च- ४६७८

नामदार न्यायमूर्ति

# काशिनाथ त्रिंबक तेलंग यांचें चरित्र

( संक्षिप्त आवृत्ति )

लेखक,

**श्रीनिवास नारायण कर्नाटकी,**

१. गुरुवर्य डॉ. सर रा. गो. भांडारकर यांचें चरित्र,
२. ना. न्या. का. त्रिं. तेलंग यांचें ( मोठें ) चरित्र,
३. डॉ. भाऊ दाजी लाड यांचें चरित्र,
या पुस्तकांचा कर्ता

किंमत एक रुपया

Printed and Published by M. N. Kulkarni at the Karnatak Press,
318A Thakurdwar, Bombay 2

## प्रास्ताविक दोन शब्द.

दोन वर्षांपूर्वी मी न्यायमूर्ति तेलंग यांचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें. तें वाचून माझ्या एक दोन मित्रांनीं मला सुचविलें कीं, चरित्रांतला तपशिलाचा भाग कांहीं कमी करून त्याला जरा संक्षिप्त स्वरूप दिल्यास त्याचा विद्यार्थिवर्गास फार उपयोग होईल. त्याप्रमाणें संक्षिप्त आवृत्तीचा हस्तलेख मी तयार केला व सुमारें सहा महिन्यांपूर्वी मुंबई युनिव्हर्सिटीचे मुख्य अधिकारी, मेहेरबान रजिस्ट्रार साहेब, यांना पत्र लिहून विनंति केली कीं, सदरील माझें पुस्तक अभ्यास-मंडळापुढें ( बोर्ड ऑफ स्टडीज पुढें ) ठेवावें व त्यांनीं तें पसंत केल्यास मॅट्रिक्युलेशन परीक्षेकरितां तें कृपा करून नेमावें. त्याप्रमाणें युनिव्हर्सिटीनें हें संक्षिप्त चरित्र पुढील सालच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेकरितां नेमलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

मूळ चरित्रांतील, फक्त विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें कमी करतां येण्यासारखा तपशील असेल तेवढाच कमी केला आहे. बाकी मुख्य व महत्वाचा भाग संक्षिप्त चरित्रांत कायम ठेवण्यांत आला आहे.

रास्ते पेठ, पुणें,<br>
ता. २ एप्रिल १९३१.

श्री. ना. कर्नाटकी.

---

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा



कै. ना. न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग,

C.I.E., M.A., LL.B., Advocate

जन्म—ता. ३०-८-१८५० ] [ निधन—ता. १-९-१८९३

# ना. न्या. का. त्रिं. तेलंग
## यांचें
# संक्षिप्त चरित्र.

### प्रकरण पहिलें.
## बालपण आणि अभ्यास.

न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग हे दिवंगत होऊन आज अडतीस वर्षें झालीं. म्हणजे तेव्हांपासून आतांपर्यंत दोन पिढ्यांचा काल निघून गेला आहे. एवढ्या कालावधींत हिंदुस्थान देशाच्या स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. न्या. तेलंग हे एक मुंबईच्या हायकोर्टांतील नामांकित न्यायाधीश होते इतकेंच नसून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत ज्या कांहीं थोर पुरुषांनीं देशाभिमानानें प्रेरित होऊन आमच्या मुंबई इलाख्यांत अनेक प्रकारच्या सार्वजनिक चळवळी मोठ्या उत्साहानें चालवून लोकांत अश्रुतपूर्व जागृति उत्पन्न केली, त्यांपैकीं तेलंग हे एक होते. वाङ्मयक्षेत्रांतली तेलंगांची कामगिरी तर अत्यंत उच्च दर्जाची असून ती कायम स्वरूपाची आहे. त्यामुळें त्यांची आधुनिक काळांतील महापुरुषांत सर्वतोमुखीं गणना झालेली आहे. अशा पुरुषाचें चरित्र तरुण पिढींतील सर्व लहान थोर माणसांनीं लक्षपूर्वक वाचून तोच कित्ता आपल्यापुढें ठेवून वागल्यास हरएक दृष्टीनें त्यांचें कल्याण झाल्याशिवाय राहणार नाहीं.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

काशीनाथपंत यांचा सन १८५० सालीं तारीख ३० आगष्ट रोजीं एका मध्यम स्थितींतल्या संभावित अशा सारस्वत ब्राह्मणकुलांत जन्म झाला. त्या दिवशीं गोकुल अष्टमी होती. काशीनाथपंत यांचे आजोबा रामचंद्रपंत. त्यांस चार मुलगे होते. त्रिंबकराव, बापुभाई, नानाभाइ व चवथा एक. त्यांपैकीं शेवटचे दोन पूर्वींच मृत झाले होते. बापुभाई यांना दोन मुलगे, एक कृष्णराव व दुसरे काशीनाथपंत. म्हणजे बापुभाईंचे काशीनाथपंत हे द्वितीय अपत्य होत. त्रिंबकरावांना पुत्रसंतान नव्हतें. म्हणून त्यांनीं काशीनाथपंतांना दत्तक घेतलें. त्यामुळें ते पुढें काशीनाथ त्रिंबक तेलंग या नांवानेंच प्रसिद्धीस आले.

काशीनाथपंतांचे कोणी एक पूर्वज एकोणिसाव्या शतकाच्या आरंभास गोव्यांतून मुंबईत कांहीं धंदा पहाण्याकरितां आले होते. पुढें बऱ्याच पिढ्या गेल्यावर रामचंद्रपंत यांचा मुंबईतील एका इंग्लिश कंपनीशीं संबंध जुळून आला. फॉर्ब्स कंपनी म्हणून मुंबईस त्या वेळीं व्यापारी असत. त्या कंपनीशीं रामचंद्रपंतांच्या वेळेपासून तेलंगांचा—असिस्टंट मॅनेजर या नात्यानें—संबंध असे. त्रिंबकराव, बापुभाई व पुढें कृष्णराव असे तिघेहि त्या कंपनींत नोकर होते.

काशीनाथपंतांचे वडील व चुलते हे हल्लींच्या दृष्टीनें कांहीं फारसे शिकलेले नव्हते. वर सांगितलेल्या व्यापारी कंपनींत काम करण्यास पुरे इतकें त्यांचें इंग्लिश शिक्षण झालेलें होतें. परंतु ते फार सद्गुणी असून व्यवहारदक्ष व संभावित असत. काशीनाथपंतांच्या मातुश्री फार शांत व गोड स्वभावाच्या होत्या व तेच त्यांचे गुण काशीनाथपंतांमध्यें उतरले होते असें म्हणतात.

काशीनाथपंतांच्या वयास पांच वर्षें होतांच त्यांना एका गांवठी शाळेंत पाठविण्यांत आलें. ते प्रथम दिनकरपंत दांते यांच्या व मग महादेव

पंतोजी यांच्या शाळेंत जाऊं लागले. इतक्या लहान वयांत देखील काशीनाथपंतांचें आपल्या अभ्यासाकडे चांगलें लक्ष असे. त्यामुळें ते आपल्या गुरुजींचे मोठे प्यार असत. त्यांच्या वयाप्रमाणें त्यांना थट्टा मस्करी आवडत असे व इटीदांडू, आट्यापाट्या हे खेळही ते खेळत असत. फक्त त्यांना केव्हां केव्हां पोटदुखीपासून मात्र त्रास होई. असो. पण त्यांच्या लहान वयांतील बुद्धिमत्तेवरून त्यांना "बालबृहस्पति" हें नांव सहज शोभून जात असे. त्यांचा वर्गांत नंबर नेहमीं वर असे. वार्षिक परीक्षेंत बक्षीस ठरलेलें असे. त्यांच्या वेळीं रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक व रा. ब. नारायणभाई दांडेकर हे इन्स्पेक्टर होते. त्या दोघांच्याही हातून काशीनाथपंतांना अनेकदां बक्षिसें मिळालेलीं होतीं. ते दोघेही गृहस्थ काशीनाथपंतांची हुषारी पाहून कौतुक करीत असत.

काशीनाथपंतांचें मराठी शिक्षण पुरें होतांच ते वयाच्या नवव्या वर्षीं एल्फिन्स्टन हायस्कुलांत इंग्रजी शिकण्याकरितां जाऊं लागले. त्या वेळीं त्यांचे वर्गशिक्षक रा. शांताराम मंगेश धुमे हे होते, व मिस्टर डब्ल्यू. एच. स्मिथ हे प्रिन्सिपॉल असून मि. आर्देसर फ्रामजी मूस हे सुपरिंटेंडेंट होते. कांहीं दिवसांच्या अनुभवानंतर मूस शेटजींनीं "हा मुलगा पुढें प्रसिद्धीस आल्याशिवाय राहणार नाहीं" असें भविष्य केलें होतें. तें खरें ठरून पुढें तेलंग जेव्हां ॲडव्होकेट झाले, पुढारी झाले, शेट दादाभाई, मेथा यांच्या बरोबर काम करूं लागले, शेवटीं हायकोर्टाचे जज्ज झाले तेव्हां तो प्रकार पाहून मूस शेटजींना आपला एका काळचा विद्यार्थी इतक्या योग्यतेस चढला म्हणून कौतुक किंबहुना अभिमान वाटत असे. असो. काशीनाथपंत हे शाळेंत असतांना वर्गांतील अभ्यासाचींच नुसतीं पुस्तकें वाचून रहात नसत. तर त्या विषयावरील आणखी दुसरीं पुस्तकें वाचून ते आपलें ज्ञान वाढवीत असत. याचा परिणाम अर्थात् वर्गांत गुरुजींनीं

विचारलेल्या प्रश्नांस काशीनाथपंत जीं उत्तरें देत असत त्यांवरून स्पष्ट दिसत असे. अशा अभ्यासी मुलाबद्दल गुरुजींना कौतुक वाटल्यास नवल काय ? ही जी अभ्यास करण्याची संवय काशीनाथपंतांनीं अगदीं लहान वयापासून आपल्यास लावून घेतली तीच पुढें त्यांच्या बुद्धीच्या विकासास व कार्यक्षमतेस कारणीभूत झाली. शाळेंत कोणतेंही काम निघो, विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें त्या कामासंबंधानें काशीनाथपंतांची तयारी नाहीं असें सहसा कधीं घडलें नाहीं. त्यामुळें विशेषतः परीक्षेच्या वेळीं अभ्यास फार म्हणून अगर वेळ थोडा म्हणून त्यांची केव्हांही धांदल उडाली नाहीं. उलट केव्हां केव्हां ऐन परीक्षेच्या दिवसांत किंवा परीक्षेच्या एकदोन दिवसांपूर्वी ते बुद्धिबळें खेळत असल्याचेंही आढळून येत असे ! सन १८६१ सालीं मिडल स्कूलच्या परीक्षेंत त्यांना इंग्रजी भाषेंतील प्रावीण्याबद्दल एक बक्षिस मिळालें ! त्या बक्षिससमारंभाचे वेळीं इंग्रजी कविता म्हणण्याचे कामीं काशीनाथ-पंतांचीच निवड करण्यांत आली होती. त्यांची कविता म्हणण्याची रीत जमलेल्या मंडळीस पसंत पडून सर्वांनींच त्यांचें कौतुक केलें. मिस्टर एडमंड बर्क हे त्या वेळीं प्रिन्सिपॉल होते. त्यांनीं या मुलाची हुषारी पाहून त्याला—काशीनाथपंतांना—एकदम मध्यें एक वर्ग टाकून वर—तिस-रींतून पांचवींत—चढविलें! पुढील वर्षीं—सन १८६२ मध्यें—देखील परीक्षेंत काशीनाथपंतांना पुन्हां बक्षीस मिळालें. याच सुमारास त्यांना मराठी कवितेची गोडी लागली आणि ती कविता चांगली समजण्याकरितां संस्कृत शिकलें पाहिजे असें त्यांना आढळून आलें. तेलंग पुढें जे मराठी व संस्कृत कवितेमध्यें प्रवीण किंवा वर्डस्वर्थ–टेनिसनच्या कवितेचे रसिक मर्मज्ञ म्हणून प्रसिद्ध झाले, त्याचें मूळ येथें सांपडतें. असो. संस्कृत शिकलें पाहिजे असें एकदां मनानें ठरवल्याबरोबर तेलंग त्या उद्योगास लागले व त्या कामीं त्यांना त्यांचे मित्र व सहाध्यायी श्रीपाद बाबाजी ठाकूर यांची

थोडीशी मदत झाली. उभयतां मग यज्ञेश्वर चिमणाजी शास्त्री सुरतकर यांच्याकडे संस्कृत शिकण्याकरितां जाऊं लागले. त्या वेळीं संस्कृत शिकण्याची हल्लींच्यासारखी सोय नव्हती. फक्त हॉवर्डच्या प्रायमरचें संस्कृतांत केलेलें भाषांतर शिकावें लागे. पण तेवढ्यानें तेलंगांचें समाधान होत नसे. सबब त्यांनीं बापुशास्त्री यांच्या वर्गांत जाऊन पाणिनीचीं सूत्रें म्हटलीं व खासगी रीतीनें लघु कौमुदी व इतर कांहीं संस्कृत पुस्तकें यांचा अभ्यास केला. त्यामुळें शाळेंत त्यांचे इंग्लिश व संस्कृत हे दोन विषय उत्तमपैकीं असत. फक्त ह्यांचा गणित हा विषय मात्र जरा कच्चा असे. त्या वेळीं हायस्कुलांत विनायक जनार्दन बापट व नारायण महादेव ऊर्फ मामा परमानंद हे दोघे शिक्षक होते. त्यांनीं काशीनाथपंतांना गणित विषयांत मदत केल्यामुळें ह्यांची बरीच सोय झाली. तेलंग हे जात्याच बुद्धिमान् असल्यामुळें कोणताही विषय त्यांतील एकदां खुब्या समजल्यावर त्यांना आपलासा करून घेण्यास मुळींच उशीर लागत नसे. त्यामुळें ते थोड्याच दिवसांत गणित विषयांत देखील चांगले तरबेज झाले. फक्त त्यांचें व्यायामाकडे अगर मोकळ्या हवेंत खेळण्याकडे मात्र असावें तितकें लक्ष नसे. अगदीं लहान वयांत ते इटीदांडू वगैरे खेळ खेळत असत. पण पुढें बुद्धीच्या विकासाकडे जसें त्यांचें जास्त जास्त लक्ष लागूं लागलें, तसें शरीरसामर्थ्य वाढविण्याकडे लागलें नाहीं. असो.

याप्रमाणें अभ्यास करून काशीनाथपंत हे सन १८६४ या सालीं मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्या परीक्षेंत ते व ठाकूर हे दोघे संस्कृत घेऊनच पास झाले. संस्कृत ही दुसरी भाषा घेऊन मॅट्रिक परीक्षेंत पास झालेले तेलंग व ठाकूर हेच पहिले विद्यार्थी होत ! त्या वेळीं हायस्कुलांत मिस्टर जेफ्रेसन हे प्रिन्सिपॉल होते. त्यांनीं काशीनाथपंतांना प्रो. मॅक्समुल्लरचा “ संस्कृत वाङ्मयाचा इतिहास ” हें पुस्तक बक्षीस दिलें.

तेलंग हे हायस्कुलांत शिकत असत तेव्हां त्यांचे कांहीं जिवलग मित्र असत. काशीनाथपंत हे स्वभावानेंच मोठे आनंदी व प्रेमळ असल्यामुळें त्यांचें सर्वांशींच जमत असे. तरी त्यांची हायस्कुलांत पांच सहा जणांची जूट असे. काशीनाथ ( तेलंग ), श्रीपाद ( ठाकूर ), गजानन ( भाटवडेकर ), रावजी ( तुल्लु ), व जमशेटजी ( दलाल ) हे सगळेच जण एकमेकांशीं फार मित्रत्वानें वागत असत व एकमेकांस शक्य ती मदत करीत असत. त्यांत मग कॉलेजांत अहमदाबादेहून अंबालाल ( देसाई ) येऊन मिळाले. पारशी व गुजराथी हिंदु विद्यार्थी यांचें काशीनाथपंतांच्या इतकें दुसऱ्या कोणीच दक्षिणी हिंदूनें प्रेम संपादन केलें नव्हतें. ह्या सर्व मंडळीमध्यें हुशार असे तेलंगच असत. आठवड्याच्या किंवा महिन्याच्या नेहमीं परीक्षेंत त्यांचाच नंबर वर असे, पण त्याबद्दल कोणालाच विशाद अगर मत्सर वाटत नसे. कारण तेलंगांचा वर नंबर येणार हें ठरल्यासारखेंच असे.

तेलंग हे वर्गांतील केवळ अभ्यासाचींच तेवढीं पुस्तकें वाचून तृप्त राहात नसत हें मागें सांगितलेंच आहे; त्यामुळें त्यांचें शाळेंतल्या वेळेपासूनच विस्तृत वाचन असे. त्यांच्या वेळीं एक बोहरी पुस्तकविक्र्या जुन्या पुस्तकांचें ओझें पाठीशीं बांधून दररोज यावयाचा व हायस्कूलमधील बाहेरच्या बाजूस जिन्याच्या पायथ्याशीं ठाणें मांडून बसावयाचा. कांहीं विद्यार्थी त्याचीं गिऱ्हाइकें असत. त्यांची अशी रीत असे कीं, एकाद्या विद्यार्थ्यानें त्या पुस्तकविक्र्याकडचें एकादें इंग्रजी पुस्तक—एकादी कादंबरी, किंवा कविता अगर एकादें चरित्र—आठ किंवा दहा आण्यांला विकत घ्यावयाचें आणि तें वाचून झाल्यावर दुसऱ्या दिवशीं तें पुस्तक बदलून दुसरें घ्यावयाचें व त्याबद्दल फक्त एक आणा द्यावयाचा ! या

सवलतीचा काशीनाथपंतच खूप फायदा घेत असत. त्यामुळें त्यांचें इंग्रजी वाङ्मय बरेंच वाचून होई.

याप्रमाणें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण पुरें होऊन परीक्षा पास झाल्यावर सन १८६५ पासून काशीनाथपंत हे एल्फिन्स्टन कॉलेजांत जाऊं लागले. त्या वेळीं कॉलेजांत ह्यूलिंग्स, कँडी, हैन्स, बुल्हर व ऑग्झेनहॅम हे प्रोफेसर होते. काशीनाथपंतांना पहिल्याच वर्षीं जुनियर स्कॉलरशिप मिळूं लागली व पुढच्याच वर्षीं एप्रिलमध्यें त्यांना सीनियर स्कॉलरशिप मिळाली. सन १८६६ या वर्षीं त्यांची एफ्. ए. ची परीक्षा पास होऊन त्यांना आणखी एक स्कॉलरशिप, "राजा ऑफ धार" च्या नांवाचें बक्षिस व इंग्लिशमध्यें "गणपतराव विठ्ठल"चें बक्षीस इतकीं पारितोषिकें मिळालीं. सन १८६६ सालच्या परीक्षेंत डॉ. भांडारकर हे संस्कृतचे परीक्षक होते. संस्कृतच्या परीक्षेंतील प्रश्नांचीं उत्तरें काशीनाथपंतांनीं समाधानकारक रीतीनें दिलेलीं पाहून डॉ. भांडारकर फार खुष झाले व त्यांना त्या तरुण विद्यार्थ्याच्या हुशारीबद्दल कौतुक वाटलें. असो. सन १८६७ मध्यें म्हणजे आपल्या वयाच्या सतराव्या वर्षीं काशीनाथपंत बी. ए. च्या परीक्षेंत पास झाले व सन १८६९ सालीं ते इंग्लिश व संस्कृत घेऊन एम्. ए. झाले. पुढें सहाच महिन्यांनीं त्यांनीं "भगवानदास पुरुषोत्तमदास" संस्कृत स्कॉलरशिपची परीक्षा देऊन ती स्कॉलरशिप मिळविली. त्या वेळीं ही परीक्षा विशेष महत्वाची गणली जात असून ती फार कठीण असे. असो. त्याच सालीं त्यांची एल्एल्. बी. ची परीक्षा पास होऊन त्यांनीं दोन्ही—एम्. ए. व एल्एल्. बी. या पदव्या एकदमच घेतल्या. मध्यंतरीं सन १८६८ सालीं ते एल्फिन्स्टन हायस्कुलमध्यें वासुदेव गोपाळ सोमण यांच्या जागीं दोन महिने संस्कृतशिक्षकाचें काम करीत होते, पण इतक्यांत चॅटफील्ड साहेबांनीं त्यांची एल्फिन्स्टन

कॉलेजांतील सीनियर फेलोच्या जागेवर नेमणूक केल्यामुळें तेलंगांना तिकडे जावें लागलें. तिकडे त्यांनीं शिकविण्याचें काम करून हायकोर्टांत ॲडव्होकेटच्या परीक्षेच्या टर्म्स भरण्यास सुरवात केली. त्या वेळीं ॲडव्होकेटची विशेष प्रकारें परीक्षा घेण्यांत येत असे. ती परीक्षा सन १८७२ मध्यें काशीनाथपंत उत्तम प्रकारें पास होऊन ते ॲडव्होकेटच्या धंद्यास लायक झाले. याप्रमाणें सन १८६७ पासून १८७२ पर्यंत काशीनाथपंतांनीं कॉलेजांत फेलोच्या जागीं काम करून ॲडव्होकेटची परीक्षा दिली व ती पास होतांच सन १८७२ मध्यें ते हायकोर्टांत आपला धंदा करूं लागले.

काशीनाथपंतांचा कॉलेजांतील अभ्यासक्रम कशा प्रकारें चालला होता यासंबंधानें इकडे चार शब्द लिहिले पाहिजेत. कॉलेजांतील अभ्यासाचा काल हा अनेक दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाचा असतो. त्या कालांत ज्या संवयी लागतात, जीं ध्येयें ठरतात, जे स्नेह जमतात, जे गुण संपादन केले जातात, त्यांचा बहुतेक पुढील सर्व आयुष्यक्रमावर परिणाम होण्याचा संभव असतो. म्हणजे ती मनुष्याच्या विद्यार्थीदशेंतील एक चांगली संधि असते. तिचा सदुपयोग करणें हें प्रत्येक विद्यार्थ्याचें कर्तव्य आहे. या दृष्टीनें पाहिल्यास काशीनाथपंतांचा कॉलेजांतील अभ्यासाचा काळ हा अत्यंत महत्वाचा होता यांत शंका नाहीं. न्या. तेलंग हे आपल्या महाराष्ट्रीय लोकांपैकीं आधुनिक कालांतील एक अत्यंत विद्वान्, थोर व कर्तबगार असे पुरुष होऊन गेले. त्यामुळें त्यांची तरुणपणांतील अभ्यासाची रीत, त्यांनीं त्या वयांत आपल्यास लावून घेतलेल्या चांगल्या संवयी, वगैरे गोष्टींकडे आमच्या तरुण लोकांचें जितकें लक्ष जाईल तितकें चांगलें. सर्वांनाच तेलंगांसारखें होतां येईल असें नाहीं. परंतु

त्यांचें उदाहरण नजरेपुढें ठेवून वागल्यास त्यापासून तरुण पिढींतील कोणत्याही माणसाचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

काशीनाथपंतांच्या वेळीं इंग्रजी शिक्षणपद्धत इकडे सुरू होऊन थोडेच दिवस झालेले असल्यामुळें ती बाल्यावस्थेंत होती व अशा वेळीं हॉवर्ड, सर अलेग्झँडर ग्रँट, वर्डस्वर्थ, चॅटफील्ड वगैरे सारखे विद्वान् व उदारमनस्क प्रोफेसर लोक आमच्या मंडळींस लाभल्यामुळें ते त्यांना अत्यंत सहानुभूतीनें वागवून हरएक प्रकारें प्रोत्साहन देत असत. तेलंग कॉलेजांत गेले तेव्हां प्रथम कांहीं दिवस ह्यूलिंग्स साहेब हे प्रिन्सिपॉलच्या जागीं होते. ते नुसते विद्वान् होते इतकेंच नसून त्यांची कल्पनाशक्ति देखील दांडगी होती. त्यांचा सहवास व संभाषण हीं नेहमीं अत्यंत प्रोत्साहक असत. त्याचा तेलंगांना बराच फायदा मिळाला. ह्यूलिंग्स नंतर चॅटफील्ड प्रिन्सिपॉल झाले. ऑक्सफर्डहून आलेला खराखुरा प्रोफेसर कसा असतो किंवा कसा असावा हें चॅटफील्ड साहेबांनींच आपल्या उदाहरणानें विद्यार्थीवर्गास चांगल्या रीतीनें दाखविलें. मुलांना शिकविण्याची त्यांना इतकी हौस असे कीं, ते विद्यार्थ्यांना सुटीच्या दिवसांत देखील बोलावीत असत, व तासाचे तास एका बैठकीस शिकवीत असत. तें इतकें कीं, बेकन व ग्रीक तत्त्वज्ञमंडळ यांच्या संबंधानें ते साहेब इतकीं टिपणें देत असत कीं, त्यांनीं वह्यांवर वह्या भरून जाव्यात. सुशिक्षणाचें खरें लक्षण म्हणजे साधा पोषाख, विनयशील वर्तन व केवळ ऐहिक ( प्रापंचिक ) गोष्टींकडे दुर्लक्ष हें चॅटफील्ड साहेबांनींच आपल्या विद्यार्थ्यांस शिकविलें. त्यांनीं आपल्या शिकविण्यानें व वर्तनानें विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा हें उत्तम रीतीनें दाखवून त्यांचें शील व नैतिक वर्तन यांना इष्ट प्रकारचें वळण दिलें. सारांश, विस्तृत वाचन व शिकस्तीचा उद्योग करण्याची आवड या

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

गोष्टी विद्यार्थ्यांस चॅटफील्ड साहेबांनींच शिकविल्या. अर्थात् या सर्व शिकविण्याचा काशीनाथपंतांना फायदा मिळाला होता.

कित्येकांची अशी समजूत झालेली आहे कीं, तेलंगांचा कॉलेजांतील अभ्यासक्रम चांगलासा नसावा. कारण ते आपल्या बी. ए. व एम्. ए. परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झाले. पण ती समजूत चुकीची आहे, असें तेलंगांच्या दोन सहाध्यायी मित्रांनींच प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून स्पष्ट दिसतें. एम्. ए. परीक्षा पास झाल्यावर सहाच महिन्यांनीं त्या वेळीं अत्यंत कठीण म्हणून समजली गेलेली परीक्षा देऊन तेलंग हे "भगवान्दास पुरुषोत्तमदास" स्कॉलर झालेच होते. त्यावरून केवळ परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाल्या नाहींत म्हणून काशीनाथपंतांचा कॉलेजांतील अभ्यासक्रम चांगला नव्हता असें म्हणतां येत नाहीं. त्यांच्या दोन मित्रांनीं दिलेल्या माहितीवरून पाहतां काशीनाथपंतांचा अभ्यासक्रम अगदीं सीधा व उत्तम असे, आणि प्रोफेसर लोकांचें त्यांच्या उद्योगशीलतेविषयीं, बुद्धिमत्तेविषयीं व वर्तणुकीविषयीं उत्तम मत असे. इतकेंच नव्हे, तर त्यांपैकीं एक मित्र ( दलाल ) तर म्हणतात कीं, ज्या गुणांच्या विकासामुळें तेलंग पुढें एक विद्वान् व कार्यक्षम पुढारी म्हणून प्रसिद्धीस आले, त्या गुणांचीं पूर्वचिन्हें त्यांच्या विद्यार्थीदशेंतच दृग्गोचर झालीं होतीं !

काशीनाथपंतांचे ठिकाणीं कांहीं विशिष्ट प्रकारचे गुण होते असें त्यांच्या मित्रांनीं आपल्या ( कॉलेजांतील ) अनुभवावरून सांगितलें आहे. त्यांचा इकडे जरूर उल्लेख केला पाहिजे. उद्योगशीलता अगर अभ्यासी स्वभाव हा तेलंगांमधला **पहिला** गुण होता. कॉलेजांत असतांना मधल्या सुटींत किंवा रिकाम्या तासांत इतर विद्यार्थी खेळ खेळत असत अगर गप्पा मारीत असत. पण तेलंग त्या वेळांत नेहमीं एखादें इंग्रजी नाटक किंवा कादंबरी वाचीत बसलेले असत ! याप्रमाणें मधून मधून

थोडी थोडी फुरसत मिळत असे तिचा उपयोग करून कॉलेजांतील पहिल्या दोन वर्षांत तेलंगांनीं स्कॉट, लिटन, डिकन्स व थॅकरे यांच्या सर्व कादंबऱ्या व शेक्सपियर व बेन जॉन्सन यांचीं सर्व नाटकें वाचून टाकलीं ! इतकें वाचन करून पुन्हां मधून मधून मित्रांशीं थट्टा, विनोद हे तेलंगांचे प्रकार चालतच असत !

काशीनाथपंतांमधला **दुसरा** गुण म्हणजे चित्ताची एकाग्रता राखण्याची त्यांना साधलेली हातोटी. त्यांचा अभ्यास चालला असला म्हणजे त्याच खोलींत कोणी गोंगाट केला अगर दुसऱ्या प्रकारानें त्रास दिला अशी त्यांनीं कधीं तक्रार केली नाहीं व एका विषयांतून दुसऱ्या विषयांत मन घालतांना अगर खेळांतून मन काढून अभ्यासाकडे वळवितांना त्यांना मुळींच प्रयास पडत नसत.

ईश्वरदत्त तैलबुद्धि हा तेलंगांमधला **तिसरा** गुण होता. त्या गुणामुळें त्यांना शाळेंत किंवा कॉलेजांत कोणताच विषय अवघड वाटत नसे. वास्तविक गणित हा विषय पहिल्यानें त्यांच्या आवडीचा नव्हता; पण त्यांतील शिक्षकांनीं एकदां खुब्या समजून सांगितल्यावर तेलंग हे सहज त्याही विषयांत तरबेज झाले व त्या विषयासंबंधानें त्यांना पुढें कधींच अडचण वाटली नाहीं.

त्यांचा **चवथा** गुण म्हणजे त्यांची स्मरणशक्ति होय. एकदां प्रोफेसर व्हूलिंग्स यांनीं विद्यार्थ्यांना वर्गांतल्या वर्गांत एक पाठ तयार करून म्हणावयास सांगितला. ठाकूरनीं ( श्रीपादराव ) तो सात मिनिटांत म्हटला. तेलंगांनीं पंधरा मिनिटांत म्हटला. नंतर बाकीच्या विद्यार्थ्यांनीं !

तेलंगांमधला **पांचवा** गुण म्हणजे त्यांच्या बोलण्यांत स्पष्ट दिसून येणारा कोणत्याही असभ्य अगर ग्राम्य भाषेचा अभाव, हा होय. त्यांना

थट्टा, विनोद वगैरे आवडत असे. पण तरुण, हूड स्वभावानुसार एकादी शिवी, अपशब्द किंवा ग्राम्य कल्पना अशी त्यांच्या बोलण्यांत कधींच दिसून आली नाहीं.

अगदीं निगर्वी स्वभाव हा तेलंगांमधला **सहावा** गुण होता. त्यांची " एक हुषार विद्यार्थी " अशी प्रथमपासूनच प्रसिद्धी होती. त्यांचे सर्वच विषय चांगले; त्यांत इंग्लिश व संस्कृत यांविषयीं तर बोलायलाच नको. त्यांतूनही त्यांचें इंग्लिश तर नेहमींच चांगलें असे. त्यांचे निबंध व इतर लेखी काम यांविषयीं प्रोफेसर लोक नेहमीं तारीफ करीत असत. पण त्यामुळें त्यांना गर्वाची पीडा कधींच झाली नाहीं ! त्यांचें इंग्लिश नेहमीं उत्तमच असल्यामुळें इतर पुष्कळ विद्यार्थी येऊन त्यांना आपल्या शंका विचारीत असत. पण तेलंगांनीं कधीं कोणास " नाहीं " म्हटलें नाहीं कीं, कधीं कोणाजवळ आपल्या हुषारीचा त्यांनीं तोरा मिरविला नाहीं !

एकंदरींत त्यांच्या एका सहाध्यायी मित्रांनीं सांगितल्याप्रमाणें काशीनाथपंतांचें मन फार उदार व प्रेमळ असे. कॉलेजांत असतांना तर ते सर्वांशीं प्रेमानें वागतच, पण कॉलेजांतील संबंध तुटल्यावरसुद्धां तेलंग आपल्या जुन्या मित्रांना कधीं विसरले नाहींत. काशीनाथपंत मग मोठ्या पदवीस चढले व मुंबईचे एक प्रमुख पुढारी झाले. पण त्यांच्या पूर्वीच्या मित्रांपैकीं कोणास त्यांच्या साहाय्याची गरज लागल्यास त्याला त्यांचा अनेकदां उपयोग झालेला आहे. फार काय, पण मित्रांचीं कामें त्यांना न कळतसुद्धां तेलंगांकडून केव्हां केव्हां परस्पर बिनबोभाट झाल्याचीं उदाहरणें आहेत ! इतकी उदारबुद्धि व सौजन्य अगदीं विरळा ! असो.

एकंदरींत काशीनाथपंतांचा विद्यार्थीदशेंतील अभ्यासक्रम उत्तमच नव्हे, तर केवळ असामान्य होता. १४ वे वर्षीं मॅट्रिक; १७ वे वर्षीं बी. ए.;

१९ वे वर्षी एम्. ए.; २० वे वर्षी एल्एल्. बी. आणि २२ वे वर्षी ॲडव्होकेट ! ह्यामुळें तेलंगांची अभ्यासाची रीत, त्यांची तीव्र ज्ञान-लालसा, त्यांचें मित्रांशीं वर्तन वगैरे गुण अनुकरण करण्यासारखे आहेत यांत शंका नाहीं.

---

प्रकरण दुसरें.

## तयारी व ध्येयें.

काशीनाथपंतांच्या चरित्राच्या पूर्वभागांतील अत्यंत महत्त्वाची व विचार करण्यासारखी कोणती गोष्ट असेल तर ती त्यांनीं आपल्या पुढील आयुष्यक्रमासंबंधीं उच्च ध्येयें ठरवून तीं गांठण्याकरितां केलेली तयारी होय. तीं ध्येयें व ती तयारी हीं दोन्ही विद्वत्वसूचक होतीं. वस्तुतः त्यांच्या कुटुंबांत असा विद्वान् व अशीं मोठमोठीं सार्वजनिक कामें केलेला पुरुष पूर्वीं होऊन गेल्याचा दाखला नाहीं. म्हणजे तेलंगांपुढें आपल्या घरचेंच असें पूर्वींचें उदाहरण नव्हतें. तरी त्यांना आपल्यापुढें उच्च ध्येयें ठेवण्याबद्दलची केवळ स्वयंस्फूर्तीनें बुद्धि झाली व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या आयुष्यांत उच्च अशा अनेक बौद्धिक भराऱ्या मारल्या व मोठमोठीं सार्वजनिक कामें करून ते श्रेष्ठत्व पावले. असो. कॉलेजांत शिकत होते तेव्हांपासूनच त्यांच्या पुढें बाळ मंगेश वागळे व महादेव गोविंद रानडे ह्यांचीं उदाहरणें असल्यामुळें त्यांच्याप्रमाणें ॲडव्होकेट होऊन स्वतंत्र धंदा करावयाचा हें तेलंगांनीं आधींच ठरविलें होतें. हा त्यांचा निश्चय इतका पक्का ठरला होता कीं, त्यामुळें त्यांनीं सरकारी नोकरी आपण होऊन त्या वेळीं चालत आलेली 'नको' म्हटली! सन १८७१ मध्यें मि. पील

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

हे मुंबईचे " डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन " च्या हुद्यावर होते. त्यांनीं महाराष्ट्रांत एक व गुजराथेंत एक अशीं दोन हायस्कुलें स्थापन करण्याचें ठरविलें होतें. व त्यांनीं तेलंग व दलाल यांना मुद्दाम बोलावून त्यांना त्या हायस्कुलावरील दरमहा रु. ३०० पगाराच्या हेडमास्तराच्या जागा देऊं केल्या. एक जागा दलाल यांनीं पतकरली. दुसरी तेलंगांनीं नाकारली ! तरी पील साहेबांनीं तेलंगांना पुन्हां स्वदस्तूरचें पत्र लिहून " जागा रु. ५०० ची लवकरच व्हावयाची आहे, तर नको म्हणूं नका, " असें सांगितलें. तरी ती तेलंगांनीं नाकारलीच !

काशीनाथपंतांचें असें मत होतें कीं, " मनुष्यानें आपल्या उदरनिर्वाहाचें साधन म्हणून कांहींतरी धंदा करून बाकीच्या वेळांत त्यानें उपयुक्त असा सार्वजनिक व्यवसाय केला पाहिजे. नाहींतर त्याचें जीवित व्यर्थ होय. उदरंभर व्यवसायापेक्षां कांहींतरी उपयुक्त कार्य करणें त्याचें कर्तव्य आहे, व त्यानें तें बजावलें पाहिजे. " याप्रमाणें तेलंग स्वतः आपलें कर्तव्य बजावीत असत व तें उत्तम रीतीनें बजावीत असत.

" स्वतंत्र धंदा व सार्वजनिक कामें ", अशीं आपलीं ध्येयें ठरविल्यावर तेलंग तीं गांठण्याकरितां उत्तम तयारी करण्याच्या उद्योगास लागले. या कामाला विस्तृत वाचन व परिश्रमपूर्वक अभ्यास यांचीच अत्यंत जरूर होती, व त्याला तेलंगांनीं बी. ए. ची परीक्षा झाल्यावर सुरवात केली ! प्रथम त्यांनीं मनाची एकाग्रता साधण्याची संवय व्हावी म्हणून कांहीं दिवस भूमिति व बीजगणित यांतील प्रश्न सोडविण्याचा क्रम ठेविला. तें झाल्यावर त्यांनीं Chillingworth's "Religion of Protestants" या ग्रंथाचे दोन मोठाले खंड घेतले. ते त्यांनीं नुसते वाचून फेंकून दिले, असें न करतां त्यांनीं त्यांतील सारांश साधकबाधक प्रमाणांसह

आपल्या भाषेंत लिहून काढला ! नंतर त्यांनीं प्लेटोचे संवाद घेतले. त्यांचादेखील त्यांनीं वरीलप्रमाणेंच सारांश काढून अभ्यास केला. तदनंतर त्यांनीं डॉक्टर स्ट्रॉस्स ( Strauss ) यांचा बायबलवरील टीका-ग्रंथ घेतला. तो वाचून झाल्यावर काशीनाथपंतांनीं भगवद्गीता घेतली. ती त्यांनीं वाचून तिचें मर्म समजून घेण्याचा यत्न तर केलाच, पण तिचें रहस्य मनांत पक्कें बिंबावें म्हणून तिचें त्यांनीं इंग्रजींत पद्यात्मक भाषांतर केलें. म्हणजे तेलंगांनीं इकडे एका कामांत दोन कामें साधून घेतलीं ! त्यांचा गीतेचा उत्तम अभ्यास झाला व इंग्रजी भाषेवरचें त्यांना प्रभुत्व संपादन करतां आलें. त्यानंतर तेलंगांनीं ब्रह्मसूत्रांवरील शाङ्करभाष्य घेतलें. या ग्रंथाच्या अभ्यासानें तेलंगांमध्यें बरीच विचार-जागृति होऊन त्यांचीं धर्मसंबंधाचीं पूर्वीचीं मतें पुष्कळच बदललीं. असो. हा सर्व विशेष प्रकारचा अभ्यास तेलंगांनीं एम्. ए. ची परीक्षा पास होण्यापूर्वीं केला होता हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ती परीक्षा झाल्यानंतर त्यांनीं मनास अधिक शिस्त लावण्याकरितां म्हणून जास्तच खडतर अभ्यास सुरू केला. यांत त्यांचा हेतु एवढाच कीं, एकाद्या विषयाचा आपणांस सर्व बाजूंनीं विचार करण्याची संवय लागावी व आपल्या चिकित्सक बुद्धीला ( critical faculty ) अधिक कुशाग्रता यावी. याकरितां तेलंगांनीं प्रथम जॉन स्टुअर्ट मिल्ल याच्या ग्रंथांचें परिशीलन आरंभिलें. याचा परिणाम असा झाला कीं, तेलंगांचें मन मिल्लच्या कल्पनांनींच भरून गेलें. फार काय, पण त्यांची साधी आणि शुद्ध इंग्लिश भाषा, त्यांची बिनतोड विवेचन-शक्ति व त्यांच्या लेखांतून व भाषणांतून दिसून येणारी त्यांना आपली बाजू निःसंदिग्ध रीतीनें मांडण्याची साधलेली हातोटी हीं सर्व मिल्लच्याच ग्रंथांच्या अभ्यासाचीं फळें होत, असें कै. चंदावरकरांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. मिल्ल नंतर तेलंगांनीं हक्स्ले, टिंडल, हर्बर्ट स्पेन्सर यांचे ग्रंथ

लक्षपूर्वक वाचले. त्यांपैकीं स्पेन्सरचे ग्रंथ तर त्यांना फारच आवडत असत. तदनंतर त्यांनीं डार्विनचेही कांहीं ग्रंथ वाचले.

काशीनाथपंतांची अशी पद्धत होती. ते एकादा ग्रंथ वाचूनच तृप्त रहात नसत. त्या ग्रंथाचें मर्म समजून घेण्याकरितां ते त्याच कर्त्याचे दुसरे ग्रंथ वाचीत असत. इतकेंच नव्हे, तर एकाद्या विषयाची एक बाजू दाखविणारे ग्रंथ त्यांनीं वाचले म्हणजे त्याच विषयाची दुसरी बाजू समजून घेण्याकरितां ते त्या बाजूचे मग ग्रंथ वाचीत असत. ही अभ्यासाची रीत अनुसरल्याचा असा परिणाम होई कीं, तेलंगाचीं कांहीं भाषणें व लेख मुद्देसूदपणा व निरुत्तर कोटिक्रम यांनीं इतके भरलेले असत कीं, ते वाचून प्रतिपक्षी, तो कोणीही असला तरी, चीतच होत असे ! याचीं उत्तम प्रत्यंतरें म्हणून तेलंगांचें " इल्बर्ट बिल " वरील भाषण व " रामायण-होमर " आणि " गीता—बायबल " यांवरील दोन विस्तृत निबंध हे केव्हांहि दाखविण्यास हरकत नाहीं.

तेलंगांची आणखी एक अनुकरणीय रीत असे. दुसऱ्या वक्त्याचे विचार बरोबर समजून घेऊन ते आपणांस व्यक्त करतां येतात कीं नाहींत हें पाहण्याकरितां काशीनाथपंत कांहीं दिवस नियमानें प्रार्थनासमाजांत जात असत व तेथील व्याख्यानें, निरूपणें वगैरे लक्षपूर्वक ऐकून घरीं आल्यावर ते तीं लिहून काढीत व मग तीं खुद्द व्याख्यात्यांना दाखवून जरूर तेथें दुरुस्त करून घेत असत ! या प्रकारच्या संवयीचा त्यांना पुढें ते सार्वजनिक कामांत पडूं लागल्यावर पुष्कळच उपयोग झाला असला पाहिजे हें उघडच आहे.

सार्वजनिक कामांत पडणाऱ्या माणसांत वक्तृत्वशक्ति असली पाहिजे, हें तेलंगांना चांगलेंच अवगत होतें. त्यामुळें ते कॉलेजांत होते तेव्हांपासू-

नच आपली वक्तृत्वशक्ति वाढविण्याचा यत्न करीत असत. सन १८६७ पासून १८७२ पर्यंत ते कॉलेजांत फेलो होते. त्या मुदतींत त्यांनीं कॉलेजच्या लायब्ररींतील सर्व पुस्तकें चाळलीं होतीं. प्रथम त्यांना कांहीं दिवस रेनॉल्डसच्या कादंबऱ्या वगैरे पुस्तकें वाचण्याचा नाद असे. पण तो पुढें सुटला व मग उपयुक्त व महत्त्वाचीं पुस्तकें वाचण्याकडे त्यांचें लक्ष लागूं लागलें. त्याचप्रमाणें ते सन १८६६-६७ च्या सुमारास विलायतेंत मोठमोठ्या प्रश्नांसंबंधानें झालेलीं ग्लॅडस्टन, जॉन ब्राइट वगैरे वक्त्यांचीं भाषणें लक्षपूर्वक वाचीत असत. तसेंच कॉलेजांत ते असतेवेळीं तिकडे किंवा अन्य ठिकाणीं ज्या सभा होत असत त्यांत तेलंग नेहमीं भाग घेत असत. आधीं त्यांचें इंग्लिश उत्तम असे. त्यांत त्यांच्या विस्तृत वाचनामुळें हरएक विषयांसंबंधीं त्यांना भरपूर माहिती असे. मागें सांगितलेल्या विशिष्ट प्रकारच्या अभ्यासानें त्यांनीं आपले ठिकाणीं कोणत्याही विषयावर विचारपूर्वक व मुद्देसूदपणानें बोलण्याची व लिहिण्याची पात्रता आणली होती. अशा अधिकाराच्या माणसावर ग्लॅडस्टन-ब्राइट यांच्यासारख्या मोठमोठ्यांच्या भाषणांचा परिणाम व्हावा व आपल्याही हातून अशींच इकडे सार्वजनिक कामें व्हावींत असें त्याला वाटावें यांत आश्चर्य नाहीं. तेलंगांचें मग वक्तृत्व वाढून सार्वजनिक कामांत त्यांचें इतकें तेज पडूं लागलें कीं, कोणी त्यांना प्राचीन रोमन वक्ता सिसिरो याची उपमा देत असत तर दुसरे कोणी तेलंगांचीं भाषणें ऐकून त्यांच्या मुखांतून जॉन ब्राइटचेंच वक्तृत्व स्रवत होतें असें म्हणत असत ! त्यांतूनहि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे तेलंग जसें इंग्लिशमध्यें चांगलें भाषण करीत असत तसे ते मराठींतही उत्तम रीतीनें भाषण करीत असत. एकदां तर त्यांनीं संस्कृतमध्यें व्याख्यान दिलें होतें असें सांगतात.

इतकी उत्तम तयारी असूनही तेलंग हे फार विनयशील असत. विचार केल्याशिवाय व मनाची खात्री असल्याशिवाय ते केवळ बोलावें म्हणून

कधींच बोलत नसत. सभेचे अध्यक्ष बोलण्याविषयीं आग्रह करीत असतांना व श्रोते त्यांचें वक्तृत्व श्रवण करण्यास उत्सुक झालेले असतांना देखील विनयानें "माफ करा" म्हणून तेलंगांनीं बोलण्याचें नाकारल्याचीं उदाहरणें आहेत.

---

प्रकरण तिसरें.

## ॲडव्होकेटचा धंदा.

सन १८७२ सालीं तेलंग जेव्हां ॲडव्होकेटची परीक्षा पास होऊन हायकोर्टांत धंदा करूं लागले तेव्हां त्या धंद्याची स्थिति त्यांच्या दृष्टीनें फारशी आशाजनक नव्हती. ॲडव्होकेट म्हणजे बॅरिस्टर हें सर्वांस माहीतच आहे. ॲडव्होकेट इकडेच परीक्षा देतात—निदान त्या वेळीं देत असत—आणि बॅरिस्टर हे विलायतेंतील परीक्षा पास होऊन येत असतात. पण धंद्याच्या दृष्टीनें दोघांचा दर्जा सारखाच. असो. तेलंग धंद्यास लागले तेव्हां हिंदी बॅरिस्टर फार नव्हते. फेरोजशहा मेथा व बद्रुद्दीन तय्यबजी हे विलायतेंतील परीक्षा देऊन मुंबईच्या हायकोर्टांत तेलंगांच्या थोड्याच दिवसांपूर्वीं बॅरिस्टरी करूं लागले होते. हिंदु ॲडव्होकेट असे फक्त बाळ मंगेश वागळे हे एकच होते. रानडे यांनीं सरकारी नोकरी पत्करली होती. अशा परिस्थितीमुळें हायकोर्टांतील सर्व बॅरिस्टरीचा धंदा युरोपीयन लोकांच्या हातांत होता. दुसरी एक गोष्ट अशी होती कीं, हिंदी बॅरिस्टर एकादा असला तरी त्याला उत्तेजन देऊन पुढें आणणारे त्या वेळीं हिंदी सॉलिसिटर नव्हते. त्यामुळें हायकोर्टांत त्या वेळीं जिकडेतिकडे युरोपीयन

बॅरिस्टरांचेंच प्राधान्य असे. तेव्हांचे प्रसिद्ध बॅरिस्टर म्हणजे स्कोबल, लॅथॅम, सार्जंट हेच होते. अशांचा जबरदस्त कोट फोडून धंद्यांत शिरकाव करूं पाहणें हें काम सोपें नव्हतें. वरील सारख्या अनुभवशीर बॅरिस्टरांपुढें काशीनाथपंत म्हणजे एक अगदींच तरुण, नुकतेच पास झालेले, अनुभवशून्य असे ॲडव्होकेट होते. तरी अशा निराशाजनक स्थितींतूनच त्यांना आपला मार्ग काढावयाचा होता.

तेलंगांच्या बाजूसही कांहीं अनुकूल गोष्टी होत्या. ते एक बुद्धिमान् व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची युरोपीयन प्रोफेसर लोक वगैरे यांजमध्यें पूर्वींच प्रसिद्धि झाली होती. दुसरें असें कीं, वेस्ट साहेबांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, तेलंगांच्या ठिकाणीं–Sympathetic faculty—स्वभावसाधर्म्य ओळखण्याची शक्ति असल्यामुळें ते धंद्याला लागल्याबरोबर थोड्याच दिवसांनीं युरोपीयन बॅरिस्टरांच्या बरोबरीनें काम करूं लागले. तशांतूनही हिंदु लॉमध्यें तर त्यांचा सर्व बॅरिस्टरांमध्यें सहज लीलेनें पहिला नंबर लागे! सारांश, सभ्यपणाची वागणूक, उद्योगक्षमता, वक्तृत्व, विनयशीलता इत्यादि त्यांच्या ठिकाणीं असलेल्या गुणांच्या योगानें ते सर्वांनाच आदरणीय वाटूं लागले. त्याच सुमारास–सन १८७२ व १८७३ सालीं–तेलंग यांचे "रामायण–होमर" व "गीता–बायबल" या विषयांवरील विद्वत्वपूर्ण निबंध प्रसिद्ध झाल्यामुळें त्यांची कीर्ति सहज युरोप–अमेरिका खंडांपर्यंतही पोंचली होती! इतकेंच नव्हे, तर **वेबर** व **लॉरिन्सर** यांच्या सारख्या प्रसिद्ध पंडितांनीं पुढें आणलेल्या तत्तद्विषयक नवीन कोड्यांना तेलंगांनीं समर्पक उत्तरें दिल्यामुळें त्यांच्या विद्वत्तेबद्दल व संस्कृत भाषाप्रवीणतेबद्दल युरोपस्थ पंडितांनींदेखील माना डोलविल्या होत्या! त्यामुळें सदर गोष्टींचा त्यांच्या धंद्यावर चांगलाच परिणाम झाला व त्यांची सर्व युरोपीयन व्यवसायबंधूंवर साहजिकच छाप बसली.

तेलंगांमध्यें आणखी एक विशेष होता. ते एक संस्कृतज्ञ पंडित होते व त्यांचें कायद्याचें ज्ञान उत्तमपैकीं होतें, या गोष्टी खऱ्या आहेत. पण ते स्वतः हिंदु असल्यामुळें धर्मशास्त्राच्या दृष्टीनें हिंदूंच्या अडचणी काय आहेत हें ते जाणत असत व त्यांच्या मनावर इंग्लिश व इतर वाङ्मय वाचून उत्तम संस्कार झालेला असल्यामुळें ते कोणत्याही गोष्टीचा उदार दृष्टीनें विचार करीत असत. तेलंगांच्या मतें हिंदुधर्मशास्त्र म्हणजे कायम ठशामध्यें बसविलेलें धर्मपुस्तक नसून त्याला वाढ आहे. त्याच्या अंगीं विकासक्षमता—growth—आहे. त्यामुळें जे नियम हजारों वर्षांपूर्वींच्या समाजास लागू पडत असत ते जशाचे तसे हल्लींच्या समाजास कसे लागू होतील ? हिंदु धर्मशास्त्र हें ज्या वेळीं रचलें गेलें त्या वेळच्या समाजस्थितीच्या दृष्टीनेंच तें रचण्यांत आलें आणि तें ठीकच होतें. पण समाजस्थितींतच जर प्रत्यहीं परिवर्तन चाललें आहे तर धर्मशास्त्रांतही तदनुसार फेरफार झाला पाहिजे हें ओघानेंच प्राप्त होतें. इतकेंच नव्हे, तर तसा वेळोवेळ फेरफार झाल्याचे धर्मशास्त्रांतच दाखले मिळतात व हिंदुस्थानांत स्वराज्यच चालू राहतें तर धर्मशास्त्राच्या नियमांत तसे फेरफार होण्याचें कामही पण चालू राहिलें असतें. तशी स्वराज्यांतल्या सारखी सवड प्रस्तुत ब्रिटिश राज्यांत मिळत नाहीं अशी तेलंगांनींच एकदां, सर हेनरी मेन याचा आधार देऊन, तक्रार केली आहे ! असो. अशा उदार दृष्टीचा तेलंगांनीं अवलंब केल्यामुळें कोणताही हिंदु लॉचा खटला असल्यास ते त्यासंबंधानें नुसतें धर्मशास्त्र अगर मूळ स्मृतीच पाहून राहत नसत, तर त्यासंबंधाच्या टीका, निबंध वगैरे सर्व उपलब्ध असलेलें वाङ्मय वाचून ते मूळधर्मशास्त्राचा उदार मनानें प्रस्तुत परिस्थितीच्या दृष्टीनें अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असत. हें सामर्थ्य तत्कालीन फारच थोड्या बॅरिस्टरांच्या अंगीं असे. हें तेलंगांचें उदार

धोरण पाहिलें व त्याप्रमाणें तें कोर्टापुढें आधार आणि प्रमाणें देऊन आपली बाजू मांडूं लागले म्हणजे जज्ज लोक खुष होऊन जात असत. अशा प्रकारचा एक " मानकुवरबाई केस " म्हणून प्रसिद्ध असलेला कज्जा सन १८७६ मध्यें हायकोर्टापुढें आला. तो अत्यंत महत्त्वाचा असून कैक दिवस चालला होता व त्यांत एका बाजूचे मि. फॅरन व मि. बद्रुद्दीन हे बॅरिस्टर असून दुसऱ्या बाजूचे मि. स्कोबल, मि. लॅथॅम व मि. तेलंग असे तीन बॅरिस्टर होते. खटला बरेच दिवस चालून तो अखेर फुलबेंचपुढें—चीफ जस्टिस सर मायकल वेस्ट्रॉप्, जस्टिस सार्जेंट व जस्टिस वेस्ट—यांच्यापुढें—निकालाकरितां आला. त्या खटल्याची हकीकत किंवा दोन्ही बाजूंच्या बॅरिस्टरांनीं पुढें आणलेले मुद्दे किंवा कोटिक्रम हे इकडे विस्तारानें देण्याचें कारण नाहीं. फक्त इतकें सांगितल्यास बस्स आहे कीं, त्या खटल्यांत स्त्रियांच्या वारसा हक्कासंबंधाचाच मुख्य प्रश्न होता. स्त्रियांच्या हक्कासंबंधानें उदार मनानें विचार करून कायद्याच्या दृष्टीनें त्यांना बरीच स्वतंत्रता ठेवल्याचा मान—हिंदुस्थानांतील सर्व हायकोर्टांचा विचार केल्यास—फक्त मुंबई हायकोर्टाचा आहे, व त्या-बद्दलचें बहुतेक श्रेय, परवां बॅरिस्टर जयकर यांनीं एकदां म्हटल्याप्रमाणें तेलंग, रानडे, चंदावरकर इत्यादि हिंदी न्यायाधीशांचें आहे ! असो. ज्या उदार धोरणानुसार तेलंगांनीं पुढें जज्ज झाल्यावर हिंदुधर्मशास्त्रीय कांहीं प्रश्नांना कायद्याचें स्वरूप दिलें, त्या धोरणाची सुरवात त्यांनीं बॅरिस्टर या नात्यानें काम करतांनाच केली होती हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सदरील " मानकुवरबाई केस " हें तेलंगांच्या त्या उदार धोरणाचेंच एक उदाहरण आहे. त्या खटल्यांतील तेलंगांच्या भाषणांत मनु, मिताक्षरा, मयूख हे सर्व आधार आलेच होते, पण हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें—मुंबई हायकोर्टाच्या आजपर्यंतच्या निवाड्याच्या दृष्टीनें—स्त्रीला वारसाहक्क आहे ह्याच त्यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दा होता. असो.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

खटल्याचें काम चालू असतांना तेलंगांच्या अंगचे कांहीं गुण—त्याची विद्वत्ता व त्यांचें वक्तृत्व—इतक्या उत्कृष्ट रीतीनें प्रकट झालें कीं, त्याबद्दल सर्वांनींच—विशेषेंकरून चीफ जस्टिस सर मायकल वेस्ट्रॉप यांनीं आपल्या आसनावरूनच उघडपणें तेलंगांची फार स्तुति केली! याचा परिणाम असा झाला कीं, हायकोर्टांत पुढें कांहीं दिवसपर्यंत वकील—बॅरिस्टर लोकांमध्यें व इतर मंडळीमध्यें तेलंगांच्या विद्वत्तेशिवाय बोलण्याचा दुसरा विषयच नव्हता. वेस्ट्रॉपसाहेब तर कोणीही चांगला मनुष्य भेटल्यास त्याच्याजवळ तेलंगांच्या हुषारीबद्दल तारीफ केल्याशिवाय राहात नसत. अर्थात् स्कोबल वगैरे बॅरिस्टर मंडळींनीं तेलंग हे पुढेंमागें हायकोर्टाचे जज्ज होतील असें जें त्याच वेळीं भाकीत केलें त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. असो. यापुढें तेलंगांचा धंदा उत्तम रीतीनें—बॅरिस्टरच्या पुढाऱ्याप्रमाणें—चालावा व त्यांची भरभराट व्हावी हें ओघानेंच प्राप्त झालें. त्यामुळें तेलंगांचें हायकोर्टांत वजन इतकें वाढलें कीं, हिंदुलॉचा कोणताही महत्वाचा खटला आला, म्हणजे, तेलंगांनीं त्यांपैकीं कोणत्याही पक्षाचें वकीलपत्र घेतलें नसेल तर, जज्जांनीं त्यांचा नेहमीं सल्ला घ्यावा. अशा एकाद्या खटल्याच्या वेळीं तेलंग कांहीं कारणानें कोर्टांत हजर नसले म्हणजे वेस्ट्रॉपसाहेबांनीं थोडेंसें विनोदानें म्हणावें कीं "बुधवारच्या दिवशीं ॲपेलेट बाजूला तेलंगांनीं कधीं गैरहजर राहातां कामा नये, असा सक्तीचा हुकूम सोडला पाहिजे." असो. पुढें सन १८८० च्या सुमारास चीफ जस्टिसच्या शिफारशीवरून सरकारकडून तेलंगांना ठाण्याच्या जॉइंट जज्जाची जागा देण्यांत आली, पण ती तेलंगांनीं नाकारली.

तेलंग आपली बॅरिस्टरी करीत असत त्या मुदतींत सन १८८७ सालीं हायकोर्टांत दुसरा एक महत्त्वाचा खटला आला. तो "दादाजी

विरुद्ध रखमाबाई" हा असून तो त्या वेळीं बराच गाजला. त्या खटल्याची थोडक्यांत अशी हकीकत आहे. जनार्दन पांडुरंग या नांवाचा एक पांचकळशी जातीचा गृहस्थ सन १८६७ मध्यें वारला. त्याला एकुलती एक मुलगी होती. तीच रखमाबाई. जनार्दनच्या मरणानंतर त्याची २५ हजार रुपयांची मिळकत रखमाबाईला मिळावयाची होती. जनार्दनच्या विधवेनें सन १८७१ सालीं डॉ. सखाराम अर्जुन नांवाच्या गृहस्थाबरोबर पुनर्विवाह केला. अर्थात् बापाच्या मिळकतीची रखमाबाई मालक होऊन ती डॉ. सखाराम यांच्या घरीं राहण्यास आली. तिचें तेराव्या वर्षीं दादाजी नांवाच्या वीस वर्षांच्या वयाच्या मनुष्याबरोबर लग्न झालें होतें. त्यानें कांहीं दिवस वाट पाहिल्यावर बायकोला आपल्या घरीं नांदण्याकरितां म्हणून बोलाविलें. पण तिच्या तर्फे आज एक सबब, उद्यां दुसरी, परवां तिसरी असें होऊं लागल्याबरोबर दादाजीनें आपल्या वैवाहिक हक्काची अंमलबजावणी करण्याच्या इराद्यानें हायकोर्टांत दावा मांडला. प्रकरण कोर्टांत गेल्यावर रखमाबाईनें आपल्या कैफियतींत दादाजीविरुद्ध पुष्कळ कारणें दाखविलीं, तें ओघानेंच झालें. तीं कारणें पुराव्यांत खोटीं ठरलीं. पण पहिल्या कोर्टानें दादाजीविरुद्ध निकाल दिला. दादाजीनें अपील केलें. अपिलांत खालच्या कोर्टाचा निकाल रद्द होऊन हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें रखमाबाईनें नवऱ्याच्या घरीं गेलें पाहिजे असा हुकूम फर्माविण्यांत आला. त्याप्रमाणें ती न गेल्यास तिला कैदेची शिक्षा भोगावी लागेल असें कोर्टानें ठरविलें. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणें रखमाबाई नवऱ्याच्या घरीं जाईना. अशा वेळीं मुंबईस प्रिन्सिपाल वर्डस्वर्थसाहेबांच्या मदतीनें " रखमाबाई डिफेन्स कमिटी " स्थापन करण्यांत येऊन तिची कैदेची शिक्षा चुकवण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्या कमिटींत तेलंग, रानडे वगैरे मंडळी सामील झाली. असो. मुद्याची गोष्ट ही कीं, तेलंग, हे रखमाबाई

तर्फे बॅरिस्टर होते व त्यांनीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें तशा प्रकारची फिर्याद मांडतां येत नाहीं व इंग्लिश कायदा लागू करून हिंदु स्त्रीला प्रस्तुत-सारख्या बाबतींत कैदेची शिक्षा होऊं शकत नाहीं असें कोर्टास सांगितलें. तेलंग म्हणाले कीं, नवरा व बायको यांचीं कर्तव्यें धर्मानें ठरविलेलीं आहेत व तीं कर्तव्यें धर्मनियमांनींच बजाविलीं गेलीं पाहिजेत. व्यवहार-मयूखाप्रमाणें तशीं कर्तव्यें बजावण्यास भाग पाडण्याचें साधन म्हणजे राजाला दंड भरणें होय ! सामाजिक दृष्टीनें जीं नवरा-बायको यांचीं कर्तव्यें असतील तीं " जात " या संस्थेनें हवींतर करवून घ्यावींत, पण तशी सक्ती दिवाणी कोर्टांना करतां येत नाहीं. प्रस्तुत स्थळीं राजाच्या जागीं दिवाणी कोर्टें आहेत. पण हिंदुधर्मशास्त्रग्रंथांत अशा फिर्यादीला आधार नाहीं. याप्रमाणें कोर्टानें निकाल दिल्यास बालविवाहाचा प्रश्न आपोआप सुटेल ! श्रीनिवास नो. कर्नाटकी

पुढें एका प्रसंगीं हाच प्रश्न निघाला असतां कलकत्ता हायकोर्टातील न्या. बानर्जी, मद्रासचे न्या. मुत्तुस्वामी आयर व मि. रमेश्चंद्र दत्त यांचीं मतें तेलंगांच्या मताप्रमाणेंच पडलीं ! असो. सदरील खटल्यांतील तेलंगांच्या कोटिक्रमानें त्यांच्या स्त्रीविषयक हक्कांसंबंधांच्या उदार धोरणाचें स्पष्ट दिग्दर्शन झालें ही गोष्ट खरी, पण या त्यांच्या तरफदारीनें त्या वेळीं मुंबईतील सबंध हिंदुसमाजांत मोठी खळबळ उडवून दिली यांत मात्र शंका नाहीं.

याप्रमाणें तेलंगांची धंद्याच्या दृष्टीनें एकसारखी भरभराटच होत चालली. पुढें सन १८८९ मध्यें जस्टिस नानाभाई हरिदास यांच्या निधनामुळें हायकोर्टांत एक जज्जाची जागा रिकामी झाली, तेव्हां नामदार तेलंगांची त्या जागेवर नेमणूक झाली ! त्यांना ही मोठ्या मानाची जागा फक्त सतरा

वर्षें त्यांनीं बॅरिस्टरी केल्यावर मिळाली. असें उदाहरण मुंबईच्या हायकोर्टांत पूर्वीं घडलेलें दुसरें मिळणार नाहीं असें म्हणतात. असो. त्या जागेबद्दलच्या त्यांच्या लायकीचा तर प्रश्नच नव्हता, पण कांहीं कांहीं गोष्टींचा यांच्या बाबतींत विलक्षण योग जुळून आला होता यांत संशय नाहीं. त्यांची बुद्धिमत्ता विश्रुतच होती. ते संस्कृतज्ञ पंडित असून त्यांचें कायद्याचें ज्ञान उत्तमपैकीं होतें. त्यामुळें त्यांच्याविषयीं हायकोर्टांतील सर्व जज्जांना व त्याचप्रमाणें खुद्द गव्हर्नरसाहेब लॉर्ड रे यांना अत्यंत आदर वाटत असे. त्यांचें शील उत्तम होतें व त्यांनीं पुढारी या नात्यानें सुमारें अठरा वीस वर्षें सार्वजनिक कामें केलेलीं होतीं. पण सर्वांत महत्वाची गोष्ट ही कीं, हे सर्व गुण जिच्यामध्यें एकवटले आहेत अशी एकही व्यक्ति त्या वेळीं हायकोर्टांतील वकील किंवा बॅरिस्टर यांमध्यें नव्हती ! त्यामुळें तेलंगांचीच हायकोर्टानें व मुंबईसरकारनें शिफारस केली व त्याप्रमाणें त्यांची विलायतेंतून नेमणूक होऊन आली. तेलंग हे जज्ज झाल्याबद्दल सर्वांनाच आनंद झाला व इंग्लिश व नेटिव्ह पत्रांनीं त्यांचें सारखेंच अभिनंदन केलें.

काशीनाथपंतांची स्वतंत्र धंदा करून सार्वजनिक कामें करण्याची प्रथमपासूनच इच्छा होती हें मागें सांगितलेंच आहे. त्यामुळें सरकारी नोकरी—चांगल्या पगाराची—दोन वेळां आपण होऊन चालून आली असतांही त्यांनीं तिचा अनादर केला ह्याचाहि उल्लेख पूर्वीं आलाच आहे. असा खरा प्रकार असूनही तेलंगांनीं या खेपेस हायकोर्ट जज्जाची जागा कां पतकरली याविषयीं लोकांनीं त्या वेळीं अनेक तर्क चालविले होते. कोणी एकानें म्हटलें कीं, तेलंगांनीं ती जागा " मोठा पगार मिळतो " म्हणून पतकरली तर दुसऱ्या कोणी तर्क केला कीं, " जागा मोठ्या मानाची " म्हणून त्यांनीं ती पतकरली, तिसऱ्या कोणी सार्वजनिक

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखले नं. 10201 ग्रंथानुक्रमांक ५. ४६७८
किंमत 9/- पाने 200

हिताच्या दृष्टीनें म्हटलें कीं, तेलंगांनीं आतां सरकारी नोकरी पतकरल्यामुळें ( नुकत्याच म्हणजे चारच वर्षांपूर्वीं निघालेल्या ) राष्ट्रीय सभेचा एक पायच मोडला व त्यांनीं पायांत शृंखला अडकवून घेतल्यानें त्यांच्या हातून स्वतंत्र बाण्यानें लोकसेवा होणार नाहीं. पण हे सगळे नुसते तर्क होते. त्यांपैकीं एकालाही मुळांत आधार नव्हता. तेलंगांनीं लोभामुळें जज्जाची जागा पतकरली हें म्हणणें तर अगदींच असत्य ! कारण जज्ज या नात्यानें त्यांना जे पैसे मिळत होते त्यापेक्षां कितीतरी पट अधिक त्यांचें बॅरिस्टरीपासून होणारें उत्पन्न असे ! तोच प्रकार मानाच्या अभिलाषाचा. तेलंग हे जज्ज व्हावयाच्यापूर्वींच लोकांच्या व सरकारच्या दृष्टीनें उच्चपदवीस चढले होते ! ते नामदार झाले होते; सिंडीक तर होतेच; एज्युकेशन कमिशनचे सभासद झाले होते; त्यांना सी. आय्. ई. पदवी मिळाली होती. बरें, इकडे राजकीय चळवळींतही ते होते; राष्ट्रीय सभेचे ते एक पुरस्कर्ते होते. तेव्हां त्यांना मान कोणता मिळावयाचा राहिला होता असें नाहीं. मग जज्जाच्या जागेचा तो विशेष मान कसला ? फार झालें तर त्यांच्या पूर्वींच्या मानांत ते जज्ज झाले म्हणून आणखी एका मानाची भर पडली इतकें म्हणतां येईल !

तेलंगांनीं जज्जाची जागा कां पतकरली याचीं खरीं कारणें निराळींच होतीं, व तीं अगदीं जवळच्या मंडळीशिवाय किंवा निकट सहवासांतल्या माणसांशिवाय इतरांस माहीत असण्याचा संभव नव्हता. खरी वस्तुस्थिति अशी होती. ज्या अर्शोरोगानें तेलंगांचा सन १८९३ मध्यें अंत झाला तो त्यांना निदान दहाबारा वर्षें पूर्वीं जडला होता. त्या रोगामुळें त्यांना दररोज मनस्वी रक्तस्राव होत असे. पण ही स्थिति त्यांनीं आपल्या आईबापांस—त्यांना एकदम धास्ती बसेल म्हणून—कित्येक दिवसपर्यंत कळूं दिली नाहीं. पण ही चोरी किती दिवस चालणार ? एके दिवशीं त्यांच्या

धोतरावर रक्ताचे डाग पडलेले त्यांच्या आईच्या नजरेस पडले व त्यानीं त्यांना लागलींच "अरे, हे डाग कसले?" म्हणून विचारिलें; तेव्हां खरा प्रकार घरांतील मंडळीस समजला व मग उपाययोजना सुरू झाली! काशीनाथपंत हे आईबापांचीं मनें न दुखविण्याबद्दल जी इतकी पराकाष्ठेची काळजी घेत असत ती स्तुत्य होती, पण त्यांनीं आपल्या प्रकृतीबद्दल हयगय केली ही मात्र त्यांनीं चूक केली. असो. सदर्हूसारखा रोग जडण्याचीं मुख्य कारणें म्हणजे सारा दिवस बैठें काम करण्याची लावून घेतलेली संवय व व्यायामाची अगर मोकळ्या हवेंत फिरण्याविषयींची अनास्था! वस्तुतः हा दोष त्या वेळच्या दुसऱ्या पुष्कळ मोठ्या लोकांस लागू होत असे हें खरें, पण कांहीं मंडळी फिरण्याचा कंटाळा करीत नसत. डॉ. भांडारकर हे रोज नियमानें संध्याकाळीं मोकळ्या हवेंत फिरत असत. न्या. रानडे हे देखील रोज सकाळ संध्याकाळ मैलचे मैल सपाटून फिरून येत असत. पण तेलंगांचें हें कांहींच नसे. त्यामुळें त्यांना वरील प्रकारची विकृति जडली होती. त्या रोगाचें मुख्य लक्षण म्हणजे केव्हां केव्हां फार अशक्तता वाटावयाची. या कारणास्तव व धंद्याची दगदग चुकावी म्हणून त्यांनीं आलेली जज्जाची जागा पतकरली! तेलंगांच्या बाबतींत दुसरें एक कारण होतें. त्यांचा ॲडव्होकेटचा धंदा चालू होताच. पण सुमारें सन १८८०–८१ पासून पुढें त्यांच्या सार्वजनिक कामाचा व्याप मनस्वी वाढला होता. एजुकेशन कमिशन, इल्बर्ट बिल, रिपन साहेबांचें प्रयाण, प्रेसिडेन्सी ॲसोसियेशनची स्थापना, राष्ट्रीय सभेची स्थापना, हेमंतोत्सवव्याख्यानमाला वगैरे कामें व त्यांतील काशीनाथपंतांचा महत्वाचा भाग हें गाडें सारखें चालू होतें. तें इतकें कीं, एकदां इंदुप्रकाशानें म्हटल्याप्रमाणें तेलंगांच्या इतका त्या वेळीं सार्वजनिक कामें करणारा मुंबईत दुसरा कोणीच नव्हता! पण ह्या सगळ्याचा त्यांच्या आधींच्याच

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

नाजुक प्रकृतीवर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? तसा तो निःसंशय झाल्यामुळें व मागें सांगितल्याप्रमाणें एका दुष्ट रोगानें त्यांच्या शरीरांत बिऱ्हाड केलेलें असल्यामुळें त्या शरीरास सक्तीची विश्रांति मिळावी म्हणून त्यांनीं आलेली जज्जाची जागा पतकरली.

जज्जाची जागा तेलंगांनीं पतकरल्यामुळें त्यांचें सार्वजनिक कामाकडे दुर्लक्ष होईल किंवा ते स्वतंत्र बाण्यानें पूर्वीसारखे वागणार नाहींत अशी जी त्या वेळीं कित्येक लोकांनीं कल्पना काढली होती ती—साहजिक असली तरी—केवळ अतिशयोक्तीची व निराधार होती. तेलंग हे मग राष्ट्रीय सभेंत उभे राहून उघड रीतीनें भाषणें करूं शकले नाहींत ही गोष्ट खरी, पण सरकारी नोकरींत शिरले म्हणून त्यांनीं राजकीय बाबतींतलीं आपलीं मतें बदललीं असें मुळींच नसून त्यांचे मेथा, वाच्छा इत्यादि लोकांशीं असलेले पूर्वीचे संबंध तसेच चालू होते व ते तेलंगांचा वरचेवर सल्ला घेत असत व तेलंगही तो मोकळ्या मनानें पूर्वीसारखाच देत असत. याशिवाय त्यांचीं इतर सार्वजनिक कामें चालू होतींच. हेमंतोत्सव व्याख्यानमाला चालू होती; एल्फिन्स्टन हायस्कुलांतील संमेलनें चालू होतीं; मग संमति-वयाचा वाद निघाला; मराठी वाङ्मय समृद्ध करण्याबाबतची योजना चाललीच होती; मराठ्यांचा विश्वसनीय इतिहास लिहिण्याचा व तदनुसार जुन्या बखरी वगैरेंचें परिशीलन हीं कामें चालू होतींच. या त्यांच्या व्यवसायांत खंड पडलाच नाहीं.

काशीनाथपंतांनीं जज्जाचें चार वर्षें काम केलें व तें त्यांनीं उत्तम प्रकारें केलें असें सर्वच लोक म्हणूं लागले. तेलंग आपले सर्व निकाल निःपक्षपातीपणानें व कांटेतोलपणानें देत असत व न्यायाधिशाच्या कामाचा ते एक केवळ कित्ता बनून राहिले होते असें इंदुप्रकाशनें म्हटलें.

" टाइम्स ऑफ इंडिया"नें म्हटलें " हायकोर्टांतील युरोपीयन जज्जांना प्राचीन धर्मशास्त्रांतील—कायद्यांतील—शंकास्थानें विचारण्याकरितां पूर्वीं बाहेरील शास्त्री-पंडितांकडे जावें लागत असे. तेलंग जज्ज झाल्यापासून ती जरुरी राहिली नाहीं. धर्मशास्त्राचा स्वतः बरोबर अर्थ करणारे व इतर जज्जांनीं केलेला अर्थ बरोबर आहे कीं नाहीं हें अधिकारानें दाखविणारे तज्ज्ञ असे मुंबई हायकोर्टांत तेलंगच पहिले जज्ज झाले ! त्यांच्यासारखे संस्कृतज्ञ पंडित असे जज्ज मुंबई हायकोर्टाला प्रथमपासूनच जर लाभले असते तर त्या कोर्टांतील जज्जांनीं आजवर आपल्या ठरावांच्या योगानें घालून दिलेल्या कायद्याचें स्वरूप अगदीं निराळ्याच प्रकारचें झालें असतें."

तेलंगांच्या जज्ज या नात्याच्या थोड्याच दिवसांच्या कारकीर्दींत हिंदु-धर्मशास्त्राप्रमाणें, दत्तक प्रकरण, स्त्रीधन, वारसाहक्क, मिळकतीची वांटणी करणें वगैरे अनेक प्रश्न त्यांच्यापुढें आले व त्यासंबंधानें त्यांनीं आपल्या रास्त धोरणाप्रमाणेंच निकाल दिले. त्यांपैकीं एका खटल्याचाच फक्त इकडे उल्लेख करतों. तो सन १८९१ सालच्या लॉ रिपोर्टांतील " आप्पाजी नरहर कुळकर्णी वि. रामचंद्र रावजी कुळकर्णी " हा खटला होय. तो खटला फार गुंतागुंतीचा होता. त्यांत मुलानें बापाच्या हयातींत त्याच्या व चुलत्याच्या इच्छेविरुद्ध वडिलोपार्जित स्थावर मिळकतीचे विभाग केले जाऊन आपला हिस्सा आपल्या ताब्यांत मिळावा अशी फिर्याद पहिल्या कोर्टांत मांडली होती. व पुढें त्यासंबंधाचें अपील हायकोर्टांत दाखल होऊन अखेर खटला फुलबेंचपुढें ( सार्जंट, तेलंग व कँडी ) सुनावणीकरतां आला. खटला बरेच दिवस चालून शेवटीं सार्जंट व कँडी यांचा तेलंगांशीं मतभेद होऊन कोर्टानें हिंदु लॉप्रमाणें मुलाला बापाच्या हयातींत तशी मिळकतीची विभागणी करून आपला हिस्सा मागतां येत नाहीं असा निकाल दिला. तेलंगांचें मत निराळें पडलें, व तें त्यांच्या

नेहमींच्या उदार धोरणाला अनुसरूनच होतें. त्यांच्या दृष्टीनें हिंदु लॉ प्रमाणें मुलाच्या मागण्याप्रमाणें मिळकतीचे विभाग करून त्याचा हिस्सा त्याच्या ताब्यांत देण्यास हरकत नाहीं. सदरील खटल्याच्या वेळीं दोन जज्ज एका बाजूला व तेलंग एका बाजूला असा प्रकार झाला खरा, पण पुढें हाच प्रश्न इतर हायकोर्टांत निघून न्या. तेलंगांचेंच मत सर्वत्र मान्य करण्यांत येऊन तोच आतां हिंदुस्थानांत कायदा झाला आहे !

तेलंगांच्या कारकीर्दींत आणखी एक वेळ त्यांचा चीफ जस्टिस सार्जंट यांच्याशीं मतभेद झाला होता. त्या वेळीं मुख्य प्रश्न सार्वजनिक हक्कासंबंधाचा असल्यामुळें तेलंगांनीं दिलेलें मत बऱ्याच लोकांस पसंत न पडल्यामुळें कित्येक वर्तमानपत्रांतून त्यांच्यावर टीका झाली. सन १८९२ मध्यें सरकारांत ज्युरीच्या हक्कासंबंधानें प्रश्न निघून देशांत ज्युरीची पद्धत कितपत यशस्वी झाली आहे याविषयीं चौकशी सुरू झाली व त्यासंबंधानें निरनिराळ्या हायकोर्टजज्जांचे व इतर मोठमोठ्या अधिकारी लोकांचे अभिप्राय मागविण्यांत आले. मुंबई हायकोर्टांतील चीफ जस्टिस सर चार्लस सार्जंट यांनीं " प्रस्तुत ज्युरीचे हक्क चालू आहेत ते काढून घेऊं नयेत " असें मत दिलें, आणि तेलंगांनीं पुढें आलेल्या कागदपत्रांवरून बेळगांव, अहमदाबाद व सुरत या जिल्ह्यांतील ज्युरींकडे खुनाचे खटले पाठवूं नयेत असें मत दिलें. त्याबद्दल तेलंगांवर कांहीं पत्रांतून कडक टीका झाली. पण त्यांत इतकीच गोष्ट लक्षांत ठेवावयाची कीं, ज्युरीचा प्रश्न जज्ज या नात्यानें न्या. तेलंगांपुढें आला होता व त्यांनीं आपला अभिप्राय जज्ज या नात्यानेंच पुढें आलेल्या कागदपत्रांवरून दिला. असें कायद्याच्या बाबतींत जज्जां—जज्जांमध्यें मतभेद होत असतात. तसा सार्जंट—तेलंग यांमध्यें झाला.

एकंदरींत तेलंगांनीं जज्ज या नात्यानें आपलें काम यशस्वी रीतीनें केलें. त्यासंबंधाचे एक दोन अभिप्राय मागें दिलेच आहेत.

---

प्रकरण चवथें.

## शंकराचार्य, रामायण व गीता.

काशीनाथपंत तेलंग यांनीं वाङ्मयक्षेत्रांत अत्यंत महत्वाची कामगिरी केली आहे. ती इतकी कीं, तशी—आपला धंदा व सार्वजनिक कामें संभाळून—कामगिरी दुसऱ्या कोणीच केली नाहीं असें एकदां सर दिनशा वाच्छा यांनीं म्हटलें आहे. तेलंगांनीं जें वाङ्मयात्मक काम केलें आहे त्यांत अनेक बाबींचा समावेश होतो. कांहीं युरोपीयन पंडितांनीं उत्पन्न केलेल्या वादविवादांत भाग घेणें; कित्येक प्राचीन ग्रंथांचे व ग्रंथकारांचे काल ठरविणें; ताम्रपत्र लेखांचीं भाषांतरें करून त्यांचे अर्थ विशद करणें; कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें करणें; कांहीं सटीक पुस्तकें तयार करणें; अर्थशास्त्रीय विषयांवर निबंध लिहिणें; सरकारच्या अन्यायमूलक कृतींवर टीका करणें; वगैरे अनेक बाबींचा त्यांच्या लिखाणांत अंतर्भाव होतो. त्यांतही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, तेलंगांनीं मराठींत देखील ग्रंथरचना करून व लेख लिहून आपल्या मातृभाषेचें ऋण फेडलें आहे. तेलंगांचें लिखाण इतकें विस्तृत आहे कीं, त्यांचें या पुस्तकांत तपशीलवार विवरण करणें शक्यच नाहीं. सबब आमच्या दृष्टीनें सामान्य मराठी वाचकांना जरूर व मनोरंजक इतक्याच लेखांचें विवेचन करण्याचें आम्ही योजिलें आहे.

तेलंगांनीं १८७० मध्य, म्हणजे आपल्या वयाच्या विसावे वर्षीं, "शंकराचार्य यांचें चरित्र" या विषयावर निबंध लिहून तो स्टु. लि. सा. सोसायटीपुढें वाचला. आचार्यांचा जन्मकाल व जन्मस्थान यांविषयींची निश्चित अशी अद्यापि कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. पण ते बालबृहस्पति असल्यामुळें त्यांना वयाच्या पहिल्याच वर्षीं जन्मभाषेचें व

संस्कृत मूळाक्षरांचें ज्ञान झालें. दुसऱ्या वर्षी त्यांस लिहितां वाचतां येऊं लागलें. तिसऱ्या वर्षी त्यांना काव्यें, पुराणें वगैरे ग्रंथ समजूं लागले. सातव्या वर्षी इतिहास, पुराणें, महाभारत, स्मृति, शास्त्रें यांचा अभ्यास पुरा करून ते गुरुगृहाहून आपल्या घरीं परत आले. तिकडे त्यांची आई एकदां अशक्तपणामुळें मूर्च्छित होऊन पडली असतां तिला त्यांनीं आपल्या अलौकिक सामर्थ्यानें उठविलें. पुढें आठव्या वर्षी त्यांनीं संन्यासदीक्षा घेतली. त्या कामीं त्यांची आई संमति देईना. पण त्यांनीं कांहीं अद्भुत चमत्कार करून तिची संमति मिळविली. मग त्यांनीं संन्यास घेतला. नंतर आचार्य देशपर्यटनाकरितां निघाले. ते फिरत फिरत नर्मदातटाकीं भगवान् गोविंदयति यांच्या आश्रमांत आले व तेथें त्यांनीं गुरूपदेश घेतला. आश्रमांत गुरुजींची एकदां समाधि लागली असतां एक वादळ उत्पन्न झालें. पण त्याचा आचार्यांनीं आपल्या अलौकिक सामर्थ्यानें उपशम केला. गुरुजी फार संतुष्ट झाले व त्यांनीं आचार्यांना आशीर्वाद देऊन काशीस जाऊन विश्वेश्वराचा प्रसाद घेऊन येण्यास सांगितलें. आचार्यांनीं तसें केलें. काशीस त्यांना सनंदन ऊर्फ पद्मपाद नांवाचा शिष्य मिळाला. वयाच्या बाराव्या वर्षी आचार्य हे बद्रीकाश्रमाकडे गेले व तेथें असतांना त्यांनीं ब्रह्मसूत्रावरील भाष्य लिहिलें. त्यानंतर त्यांनीं इतर भाष्यें लिहिलीं आणि ते सर्व ग्रंथ आपल्या शिष्यांकडून पढविले. कांहीं दिवसांनीं खुद्द वेदव्यास ब्राह्मणवेषानें आचार्यांकडे वादाकरितां आले आणि आपण काढलेले आक्षेप त्यांनीं खोडून काढलेले पाहून ते फार खूष झाले; व त्याचप्रमाणें देशपर्यटन करून प्रतिपक्ष्यांना जिंका असा आचार्यांना आशीर्वाद देऊन ते अंतर्धान पावले.

पुढें आचार्य कांहीं दिवसांनीं कुमारिल भट्ट व मंडन मिश्र यांस भेटले. त्यांनीं मंडनमिश्र यांस वादांत जिंकतांच ते पणाप्रमाणें संन्यास

घेण्यास तयार झाले व त्यांची पत्नी भारती ही परलोकीं जावयास निघाली. तेव्हां आचार्यांनीं तिला वादाकरितां थांबवून घेतलें. पण तिनें वादांत आचार्यांस कामशास्त्रासंबंधीं कांहीं प्रश्न विचारतांच ते बालब्रह्मचारी असल्यामुळें कुंठित होऊन स्तब्ध बसले. त्यांनीं मग योगसामर्थ्यानें परकाया प्रवेश करून एक वर्षभर राज्योपभोग घेतला व मग मंडनमिश्राच्या घरीं येऊन भारतीच्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं. नंतर मिश्रांनीं संन्यास घेतला. पुढें आचार्यांनीं बराच प्रवास केला. ते महाराष्ट्रांत आले तेव्हां एका कापालिकानें त्यांच्या प्राणावर कांहीं संकट आणलें. पण त्यांतून ते पद्मपादशिष्याच्या चातुर्यानें बचावले !

त्याच सुमारास आचार्यांना आपल्या आईचा अंतकाल समीप आल्याचें समजतांच ते तिच्या दर्शनार्थ आले. त्यांना पाहतांच ती फार संतुष्ट झाली व मग तिचें प्राणोत्क्रमण झालें. तिचा प्रेतसंस्कार वगैरे झाल्यावर आचार्य पुन्हां देशाटनाकरितां निघाले व फिरत फिरत ते कामरूप देशांत आले. तेथें अभिनव गुप्त या नांवाच्या एका दुष्ट मनुष्यानें आचार्यांना मोठ्या प्राणसंकटांत घातलें. पण याही खेपेला पद्मपाद शिष्याच्याच मंत्रसामर्थ्यानें ते वांचले व स्वतः अभिनव गुप्त हाच मरण पावला !

आचार्य मग काश्मीरांत गेले व शेवटीं बद्रिकेदारकडे गेले. ते शिष्याकडून पाठ पढवीत होते इतक्यांत त्यांचीं बत्तीस वर्षें भरलीं, व देव, सिद्ध व ऋषि हे त्यांना घेऊन जाण्याकरितां विमानांतून खालीं उतरले. नंतर इंद्र, उपेंद्र इत्यादि देवतांनीं आचार्यांना गंधपुष्पादि अर्पण करून त्यांची पूजा केली व त्यांच्या अवतारकृत्यांबद्दल ते जयजयकार करीत असतांनाच आचार्य निजधामास गेले. असो.

सदरहू आचार्यचरित्रांत कांहीं अद्भुत गोष्टी असून त्या शक्य कोटींतल्या नाहींत असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. त्यांच्या



१ हिमालयाजवळ.

समाधानाकरितां तेलंगांनीं युरोप खंडांतील टॉमस ब्राउन व टर्गो या दोन प्रसिद्ध पुरुषांच्या चरित्रांतील ( टर्गोचें त्रोटक चरित्र जॉन मोर्ले यांनीं लिहिलें आहे ) कांहीं अद्भुत प्रकारांचा उल्लेख करून व प्रस्तुत वाफेच्या व विजेच्या शक्तीचा शोध लागल्यादिवसापासून पूर्वीं अद्भुत किंवा अशक्य वाटणाऱ्या गोष्टी कशा आमच्या दृष्टीसमोर खरोखर घडत आहेत तें सांगून म्हटलें कीं, आचार्यांच्या चरित्रांत कांहीं गोष्टी अद्भुत किंवा किंचित् अतिशयोक्तियुक्त असल्या तरी त्या नितरां अशक्य आहेत असें म्हणतां येणार नाहीं.

काशीनाथपंतांना शंकराचार्यांसंबंधानें अत्यंत आदर किंबहुना भक्तियुक्त अभिमान वाटत असल्यामुळें त्यांचा आचार्यांच्या वाङ्मयासंबंधानें जबर व्यासंग होता. त्यामुळें त्यांच्या पहिल्या पहिल्या लेखांत आचार्यांसंबंधाचेच—त्यांचा काल व ग्रंथ यांविषयींचेच—चार पांच लेख आहेत. तेलंगांनीं आचार्यांचा सहाव्या शतकाचा उत्तरार्ध हा काल ठरविला आहे. डॉ. भांडारकर यांचेंही मत असेंच होतें. पण तो काल अद्यापि पंडितांत सर्वमान्य झाला नाहीं.

तेलंगांनीं सन १८७२ सालीं रामायणावर एक अत्यंत सुंदर व विद्वत्त्वपूर्ण निबंध लिहून त्यांत त्यांनीं प्रसिद्ध शार्मण्यदेशीय पंडित डॉक्टर वेबर यांस उत्तर दिलें आहे. वेबर साहेबांनीं एका लेखांत वाल्मीकीनें आपलें रामायण हें ( बौद्ध धर्मीय ) दशरथ जातकाच्या आधारानें लिहिलें असून त्यांत होमरच्या ईलियडचें साहाय्य घेतलें आहे असें प्रतिपादन केलें होतें व रामायण हा ग्रंथ ख्रिस्तीशकाच्या आरंभापेक्षां फार जुना नाहीं असें म्हटलें होतें. तेलंगांनीं डॉ. वेबर साहेबांनीं काढलेली कल्पना साफ चुकीची आहे असें सप्रमाण सिद्ध केलें आहे. तेलंगांचा सगळाच

लेख अत्यंत मुद्देसूद व वाचनीय आहे. पण इकडे त्याचा फार थोड्या शब्दांत सारांश देण्यापलीकडे कांहीं करतां येत नाहीं.

वेबर साहेबांचा पहिला मुद्दा हा कीं, वाल्मीकीनें दशरथ जातकावरून आपलें रामायण रचिलें व त्यांत त्यानें होमरच्या ईलियड काव्याची मदत घेतली. तेलंगांनीं या विधानाला आधार काय असें प्रथमच वेबरला विचारलें ! रामायणांतील कथानकांत व दशरथ जातकांतील दंतकथेंत थोडेंसें साम्य आहे एवढाच जर वेबरच्या विधानाला आधार असेल तर वेबरसाहेब म्हणतात त्याच्या उलट रामायणाच्या आधारानेंच दशरथ जातक लिहिलें गेलें असें कां म्हणूं नये ? बरें, दोन्हीकडल्या कथानकांत साम्य तरी कितीसें ? रामायणांत सीता ही रामाची बायको असें म्हटलें असून त्यांचें वनवासांत जाण्यापूर्वीं लग्न झालें होतें. जातकांत सीता ही रामाची बहीण असें म्हटलें असून त्या बहीण-भावाचें लग्न वनवासांतून परत आल्यावर झालें असें दाखविलें आहे. दुसरा फरक, रावणानें सीतेचें हरण केलें व रावणाशीं युद्ध करतेवेळीं वानरसैन्यानें लंकेस वेढा दिला, या रामायणांतील दोन महत्वाच्या गोष्टींचा दशरथ जातकांत पत्ताही नाहीं ! यावर वेबरसाहेब म्हणतात कीं, ही या दोन गोष्टींची उणीव वाल्मीकीनें ईलियडची मदत घेऊन भरून काढली. ईलियडच्या मदतीचें तूर्त राहो. पण जातकांच्या खऱ्या संभवनीय प्रकाराविषयीं प्रथम दोन शब्द लिहिले पाहिजेत. गौतम बुद्ध हा मुळीं हिंदु असल्यामुळें जातकांतल्या गोष्टींत पूर्वीच्या ब्राह्मणी हिंदुधर्मांतील कांहीं कल्पना व कांहीं दंतकथा मिश्रित होऊन जाव्या हें अगदीं संभवनीय व साहजिक आहे असें तेलंगांनीं त्याच वेळच्या ( ऑक्टोबर १८७२ ) ॲकेडेमींतील ( Academy ) जातकविषयक एका लेखाच्या आधारानें स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे. तेव्हां दशरथजातकाच्या आधारानें रामायण लिहिलें गेलें ही कल्पना अगदीं निराधार आणि असंभाव्य आहे.

बरें, रामायणांत ईलियडची मदत घेतली या म्हणण्याला तरी आधार काय ? दोन्ही ग्रंथांत एकदोन गोष्टींसंबंधानें साम्य दिसून येतें, एवढ्या वरूनच वेबरनें आपली कल्पना बसविली असेल तर तसें करणें केवळ हास्यास्पद व धाष्टर्याचें होईल ! कारण दोन भिन्न राष्ट्रांतील ग्रंथांत अशा साम्यदर्शक गोष्टी असल्याचीं इतिहासांत अनेक उदाहरणें मिळतील. पण तेवढ्याच आधारावर मोठमोठे सिद्धांत बांधणें अगर त्या ग्रंथांचे काल ठरवूं पाहणें हास्यास्पद आहे. असो. रामायणांत व ईलियडमध्यें फक्त एका स्त्रीला पळवून नेल्यामुळें लढाई झाली एवढ्या एका गोष्टीचेंच काय तें साम्य आहे. बाकीच्या पुष्कळ गोष्टींसंबंधानें बिलकूल साम्य नाहीं. ईलियडमधली मुख्य राजकन्या हेलेन हिला ट्रॉयच्या पॅरिस नामक राजपुत्रानें तिच्या घरून पळवून नेली ही गोष्ट खरी, पण तिला त्याच्याही पूर्वीं आथेन्सच्या थिसियस राजानें एकदां पळवून नेली होती ! पण तेंव्हां तिला तिच्या कॅस्टर व पोलुक्स या दोघां भावांनीं सोडवून आणली होती ! याच्याशीं सदृश असें रामायणांत काय आहे ? पॅरिस हा मिनेलॉस याच्या—हेलेनच्या नवऱ्याच्या घरीं पाहुणा आला होता. पण मिनेलॉसच्या गैरहजेरींत त्यानें तिला फुसलावून नेली व ती खुषीनें गेली ! याच्याशीं सीताहरणाची तुलना करावयाची काय ? हेलेन सारखी पळपुटी स्त्री कोठें आणि अत्यंत साध्वी व पतिव्रता अशी सीता कोठें ? त्याचप्रमाणें हेलेनला पळवून नेणारा स्त्रैण व भ्याड असा पॅरिस कोठें आणि सीतेचें हरण करणारा पण इंद्रादि सर्व देवांना गुलामांप्रमाणें वागविणारा रावण कोठें ? ग्रीक सैन्याचा मुख्य सेनापति आगेमेम्नन असून तो मिनेलॉसचा भाऊ होता. रामायणांतील वानरसेनेचा सेनापति सुग्रीव असून तो रामाचा भाऊ नव्हता ! लढाई संपल्यावर आगेमेम्नन परत आपल्या घरीं आला. पण त्याच्या बायकोनेंच त्याचा खून करून ती आपल्या

दुसऱ्या प्रियकराबरोबर उठून गेली ! याचा नुसता गंध तरी रामायणांत आहे काय ? सर रेमंड वेस्ट यांनीं एकदां अगदीं रास्त रीतीनें म्हटल्या-प्रमाणें, रामायणकाळची परिस्थिति व सबंध वातावरण हीं होमरच्या वेळेच्या मानानें, इतकीं भिन्न व शुद्ध होतीं कीं, रामायणाच्या रचनेच्या कामीं होमरच्या ईलियडचा अगदीं दूरचाही संबंध येणें शक्य नव्हतें ! नुसतें एकाद्या गोष्टीसंबंधानें साम्य दिसलें म्हणून कांहीं तरी कल्पना करण्यांत काय अर्थ आहे ?

नुसता संभाव्य प्रकार काय असावा हेंच पाहावयाचें असेल तर ईलियडलाच रामायणाची मदत झाली असेल हें अधिक संभवनीय दिसतें. या दृष्टीनें तेलंगांनीं केलेलें विवेचन अत्यंत वाचनीय आहे. त्यांत त्यांनीं Ancient Classics for English Readers या पुस्तकमालेंतील होमरच्या कथेसंबंधाच्या दोन खंडांचा उल्लेख केला आहे. त्या ग्रंथांतील कांहीं प्रस्तुतविषयक प्रमाणांचा उल्लेख करून तेलंग थोडक्यांत म्हणतात कीं, हिंदु ग्रंथाच्याच ( रामायणाच्या ) आधारानें ग्रीक ग्रंथ ( ईलियड ) लिहिला गेला असणें अधिक संभवनीय आहे.

रामायण हा ग्रंथ ख्रिस्ती शकाच्या आरंभापेक्षां फार जुना नाहीं हा वेबर साहेबांचा दुसरा मुद्दा. तोही अगदीं निराधार आहे हें तेलंगांनीं आधार देऊन मुद्देसूद रीतीनें दाखविलें आहे. त्या सगळ्याचा विस्तार इकडे करीत नाहीं. पण वेबरच्या फक्त एक दोन कोट्यांचा निर्देश करतों. वेबर साहेबांस रामायणांत अनेक ठिकाणीं " यवन " शब्द मिळाला. त्यांच्या मतें " यवन " म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत या देशांत आलेले बॅक्ट्रियन ग्रीक लोक ! सबब ज्या अर्थीं रामायणांत या ग्रीक लोकांचा उल्लेख सांपडतो त्या अर्थीं तो ग्रंथ तदनंतरचा, हें उघडच आहे.

तेलंग म्हणतात कीं, रामायणांत योजिलेल्या "यवन" शब्दाचा "ग्रीक" असा अर्थ घेण्यास आधार काय ? मॅक्समुल्लर व लॅासन हे दोघेही म्हणतात कीं, पूर्वीं सर्व सेमिटिक–हिब्रु, फिनिशिअन, अरेबिक वगैरे–राष्ट्रांतील लोकांस "यवन" शब्द लावीत असत. पाणिनीच्या सूत्रांत "यवन" शब्द अनेकदां आलेला आहे. त्यावरून सदर्हू पंडितद्वयाच्या विधानाला पुष्टिच मिळते. शिवाय शिकंदराच्याही पूर्वीं डरायस हिस्टॅस्पिस या इराणच्या राजानें हिंदुस्थानावर स्वारी केलीच होती. अर्थात् रामायणांतील "यवन" म्हणजे "बॅक्ट्रियन ग्रीक" असाच अर्थ घेण्याला आधार नाहीं. नुसत्या कोणत्या तरी शब्दाचा कोणत्या तरी लोकांशीं बादरायण संबंध जोडण्यांत काय अर्थ आहे ?

ओढून ताणून आणलेले आहे.

वेबरची आणखी एक अशीच कोटि पाहा. ते म्हणतात कीं, सिलोन बेटाचें ग्रीक लोकांस माहीत होतें तें नांव "सिलोन किंवा सिंहलद्वीप" हें होय. "लंका" हें तदनंतरचें. तेंच रामायणांत आलेलें आहे. अर्थात् रामायण हें ख्रिस्तापूर्वीं पहिल्या किंवा दुसऱ्या शतकानंतरचें ! यावर तेलंग म्हणतात कीं, "लंका हें नांव 'ग्रीक' लोक यावयाच्या पूर्वींचेंही असेल. पण तें मग बंद पडल्यावर 'सिलोन' हें नांव सुरू झालें व नंतर हें मागें पडून फिरून 'लंका' सुरू झालें, असें मानावें लागेल !" तेलंग म्हणतात, तसें झालें तरी काय बिघडलें ? "लंका" हें नांव मागें पडून पुन्हां प्रस्तुत कालीं "सिलोन" चालू झालें नाहीं काय ? तात्पर्य, वरील प्रकारच्या नांवाच्या फेरबदलीनें वेबरच्या उपपत्तीस कांहींच पुष्टि मिळत नाहीं.

तेलंगांनीं केलेल्या अगदीं साधार विवेचनाचा निष्कर्ष इतकाच निघतो कीं, रामायणाचा काल ( ख्रिस्तपूर्व १५० वर्षें ) पतंजलीच्या कालाच्या

अलीकडे ओढतांच येत नाहीं. त्याच्याही पूर्वी तो किती जाऊं शकतो हें मात्र नक्की सांगतां येत नाहीं. पण त्याही दिशेनें तेलंगांनीं थोडेंसें विवेचन केलें आहे. तेलंग म्हणतात कीं, पाणिनीच्या सूत्रांत " इक्ष्वाकु " पासून " ऐक्ष्वाक " शब्द कसा होतो व " केकय " पासून " कैकेयी " कसा होतो हें दाखविण्यांत आलें आहे. " ऐक्ष्वाक " याचा अनेक वेळां " राम " असा अर्थ होतो हें विश्रुतच आहे. पाणिनीच्या दुसऱ्या एका सूत्रांत रामाची आई कौसल्या हिचा उल्लेख आलेला आहे. एवढ्यावरून निदान पाणिनीला रामायणांतल्या कथेची माहिती होती हें सिद्ध होतें. पतंजलीच्या महाभाष्यांत तर

" प्रासादे धनपतिरामकेशवानाम् "

असा धनपति राम, केशव यांचा स्पष्ट उल्लेख आहे. त्याचप्रमाणें गणपाठांत सुमित्रा-सौमित्री, पुष्करसद्-पौष्करसदी असे शब्द आले आहेत. पाणिनीच्या दुसऱ्या एका सूत्राप्रमाणें शिवादिगणांत रावण व काकुत्स्थ हीं नांवें आलीं आहेत. सारांश, रामायणीय कथेंतील बरींच नांवें पाणिनीच्या वेळीं प्रसिद्ध होतीं, यांत शंकाच नाहीं.

रामायणांत ब्रह्मा, विष्णु व शिव यांचा आदरयुक्त उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणें,

इंद्रश्च भगवान् साक्षान्मरुद्गणवृतः प्रभुः ।

असा इंद्राचा देखील आदरपूर्ण उल्लेख सांपडतो. तात्पर्य, रामायणाचा नक्की काल कोणता हें जरी आज सांगतां येत नाहीं, तरी तो एक फार प्राचीन ग्रंथ आहे याबद्दल शंकाच रहात नाहीं. असो. याप्रमाणें हिंदु लोकांच्या एका अत्यंत प्राचीन व पूज्य ग्रंथावर सुमारें साठ वर्षांपूर्वी एका युरोपीयन पंडिताकडून झालेला हल्ला काशीनाथपंतांनीं मोठ्या कुशलतेनें व

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

निरुत्तर कोटिक्रमानें परतविला व त्या योगानें त्यांनीं आपल्या देशाची व आपल्या आर्यसंस्कृतीची मोठीच कामगिरी केली यांत शंका नाहीं. सर रेमंड वेस्ट म्हणतात कीं, या तरुण ( तेलंगांचें वय २२ वर्षांचें होतें ) हिंदु पंडितानेंच केलेली प्रकृतविषयक टीका युरोपीयन विद्वन्–मंडळांत सर्वमान्य झाली व वेबर साहेबांची उपपत्ति त्याज्य ठरली ! विलायतेंतील "Academy" चाही अभिप्राय असाच पडला.

सन १८७३ सालीं काशीनाथपंतांनीं दुसरा एक 'भगवद्गीते'वर असाच अत्यंत विद्वत्वपूर्ण व उद्बोधक निबंध लिहिला. त्या वेळीं डॉ. लॉरिन्सर नामक युरोपीयन पंडितानें एक लेख लिहून त्यांत त्यानें भगवद्गीता ही बायबलाच्या आधारानें लिहिली गेली आहे व गीता ग्रंथाचा काल ख्रिस्ती शकाचें आठवें शतक हा असावा असें प्रतिपादन केलें होतें. तेलंगांनीं सदर्हू आपल्या निबंधांत डॉ. लॉरिन्सर याला समर्पक उत्तर दिलें आहे. तेलंगांचा निबंध बराच विस्तृत असून तो आधार, प्रमाणें यांनीं खचून भरला आहे. त्यांनीं त्यांत एकही विधान आधारावांचून केलें नाहीं. निबंधावरून दुसरी गोष्ट दिसून येते ती ही कीं, तेलंगांचा इंग्लिश वाङ्मयाशीं अत्यंत दृढ परिचय असून ख्रिस्ती धर्मविषयक ग्रंथांचेंही त्यांनीं काळजीपूर्वक परिशीलन केलें होतें. तिसरी गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते ती ही कीं, निबंधाच्या प्रत्येक पानावरून तेलंगांच्या ठिकाणीं आपल्या प्राचीन आर्यसंस्कृतीविषयीं व पवित्र ग्रंथविषयीं असलेली पूज्यबुद्धि व अभिमान हीं स्पष्ट रीतीनें व्यक्त होतात. तरी प्रतिपक्षाविषयीं अनुदारवृत्ति किंवा मर्यादेबाहेर कटुता हे दोष दिसत नाहींत. चवथी व महत्वाची गोष्ट अगदीं वरवर वाचणाराच्याही लक्षांत येते ती ही कीं, तेलंगांनीं त्या निबंधाच्या शेवटीं वेबर, लॉरिन्सर वगैरे जे युरोपियन पंडित केवळ पूर्वग्रहदूषित मनानें आमच्या प्राचीन

ग्रंथांचें संशोधन चालवून त्या ग्रंथांचे काल आपल्या मनास वाटेल त्याप्रमाणें शक्य तेवढे अलीकडे ओढीत असतात. त्यांच्या ह्या अन्यायमूलक व अशास्त्रविहित प्रवृत्तीचा अगदीं निर्भीडपणें व स्पष्ट शब्दांत निषेध केला आहे.

लॉरिन्सर याचा पहिला मुद्दा असा आहे कीं, गीतेच्या कर्त्यानें बायबलचा आधार घेऊन ती लिहिली ! या मुद्याच्या पुष्टीकरणार्थ त्यानें अशी कारणपरंपरा लावली आहे. ख्रिस्तभक्त टॉमस हा ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकांत हिंदुस्थानांत आला होता व त्यानें इकडे बरेच ख्रिस्त अनुयायी तयार केले. त्यांपैकीं एकानें बायबलाचें आपल्या भाषेंत भाषांतर केलें आणि त्या भाषांतराचा आधार घेऊन गीताकर्त्यानें आपला ग्रंथ लिहिला ! कारण सेंट जॉनच्या शुभवर्तमानांत व गीतेंत बरेंच साम्य दिसतें. यांपैकीं प्रत्येक कोटी चुकीची आहे असें तेलंगांनीं स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे. आधीं सेंट टॉमस हा पहिल्या शतकांत हिंदुस्थानांत आला होता या गोष्टीला पुरावा नाहीं. हल्लींचे इतिहासकार—उदाहरणार्थ व्हिन्सेंट स्मिथ—तर स्पष्ट म्हणतात कीं, ती नुसती एक गप्प आहे ! दुसरी गोष्ट अशी आहे कीं, बायबलच्या नव्या करारांतील चार शुभवर्तमानांपैकीं पहिलीं तीन—मॅथ्यू, ल्यूक व मार्क—हीं दुसऱ्या शतकाच्या अखेरीपर्यंत अस्तित्वांतच नव्हतीं असें डॉ. स्ट्रॉस्स ( Dr. Strauss ) हा आपल्या "ख्रिस्तचरित्रांत" म्हणतो. तदनंतरचें जॉनचें शुभवर्तमान ! अर्थात् जेथें मूळाचाच ठिकाण नव्हता तेथें भाषांतर कोठून येणार ? आडांतच नव्हतें तर पोहऱ्यांत कोठून येणार ? आणि जें अस्तित्वांतच नव्हतें त्याचा आधार तो कसा घ्यावयाचा व ह्या आधारावर गीतेसारखा ग्रंथ तो कसा लिहावयाचा ? तात्पर्य, लॉरिन्सरची सगळीच इमारत नुसत्या भुसभुशीत पायावर व कल्पनेवर रचलेली ! तें एक असो. पण बायबलच्या कांहीं

भागामध्यें व गीतेमध्यें खरोखरीच साम्य असलें तर तिकडे दुसरीही कल्पना संभवते. पण तिजकडे लॉरिन्सरचें लक्षही गेलेलें नाहीं ! वर सांगितल्याप्रमाणें गीतेनें बायबलचा आधार घेतल्याची कल्पना जर अगदीं निराधार ठरते तर बायबलानें गीतेचा आधार घेतला असेल ही कल्पना साहजिकच पुढें येते. पण या दृष्टीनें लॉरिन्सरनें सदहू प्रश्नाचा मुळीं विचारच केला नाहीं. पण खरा प्रकार असा कीं, डॉ. स्ट्रॉस यांच्या मतें दुसऱ्या शतकाच्या अखेरीस ख्रिस्ताचीं जीं शुभवर्तमानें लिहिलीं गेलीं तीं मूळ भक्तांनीं लिहिलीं त्याच स्वरूपांत असण्याचा संभव नाहीं. म्हणजे त्यांत बाहेरची कांहींतरी भर पडत पडत मग तीं हल्लींच्या स्थितींत तयार झालीं असलीं पाहिजेत. दुसरी गोष्ट. ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकांत शिकंदर बादशाह हिंदुस्थानांत आला त्यावेळीं इकडे बौद्ध धर्मासंबंधीं जंगी चळवळ चालली होती. त्या चळवळीचा बाहेरून आलेल्या ग्रीक वगैरे लोकांवर कांहीं तरी परिणाम होणें अगदीं संभवनीय होतें. तिसरी गोष्ट. डीन मिल्मन हा इतिहासकार म्हणतो कीं, मूळ हिंदुस्थानांत उत्पन्न झालेल्या धर्मसंबंधीं तत्वांच्या योगानेंच पाश्चिमात्य राष्ट्रांतील धार्मिक चळवळीला वळण लागलें असलें पाहिजे. चवथी गोष्ट, प्रसिद्ध ग्रीक तत्ववेत्ता पिथॅगोरस यानें हिंदुस्थानांत येऊन इकडील कांहीं आध्यात्मिक गोष्टींचा अभ्यास केला होता असें कांहीं ग्रंथकार म्हणतात. पांचवी गोष्ट, खुद्द येशूख्रिस्ताच्या वेळीं एशियामायनरमध्यें "इसिनीस" नांवाचा जो एक पंथ अगदीं जोरांत होता, त्याचा पूर्वेकडील देशाशीं संबंध असून तिकडूनच त्याला प्रेरणा झाली असें नमूद आहे. या सर्व कारणसमुच्चयावरून असें स्पष्ट निष्पन्न होतें कीं, हिंदुतत्त्ववेत्त्यांनीं ख्रिस्ती धर्मापासून कांहीं गोष्टी घेतल्या हें मुळींच संभवनीय नसून ख्रिस्ती लोकांनीं मात्र हिंदुधर्मापासून बऱ्याच गोष्टी घेतल्या असण्याचा दृढ संभव दिसतो. पण

लॅरिन्सर किंवा त्यांच्यासारख्याच मनःप्रवृत्तीचे इतर पाश्चात्यपंडित यांचें प्रस्तुत विषयाचा विचार करतांना या दुसऱ्या संभवनीय उपपत्तीकडे नुसतें लक्षही गेलेलें दिसत नाहीं ! तात्पर्य, बायबलवरून गीता लिहिली गेली या कल्पनेला ग्रंथांचा किंवा परिस्थितीचा कोणताच आधार मिळत नसून खऱ्या ग्रंथांचा व इतर उपलब्ध साधनांचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्यास खिस्ती धर्मानेंच हिंदुधर्माचें सहाय्य घेतल्याचें अधिक संभवनीय ठरतें. तरी हिंदुधर्माचें एक मुख्य तत्व अद्यापि खिस्ती अगर महंमदी धर्माच्या अनुयायांच्या गळीं उतरलेलें दिसत नाहीं. दुसऱ्या धर्मांतले दोष काढीत बसणें हें प्रस्तुत खिस्ती किंवा महंमदी धर्माचें एक मुख्य तत्व म्हणून ( कित्येकांच्या मतें ) गणलें जातें. पण सत्य हें सर्व धर्मांत कमी अधिक प्रमाणांत आहे व ज्यानें त्यानें श्रद्धेनें आपल्या धर्माप्रमाणें वर्तन ठेवल्यास त्यांतच परमेश्वर त्याला सद्गति देतो असें हिंदुधर्म शिकवितो. असो.

आतां गीतेच्या कालासंबंधानें दोन शब्द लिहिले पाहिजेत. कित्येक युरोपीयन पंडितांची ठाम समजूत होऊन बसली आहे कीं, भगवद्गीता ही बायबलवरून लिहिली गेली, आणि खिस्तावरून श्रीकृष्णाची नक्कल केली गेली ! बायबलावरून गीता लिहिली गेली ही कल्पना कशी अज्ञानमूलक व निराधार आहे हें वर दाखविण्यांत आलें आहे. तोच प्रकार श्रीकृष्ण खिस्ताची नक्कल असल्यासंबंधाचा. श्रीकृष्णलीलेचा उल्लेख पतंजलीच्या महाभाष्यांत सांपडतो असें डॉ. भांडारकरांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. पतंजलि हा खिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत होऊन गेला. दुसरी गोष्ट. खिस्तपूर्व चवथ्या शतकांतल्या मेगॅस्थिनीसनें आपल्या ग्रंथांत लिहून ठेविलें आहे कीं, आपल्या वेळीं या देशांत कृष्णभक्ति प्रचारांत असून लोकांत वैष्णव व शैव असे पंथही अस्तित्वांत आले होते. म्हणजे हा प्रकार येशूखिस्त जन्मण्याच्या चारशें वर्षांपूर्वींचा ! या सर्व गोष्टींचा विचार

केल्यास ख्रिस्तावरून श्रीकृष्णाची नक्कल केली गेली ही कल्पना अगदीं निराधार व हास्यास्पद ठरून, श्रीकृष्णावरून ख्रिस्ताची नक्कल झाल्याची कल्पनाच अधिक संभवनीय ठरूं पाहते आणि त्यास मागें सांगितलेल्या डॉ. स्ट्रॉस्स, डीन मिलमन वगैरे पाश्चात्य इतिहासकारांच्या दाखल्यानें बळकटी येते. तात्पर्य, गीतेच्या कालासंबंधाच्या युरोपीयन पंडितांच्या सर्व कोट्या लटक्या पडतात.

काशीनाथपंतांनीं आपल्या निबंधांत भगवद्गीतेचा काल क्रमाक्रमानें मागें नेऊन ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकपर्यंत भिडविला आहे. बाणभट्टाच्या कादंबरींत भगवद्गीतेचा स्पष्ट उल्लेख आहे. बाणभट्ट सातव्या शतकांत झाला. कालिदासाच्या रघुवंशकाव्यांत व कुमारसंभवकाव्यांत गीतेचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. कालिदास हा सहाव्या शतकांत झाला. बादरायण व्यासाच्या ब्रह्मसूत्रांत गीतेचा "स्मृति" म्हणून अनेक ठिकाणीं उल्लेख आला असून त्याचा अर्थ भगवद्गीता असाच घ्यावयाचा याबद्दल शंकराचार्य, रामानुजाचार्य व मध्वाचार्य यांच्यामध्यें एकवाक्यता आहे. कोलब्रुक म्हणतो कीं, ब्रह्मसूत्रावर बोधायनाचार्यांचें भाष्य होतें. रामानुजाचार्य व मध्वाचार्य हे दोघेही म्हणतात कीं, बोधायनाचार्यांचें भाष्य आपण पाहिलें आहे. रामानुजाचार्य तर स्पष्ट सांगतात कीं, आपण बोधायनाचार्यांच्या भाष्याला अनुसरूनच आपलें भाष्य लिहिलें आहे. बोधायन आपस्तंबाच्या पूर्वीचा. आपस्तंब हा ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत झाला. म्हणजे ब्रह्मसूत्रें हीं निदान ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकांतलीं असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. भगवद्गीता तत्पूर्वींची. याचा अर्थ इतकाच कीं, गीतेचा काल ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकाच्या अलीकडे ओढतांच येत नाहीं. तो काळ त्याच्याही मागें किती लोटतां येईल हें मात्र नक्की सांगतां येत नाहीं. डॉ. भांडारकरांचेंही मत असेंच आहे. सारांश,

भगवद्गीतेचा काल अलीकडे ओढण्याबद्दलचा कांहीं युरोपीयन पंडितांनीं चालविलेला खटाटोप व्यर्थ झाला.

आतां एकाच महत्वाच्या गोष्टीचा उल्लेख करून हें प्रकरण संपवितों. सुमारें अर्ध शतकापूर्वी कांहीं पाश्चात्य पंडितांची आमच्या प्राचीन ग्रंथांना अर्वाचीनत्व आणण्याविषयींची दृढ प्रवृत्ति स्पष्ट दिसत होती. त्या प्रवृत्तीचा तेलंगांनीं या लेखांत स्पष्ट निषेध केला आहे. तसा निषेध डॉ. भांडारकरांनींही अनेकदां केला आहे. पण तेलंगांनीं तो अधिक स्पष्ट व कडक शब्दांत केला आहे. त्यामुळें तेलंगांच्या वरील ( रामायण व भगवद्गीता ) दोन निबंधांचें, निदान हिंदु लोकांच्या दृष्टीनें महत्व विशेष आहे. व ही एक तेलंगांनीं आपल्या देशाची व आपल्या प्राचीन आर्य-संस्कृतीची मोठी कामगिरी केली याबद्दल प्रत्येक हिंदु मनुष्याला त्यांच्या-विषयीं आदर व अभिमान वाटला पाहिजे. ज्यांना तेलंगांच्या कडक निषेधाची भाषा वाचावयाची असेल त्यांनीं ते निबंध मुळांतच पाहिले पाहिजेत. आम्ही इकडे फक्त चार शब्दांत भाषांतररूपानें गीतेवरील निबंधांतल्या निषेधाचा उल्लेख करितों.

तेलंग म्हणतातः “ आमच्या कांहीं प्राचीन ग्रंथांचे काल अद्यापि अनिश्चित स्थितींत आहेत, व ते काल निश्चित करण्याच्या कामीं उपयोगीं पडणारीं बरींच साधनें कालचक्रामुळें नष्ट झालीं आहेत. अशा वेळीं कांहीं पाश्चात्य पंडित लोक दुराग्रहमूलक विधानें करून आमच्या प्राचीन ग्रंथांचे अगर मतांचे काल अगदीं अलीकडे ओढून आणण्याच्या कामीं गुंतलेले आहेत. त्यांच्या मनानें एकदां एक गोष्ट गृहीत धरली म्हणजे तिच्या आराधाला त्यांना अगदीं कच्चा पाया अगर एकादी संशयात्मक गोष्टही चालते. मग ते असल्या सिकतामय भुसभुशीत पायावर मोठमोठे मनोरे

उठवितात व मोठमोठे सिद्धांत रचतात. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, आमच्या कांहीं प्राचीन ग्रंथांचे काल अगदीं अलीकडे ओढून सोडले गेले आहेत. * * * ज्यांनीं 'प्राच्य-भाषाग्रंथ-संशोधन' (Oriental Research) चालविण्याचें आपल्या हातीं कंकण बांधलें आहे व ज्यांना तशा संशोधनास 'शास्त्र' ( science ) हें प्रतिष्ठित व गंभीर नांव देणें गोड वाटतें त्यांनीं तरी निदान असली पूर्वग्रहदूषित क्रिया न घडूं देण्याबद्दल जपलें पाहिजे. पण दुःखाची गोष्ट ही कीं, अशा प्रवृत्तीपासून मोठमोठे पंडित देखील मुक्त राहिले नाहींत. खुद्द प्रो. मॅक्समुल्लर एके ठिकाणीं म्हणतात कीं, 'वालखिल्य सूक्त किंवा असलींच दुसरीं सूक्तें हीं प्रातिशाख्यपेक्षांही अलीकडचीं आहेत असें प्रतिपादन करणें शक्य झालें तर मला फार बरें वाटेल. तसेंच प्रातिशाख्यादि ग्रंथ त्याचेहीपेक्षां अगदीं अलीकडचे आहेत असें सिद्ध झाल्यास मला फार समाधान वाटेल, पण तें समाधान मला लाभणार नाहीं अशी भीति वाटते.' '× × ×' या उद्गारांवरून एकंदरींत युरोपियन पंडितांची मनःस्थिति कशी आहे हें चक्क सूर्यप्रकाशाप्रमाणें दिसून येतें. मुल्लर साहेबांनीं तरी या विषयांत आपल्या आवडी-नावडीची अगर मनाच्या समाधानाची भाषा कां बरें वापरावी ? हा शास्त्रीय विषय. तत्संबंधानें विचार करणाऱ्या मनुष्याचें लक्ष फक्त सत्यशोधनाकडे वेधून राहिलें पाहिजे. तें सत्य मग या बाजूस मिळालें अगर त्या बाजूस मिळालें म्हणून काय बिघडलें ? 'सत्य असेल तें मिळालें तरच मनाचें समाधान होईल,' हीच भाषा शास्त्रीय विवरणामध्यें योग्य होणार नाहीं काय ? परंतु सांगण्यास वाईट वाटतें कीं, कित्येक पंडितांची मनःस्थिति शास्त्रीय संशोधनास योग्य इतकी निर्विकार नसून तिच्यांत आवड-नावड, मनाचें समाधान, गृहीत गोष्टी, पूर्वग्रह इत्यादि विकारांचें प्राबल्य माजल्यामुळें

ती मनस्वी दूषित झालेली असते. इतक्या दोषांनीं पीडित झालेल्या माणसांना त्यांना पाहिजेत तशा गोष्टी जिकडे तिकडे आहेत असा भ्रम होतो व मग तो भ्रमच सत्य आहे असें त्यांस वाटत असतें. अशा मनःस्थितीमुळें त्यांच्या हातून सत्यशोधन होणें अति दुर्घट असतें. सबब अशा पूर्वग्रहदूषित व अशास्त्रविहित मनःस्थितीबद्दल जितका तीव्र निषेध करावा तितका थोडाच आहे. म्हणूनच तशा प्रवृत्तीबद्दल प्रस्तुत प्रसंगीं अत्यंत नम्रपणें पण जोराचा निषेध करणें मी माझें कर्तव्य समजतों "

तेलंगांच्या या निर्भीड लिहिण्याचा लागलाच परिणाम झाला असें मानण्यास जागा आहे. प्रस्तुत निबंध हा सन १८७३ मधला. त्यांत प्रो. मॅक्समुल्लर यांचा प्रत्यक्ष नांवानें उल्लेख आला आहे. तरी त्याच मुल्लरसाहेबांनीं थोड्या दिवसांनीं तेलंगांना विनंति करून त्यांजकडून "भगवद्गीता, सनत्सुजातीय व अनुगीता" या महाभारतांतल्या भागांचीं भाषांतरें करवून तीं आपल्या "प्राच्यधर्म पुस्तकमालें"तील आठवें पुष्प म्हणून प्रसिद्ध केलीं, हें सर्व विश्रुत आहे. तसा मान हिंदी पंडितांपैकीं फक्त तेलंगांनाच मिळाला आहे. बाकीचे लेखक युरोपीयन आहेत.

---

प्रकरण पांचवें.

## सटीक पुस्तकें, भाषांतरें वगैरे.

—:०:—

काशीनाथपंतांनीं प्राचीन वाङ्मयक्षेत्रांत जी महत्त्वाची कामगिरी केली आहे त्यांत कांहीं सटीक पुस्तकांचा व भाषांतरांचा समावेश होतो. त्यांपैकीं कांहींचा या प्रकरणांत निर्देश करतों. सन १८७४ सालीं

तेलंगांनीं मुंबईसरकाराकरितां भर्तृहरीचीं " नीति व वैराग्य " हीं दोन शतकें एकत्रित करून एक पुस्तक तयार केलें व त्यांतील श्लोकांवर भरपूर टीपा देऊन त्यास एक अत्यंत विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना जोडली आहे. प्रस्तावनेंत भर्तृहरीचा काल ठरवितांना तेलंगांनीं त्या कवीविषयीं कित्येक युरोपीयन पंडितांनीं जे कित्येक विचार नमूद केले आहेत, त्यांपैकीं कांहीं कसे चुकीचे आहेत हें सिद्ध करून दाखविलें आहे. त्यासंबंधीं इकडे जास्त विस्तार करण्याचें कारण नाहीं. पण मासल्याकरितां एक दोन उदाहरणें देतों. प्रो. मॅक्समुल्लर साहेबांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, भर्तृहरीच्या प्रकृत शतकद्वयावर बौद्ध धर्माची छाया पडलेली दिसते. तेलंगांना तसें वाटत नाहीं. कांहीं कांहीं श्लोकांत ग्रथित झालेलीं व्यापक नीतितत्त्वें अगर मतें हीं वस्तुतः हिंदु व बौद्ध दोन्ही धर्मांतील म्हणतां येतील. बौद्धधर्म हा मुळीं हिंदुधर्मापासूनच उत्पन्न झालेला असल्यामुळें इकडचीं कांहीं तत्त्वें तिकडे गेलीं असल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. भर्तृहरी हा बौद्ध होता ही कदाचित् चीनदेशाकडची प्रचलित दंतकथा असेल. पण तिला मुळांत आधार अगदीं नाहीं. सदर्हू दोन शतकांतून ठिकठिकाणीं त्रिमूर्ति, दशावतार, वेद, स्मृति, पुराणें वगैरेंचा जो उल्लेख दृष्टीस पडतो त्यावरून ह्या शतकांचें वेदान्तस्वरूप स्पष्ट होतें. दोन्ही शतकांच्या पहिल्या श्लोकावरून तर त्या वेदान्तस्वरूपाविषयीं शंकाच राहात नाहीं. तो श्लोक हा—

दिक्कालाद्यनवच्छिन्नानंतचिन्मात्रमूर्तये ।
स्वानुभूत्येकसाराय नमः शांताय तेजसे ॥

प्रो. विल्सन म्हणतात कीं, सदर्हू शतकांत पुराणांचा उल्लेख आहे. त्यावरून तीं शतकें फारशीं जुनीं नसावींत. यावर तेलंग विचारतात कीं,

निरनिराळ्या पुराणांचे तरी काल कोठें ठरले आहेत ? कांहीं पुराणें प्राचीन असतील, कांहीं अर्वाचीन असतील. त्यांचा काल नक्की ठरल्याशिवाय व भर्तृहरीच्या मनांत कोणतीं पुराणें होतीं हें समजल्याशिवाय पुराणांच्या सामान्य उल्लेखावरून त्या शतकांचा काल ठरविणें बरोबर नाहीं. जीं पुराणें शंकराचार्यांनंतरचीं आहेत असें प्रो. विल्सन म्हणतात त्याच पुराणांतले कांहीं उतारे आचार्यांनीं आपल्या श्वेताश्वतर उपनिषदावरील भाष्यांत घेतलेले आहेत ! तेव्हां काल ठरविण्याचे कामीं प्रो. विल्सन यांची विचारसरणी काय उपयोगी ?

लासन म्हणतो कीं, " भर्तृहरीनें बुद्धाला अवतारांत आणलें आहे. पण बुद्धाची अवतारांत गणना कधींपासून झाली ? तसा उल्लेख दहाव्या शतकांतील एका शिलालेखांत सांपडतो. तेव्हां शतकें तदनंतरचीं तरी असलीं पाहिजेत किंवा तो शिलालेखांतला श्लोक प्रक्षिप्त तरी असला पाहिजे." हें लासनचें मत. तेलंग म्हणतात कीं, लासनच्या दोन्ही कल्पना चुकीच्या ! बुद्धाविषयींची अवतारकल्पना बौद्धधर्म जोरांत होता तेव्हांच निघाली असली पाहिजे. तो धर्म दहाव्या शतकांत मुळींच जोरांत नव्हता. डॉ. केर्न ( Kern ) याच्या मताप्रमाणें बुद्धाविषयींची अवतारकल्पना ही तिसऱ्या किंवा चवथ्या शतकांतली ! कदाचित् त्याच्याही पूर्वींची असूं शकेल. असो. तेलंगांनीं भर्तृहरीचा तात्पुरता काल खिस्तोत्तर पहिलें किंवा दुसरें शतक ठरविला आहे. पण तो काल अद्यापि सर्वमान्य झालेला नाहीं.

सन १८८४ सालीं तेलंगांनीं विशाखदत्तकृत " मुद्राराक्षस " या संस्कृत नाटकाची मुंबई सरकाराकरितां एक सटीप आवृत्ति तयार केली. नाटकाच्या संविधानकाचा काल खिस्तपूर्व चवथें शतक असून त्यांत चाणक्य व राक्षस हीं दोन मुख्य पात्रें आहेत. चाणक्यानें चंद्रगुप्त

याला नंदवंशीय गादीवर कायम करण्याकरितां अनेक उपायांची योजना केली आहे. नंदांचा अमात्य राक्षस हा उदारमनस्क व सरळ बुद्धीचा मनुष्य असल्यामुळें चाणक्याच्या कुटिल नीतीपुढें त्याला अखेर हार खावी लागली !

तेलंगांनीं सदर्हू पुस्तकांत बऱ्याच टीपा दिल्या असून एक विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. प्रस्तावनेंत त्यांनीं विशाखदत्ताच्या कालाविषयीं चर्चा केली आहे. प्रो. विल्सन यांनीं विशाखदत्त हा अकराव्या शतकांत झाला असें आपलें मत दिलें आहे. तो काल ठरवितांना त्यानें कांहीं विचित्र विधानें केलीं आहेत. त्यासंबंधानें विशेष विस्तार न करतां फक्त एक दोन मुद्यांविषयींच लिहितों. मुद्राराक्षस नाटकांत " म्लेच्छ " शब्द अनेक ठिकाणीं आला आहे. प्रो. विल्सन यांनीं त्याचा त्या त्या ठिकाणीं " मुसलमान " असा अर्थ केला आहे. " मुसलमान " लोक हिंदुस्थानांत दहाव्या शतकांत आले व " म्लेच्छ " म्हणजे मुसलमान, त्याअर्थीं हें नाटक दहाव्या शतकानंतरचें ! असा विल्सनचा कोटिक्रम दिसतो. पण विल्सनचा अर्थ चुकीचा आहे. त्याच नाटकांत " म्लेच्छ " हा शब्द सहाव्या अंकांत,

**" अहो विवेकशून्यता म्लेच्छस्य ! "**

या वाक्यांत मलयकेतूला लावला आहे ! तेव्हां विल्सन यांनीं केलेला सर्वसाधारण अर्थ बरोबर नाहीं. " म्लेच्छ " म्हणजे अशिक्षित, असभ्य, आडदांड, रानटी असे अनेक अर्थ होतात. अर्थात् प्रकृत नाटकाचा काल ठरविण्याच्या कामीं " म्लेच्छ " शब्दाचा कांहीं उपयोग नाहीं. तें बौद्धधर्माचा ऱ्हास होत चालला होता, अशा वेळीं रचिलें गेलें असलें पाहिजे, असें उघड दिसतें.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं ९०९२०९ ग्रंथानुक्रमांक ५. ४६०८
किंमत ९१ पाने २००

दुसरी एक प्रो. विल्सन यांची चुकीची समजूत झालेली दिसते. ते " क्षपणक " याचा " बौद्ध " असा अर्थ समजतात. पण तो शब्द बऱ्याच वेळां " जैनां "स लावतात. बौद्ध व जैन या दोन धर्मांत बरेंच साम्य आहे, ही गोष्ट खरी, पण प्राचीन ग्रंथांत वरील सारखा एकाद-दुसरा शब्द आलेला आढळल्यास त्याचा बरोबर अर्थ करतांना दुसऱ्या पुष्कळ गोष्टींचा विचार करावयाचा असतो. नाहीं तर अपुऱ्या माहितीच्या आधारावर बसविलेलीं अनुमानें चुकीचीं ठरण्याचा संभव असतो. असो. तेलंगांनीं सर्व उपलब्ध साधनांचा विचार करून " मुद्राराक्षस " हें नाटक आठव्या शतकाच्या सुरवातीस लिहिलें गेलें असावें असें आपलें मत दिलें आहे.

काशीनाथपंतांनीं आपल्या प्रस्तावनेंत एका गोष्टीसंबंधानें स्पष्ट खुलासा केला आहे. त्याचा इकडे थोडासा उल्लेख केला पाहिजे. प्रस्तुत नाटकांत चाणक्यानें चंद्रगुप्ताचें स्थान पक्कें करण्याकरितां योजिलेल्या युक्त्या, काढलेल्या क्लृप्त्या, केलेलीं कृष्णकारस्थानें यांचा विचार केल्यास त्या वेळचें हिंदुस्थानचें सबंध वातावरणच नैतिकदृष्ट्या इतकें दूषित झालें होतें कीं काय अशी शंका सहज मनांत उभी राहते. पण यासंबंधानें तेलंगांनीं अनुसरलेली विचारसरणी अगदीं निर्दोष आहे असें वाटतें. त्यांच्या म्हणण्याचें तात्पर्य असें: " राजकारण हें कोठेंही झालें तरी कमी अधिक प्रमाणांत संशयात्मक नीतितत्त्वांच्या मार्गानेंच चाललेलें असतें. युरोप खंडांत देखील अद्यापि एकादा राजकारणी पुरुष दुसऱ्या एकाद्याला " मुत्सद्दी " म्हणतांना आपण ऐकतों. कारण काय ? तर त्या दुसऱ्यानें एकाद्या विवक्षित प्रसंगीं लबाडी इतक्या शिताफीनें केलेली असावी कीं, ती लोकांच्या लक्षांतही आली नाहीं ! त्याचप्रमाणें सार्वजनिक कामासंबंधीं खलित्यांतील—ते प्रसिद्ध करण्यापूर्वीं—महत्वाचा मजकूर गाळणें

किंवा अपुऱ्या कारणांकरितां अगर कारण नसतांही एकादी लढाई सुरू करणें असले प्रकार जर जिकडे तिकडे अद्यापि आमच्या डोळ्यांसमोर घडत आहेत तर चाणक्य किंवा राक्षस यांच्या कालापेक्षां प्रस्तुत सुधारलेल्या युगांत देखील राजकारण हें नीतिदृष्ट्या अधिक सुधारलें आहे असें कोणत्या आधारावर म्हणावयाचें ? ”

प्रो. मॅक्समुल्लर साहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या “ प्राच्यधर्मपुस्तक मालेंतील ” आठवें पुस्तक काशीनाथपंत तेलंग यांनीं सन १८८३ सालीं लिहिलेलें असून त्यांत त्यांनीं भगवद्गीता, सनत्सुजातीय व अनुगीता या महाभारतांतील तीन भागांचीं इंग्रजी भाषांतरें अंतर्भूत केलेलीं आहेत, व त्यांपैकीं प्रत्येकास एक एक प्रस्तावना जोडून त्यांत त्या त्या भागाच्या कालाविषयीं चर्चा केली आहे. भगवद्गीतेविषयीं माहिती सर्वांनाच आहे. सनत्सुजातीय हा एक भारताच्या उद्योगपर्वांतील भाग असून त्यांत भगवद्गीतेच्याच वळणावर ( सनत्कुमार ) सनत्सुजात व धृतराष्ट्र यांजमधील अध्यात्मविषयावरील षडध्यायरूपानें संभाषण–प्रसंग आलेला आहे. अनुगीता हा अश्वमेध पर्वांतील एक भाग असून त्याचे ३६ अध्याय आहेत. अनुगीतेंत श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांमधील संभाषण आलेलें असून त्याचा आध्यात्मिक उपदेश हाच विषय आहे. भारतीय युद्धाच्या समाप्तीनंतर पांडव आपल्या राज्यव्यवस्थेस लागले व श्रीकृष्ण द्वारकेस जाण्यापूर्वीं पांडवांचा निरोप घेण्याकरितां आले. ते अर्जुनाच्या मंदिरांत आल्याबरोबर त्याला समरांगणावरील श्रीकृष्णाच्या अमृतोपम उपदेशाचें–भगवद्गीतेचें–स्मरण झालें व तो उपदेश पुन्हां एकवार ऐकण्याची त्यानें देवाजवळ आपली इच्छा प्रकट केली. श्रीकृष्णांनीं उत्तर दिलें कीं, तो उपदेश त्या वेळेलाच योग्य होता. आतां ती वेळ निघून गेली. अर्थात् तो उपदेश आतां देतां येणें शक्य नाहीं ! तथापि अर्जुनाची जिज्ञासा

तृप्त करण्याकरितां श्रीकृष्णांनीं इतिहास, पुराणें वगैरेंच्या आधारानें उपदेश केला, तीच अनुगीता.

प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या प्रस्तावनेंत तेलंगांनीं भगवद्गीतेच्या कालसंबंधानें जो ऊहापोह केला आहे, तो बऱ्याच अंशानें त्यांनीं डॉ. लॉरिन्सर यांस दिलेल्या उत्तराच्याच अनुरोधानें केला आहे. पण त्यांत त्यांनीं कांहीं कांहीं गोष्टींविषयीं जी विशेष चर्चा केली आहे तीवरून तर भगवद्गीतेच्या प्राचीनत्वाविषयीं शंकाच राहात नाहीं. गीतेंत जे तत्वविचार आलेले आहेत त्यांत नंतरच्या कांहीं ग्रंथांतून दिसून येणारे प्रमाणशुद्धता, नियमबद्धता किंवा सुसंगतपणा, हे गुण आढळत नाहींत. याचें एकच उदाहरण देतों: गीतेच्या नवव्या अध्यायांत "समोऽहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।" असें वचन आहे. त्याचें "मी सर्व भूतांशीं समबुद्धीनें वागतों; मला द्वेष्य कोणी नाहीं व प्रियही कोणी नाहीं," असें भाषांतर आहे. पण त्याच्या अगदीं उलट सोळाव्या अध्यायांत एक श्लोक आला आहे, तो हा—

**तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥**

( द्वेष्टे, क्रूर, अधम असे जे ते लोक, त्यांना मी सर्वदा जन्ममरणाच्या फेऱ्यामध्यें टाकून, अशुभ आसुरी योनींमध्येंच जन्माला घालतों. )

तसेंच गीतेंत अथर्व-वेदाचा उल्लेख नाहीं. फक्त तीन वेदांचा किंवा त्रयीचा आहे. पण पतंजलीच्या महाभाष्यांत अथर्व-वेद श्रेष्ठ मानलेला आहे. गीतेंत सामवेद श्रेष्ठ मानण्यांत आला आहे. तसा तो ऐतरेय ब्राम्हणांत श्रेष्ठ मानलेला आहे. मनुस्मृतींत "नराणां ब्राम्हणः श्रेष्ठः" असें वचन आहे. पण गीतेंत "नराणां च नराधिपम्" असें म्हटलें आहे.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत वेदांना कमी मानलेलें आहे, पण तो उल्लेख कर्मकांडासंबंधानें आहे. ज्ञानकांडाला किंवा उपनिषदांना गीतेंत श्रेष्ठच मानलेलें आहे. पण मन्वादि ग्रंथांत असा भेदाभेद मानलेला नसून वेद हे सर्वतोपरी श्रेष्ठ व प्रमाणभूत मानले गेले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करून भगवद्गीता ही जुन्या उपनिषत्कालांतली दिसते असें तेलंगांनीं आपलें मत दिलें आहे.

सनत्सुजातीय हें प्रकरण देखील भगवद्गीतेशींच समकालीन आहे असें तेलंगांचें मत आहे. सनत्सुजातीय याचा पंचतंत्रांत उल्लेख आहे. शंकराचार्यांनीं श्वेताश्वतर उपनिषदावर जें भाष्य लिहिलें आहे त्यांत त्याचा उल्लेख आहे व पतंजलीच्या महाभाष्यांत आहे. यावरून व इतर कांहीं अंतःप्रमाणांवरून पाहतां भगवद्गीता व सनत्सुजातीय हीं दोन्ही एकाच काळीं रचिलीं गेलीं असलीं पाहिजेत असें उघड दिसतें.

अनुगीता मात्र बरीच नंतरची आहे. अनुगीतेचा आचार्यांच्या भाष्यांत उल्लेख आहे. विज्ञानभिक्षूच्या सांख्यसारांत आहे. सामाजिक बाबतींत अनुगीता ही भगवद्गीतेच्या पुढची मजल आहे. त्यांत राजांचा जुलूम, तुरुंगवास, गरीबांस छळणारे कायदे लोखंडी ओतींव मूर्ति तयार करणें, ओझीं वाहण्यास हत्तीचा उपयोग करणें, चामड्यांत पेंढा भरलेले ( चर्ममय ) प्राणी वगैरे गोष्टींचा उल्लेख आहे. नृत्य, गायन व कारागिरी हीं अनुगीतेंत निषिद्ध मानलेलीं आहेत. मनु, गौतम व आपस्तंब यांच्या ग्रंथांत देखील नृत्य व गायन यांचा निषेध आहे. फार काय, पण गायकाच्या आवाजाला त्या ग्रंथांत गाढवाच्या ओरडण्याची उपमा देण्यांत आली आहे ! भगवद्गीता व सनत्सुजातीय यांच्या रचनेंत कर्त्याच्या मनांत उदारभावनेची प्रेरणा झालेली

उघडच दिसते. अनुगीता किंवा मनु, आपस्तंब यांच्या काळीं एकंदरींत सामाजिक दृष्टीनें अवनति झालेली दिसते. अनुगीतेंत सौगतांचा उल्लेख आलेला आहे. सौगत म्हणजे बौद्ध. अर्थात् अनुगीता ही बुद्धानंतरची. भगवद्गीता त्याच्या पूर्वींची. म्हणजे ठोकळ मानानें कालदृष्ट्या सदरील ग्रंथांचा असा अनुक्रम लागेल. भगवद्गीतेनंतर बुद्धावतार, बुद्धानंतर आपस्तंब, व आपस्तंबानंतर अनुगीता.

काशीनाथपंतांनीं भगवद्गीतेचें एक पद्यात्मक भाषांतर केलेलें प्रसिद्ध आहे. तें भाषांतर त्यांनीं ( Blank Verse ) निर्यमक कवितेंत केलेलें असून तें एम्. ए. च्या परीक्षेच्या वेळीं कविता करण्याचा अभ्यास ( Exercise ) या दृष्टीनें केलेलें होतें. अर्थात् तें प्रसिद्ध करण्याचा त्यांचा प्रथम बेत नव्हता. पुढें जेव्हां तें प्रसिद्ध करावें असें त्यांना वाटलें तेव्हां तें व लॉरिन्सर साहेबांस उत्तर म्हणून त्यांनीं लिहिलेला भगवद्गीतेवरील निबंध अशीं दोन्ही एकत्र पुस्तकरूपानें त्यांनीं प्रसिद्ध केलीं. गीतेवरील निबंधाविषयींचा विस्तृत उल्लेख मागील प्रकरणांत आलाच आहे. तेलंगांनीं केलेलें हें गीतेचें पद्यात्मक भाषांतर अति उत्तम उतरलें आहे असें अनेक तज्ज्ञ माणसांनीं म्हटलें आहे. टाइम्स ऑफ इंडियानें कबूल केलें आहे कीं, " हें भाषांतर इतकें उत्तम वठलेलें आहे कीं, तें होऊन कितीही काळ लोटला, तरी त्याचें " इंग्लिश वाङ्मय " या दृष्टीनें महत्व केव्हांही कमी होणार नाहीं. "

तेलंगांनीं आपले निबंध स्टु. लि. अँड सा. सोसायटीपुढें किंवा मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें वाचले आहेत. व बरेच लेख त्यांनीं "इंडियन अँटिकरी "मध्यें लिहिले आहेत. मागच्या प्रकरणांत सांगितलेल्या निबंधांशिवाय काशीनाथपंतांनीं कांहीं किरकोळ लेख, टिपणें वगैरे

प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांत कांहीं ग्रंथांचे काल ठरविणें, परीक्षणें, ताम्रपत्रलेखांचीं भाषांतरें वगैरे बाबी आल्या आहेत. त्यांचा आतां थोडक्यांत उल्लेख करतों.

**काल ठरविणें**:—न्यायकुसुमांजलीचा कर्ता उदयनाचार्य हा अकराव्या शतकांत झाला; मधुसूदन सरस्वती हे पंधराव्या शतकाच्या शेवटीं अगर सोळाव्याच्या आरंभीं झाले; शंकरविजयाचा कर्ता आनंदगिरी हा शंकराचार्यांचा शिष्य " आनंदगिरी " नसून तो दुसराच असला पाहिजे व त्यानें लिहिलेलें " शंकरविजय " हें पुस्तक चवदाव्या शतकांतलें असलें पाहिजे; सुबंधु व कुमारिल भट्ट हे सहाव्या शतकांत झाले; कालिदास, हर्ष व चंद यांच्या कालाविषयीं चर्चा केली आहे.

**परीक्षणें**:—नेटिव्ह ओपिनियनमध्यें कीलहॉर्न याच्या संस्कृत व्याकरणाचें परीक्षण; मंडलिकांचा " हिंदु लॉ," व " काव्येतिहाससंग्रह " यांचें परीक्षण " इंडियन अँटिक्वरी" मध्यें.

**ताम्रपत्रलेख**:—चालुक्यवंशीय एका राजाचें दानपत्र, कदंबवंशीय एका राजानें दिलेला ताम्रपट व शिलाहार वंशांतील एका राजाचा ताम्रपट यांचीं भाषांतरें प्रसिद्ध केलीं आहेत.

**पार्वतीपरिणय**:—हें नाटक बाणाचें असावें असें परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं म्हटलें आहे. तेलंगांच्या मतें तें कालिदासाच्या " कुमारसंभव " काव्याच्या आधारानें लिहिलें गेलें असावें.

याशिवाय तेलंगांनीं, मुस्कटदाबीचा कायदा, खुला व्यापार-संरक्षण, पेशवाईच्या वेळची समाजस्थिति व कायद्याचें राज्य या विषयांवर लिहिलेले लेख प्रसिद्ध आहेत. पण त्यासंबंधानें पुढें एकाद्या दुसऱ्या प्रकरणांत विचार करूं.

तेलंगांनीं लोकांस माहिती करून देण्याकरितां बरींच व अनेक विषयांवर व्याख्यानें दिलीं आहेत. पण त्यांसंबंधाचा इकडे विस्तार करीत नाहीं.

---

प्रकरण सहावें.

## मराठींत ग्रंथरचना.

तेलंगांना आपल्या मातृभाषेचा भारी अभिमान असे. हिंदु युनियन क्लबांत त्यांनीं एकदां असा नियम केला होता कीं, कोणीही सभासदानें मराठी बोलतांना मध्येंच इंग्रजी शब्द आणूं नयेत व इंग्रजी बोलतांना मध्यें मराठी शब्द आणूं नयेत ! काशीनाथपंतांचा वस्तुतः धंदा बॅरिस्टरीचा असल्यामुळें व त्यांचा संबंध युरोपीयन, पारशी वगैरे लोकांशीं फार असल्यामुळें, त्यांचा बहुतेक सर्व व्यवहार इंग्रजींत चालत असे. या गोष्टीचा विचार केला व तत्कालीन सुशिक्षित लोकांची आपल्या मातृभाषेविषयींची सामान्यतः अनास्था मनांत आणली म्हणजे काशीनाथपंतांची आपल्या मराठी भाषेबद्दलची कळकळ व अभिमान फार स्तुत्य वाटतात. असो. त्यांनीं आपल्या व्यवसायांत थोडीशी मराठींत ग्रंथरचनाही केली होती. त्यांनीं " स्थानिक राज्यव्यवस्था " व " शहाणा नेथन " हीं दोन मराठींत पुस्तकें लिहिलीं आहेत; व हिंदु युनियन

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

क्लबांतील हेमंतोत्सव व्याख्यानमालेंतील " शास्त्र व रूढि " व " सामाजिक बाबतींतील तडजोड " या विषयांवर त्यांनीं मराठींत दिलेलीं दोन व्याख्यानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहेत. याशिवाय त्या व्याख्यानमालेच्या वेळीं होणाऱ्या वादविवादांत जीं जीं त्यांनीं भाषणें केलीं तीं तीं त्यावेळच्या इंदुप्रकाशादि वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालीं आहेतच.

काशीनाथपंतांनीं " स्थानिक स्वराज्य " या विषयावर जें पुस्तक लिहिलें त्याचा थोडासा इतिहास आहे. सन १८८२ सालीं लॉर्ड रिपन यांनीं स्थानिक स्वराज्यासंबंधानें एक सरकारी ठराव प्रसिद्ध करून म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें वगैरे स्थानिक संस्थांमधून निम्मे प्रतिनिधि लोकांनीं निवडावे असें ठरविलें होतें. तो एक प्रकारचा लोकांस दिलेला हक्क होता. त्याचें महत्त्व लोकांस समजावें व त्यांनीं त्या हक्काचा चांगला उपयोग करून आपला व आपल्या ग्रामबंधूंचा फायदा करून घ्यावा या हेतूनें तेलंगांनीं वरील पुस्तक लिहिलें. इंग्रजींत " चामर्स लोकलसेल्फ गव्हर्नमेंट " या विषयावर एक भरपूर माहितीनें भरलेलें पुस्तक आहे. त्याचें तेलंगांनीं हें भाषांतर केलें. हेतु इतकाच कीं, स्थानिक स्वराज्याची इंग्लंडांत सन १२७५ पासून कसकशी प्रगति होत आली आहे व तिकडील लोक या कामांत कसें लक्ष घालीत असतात हें इकडील—महाराष्ट्रांतील—सामान्य लोकांस देखील समजावें व त्यांनीं तसें सार्वजनिक कामांत लक्ष घालण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून तेलंगांनीं वरील पुस्तकाचें मराठींत भाषांतर केलें व तें सन १८८५ मध्यें प्रसिद्ध केलें.

आम्ही हिंदुस्थानचे लोक आपले उद्योग करतों, आपलीं घरें स्वच्छ ठेवतों व सामान्यतः आपल्या हिताकडे व फायद्याकडे लक्ष देतों. तें सर्व बरोबर आहे. परंतु आपण ज्या गांवांत राहातों अगर ज्या देशाचे

आपण नागरिक आहों त्या गांवांतील अगर देशांतील लोकांसंबंधानें आपल्याला कांहीं कर्तव्यें करावयाचीं असतात याची मात्र आपणांस सामान्यतः जाणीव नसते. युरोप खंडांतील लोकांस याचें लहानपणापासूनच बाळकडू मिळालेलें असतें. त्यामुळें ते लोक सार्वजनिक कामें हीं जवळ जवळ आपलीं नित्यक्रमाचीं कामें होत असें मानीत असतात. असा प्रकार इकडे सुरू व्हावा, किंबहुना त्या दिशेनें आमच्या लोकांच्या दृष्टींत फरक पडावा व इंग्लंडांतील लोक सार्वजनिक कामें कशीं उत्सुकतेनें करीत असतात हें पाहून आमच्या लोकांनीं जागें व्हावें व आम्ही तशीं कामें करूं लागावें हाच तेलंगांचा वरील पुस्तक लिहून प्रसिद्ध करण्यांत हेतु होता. असो. स्थानिक स्वराज्य व इतर प्रकारचीं सार्वजनिक कामें करण्याच्या बाबतींत तेलंगांच्या वेळेच्या मानानें लोकांच्या वृत्तींत हल्लीं बराच फरक पडलेला स्पष्ट दिसत असल्यामुळें सदरहू पुस्तकांतील तपशिलाचा इकडे ऊहापोह करण्याचें कारण नाहीं.

तेलंगांनीं "शहाणा नेथन" हें एक दुसरें मराठींत पुस्तक लिहिलें आहे. हें "लेसिंग" नांवाच्या जर्मन पंडितानें लिहिलेल्या एका नाटकाचें भाषांतर आहे. हें पुस्तक लिहून प्रसिद्ध करण्यांत तेलंगांचे दोन हेतु होते. त्या वेळीं रेनॉड्ल्स, बोकॅशियो इत्यादि कादंबरीकारांच्या पुस्तकांचीं भाषांतरें करण्याकडे कांहीं सुशिक्षित लोकांचें लक्ष लागलेलें होतें. तशीं पुस्तकें वाचण्याकडे जनतेची झालेली प्रवृत्ति इंग्रजींतील उत्तमोत्तम ग्रंथ—भाषांतररूपानें मराठींत लिहिलेले—वाचण्याकडे वळविली गेल्यास लोकांच्या उदार भावना जागृत होतील व त्यांच्या दृष्टींत फरक पडेल असें तेलंगांना वाटलें. दुसरी गोष्ट, सुमारें चाळीस पन्नास वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत धर्मसंबंधीं बराच ऊहापोह चालत असे. त्यांत कांहीं लोकांचें आपल्या हिंदुधर्मांत जें एक उदात्त धर्मसहिष्णुतेचें ( Toleration ) तत्व आहे त्याकडे दुर्लक्ष

होत असे. तें उदात्त तत्वच " Nathan the Wise " या नाटकांत अंतर्भूत झालेलें आहे. त्या तत्वाचें कांहीं उदारमनस्क असे पाश्चात्य ग्रंथकार देखील किती महत्व मानीत असतात हें आमच्या महाराष्ट्रीय लोकांस समजावें व तें तत्व वरील ऊहापोह करतेवेळीं त्यांनीं आचरणांत आणण्यास प्रवृत्त व्हावें म्हणूनच तेलंगांनीं वरील पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. असो. सदहू लेसिंगचें इंग्रजी पुस्तक तेलंगांनीं सन १८७३ मध्येंच वाचलें होतें व त्याचें त्यांनीं मराठींत भाषांतरहि केलें होतें. पण त्यांच्या कार्यबाहुल्यामुळें तें प्रसिद्ध करण्याचा बरेच दिवस योग आला नाहीं. तो सन १८८७ मध्यें आला, आणि हें सुमारें दोनशें पानांचें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें.

मूळ ग्रंथकार लेसिंग याची थोडक्यांत हकीकत अशी आहे. गॉटहोल्ड इफ्राइम लेसिंग ( Gotthold Ephraim Lessing ) हें त्या ग्रंथकाराचें सबंध नांव. त्याच्यासंबंधानें तेलंग आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात: " लेसिंगचीं इंग्रजींत दोन चरित्रें हल्लीं प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांवरून दिसून येणारी त्याची अचाट बुद्धि, त्याच्या मनाचा थोरपणा, त्याचा खरा देशाभिमान, त्यानें सांसारिक अडचणींत व दुःखांत देखील विद्या संपादनार्थ व विद्याप्रसारार्थ केलेले परिश्रम या गोष्टींचा विचार केला म्हणजे वाचकाच्या मनांत त्याच्याबद्दल अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाहीं. जर्मन भाषेच्या समृद्धीला व जर्मनीमध्यें हल्लीं जो इतका विद्याप्रसार होत आहे त्याला बऱ्याच अंशीं लेसिंग हाच मूळ कारण झाला असें युरोपीयन पंडितांचें म्हणणें आहे. " हा थोर माणूस सन १७२९ मध्यें जन्मला व सन १७८१ मध्यें वारला. तो स्वतंत्र विचारांचा मनुष्य असल्यामुळें जर्मनीमधील धर्मोपदेशक मंडळीची त्याच्यावर नेहमीं नजर असे. त्यानें आपलें " Nathan the Wise " हें पुस्तक लोकांस

धर्मसहिष्णुतेचा धडा शिकवावा म्हणून लिहिलें. त्याचा धर्मासंबंधीं एक सिद्धांत असे; " कोणताही एक धर्म तुम्ही घ्या, त्याला सर्वांशीं व सर्वत्र अबाधित प्रामाण्य आहे असें म्हणतां येत नाहीं. पण दरएक मोठ्या धर्मांत सत्याचा कांहींना कांहीं तरी अंश असतो, व त्या धर्माच्या अनुयायी लोकांच्या बुद्धीस व स्वभावास पटतील असे कांहीं गुण त्यांत असतात. " हेंच तत्त्व आमच्या गीतेच्या पुढील श्लोकांत अंतर्भूत झालेलें आहे.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥**
**येऽप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धयान्विताः ।**
**तेऽपि मामेव कौन्तेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥**

तेलंग म्हणतात कीं, हें जें आमचें प्राचीन ग्रंथांतील तत्व तेंच वरील ( लेसिंगच्या ) पुस्तकांत गोंवलें गेलें आहे. इतकेंच नव्हे, तर त्या तत्वाचें महत्व आमच्या सारखें इतर धर्मांत मानलेलें नाहीं. तरी एक जर्मन महापंडिताचें—त्याच्या पुस्तकावरून दिसून येणारें—मत आमच्या लोकांस समजल्यास त्यांना त्यापासून बोध होईल व वरील आमचेंच तत्व—धर्मसहिष्णुतेचें—त्यांच्या कदाचित् जास्त जास्त आचरणांत दिसूं लागेल. म्हणूनच तेलंगांनीं सदहू पुस्तक लिहिलें.

सदहू नाटकाचें कथानक थोडक्यांत असें आहे. बाराव्या शतकांत जेरुसलेम येथील येशू ख्रिस्ताच्या समाधीसंबंधानें ख्रिस्ती आणि मुसलमान या लोकांमध्यें बरींच धर्मयुद्धें झालीं हें इतिहासज्ञांस श्रुतच आहे. त्यावेळीं जेरुसलेम प्रांताचा सुलतान सालादिन नांवाचा राजा होता. तो त्या धर्मयुद्धांतील सेनानायक होता. तोच प्रस्तुत नाटकांतील एक पात्र आहे. जेरुसलेम गांवांत नेथन या नांवाचा एक श्रीमान् यहुदी व्यापारी होता.

तो फार धार्मिक वृत्तीचा व नीतिमान् असे. त्याची शहाणपणाबद्दल फार ख्याति होती. म्हणून लोक त्याला "शहाणा नेथन" म्हणत असत. तो तेथील दुसऱ्या एका गांवीं असतांना ख्रिस्ती लोकांनीं तिकडच्या सर्व यहुदी लोकांची कत्तल केली. त्यांत नेथनची बायको व मुलें मृत झालीं. त्याच सुमारास वुल्फ फिल्ने या नांवाचा वेषानें ख्रिस्ती पण धर्मानें मुसलमान, असा नेथनचा एक मित्र होता. त्याला एक एकुलती एक अशी लहान मुलगी होती. तिची आई मृत झालेली असल्यामुळें तिच्या बापाच्यानें तिला लढाईवर नेववेना. सबब त्यानें तिला आपल्या मोतद्दारांबरोबर नेथन जवळ संभाळण्याकरितां म्हणून पाठवून दिलें. नेथनचीं बायको-मुलें पूर्वींच मृत झालेलीं होतीं. अर्थात् देवानेंच आपणांस ही मुलगी दिली असें समजून नेथननें त्या मुलीचा स्वीकार केला व तिचें **रेका** असें नांव ठेविलें. पुढें रेकेचा बाप—वुल्फ फिल्ने—हा मरण पावला. अर्थात् नेथननें तिचें पोटच्या मुलीप्रमाणें पालन केलें. तिला लहानाची मोठी केली. तिला शिक्षण दिलें. ती मुलगी पुढें चांगली रूपवती, सुस्वभावी व विचारशील अशी निघाली. तिला आपली पूर्वींची कांहींच माहिती नव्हती. नेथनलाच ती आपला बाप समजत असे. तिला धर्मशिक्षण म्हणजे सर्व धर्मांना ग्राह्य अशीं धर्मतत्वें व नीतितत्वें यांचें शिक्षण देण्यांत आलें होतें. ख्रिस्ती किंवा यहुदी अशा विशिष्ट धर्माचें शिक्षण तिला दिलेलें नव्हतें. नेथनच्या घरीं **दाया** नांवाची एक ख्रिस्ती स्त्री होती. तिचें रेकेवर फार प्रेम असे. तिनेंच रेकेचें आईप्रमाणें संगोपन केलें होतें. तिला रेकेच्या जन्मापासूनची सर्व हकीकत माहीत होती. स्वतः दायाचा धर्म ख्रिस्ती, जन्म युरोपखंडांत, त्यामुळें तिच्या मनाचा ओढा त्या बाजूलाच असणें स्वाभाविक होतें. ती रेकेला बऱ्याच गोष्टी सांगत असे. परंतु त्यांचा रेकेच्या मनावर कांहींच

परिणाम होत नसे. एकदां असें झालें कीं, नेथन हा व्यापाराकरितां बाहेर गांवीं गेला होता. अशा वेळीं इकडे जेरुसलेम गांवांत त्याच्या घराला आग लागली. पण एका "**टेंपुर**"नें आगींत उडी घालून रेकेला वांचविली. त्या पुरुषाला पाहून रेकेला कृतज्ञता वाटली व तिला त्याला भेटण्याची इच्छा झाली. परंतु तो '**टेंपुर**' कांहीं केल्या नेथनच्या घरीं येण्यास कबूल होईना. मुलगी झुरणीस लागली. दायाची इच्छा कीं, **रेकेनें** एकाद्या ख्रिस्ती तरुणाशीं लग्न करावें. **दायानें** पुष्कळ खटपट केली. परंतु '**टेंपुर**' हा मनाचा मोठा मनुष्य होता. तो नेथनच्या गैरहजेरींत त्याच्या घरीं येण्यास मुळींच कबूल होईना! कांहीं दिवसांनीं नेथन घरीं परत आला. त्याला मग सर्व हकीकत समजली. त्यानें '**टेंपुर**ला' आपल्या घरीं बोलाविलें. **टेंपुर** प्रथम कांहींसा उद्धटपणानें वागला, परंतु नेथनचें शांततेचें व शहाणपणाचें भाषण ऐकून तो नरम झाला व त्यानें नेथनच्या घरीं येण्याचें कबूल केलें.

इकडे सुलतान सालादिन याचा धर्मादाय फार जबरदस्त असल्यामुळें त्याच्या खजिन्यांत पैशाची तूट पडली. सुलतानच्या मनांतून नेथनजवळून युक्तीनें कांहीं द्रव्य काढावयाचें होतें. सबब त्यानें नेथनला खरी स्थिति कळविली नाहीं. परंतु ती त्याला खजिनदाराकडून पूर्वींच समजली होती. नेथन राजास भेटला. राजानें त्याला थोडेंसें अडविण्याच्या हेतूनें "कोणता धर्म चांगला?" असा प्रश्न केला. नेथननें त्याला एक तीन आंगठ्यांची गोष्ट सांगून कळविलें कीं "सर्वच धर्म चांगले. ज्यानें त्यानें श्रद्धेनें आपला धर्म पाळावा हेंच उचित!" तीन आंगठ्यांची गोष्ट पुढें येईलच. पण नेथनचें उत्तर ऐकून सुलतान आश्चर्यचकित झाला, आणि आपला द्रव्य मागण्याचा हेतु तो लपवूं लागला. पण नेथननें मग आपण होऊन त्याला द्रव्य दिलें.

तिकडे **टेंप्लर** हा नेथनच्या घरीं जाऊन **रेका** व **दाया** यांना भेटला. रेकेला पाहून तो मोहित झाला. त्यानें नेथनजवळ रेकेविषयीं मागणें केलें. पण नेथनला **टेंप्लर**ची पुरी माहिती नव्हती. सबब त्यानें त्याच्या म्हणण्याला एकदम रुकार दिला नाहीं. **टेंप्लर**ला राग आला. पुढें **दाया**नें त्याला सांगितलें कीं, **रेका** ही धर्मानें ख्रिस्ती आहे. तिला नाकारण्याचा नेथनला अधिकार नाहीं. ती गोष्ट **टेंप्लर**नें मग तेथील धर्माध्यक्षाला कळविली. आणि सांगितलें कीं, एका ख्रिस्ती मुलीला या यहुद्यानें आपल्या धर्मांत वाढविली आहे ! धर्माध्यक्षानें आपला एक मठवासी मनुष्य पाठवून त्याला सर्व प्रकरणाची चौकशी करून येण्यास सांगितलें. तो मठवासी म्हणजे पूर्वीचा मोतद्दार पण संसाराला कंटाळून संन्यास घेतलेला असा माणूस होता ! त्याच्याबरोबरच रेकेच्या बापानें तिला तिच्या बालपणांत संभाळण्याकरितां नेथनजवळ पाठवून दिलें होतें ! त्यानें येऊन नेथनला पूर्वीची सर्व हकीकत सांगितली आणि एक पुस्तक दिलें. त्यावरून **रेका** व **टेंप्लर** हीं बहीणभाऊ आहेत असें त्याला समजलें. पुढें सुलतान सालादिन याला तें पुस्तक पाहण्याला मिळतांच त्यांतील कांहीं लेख आपल्या " असाद ". नांवाच्या भावाच्या हातचे आहेत असें आढळून आलें, व त्या मजकुरावरून **रेका** व **टेंप्लर** हीं आपल्या भावाचीं मुलें आहेत अशी सुलतानाची खात्री झाली. याप्रमाणें सर्वच गोष्टीचा खुलासा होऊन सर्वत्र आनंदी आनंद झाला.

वर सांगितलेली तीन आंगठ्यांची गोष्ट थोडक्यांत अशी आहे. प्राचीन काळीं एका गृहस्थाजवळ एक हिऱ्याची आंगठी होती. ती त्यानें आपल्या एका मित्रास दिली आणि सांगितलें कीं, "या आंगठींतल्या खड्यांत एक असा गुण आहे कीं, ती ज्याच्याजवळ असेल तोच आपल्या कुटुंबांतला कर्ता व शहाणा असा पुरुष होईल. तेव्हां ही तुम्ही आपला

जो आवडता मुलगा असेल त्यालाच द्या. " याप्रमाणें ती आंगठी एका गृहस्थाजवळ आली. त्याला तीन मुलगे होते. तिघांवर त्याची सारखीच प्रीति होती. तो प्रत्येकास सांगे कीं, ही आंगठी मी तुला देईन. पुढें त्याचा अंतकाळ समीप आला. तेव्हां ती आंगठी कोणास द्यावी याविषयीं त्याला काळजी पडली. मग त्यानें एक युक्ति काढली. त्यानें एका जवाहिऱ्यास आपल्या खोलींत बोलाविलें आणि त्याला एकांतांत सांगितलें कीं, या आंगठीप्रमाणें हुबेहूब दुसऱ्या दोन आंगठ्या तयार करा, खर्च व श्रम कितीही पडोत. आंगठ्या तयार झाल्या. मग त्या गृहस्थानें तिघां मुलांना जवळ बोलावून प्रत्येकाला एक एक अशा त्या दिल्या, व मग तो स्वर्गस्थ झाला. पुढें मुलांमध्यें तंटे सुरू झाले. प्रत्येकजण म्हणे कीं, आपली आंगठी खरी व आपणच घरांतला कर्ता पुरुष ! वाद मिटेना. पुष्कळ धुसफुस सुरू झाली. तडतोडीचे प्रयत्न झाले, पण तिघां भावांपैकीं कोणीच पड घेईना. शेवटीं खटला न्यायाधीशापुढें गेला. तिघां भावांपैकीं बापाला कोणीच दोष देईना. फक्त तिघांपैकीं कोणीतरी आपणांस फसविलें आहे असें प्रत्येकजण म्हणे. न्यायाधीशानें सर्व खटला समजून घेतला आणि निकाल सांगतांना तो म्हणाला, " तुमच्या बापाला ज्याअर्थीं इकडे साक्षीला आणतां येत नाहीं किंवा आंगठीला ज्याअर्थीं तोंड उघडून बोलतां येत नाहीं, त्याअर्थीं तुमच्या या तंट्याचा निकाल समाधानकारक रीतीनें देतां येत नाहीं. खऱ्या आंगठींत असा एक गुण असल्याचें मी ऐकलें आहे कीं, ती ज्याच्याजवळ असेल तो सर्वांनाच—ईश्वरास तसेंच मनुष्यांस—प्रिय होतो. तसा गुण खोट्या आंगठींत नाहीं. या एका गोष्टीवरूनच सगळ्या तंट्याचा निकाल लागतो ! तुम्ही मला सांगा कीं, तुम्हांपैकीं कोण दुसऱ्या दोघांना प्रिय आहे ? तुम्हांपैकीं प्रत्येकाचें प्रेम जर केवळ स्वतःवरच असेल तर तुम्ही तिघेही ठक आहां ! आणि तिघांच्याही

आंगठ्या खोट्याच ! ! खरी आंगठी बहुधा हरवली असेल, व तें छपविण्याकरितां किंवा तिची जागा चालविण्याकरितां तुमच्या बापानें तीन नव्या आंगठ्या तयार करविल्या असतील. तुम्हांपैकीं प्रत्येकास तुमच्या बापानें आंगठी दिली आहे. प्रत्येकाची खात्री कीं, आपली आंगठी खरी. कदाचित् एका आंगठीचें फाजील महत्व वाढूं नये असें तुमच्या बापास वाटलें असावें व म्हणूनच त्यानें तीन आंगठ्या तयार करवून तुम्हांपैकीं प्रत्येकास एक एक दिली असावी. एक गोष्ट सत्य आहे. बापाचें तुम्हां तिघांवर सारखेंच प्रेम होतें. अर्थात् एकाला सुखी करून दुसऱ्या दोघांना दुःखांत ठेवणें हें त्याला आवडलें नाहीं. म्हणून त्यानें तीन आंगठ्या तयार करवून तुम्हां तिघांनाही सुखी करण्याचा प्रयत्न केला. तरी तुम्ही अशा शुद्ध व सात्विक प्रेमाचें अनुकरण करा. आपापल्या आंगठींतील खरा गुण प्रकट करण्याच्या कामीं तुम्हांमध्यें चढाओढ लागूं द्या. म्हणजे त्या गुणाच्या योगानें तुम्हांपैकीं प्रत्येकाला सौम्यपणा, शांतीची आवड, परोपकारबुद्धि व ईश्वरावर निष्कपट प्रेम हीं प्राप्त होतील. व याचप्रमाणें खड्याचा गुण तुमच्या मुलांमध्यें, व मुलांच्या मुलांमध्यें प्रकट होत गेल्यास तुम्ही एक हजार वर्षांनीं या धर्मासनापुढें या. त्यावेळीं या आसनावर मजपेक्षां अधिक शहाणा न्यायाधीश येणार आहे. तो तुम्हांला बरोबर फैसला सांगेल. आतां तुम्ही जा." असो. याप्रमाणें सर्व गोष्टीचें तात्पर्य आहे.

तेलंगांनीं हेमंतोत्सव व्याख्यानमालेंत दोन व्याख्यानें मराठींत दिलीं. हिंदु युनियन क्लबच्या तर्फे मुंबईतील मराठी जाणाऱ्या लोकांना निरनिराळ्या विषयांसंबंधीं कांहीं ज्ञानप्राप्ति व्हावी म्हणून तेलंगांनींच सन १८८६ सालीं वरील व्याख्यानमाला सुरू केली, व त्यांत त्यांनीं स्वतः त्याच सालीं "शास्त्र व रूढि" या विषयावर एक व्याख्यान दिलें. तेलंगांच्या

वेळीं सामाजिक सुधारणेचा प्रश्न बराच बिकट झाला होता. समाजांत त्यावेळीं नवा व जुना असे दोन पक्ष झाले होते. त्यांमध्यें हमरी-तुमरी चालत असे. अशावेळीं नव्या-जुन्या गोष्टींची चांगल्या रीतीनें सांगड घालून जनतेपुढें निरनिराळे प्रश्न मांडून त्यांतून हितकर काय आहे हें दाखविणें हाच समाजसुधारकांचा सरळ मार्ग होता. जुन्यांतलें चांगलें तेवढें ठेवून नव्या परिस्थितींत कसें वागावें हेंच लोकांना त्यावेळीं समजणें जरूर होतें. तें दाखविण्याचें काम काशीनाथपंत तेलंग उत्तम रीतीनें करीत असत; व त्या हेतूनेंच त्यांनीं "शास्त्र व रूढि" हा विषय घेऊन त्यावर व्याख्यान दिलें. त्याचा थोडक्यांत सारांश असा.

लोकांत दोन पक्ष होते. एकाला शास्त्रविरुद्ध रूढि असेल ती त्याज्य वाटत असे. दुसऱ्याला "शास्त्राद्रूढिर्बलीयसी" हें ग्राह्य वाटत असे. खरा प्रकार असा आहे. शास्त्र म्हणून जें म्हणतात त्यांत वेद, स्मृति, पुराणें या सर्वांचा अंतर्भाव होतो. तेव्हां त्या सर्वांचा मथितार्थ काय निघतो हें प्रथम पाहिलें पाहिजे, व आपण त्याप्रमाणें नेहमीं वागत आलों आहों कीं काय हेंही पाहिलें पाहिजे. दुसरी गोष्ट अशी कीं, स्मृति वगैरे ग्रंथांत जे नियम घालून दिले आहेत ते त्या त्या कालाचे दर्शक आहेत. तो काल किंवा तो समाज आतां राहिला नाहीं. समाजाची नेहमीं उत्क्रांति होत असते. तेव्हां शिष्टजनांच्या मतें सदरील नियमांत योग्य ते फेरफार करण्यास हरकत नाहीं. याचीं उदाहरणें आहेत. द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कृपाचार्य, परशुराम हे जातीचे ब्राह्मण असून त्यांनीं क्षात्रवृत्ति स्वीकारल्याचे दाखले आहेत. त्याचप्रमाणें जनक, विश्वामित्र हे क्षत्रिय असून त्यांनीं ब्राम्हणधर्म स्वीकारला होता. मधुविद्या व पंचाग्निविद्या या ब्राम्हणांनीं क्षत्रियांपासून घेतल्या असें छांदोग्य उपनिषदांत सांगितलें आहे. पेशवाईत खुद्द रामशास्त्री प्रभुणे यांनीं

पेशव्यांना स्नानसंध्या कमी करण्याबद्दलचा उपदेश केल्याचें प्रसिद्ध आहे. द्रौपदीच्या विवाहाचें कुमारिल भट्टानें असें समर्थन केलें आहे:—

**यौवनस्थैव कृष्णाहि वेदिमध्यात्समुत्थिता ।**
**सा च स्त्री श्रीश्च भूयोऽभिभुज्यमाना न दुष्यति ॥**

तात्पर्य, " यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरेजना: । " हें गीतावचन प्रसिद्धच आहे. तेव्हां शास्त्रनियम हे एकदां घालून दिलेले जशाचे तसे "यावच्चंद्र दिवाकरौ" पाळले पाहिजेत असें होत नाहीं. त्यांत शिष्टजनांनीं फेरफार करणें हें क्रमप्राप्तच आहे. तेलंग म्हणतात कीं, "माझ्या मतें मूळशास्त्रकारांचा हेतु असा असावा कीं, देश, काल, वर्तमान यांकडे लक्ष देऊन धर्मशास्त्रनियमांत वेळोवेळ शिष्टांनीं जरूर फेरफार करावे. त्यावरून शास्त्रकारांचा शहाणपणा व दूरदर्शीपणा व्यक्त होतो. जे नियम एका स्थितींत सोइवार वाटले तेच नियम स्थित्यंतर झाल्यावर प्रतिबंधक होऊन असुखास कारणीभूत झाल्याशिवाय कसे राहतील ? जें चाललें आहे तेंच ठीक आहे. त्यांत फेरफार करणार नाहीं असें म्हणून चालणार नाहीं. सृष्टिनियमाप्रमाणें आमच्या देशाच्या स्थितींत फेरफार होत जाणारच. ती स्थिति जशीची तशी कायम राहाणें शक्य नाहीं. सबब कालमानाप्रमाणें जे योग्य फेरफार व्हावयाचे त्याला कांहीं तरी वाट दाखवून द्या व त्यायोगानें होणारी गैरसोय सोसण्यास कांहीं दिवस तयार व्हा, दुसरा मार्ग दिसत नाहीं." तेलंगांची ही विचारसरणी सर्वांनाच—जुन्या व नव्या पक्षांना—पसंत पडून तें व्याख्यान त्यांना फार आवडलें असें इंदुप्रकाशादि पत्रांवरून दिसतें.

सन १८८९ मध्यें त्याच व्याख्यानमालेमध्यें तेलंगांनीं " सामाजिक विषयासंबंधीं तडजोड " या विषयावर दुसरें व्याख्यान दिलें. त्याचा

अगदीं थोडक्यांत सारांश देतों. सामाजिक विषयांसंबंधानें विचार करतांना तो विचार, उच्चार व आचार (Thought, Word and Deed) या क्रमानें केला पाहिजे. विचारासंबंधानें तेलंग म्हणतात, " आपलीं ईश्वरासंबंधानें, समाजासंबंधानें, राष्ट्रासंबंधानें काय कर्तव्यकर्में आहेत यांबद्दल प्रत्येक सुशिक्षित मनुष्यानें आपल्या बुद्धीप्रमाणें खोल विचार करून आपलीं मतें होईल तितक्या अंशानें, कायम केलीं पाहिजेत, आणि असें ठरवितांना ' न हि सत्यात्परो धर्मः' हें महावाक्य प्रमाणभूत मानलें पाहिजे. " दुसरा प्रश्न, वाडवडिलांचीं मतें व त्यांची वर्तनपद्धत याकडेही लक्ष दिलें पाहिजे. आम्ही वाडवडिलांचें प्रत्येक बाबतींत अनुकरण करूं असें म्हणून चालणार नाहीं. तसें करूं म्हटल्यास सुधारणा होऊन समाजाचें पाऊल केव्हांही पुढें पडणार नाहीं. तिसरी गोष्ट लक्षांत धरण्याची म्हणजे ही कीं, वाडवडिलांची वर्तनपद्धत सोडून तिच्या जागीं नवी सुरू करावयाची ती समाजास हितकर असली पाहिजे व तिच्या समर्थनार्थ आपल्याजवळ तशीं भरपूर प्रमाणें व युक्तिवाद हीं असलीं पाहिजेत. म्हणजे त्या नव्या पद्धतीविषयीं वाडवडिलांची खात्री करून त्यांना आपल्याबरोबर घेऊन जाण्यास फारशी अडचण पडणार नाहीं.

हल्लीं आपण संक्रमण स्थितींत आहों. त्यामुळें आपल्या समाजस्थितींत कांहीं आपोआपच फेरफार होत आहेत. अशा स्थितींत आपण जुन्यालाच चिकटून बसणार असें म्हणून चालणार नाहीं. तसें करणें कोतेपणाचें होईल. तर जे फेरफार होतील त्यांना इष्ट दिशा लावून त्यांपासून समाजाचें एकंदरींत हित होईल असा यत्न केला पाहिजे. अनिष्ट दिशा लागल्यास नुकसान होईल.

याप्रमाणें एकादां " विचार " ठरल्यावर त्यांचा " उच्चार " कसा व केव्हां करावयाचा हें पाहिलें पाहिजे. सत्यप्रतिपादन हें चांगलेंच कृत्य

असतें. पण केव्हां केव्हां तेवढेंच पुरे नसतें. तर तें वेळ पाहून केलें पाहिजे हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. याचीं तेलंगांनीं एक दोन उदाहरणें दिलीं आहेत; त्यांपैकीं एक असें:–सन १८८९ च्या सुमारास इंग्लंडांत आयर्लंडचा प्रश्न उपस्थित होऊन त्याबद्दल बरीच जंगी चळवळ चालली होती. त्यामुळें तिकडील मुत्सद्दी लोकांस दुसरें कांहीं सुचेनासें झालें होतें. अशावेळीं तिकडे हिंदुस्थानचा—तो कितीही महत्वाचा व निकडीचा असला तरी—प्रश्न काढणें बरोबर नव्हतें. या करतां तो थोडा वेळ बाजूस सारावा लागला. त्याचप्रमाणें, तेलंगांच्या वेळीं लोकमत पुनर्विवाहास हळू हळू अनुकूल व्हावयास लागलें होतें. अशावेळीं त्यांतच फिरून जातिभेद मोडण्याचें मिश्रण करणें ठीक नव्हतें. सारांश, केवळ पायाखालीं काय आहे एवढेंच न पाहतां, दूरवर दृष्टि फेंकून काय करावयाचें तें केलें पाहिजे.

" आचारा "संबंधानें वास्तविक पाहिल्यास, ज्याचें जसें मत असेल त्याप्रमाणें तो वागला तर उत्तमच, पण व्यवहारांत तें सर्वांनाच शक्य नसतें. म्हणून एकादा मनुष्य आपल्या मताप्रमाणें—कारणें कांहींही असोत—न वागला तर त्याच्या प्रतिपादनाची किंमत कमी होते असें नाहीं. किंवा त्यानें आपलें तोंड बंद ठेविलें पाहिजे असेंही होत नाहीं. कोणी एकादा मनुष्य आपणांस मूर्तिपूजा मान्य नाहीं म्हणणारा, कोणत्याही कारणानें, एकाद्या वेळीं देवळांत गेला म्हणजे कांहीं बिघडतें असें नाहीं. त्याचप्रमाणें एकाद्या मनुष्यानें पुष्कळ प्रयत्न करूनही घरांतल्या बायका शिकत नाहींत, तर त्यानें स्त्रीशिक्षणाबद्दलचा उपदेश करूं नये असें होत नाहीं. मुख्य मुद्दा हा कीं, " एकादा मनुष्य म्हणाला कीं, अमकी अमकी समजूत अज्ञानमूलक आहे अशी माझी खात्री झाली म्हणून ती मी सोडणार तर ही तडजोड रास्त होईल. पण मी जें सत्य समजतों तें तुम्हांला पटलें नाहीं म्हणून तुम्ही जें ( असत्य ) अंगीकारलें आहे

त्याप्रमाणें मी वागेन, असें झाल्यास ही तडजोड बरोबर होणार नाहीं." पुनर्विवाह हा शास्त्रविरुद्ध नाहीं. पण लोक तसा मानतात तर प्रथम अक्षतयोनि विधवा विवाह सुरू करणें ही तडजोड रास्त होईल. इंग्लंडला जाणें हें शास्त्राविरुद्ध आहे. पण कोणी तसा जाऊन आल्यास त्याला प्रायश्चित्त देऊन जातींत घेणें ही तडजोड न्यायाची होईल. सारांश, सुधारणा करणें ती हळू हळू केली पाहिजे. तिला थोडा दिनावधि लागेल. पण दिनावधि लागून जी सुधारणा होईल ती पक्की होईल. मात्र मध्यंतरीं खटपट चालू राहिली पाहिजे. ती सोडतां कामा नये.

हे तेलंगांचे समाजसुधारणेविषयींचे विचार प्रस्तुत काळीं सर्वांनाच पटतील असें वाटत नाहीं. हल्लींच्या समाजाचे विचार त्या बाबतींत फार पुढें गेले आहेत. तथापि तेलंगांनीं आपलें व्याख्यान चाळीस वर्षांपूर्वींच्या समाजस्थितीच्या दृष्टीनें दिलें होतें ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे त्यासंबंधाच्या अधिक खुलाशाचें कारण उरत नाहीं.

काशीनाथपंतांनीं मराठी वाङ्मयाची समृद्धि करण्याचे अन्य रीतीनेंही प्रयत्न चालविले होते. हिंदु यूनियन क्लबमध्यें त्यावेळीं बहुधा विद्वान् व सुशिक्षित अशा लोकांचाच भरणा असे. त्यांपैकीं ज्याला जशी इच्छा व सवड होईल तशी त्यानें मराठी भाषेची कांहींतरी सेवा करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून बरेच दिवस क्लबांत चर्चा होऊन तेलंगांनीं एक योजना ( scheme ) तयार केली. ती अगदीं मुक्रर ठरून सन १८९० सालीं हिंदु यूनियन क्लबमध्यें न्या. तेलंगांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. तिचें "महाराष्ट्र भाषासंवर्धक मंडळी" असें नामकरण करण्यांत येऊन तिचा "मराठी भाषेंत विशेषेंकरून ऐतिहासिक, चरित्रात्मक, बोधपर व इतर उपयुक्त विषयांवर सुलभ व मनोरंजक ग्रंथसमूह वाढवावा"

असा केसरीच्या द्वारें हेतु जाहीर करण्यांत आला. असो. या मंडळींत ठरल्याप्रमाणें कित्येक गृहस्थांकडे भाषांतर किंवा रूपांतर करण्याकरितां म्हणून कांहीं निवडक इंग्रजी पुस्तकें वांटण्यांत आलीं होतीं. कै. वि. कों. ओक यांनीं "एब्राहाम लिंकन" याचें संक्षित चरित्र लिहिलें आहे. त्याच्या प्रस्तावनेंत ते असें म्हणतातः—"चरित्र लिहिण्याविषयीं आम्हांस प्रथमतः ऑन. जस्टिस का. त्रिं. तेलंग यांनीं सुचविलें. त्यास आधारभूत म्हणून एक फार उत्तम इंग्लिश पुस्तक पाठवून दिलें. आणि आमच्या विनंतीस मान देऊन, त्यांस इतर मोठमोठीं अनेक कामें होतीं तरी, आमच्या पुस्तकाचा हस्तलेख वाचून पाहिला आणि छापील कच्चे खर्डे तपासून त्यांत जागोजाग पुष्कळ चांगली भर घातली. ती इतकी कीं, ह्या पुस्तकांत रसिकांस मान्य, विद्वानांस प्रिय, सामान्यांस बोधपर आणि धर्मज्ञांस मनोरंजक असें जर कोठें कांहीं असलें तर तें सगळें त्या सत्पुरुषाच्या हस्तस्पर्शाचें फळ आहे. म्हणून त्याबद्दलचें सगळें श्रेय त्यांचें आहे." असो. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, वरील योजनेपासून फक्त या ओकांच्या पुस्तकांपलीकडे फळाच्या रूपानें कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. व तेलंगांच्या मृत्यूनंतर तिकडे हिंदु यूनियन क्लबमधील कोणत्याही प्रमुख सभासदाचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

हेमंतोत्सवव्याख्यानमालेंतील मुख्य व्याख्यानानंतर वादविवाद होत असे. त्यांत तेलंग हे वरचेवर भाग घेत असत व भाषणाच्या द्वारें ते निरनिराळ्या विषयांसंबंधीं श्रोत्यांना नवीन माहिती सांगत असत. पण त्याचा इकडे विस्तार करीत नाहीं. पण सांगावयाची गोष्ट ही कीं, सदर्हू व्याख्यानमाला तेलंग हयात होते तोंपर्यंत चांगली चालली. मग तिला उतरती कळा लागली, व अखेर ती बंद पडली. याचा इत्यर्थ एका मुंबईच्या बातमीदारानें केसरींत स्पष्ट करून दाखविला होता तो असाः

"कोणाला असल्या गोष्टींची आस्थाच नाहीं व कोणाला यांत मन चालवयाला नको."

तेलंग हे केव्हां केव्हां सवडींत सवड काढून मराठींत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचीं परीक्षणें करून किंवा त्यांतील गुणदोष दाखवून वाचकवर्गाला योग्य वळण लावीत असत. सन १८७८ मध्यें कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, कै. काशीनाथ नारायण साने, व कै. बाळाजी जनार्दन मोडक या तिघांनीं मिळून "काव्येतिहाससंग्रह" मासिक पुस्तक सुरू केलें होतें. त्याचें तेलंगांनीं सन १८८० सालीं "Indian Antiquary" मध्यें परीक्षण केलें. त्यांत त्यांनीं सदहू संपादकांची योग्य स्तुति करून मासिकाबद्दल असा अभिप्राय दिला:—"एकंदरींत मासिक चांगलें चाललें आहे. आणि ज्यांना ज्यांना आपल्या मराठी व संस्कृत वाङ्मयाबद्दल कळकळ वाटत असेल व विशेषतः ज्यांना आपल्या महाराष्ट्राच्या इतिहासाचें महत्व वाटत असेल अशा प्रत्येक गृहस्थानें या मासिकास जरूर आश्रय द्यावा."

सन १८९१ सालीं मुंबईंत "एल्फिन्स्टन कॉलेज यूनियन" पुढें त्या वेळचे तिकडील म्युनिसिपल कमिशनर मि. ॲकवर्थ यांचें "मराठी कविता" यावर व्याख्यान झालें. त्यावेळीं न्या. तेलंग हे अध्यक्षस्थानीं होते. ॲकवर्थ साहेबांनीं आपल्या विषयावर बोलतांना मराठींत चांगले गद्य ग्रंथ नाहींत असें सांगून कै. विष्णु शास्त्री चिपळूणकरांचें "निबंधमाला" हें मासिक कांहीं इतक्या उच्च दर्जाचें नव्हतें असें म्हटलें. त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें तेलंग यांचें जें भाषण झालें त्यांत त्यांनीं मराठी भाषेंतील गद्यलेखकांपैकीं कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची योग्य शब्दांत स्तुति केली. परंतु विष्णुशास्त्री यांच्या टीकापद्धतीविषयीं त्यांनीं

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)

आपली नापसंती दर्शवून त्यापद्धतीच्या योगानें शास्त्रीबोवांनीं लोकांची वाष्कळ लिहिण्याकडे प्रवृत्ति केली असें म्हटलें. वस्तुतः विष्णुशास्त्री यांनीं निबंधमालेंत जरी कांहीं उपयुक्त विषयांवर चांगले निबंध लिहिले असले तरी त्यांनीं कांहीं कांहीं वेळां अनुसरलेल्या टीकापद्धतीसंबंधानें—कांहीं थोडे लोक खेरीज करून—कोणाचेंच मत चांगलें नव्हतें. कै. वामनराव मोडक, कै. अण्णासाहेब महाजनी, कै. काशीनाथपंत साने यांनीं अनेकदां शास्त्रीबोवांच्या हयातींतच त्यांच्या टीकापद्धतीविषयीं निषेध केला होता हें शास्त्रीबोवांच्या चरित्रांत नमूद आहे. त्याच मताचा न्या. तेलंगांनीं वरील प्रसंगीं जवळ जवळ अनुवाद केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण तेलंगांचें भाषण कित्येकांस आवडलं नाहीं व त्यांनीं त्याबद्दल वर्तमान-पत्रांत न्यायमूर्तींवर टीका केली. असो.

सन १८९२ मध्यें मराठींत तीन चरित्रात्मक पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं. रा. राजारामशास्त्री भागवत यांनीं लिहिलेलें शिवाजीचें चरित्र; रा. निगुडकरांनीं लिहिलेलें परशुराम भाऊ पटवर्धन यांचें चरित्र; व रा. वासुदेव शास्त्री खरे यांनीं लिहिलेलें नाना फडणविसांचें चरित्र हीं तीं पुस्तकें होत. या तिन्ही पुस्तकांसंबंधानें तेलंगांनीं हिंदु यूनियन क्लबमध्यें अत्यंत मार्मिक रीतीनें गुण-दोष-विवेचन केलें. त्याचा इकडे विस्तार न करतां त्यावेळीं केसरीनें त्यासंबंधीं जे उद्गार काढले तेवढेच देतों:— “नामदार तेलंगांनीं हिंदु यूनियन क्लबांत दिलेलें व्याख्यान सारांशरूपानें आज दुसरीकडे छापलें आहे, तें प्रत्येक महाराष्ट्रभाषाहितचिंतकानें वाचण्यासारखें आहे. काशीनाथपंतांसारख्या कार्यव्यापृत्वाविषयीं प्रख्यात असलेल्या गृहस्थांसही मराठी चरित्रांचें व बखरींचें परिशीलन करण्यास वेळ सांपडतो हें नृपक्रीडनकांत व धूम्रपानाच्या झुरक्याबरोबर चकाट्या पिटण्यांत दंग झालेल्या आधुनिक विद्वानांनीं व इतर रिकामटेकड्या

लोकांनीं लक्षांत बाळगण्यासारखें आहे. सरकारी नोकरींत शिरल्यावर उरलेला वेळ व्यर्थ न घालवितां तो महाराष्ट्र भाषेच्या सेवेकडे ते लावीत आहेत हें त्यांस भूषणास्पद नाहीं असें कोण म्हणेल ? ”

---

प्रकरण—सातवें.

## लोकशिक्षण

लोकांत साक्षरतेचें प्रमाण वाढून त्यांना हरएक दृष्टीनें कार्यक्षम करणें हें एक हल्लींच्या दिवसांत प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांतील सरकारचें व लोकनायकांचें मुख्य कर्तव्य गणलेलें आहे. तें कर्तव्य लोकनायकांना त्यांच्या सवडीप्रमाणें व संधि मिळेल तसें प्रत्यक्ष शिक्षण देण्याच्या कामीं भाग घेऊन किंवा विद्यापीठासारख्या संस्थेच्या कामांत परिश्रमपूर्वक लक्ष घालून अगर त्यासंबंधाच्या सरकारी धोरणांत सुधारणा सुचवून अथवा शिक्षणसंस्थांना प्रत्यक्ष द्रव्यद्वारा यथाशक्ति मदत करून करतां येण्यासारखें असतें. तेलंगांमधला विशेष हा कीं, लोकशिक्षणाच्या कामांत वरीलपैकीं प्रत्येक मार्गानें सहाय्य करून त्यांनीं देशाची मोठी कामगिरी बजाविली आहे. त्यासंबंधानें आतां थोडेंसें विवरण करतों.

शिक्षण देण्याच्या कामीं प्रत्यक्ष भाग घेण्याची तेलंगांचें शिक्षण पुरें होतांच त्यांना संधि मिळाली होती. ते बी. ए. होतांच सन १८६८ सालीं त्यांनीं एल्फिन्स्टन हायस्कुलांत दोन महिने संस्कृत शिकविण्याचें काम केलें होतें. पुढें त्यांची सीनियर फेलोच्या जागीं नेमणूक झाल्यामुळें त्यांना कॉलेजांत शिकविण्याचेंच काम करावें लागे. त्यानंतर पुढें ते बॅरिस्टरीचा धंदा करूं लागल्यावर त्यांची लॉ स्कूलमधील प्रोफेसरच्या जागीं

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं. १०९२०९ ग्रंथानुक्रमांक
किंमत पाने २००

सन १८८१ मध्यें नेमणूक झाली. त्यावेळीं लॉ स्कूलमध्यें तेलंग हेच पहिले हिंदी प्रोफेसर होते. पुढें सन १८८८ सालीं त्या जागीं त्यांची कायमप्रमाणें नेमणूक झाल्यामुळें पुढील सालच्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं लॉर्ड रे यांनीं तेलंगांच्या विद्वत्तेविषयीं व योग्यतेविषयीं आदरोद्गार काढले होते. सन १८८९ मध्यें तेलंगांची जज्जाचे जागीं नेमणूक होतांच त्यांनीं प्रोफेसरच्या जागेचा राजीनामा दिला. याप्रमाणें तेलंगांनीं प्रत्यक्ष अध्यापनाचें काम केलें होतें.

विद्यापीठाशीं—यूनिव्हर्सिटीशीं—तेलंगांचा प्रथम सन १८७४ पासून परीक्षक या नात्यानें संबंध आला. त्या सालीं ते जे बी. ए. च्या परीक्षेंत संस्कृतचे परीक्षक नेमले गेले ते तसेच पुढें चार वर्षेंपर्यंत परीक्षक नेमले गेले होते. सन १८७७ सालीं त्यांची सरकारकडून यूनिव्हर्सिटीच्या फेलोच्या जागीं नेमणूक करण्यांत आली. सन १८८२ मध्यें ते डॉ. भांडारकरांनीं सिंडिकेटमधील आपल्या जागेचा राजीनामा दिल्यामुळें, त्यांच्या जागीं सिंडीक झाले. तेलंग त्या जागेवर पुढें दहा वर्षें राहिले, व मग त्यांची सन १८९२ सालीं व्हाइस-चॅन्सेलरच्या जागीं नेमणूक झाली.

तेलंग यांची सिंडीक या नात्याची—१८८२ ते १९९२—कारकीर्द फार महत्वाची होती. त्या मुदतींत युनिव्हर्सिटीच्या परीक्षांपैकीं शेतकी, कायदा व आर्ट्स ( वाङ्मय व इतर विषय ) या परीक्षांचे अभ्यासक्रम ठरवावयाचे होते. ते ठरविण्याच्या कामीं तेलंगांनीं मनस्वी मेहनत घेतली. त्यांपैकीं कायद्याच्या अभ्यासक्रमामध्यें बरीच सुधारणा करावयाची होती. शेतकीच्या शिक्षणाची रीतसर अभ्यासक्रम ठरवून नीट व्यवस्था लावा-वयाची व अखेरची परीक्षा झाल्यावर विद्यार्थ्यांना पदवी द्यावयाची,

याप्रमाणें ती योजना होती. या दोन्ही कामांत तेलंगांनीं फार परिश्रम केले व त्या शिक्षणाची नीट पायाशुद्ध मांडणी केली असें त्या वेळचे व्हाइसचॅन्सलर सर रेमंड वेस्ट व टाइम्स ऑफ इंडिया यांनीं नमूद करून ठेविलें आहे. पण " आर्ट्स " शाखेचा अभ्यासक्रम ठरविणें हें त्याहीपेक्षां जास्त महत्वाचें काम होतें. या अभ्यासक्रमांत पूर्वीं एकदोनदां फेरफार करण्यांत आले होते. सन १८७० सालीं त्या अभ्यासक्रमांत संस्कृत, लॅटिन वगैरे भाषांना आवश्यक सदराखालीं स्थान मिळालें होतें. सन १८७९ मध्यें त्यांत शास्त्रीय ( science ) विषयांची भर घातली जाऊन त्याचा निराळाच अभ्यासक्रम ठरविण्यांत आला व दरवर्षीं एक परीक्षा याप्रमाणें तीन वर्षांत तीन परीक्षा झाल्यावर विद्यार्थ्यांना बी. ए. किंवा बी. एससी. पदवी मिळावी अशी ती व्यवस्था होती. पण ती कांहीं वर्षांच्या अनुभवानें गैरसोयीची व असमाधानकारक होती असें आढळून आलें. त्याच सुमारास दुसरी एक गोष्ट घडली होती. सन १८८५ मध्यें राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यामुळें लोकांत राजकीय दृष्टीनें बरीच जागृति झाली होती व तिला इतिहासाच्या अभ्यासानें इष्ट प्रकारचें वळण देणें अत्यंत जरूर होतें. तसेंच इंग्लंडचा व आपल्या देशाचा संबंध आल्या दिवसापासून आमच्या लोकांच्या आर्थिक स्थितींत हळुहळू पण खात्रीनें फरक पडत चालला होता. या गोष्टीची लोकांस चांगली माहिती करून देण्याच्या कामीं अर्थशास्त्राचा अभ्यास हा अगदीं महत्वाचा व जरूर होता. पण या विषयांच्या अध्ययनाची चालू अभ्यासक्रमांत असलेली सोय समाधानकारक नव्हती. या सर्व गोष्टींचा नीट विचार करून काशीनाथपंतांनीं बी. ए. चा चांगला व्यापक दृष्टीनें अभ्यासक्रम तयार केला व मॅट्रिकपासून बी. ए. ची मुदत तीनच्या जागीं चार वर्षें करून त्या मुदतींत त्या सर्व विषयांचा पायाशुद्ध अभ्यास पुरा व्हावा अशी

व्यवस्था केली. या चार वर्षांत इंग्लिश व संस्कृत या भाषांचा व गणित विषयाचा जरूर तेवढा विद्यार्थ्यांचा अभ्यास व्हावा; तर्कशास्त्र व पदार्थविज्ञान यांच्या मूळ तत्वांची त्यांना माहिती व्हावी व अखेरच्या दोन वर्षांत त्यांचें हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही देशांच्या इतिहासाचें व अर्थशास्त्राचें अध्ययन पूर्ण होऊन विद्यार्थी आपल्या धंद्यास व देशकार्यास लायक व्हावे अशी तेलंगांची सर्व योजना होती. ही योजना तयार करण्यास अर्थातच बराच काळ लागला व पुष्कळ विद्वान् व लायक गृहस्थांबरोबर विचारविनिमय करावा लागला. सबब त्या कामाकरितां सिनेटकडून जी कमिटी नेमण्यांत आली होती त्यांत त्यावेळचे सर्व विद्वान्, तज्ज्ञ व अनुभवी असे लोक समाविष्ट करण्यांत आले होते. युरोपियनांपैकीं प्रि. वर्डस्वर्थ, प्रि. ऑग्झेन्हॅम, ना. बर्डवुड, डॉ. मॅकिकन व फादर मेयर्स व आमच्यांपैकीं डॉ. भांडारकर, रा. ब. ( नंतरचे न्यायमूर्ति ) रानडे, फेरोजशहा मेथा, प्रि. मोडक व स्वतः काशीनाथपंत तेलंग अशी मंडळी त्या कमिटींत होती, व या कमिटीनें सदरील विषयाचा सुमारें दोन वर्षें सर्व दृष्टींनीं विचार करून वर सांगितलेला अभ्यासक्रम मुक्रर केला व तो तेलंगांच्या सूचनेवरून सिनेटनें सन १८९० च्या एप्रिलमध्यें पास केला. या अभ्यासक्रमाला देखील कांहीं लोकांचा विरोध होता, पण तो इतका महत्वाचा नव्हता. तरी तो अभ्यासक्रम—जो इतक्या अधिकाराच्या मंडळींनीं ठरविला होता व जो सुमारें वीस वर्षें विद्यार्थी व अध्यापक वर्ग यांच्या पचनीं पडला होता तो सन १९१० च्या सुमारास त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम यांच्या आग्रहामुळें फिरविण्यांत आला व इतिहास व अर्थशास्त्र हे आवश्यक विषयांतून काढून ऐच्छिक विषयांत घालण्यांत आले! ही इतकी उलथा-पालथ लॉर्ड सिडनहॅम यांनीं कां

केली याचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. पण त्यांत आम्ही येथें शिरूं इच्छित नाहीं. सिनेटपुढें प्रश्न आला तेव्हां (१९१०–११) तेलंग व रानडे दिवंगत झालेले होते. वर्डस्वर्थ साहेब विलायतेस गेले होते. पण मेथा व डॉ. भांडारकर हे हजर होते. त्यांनीं विरोध केला, पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. असो.

तेलंगांनीं वर सांगितल्याप्रमाणें आपल्या मुदतींत युनिव्हर्सिटींत उत्तम काम केलें. त्याप्रमाणें त्यांची लॉर्ड हॅरिस यांजकडून सन १८९२ मध्यें व्हाइस चॅन्सलरच्या जागीं नेमणूक झाली ती ठीकच झाली. त्यामुळें सर्वांनाच आनंद झाला. पण पुढच्याच वर्षीं तेलंग स्वर्गस्थ झाले.

तेलंगांनीं शिक्षणाच्या बाबतींत जी दुसरी महत्वाची कामगिरी केली ती एज्युकेशन कमिशनचे एक सभासद या नात्यानें होय. सन १८८२ सालीं लॉर्ड रिपन साहेबांनीं या कमशनची नेमणूक केली होती. त्यांत सर्व प्रांतांतून प्रतिनिधींची नेमणूक करण्यांत आली होती. मुंबई इलाख्यातर्फे फक्त काशीनाथपंत तेलंग यांचीच तेवढी नेमणूक झाली होती.

लॉर्ड रिपन यांचे हें जें एज्युकेशन कमिशन नेमण्यांत आलें त्यांत एक-दोन हेतु होते. तें कमिशन नेमलें जाण्यापूर्वीं रेव्ह. जॉन्सन, रेव्ह. डॉ. मॅकिकन वगैरे कांहीं प्रमुख मिशनरींनीं विलायतेंत सुमारें चार वर्षें जंगी चळवळ चालविली होती. तिचा हेतु हा होता कीं, हिंदुस्थानांत जी शिक्षण-पद्धत सुरू करण्यांत आली आहे त्यांत धर्मशिक्षणाची सोय केलेली नसल्यामुळें सुशिक्षित लोकांचीं मनें नास्तिकपणा किंवा अज्ञेयवाद असल्या मतांकडे झुकत चाललीं आहेत; तर देशांतील वरिष्ठ प्रकारचें शिक्षण हें खासगी—म्हणजे मिशनरी--संस्थांच्या ताब्यांत द्यावें. म्हणजे त्यांत धर्म-

शिक्षणाची सहज सोय होईल व सरकारचा त्या बाबतींत होणारा बराच खर्च वांचून ते पैसे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याकडे खर्च करतां येतील. मिशनरी लोकांच्या या चळवळीला विलायतेंतील लॉर्ड हॅलिफॅक्स, ड्यूक ऑफ आर्गाइल अशा बड्या बड्या लोकांचें पाठबळ होतें. अर्थात् सदर्हू कमिशनची जी नेमणूक झाली ती सदरील गोष्टींची चौकशी करण्याकरितांच म्हणून झाली होती. कमिशनची नेमणूक करण्याबाबतचा जो सरकारी ठराव प्रसिद्ध झाला होता त्यांत "प्राथमिक शिक्षणाची स्थिति व तें जास्त प्रमाणावर प्रसृत करण्याबद्दलचे उपाय" यासंबंधानें चौकशी करणें हाच हेतु स्पष्टपणें निर्दिष्ट करण्यांत आला होता.

वरील प्रकारांत बाहेर आलेलें मिशनरी लोकांचें विधान—कीं सरकारच्या धर्मरहित शिक्षणपद्धतीनें तयार झालेले लोक बहुधा नास्तिक असतात हें—अगदीं निराधार होतें, व वरिष्ठ प्रकारचें शिक्षण देण्याबाबतचें चालू सरकारी धोरण बदललें जाऊन तें ओझें सरकारच्या डोक्यावरून काढून इतक्यांतच—मिशनरी संस्था इतक्याच कांहीं खासगी शिक्षणसंस्था नव्हत्या—खासगी संस्थांच्या अंगावर टाकणें हें हरएक दृष्टीनें अनिष्ट होतें. याबद्दल या देशांतील सर्व जाणत्या लोकांमध्यें बिलकूल मतभेद नव्हता. त्यामुळें इकडे आमच्या देशांतील प्रमुख प्रमुख संस्थांनीं व लोकनायकांनीं देखील उलट दिशेनें मोठी चळवळ करून सरकारकडून वरिष्ठ प्रकारच्या शिक्षणाची पिच्छेहाट किंवा उपासमार करूं द्यावयाची नाहीं असा निश्चय केला होता. त्या बाबतींत अत्यंत मूल्यवान् अशी जर कोणी—मुंबई इलाख्यातर्फे बोलावयाचें म्हटल्यास—कामगिरी केली असेल तर ती निःसंशय तेलंगांनींच होय. सदर्हू कमिशनमधील बऱ्याच सभासदांशीं पुष्कळ प्रश्नांसंबंधीं तेलंगांचा तीव्र मतभेद झाल्यामुळें त्यांनीं आपलें एक भिन्नमतदर्शक पत्रक कमिशनच्या रिपोर्टास

जोडलें होतें. तें अत्यंत मुद्देसूद व समर्पक असें मिशनरी लोकांच्या व व त्यांच्या पाठराख्यांच्या चळवळीस उत्तर असून त्यांत आणखी दुसऱ्या शिक्षणविषयक बाबींविषयीं ऊहापोह केला होता. त्याचा स्थलाभावास्तव इकडे विस्तार करतां येत नाहीं. तेलंगांचा निरुत्तर करून सोडणारा कोटिक्रम ज्याला पहावयाचा असेल त्यानें तें भिन्नमतपत्रक मुळांतच वाचलें पाहिजे. आम्ही इकडे फक्त चार शब्दांत त्याचा सारांश देतों.

हिंदुस्थान सरकारानें आपण धर्मशिक्षणाच्या भानगडींत न पडतां पूर्वीचेंच व्यावहारिक (secular) शिक्षणाबाबतचें धोरण चालू ठेवणार आहोंत असें जाहीर केल्यामुळें मिशनरी लोकांचीं त्या दृष्टीनें तोंडें बंद झालीं. परंतु रेव्ह. जॉन्स्टन वगैरे मिशनरी लोकांनीं एका अर्जांत "सुशिक्षित लोक हे नास्तिक किंवा अज्ञेयवादी होतात" असें केलेलें विधान व त्याच्या समर्थनार्थ त्यांनींच दिलेल्या कांहीं साक्षी ह्या होत्याच ! त्यांचा तेलंगांनीं आपल्या भिन्नमतपत्रकांत स्पष्ट निषेध केला. आपण स्वतः व आपले पुष्कळ मित्र चालू असलेल्या सरकारी शिक्षणपद्धतीनेंच शिकलेले असल्यामुळें मिशनरी लोकांनीं "सुशिक्षित लोक नास्तिक व अज्ञेयवादी होतात" असें निराधार व खोडसाळ विधान केल्याबद्दल स्पष्ट शब्दांत निषेध करणें आपलें कर्तव्य आहे असें म्हणून तेलंगांनीं तसा निषेध केला.

काशीनाथपंत तेलंग हे वरिष्ठ प्रकारच्या शिक्षणाचे प्रथमपासूनच मोठे पुरस्कर्ते होते. त्या दृष्टीनें त्यांनीं—सरकारचा जो वरिष्ठ शिक्षणांतून अंग काढून प्राथमिक शिक्षणाकडेच होत चाललेला जास्त जास्त कल—त्याच्याविरुद्ध इतकें जोराचें व निरुत्तर करून सोडणारें प्रतिपादन केलें कीं, त्याचा कमिशनचे अध्यक्ष सर विल्यम हंटर व खुद्द लॉर्ड रिपन यांच्या मनावर देखील इष्ट प्रकारचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं !

तेलंगांनीं म्हटलें कीं, आपण प्राथमिक शिक्षणाच्या विरुद्ध मुळींच नाहीं. देशाची सर्व दृष्टींनीं—राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे दृष्टींनीं—प्रगति होण्याकरितां प्राथमिक शिक्षणाचा जनतेमध्यें शक्य तितका प्रसार झालाच पाहिजे, हें तत्त्व त्यांना पूर्णपणें मान्य होतें. पण प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराकरितां, त्याच्याच बरोबर वरिष्ठ शिक्षणाचेंही पाऊल पुढें पडत राहिलें पाहिजे असें तेलंगांनीं मॅथ्यू ॲर्नाल्ड याच्या ग्रंथांचा आधार घेऊन व खुद्द युरोप खंडांत आलेल्या अनुभवाचा दाखला देऊन सिद्ध करून दाखविलें. प्राथमिक शिक्षणाला त्यांनीं हाताची, व वरिष्ठ शिक्षणाला डोक्याची उपमा देऊन स्पष्ट म्हटलें कीं, राष्ट्रदेहाला नुसते लठ्ठ हात असून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. त्याला चांगलें डोकेंही पण असलें पाहिजे. तरच देशाची प्रगति होईल. एका प्रकारच्या शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां दुसऱ्या प्रकारच्या शिक्षणाची उपासमार करणें हें धोरण बरोबर नाहीं. देशाचें खरोखरीच पाऊल पुढें पडावें अशी सरकाराची मनापासून इच्छा असेल तर त्यानें जास्त रक्कम खर्च करण्यास तयार झालें पाहिजे, व याच्या समर्थनार्थ खुद्द इंग्लंडच्याच पार्लमेंटनें कसें शिक्षणाकरितां फक्त दहा वर्षांत २० लक्ष पौंडांच्या ठिकाणीं ४२ लक्ष पौंडांचा खर्च मंजूर करून उत्तम उदाहरण घालून दिलें आहे हें दाखवून तेलंगांनीं लॉर्ड रिपन साहेबांनीं त्याचें अंशतः तरी अनुकरण करून शिक्षणाकरितां मोठी रक्कम मंजूर करावी अशी त्या लाटसाहेबांस कळकळीची विनंति केली आहे. ह्या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, मिशनरी लोकांच्या धर्मविषयक शिक्षणाविषयींच्या काव्यास सरकार बळी तर पडलें नाहींच, पण प्राथमिक शिक्षणाच्या पायीं वरिष्ठ शिक्षणाबद्दलची जबाबदारी टाळण्याबाबतचें धोरण सरकारला बदलावें लागलें व ज्या ज्या ठिकाणीं हायस्कुलें व कॉलेजें हीं वाढविण्याबद्दलची मागणी येईल त्या त्या

ठिकाणीं ती अवश्य पुरवावी अशी कमिशननें सर्वानुमतें शिफारस केली. असा परिणाम घडून येण्यास आणखी दुसऱ्या कांहीं गोष्टी कारण झाल्या हें कबूल केलें पाहिजे. मुख्य कारण देशांत लोकांनीं केलेली चळवळ व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कमिशनचे अध्यक्ष सर विल्यम हंटर यांची सहानुभूतिपूर्ण वृत्ति व खुद्द लॉर्ड रिपन यांचें उदार धोरण ! अशा कारणसमुच्चयामुळें वरील प्रकारचा इष्ट परिणाम झाला. पण कारणें कांहीं असलीं, तरी काशीनाथपंतांनीं खुद्द कमिशनमध्यें राहून केलेली कामगिरी बिनमोल होती यांत शंकाच नाहीं. अर्थात् लागलीच तेलंगांच्या कृतीविषयीं जिकडे तिकडे गौरव व्हावा यांत आश्चर्य नाहीं. कमिशनच्या रिपोर्टावरील सरकारी ठरावांत तेलंगांसंबंधानें गौरवयुक्त उल्लेख केलेला होता. त्यावेळच्या "टाइम्स ऑफ इंडिया"नें एक लेख लिहून त्यांत तेलंगांच्या बुद्धिमत्तेविषयीं व त्यांनीं कमिशनमध्यें केलेल्या कामाविषयीं स्तुतिपर उद्गार काढले होते. थोड्याच दिवसांनीं महाराणी सरकारकडून तेलंगांना सी. आय. ई. ही बहुमानाची पदवी अर्पण करण्यांत आली. हा सर्व प्रकार पाहून सर्वांनाच आनंद झाला. पुण्यास रा. ब. रानड्यांच्या प्रोत्साहनानें सार्वजनिक सभेची एक जाहीर सभा भरविण्यांत येऊन तेलंगांचें अभिनंदन करण्यांत आलें. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळीकडून तेलंगांना मानपत्र देण्यांत आलें, व केसरीनें तेलंगांविषयीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले:-"आन. मि. का. तेलंग यांनीं आजपर्यंत जी बुद्धिमत्ता प्रदर्शित केली आहे तीबद्दल त्यांना मिळालेला सी. आय. ई. हा मानाचा किताब योग्य पात्रीं पडला हें कोणीही कबूल करील. एज्युकेशन कमिशनचे मेंबर या नात्यानें मि. तेलंग यांनीं प्रशंसनीय कुशाग्रबुद्धि, विचारशैली, कोटिक्रम व वक्तृत्वशक्ति हीं प्रकट केलीं हें आम्ही मागेंच सांगितलें आहे. तेव्हां त्यांना हा किताब मिळाला हें ऐकून सर्व महाराष्ट्रीयांस संतोष व समाधान होणार आहे यांत बिलकुल संशय नाहीं."

काशीनाथपंत तेलंग यांनीं शिक्षणाच्या बाबतींत तिसरी एक चिरसंस्मरणीय कामगिरी केली आहे. ती मुंबईस जी " व्हिक्टोरिया जुबिली टेक्निकल इन्स्टिटयूट" नांवाची एक अत्यंत उपयुक्त संस्था चालू आहे तिच्या स्थापनेच्या वेळेची होय. तेलंग व मुंबईचे इतर पुढारी लोक यांच्या सन १८७०–७५ च्या सुमारापासूनच लक्षांत येऊन चुकलें होतें कीं, आपल्या देशाची राजकीय व सामाजिक सुधारणेबरोबरच औद्योगिक दृष्टीनेंही सुधारणा होणें जरूर आहे. याबद्दल पुढारी लोकांत केव्हां केव्हां ऊहापोह होत असे. परंतु सन १८८५ सालीं लॉर्ड रे हे जेव्हां मुंबईचे गव्हर्नर होऊन आले तेव्हां वरील पुढाऱ्यांच्या कल्पनेस मूर्तस्वरूप देण्याबाबतची चर्चा सुरू झाली. तेलंग व फेरोजशहा मेथा यांनीं जी पहिली गोष्ट केली ती लॉर्ड रे मुंबईस आल्याबरोबर त्यांच्या नजरेस ही " औद्योगिक शिक्षणाविषयीं "ची गोष्ट आणली, ही होय. स्वतः लॉर्ड रे हे एक शिक्षणविषयक तज्ज्ञ असल्यामुळें व त्यांनीं खुद्द इंग्लंडमध्येंच सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या बाबतींत कित्येक दिवस काम केलेलें असल्यामुळें सदहू कामामध्यें त्यांच्या अनुभवाची चांगलीच मदत झाली, व लॉर्ड रे यांच्या सहानुभूतीनें तेलंग व मेथा यांनीं धंदेशिक्षणाच्या संस्थेची एक योजना तयार केली.

या कामीं तेलंगांनीं एज्युकेशन कमिशनमधील मंडळीची सहानुभूति पूर्वींच मिळवून ठेविली होती. पुढें लॉर्ड रिपन यांना सन १८८४ च्या अखेरीस उत्साहपूर्वक मुंबईकरांनीं निरोप दिला तेव्हां त्यांचें कांहीं स्मारक उभारावें म्हणून एक फंड जमा झालाच होता. त्याचा विनियोग एकादा पुतळा अगर रिपन साहेबांच्या नांवानें स्कॉलरशिपा स्थापन करण्याच्या कामीं न करतां सरकारनें धंदेशिक्षणाची कांहीं सोय करण्याचें मनांत आणल्यास त्या कामीं मदत म्हणून ती रक्कम द्यावी असें

ठरलें. इतकी तयारी होतांच, लॉर्ड रे यांनीं मुंबईच्या प्रमुख पुढारी लोकांस सेक्रेटरीएटमध्यें बोलावून त्यांच्याशीं सदहू प्रकरणीं बरीच वाटाघाट केली. पुढें सन १८८७ मध्यें महाराणी साहेबांची ज्युबिली आली. तेव्हां त्या उत्सवाच्या निमित्तानें एकादें स्मारक करणें जरूर होतें. इतक्यांत सर दिनशा पेटिट यांनीं एल्फिन्स्टन कॉलेज परळहून हालवून कोटांत आणल्यास आपण नवी इमारत बांधून देण्यास तयार आहों असें कळविलें; पण परळ येथील कॉलेजची इमारत बांधण्यास पहिले कावसजी जहांगीर रेडीमनी यांनीं दोन लाख रुपये दिले होते. तेव्हां तोड अशी निघाली कीं, सर दिनशा पेटिट यांनीं कोटांत कॉलेजकरितां इमारत बांधून द्यावी व तिला रेडीमनी यांचें नांव द्यावें व परळ येथील कॉलेजच्या ( जुन्या ) इमारतीला सर दिनशा पेटिटचें नांव द्यावें व तीच धंदेशिक्षणाच्या शाळे-करितां वापरावी. याप्रमाणें सर्व योजनेला इतकें स्वरूप येण्याला तेलंग व मेथा यांचेच श्रम केवळ कारणीभूत झाले. त्यांतूनही लॉर्ड रे यांची सहानु-भूति या कामीं नसती तर तें इतक्या लवकर व इतक्या यशस्वी रीतीनें हातावेगळें झालें नसतें. पुढें ती—धंदेशिक्षणाची शाळा कायमप्रमाणें चालावी म्हणून बोर्डाची व्यवस्था करण्यांत आली, व त्यांत जितक्या फंडांचा संबंध आला होता तितक्यांचे प्रतिनिधि व सरकारचे कांहीं प्रति-निधि यांची बोर्डावर नेमणूक करण्यांत आली. कायम खर्चाची तजवीज करण्याकरितां रिपन मेमोरियल फंड, सर जमशेटजी जिजीभाई व नव-रोजी फर्दुनजी यांचे दोन स्मारक फंड, इतके फंड—एकत्रित करून त्यांतच मुंबई सरकारनें वार्षिक खर्चाकरितां सालीना कांहीं रक्कम देण्याचें ठरविलें. याप्रमाणें सर्व तयारी होतांच सन १८८९ मध्यें परळ येथें " व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट " या नावानें धंदे शिक्षणाचें कॉलेज उघडण्यांत आलें व तें आज चाळीसपेक्षांही अधिक वर्षें उत्तम

रीतीनें चाललें आहे. या सर्व योजनेंत तेलंगांच्या अंगीं असलेले कांहीं मुत्सद्देगिरीचे उत्तमोत्तम गुण उपयोगास आले व सदरील संस्थेची स्थापना म्हणजे तेलंगांची जज्जाचे जागेवर नेमणूक व्हावयाच्या पूर्वींपर्यंतच्या त्यांच्या सर्व सार्वजनिक चळवळींवर सुंदर कळस चढविला गेला असें सर दिनशा वाच्छा यांनीं एके ठिकाणीं लिहून ठेविलें आहे !

तेलंगांच्या मनाचा ओढा स्वभावतःच वाङ्मयाकडे असला तरी उद्योग-धंद्यांच्या दृष्टीनें देशाची उन्नति व्हावी एतदर्थ ते कसे कसून तनमनधनेंकरून खटपट करीत असत हें वरील हकीकतीवरून स्पष्ट झालेंच आहे. पण तशा कामांत पदरचे कांहीं पैसे खर्च व्हावयाचे असले तरी ते करून एका दृष्टीनें त्यांनीं स्वार्थत्यागही केल्याचें उदाहरण घडलें आहे. सन १८७०–८० च्या सुमारास तेलंग, मेथा व दुसरे कांहीं मित्र यांनीं मिळून एक साबणाचा कारखाना काढला व त्यांत प्रत्येकानें भांडवलाच्या रूपानें हजारों रुपये घातले. त्या कारखान्याच्या बोर्डावर तेलंग, मेथा यांची नेमणूक झालेली होती. कारखाना नीट चालला आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां ते बोर्डाच्या प्रत्येक सभेला न चुकतां हजर राहत असत. पण अखेर काय झालें ? कारखाना बुडाला आणि तेलंग, मेथा वगैरेंनीं घातलेले सर्व पैसे बुडून गेले ! पण त्यांनीं तें एक देशाचें काम म्हणून अंगावर घेतलें होतें. असो.

पण शिक्षणाचें काम आलें कीं, त्याला तेलंग हे अंतःकरणपूर्वक सढळ हातानें मदत केल्याशिवाय सहसा राहात नसत. ते दरमहा सुमारें तीनशें विद्यार्थ्यांना द्रव्यद्वारा मदत करीत असत असें एकदां इंदुप्रकाशानें प्रसिद्ध केलें होतें. मुंबईंत राहाणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना फी अथवा पुस्तकें विकत घेणें अगर खाणावळीचे पैसे देणें असल्या कामीं खर्च करण्याकरितां

पैशाची फार गरज लागत असते हें प्रसिद्ध आहे. तेलंग अशा अनेक गरजू विद्यार्थ्यांना मनापासून मदत करीत असत. ही तर त्यांची शिक्षणाच्या कामीं प्रत्यक्ष होणारी मदत झाली. अप्रत्यक्ष रीतीनें त्यांचेकडून होणारी मदत तर त्याहीपेक्षां कितीतरी अधिक असे.

सन १८९०–९१ च्या सुमारास कै. बळवंत भाऊ नगरकर यांनीं मुंबईत "शिवाजी हायस्कूल" ही शिक्षणसंस्था बरेच दिवस चालविली होती. तिला तेलंगांची द्रव्यद्वारा महत्वाची मदत होत असे.

सन १८९२ मध्यें मुंबईजवळील दादर येथें एक "धी जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट" नांवाची शिक्षणसंस्था स्थापन झाली. तिच्या मूळ उत्पादकांपैकीं न्या. तेलंग हे एक होते. त्या संस्थेकडून आज कित्येक शाळा चांगल्या रीतीनें चालविल्या जात आहेत.

सन १८८० सालीं कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं पुण्यास एक "न्यू इंग्लिश स्कूल" नांवाची शाळा काढली. थोड्याच दिवसांनीं कै. आगरकर व कै. टिळक हेही शास्त्रीबोवांना येऊन मिळाले. पुढच्याच वर्षी म्हणजे सन १८८१ मध्यें कांहीं सामान, पुस्तकें वगैरे जिनसांची जरूर लागली व त्याबद्दल चालकांनीं वर्गणीची यादी फिरवून सुमारें रु. ३५० जमा केले. त्यांत रसायनशास्त्रीय उपकरणांकरितां म्हणून ( for purchasing chemical apparatus ) तेलंगांकडून ५० रुपये आलेले शाळेच्या दप्तरांत दाखल झालेले आहेत. पुढें सन १८८४ सालीं शाळेला नियमबद्ध स्वरूप देण्याकरितां म्हणून "डेक्कन एज्युकेशन सोसायटी" स्थापन करण्यांत आली. त्यावेळीं नामदार तेलंग हे १००० रुपये भरून त्या सोसायटीचे "पेट्रन" झाले. लागलीच तेलंगांची कौन्सिलमध्यें निवडणूक झाली. याप्रमाणें सोसायटीच्या स्थाप-

श्री. छ. प्रतापसिंह महाराज

नेच्या वेळीं तेलंग जे कौन्सिलर झाले ते अखेरपर्यंत (सन १८९३) कायम होते. त्यांच्या निधनानंतर फेरोजशहा मेथा हे कौन्सिलर झाले. असो. सन १८८४ मध्यें तेलंग डे. ए. सोसायटीचे कौन्सिलर झाले तेव्हांपासून पुढें सोसायटीतर्फे झालेल्या प्रत्येक महत्वाच्या समारंभाचे वेळीं ते हजर होते. सन १८८४ सालींच त्यांना सोसायटीतर्फे सी. आय्. ई. पदवी मिळाल्याबद्दल मानपत्र देण्यांत येऊन त्यांत त्यांनीं त्यावेळपर्यंत शिक्षणोत्तेजनार्थ व शिक्षणप्रसारार्थ जे परिश्रम केले होते त्याबद्दल गौरव-युक्त उल्लेख करण्यांत आला होता, व त्यावर उत्तर देतांना तेलंगांनीं चिपळूणकर–आगरकर–टिळक या मंडळींनीं केलेल्या स्तुत्य उपक्रमा-बद्दल उत्तेजनपर उद्गार काढले होते. याबद्दलची सर्व हकीकत त्यावेळच्या केसरींत प्रसिद्ध झाली होती. असो.

त्यावेळीं मुंबईंत जितक्या शिक्षणविषयक किंवा वाङ्मयात्मक संस्था होत्या तितक्या सर्वांशीं तेलंगांचा संबंध असे. सन १८९२ सालीं प्रसिद्ध शेट दामोदरदास गोवर्धनदास यांनीं मुंबईस एक जंगी सार्वजनिक वाच-नालय (People's Free Reading Room) स्थापन केलें. तें उघडण्याचा समारंभ त्याच सालीं न्या. तेलंग यांच्याच हस्तें झाला.

मुंबईस नेटिव्ह जनरल लायब्ररी नांवाचें एक फार जुनें वाचनालय आहे. त्याचे न्या. तेलंग हे कित्येक वर्षें अध्यक्ष होते. त्याचप्रमाणें मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे ते सन १८७४ मध्यें जे सभासद झाले ते शेवटपर्यंत होते. त्या संस्थेचे सर रेमंड वेस्ट हे कांहीं वर्षें अध्यक्ष होते. त्यांनीं त्या संस्थेपुढें तेलंगांनीं अनेक विद्वत्वपूर्ण निबंध वाचून व तिकडे होणाऱ्या वादविवादांत उत्साहपूर्वक भाग घेऊन जी अत्युत्तम कामगिरी केली होती त्याचा एके ठिकाणीं अत्यंत गौरवयुक्त उल्लेख केला

होता. सर रेमंड वेस्ट हे पेनशन घेऊन विलायतेस गेल्यावर तेलंगांनाच त्या संस्थेचे अध्यक्ष निवडण्यांत आलें ! त्या सोसायटीचे तेलंग हेच पहिले हिंदी अध्यक्ष होते ! मुंबईची एशियाटिक सोसायटी ही संस्था सव्वाशें वर्षांपेक्षांही अधिक जुनी आहे. तिच्या अध्यक्षांच्या नामावळींत सर्व युरोपीयन लोकांचीं नांवें आहेत. त्यांत हिंदी अध्यक्षांचें म्हणजे फक्त न्या. तेलंगांचेंच तेवढें एक नांव आहे !

---

प्रकरण आठवें.

# सामाजिक सुधारणा

हिंदुस्थान देशांत ब्रिटिशसत्ता सुरू झाल्याबरोबर ज्या कांहीं आनुषंगिक अशा—पोस्ट, तारायंत्रें, आगगाड्या, आगबोटी वगैरे—नवीन गोष्टी आल्या—तेव्हांपासूनच आमच्या लोकांच्या दृष्टींत हळुहळू व नकळतच फरक पडूं लागून त्यांच्या कल्पना बदलूं लागल्या. या क्रांतीला जीं कारणें झालीं त्यांत इंग्लिश शिक्षणाला पहिलें स्थान दिलें पाहिजे. या शिक्षणाच्या योगानें आम्हांस कांहीं नवीन गोष्टी समजूं लागल्या. आमच्या लोकांची दृष्टि फांकूं लागली, व आमची चिकित्साबुद्धि जागृत होऊं लागली. पूर्वीं आमच्या लोकांची कोणत्याही गोष्टीचा विचार करण्याची जी रीत असे ती एकदेशीय असे. याचें मुख्य कारण म्हणजे बाहेरच्या लोकांशीं संबंध येऊन ज्या मार्गानें नवीन गोष्टींची माहिती मिळावयाची तो मार्गच आमच्या लोकांस खुला नव्हता. तो मार्ग ब्रिटिश सत्तेच्या आगमनाबरोबर मोकळा झाल्यामुळें साहजिकच आमच्या लोकांच्या विचारांत क्रांति होऊं

लागली व या विचारक्रांतीचा जो पहिला परिणाम दृष्टीस पडला तो आमच्या सामाजिक दुःस्थितीसंबंधानें होय. याबद्दलचें जें पहिलें उदाहरण घडलें तें गेल्या शतकाच्या तिशींतलें—म्हणजे बरोबर शंभर वर्षांपूर्वींचें—होय. त्यावेळीं एक श्रीपत शेषाद्रि नांवाचा ब्राह्मण ख्रिस्ती झाला होता. त्याला पश्चात्ताप झाल्यामुळें त्याची परत हिंदु धर्मांत येण्याची इच्छा होती. पण त्याला त्या काळीं हाताशीं धरतो कोण ? आणि मदत करतो कोण ? पण तशाही वेळीं त्या काळांतले चांगले शिकून तयार झालेले व विद्वान् असे गृहस्थ म्हणजे कै. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर हे धैर्यानें पुढें आले आणि त्यांनीं त्या वेळचे मुंबईतील हिंदु लोकांचे पुढारी नामदार जगन्नाथ शंकर शेट यांची सहानुभूति मिळवून सदर्हू कामीं पुढाकार घेतला आणि श्रीपत शेषाद्रीला प्रायश्चित्त येऊन परत जातींत घेतलें ! ह्यावरून त्यावेळीं सबंध हिंदु समाजांत मोठी खळबळ उडून गेली व खुद्द शास्त्रीबोवांचा त्यांच्या जातवाल्या लोकांकडून मनस्वी छळ झाला. असो. तदनंतर पुढें पुनर्विवाहाचा प्रश्न निघाला. त्यासंबंधानें व स्त्रियांस शिक्षण देण्याची कांहीं व्यवस्था झाली पाहिजे याविषयीं चळवळ सुरू झाली.

डॉ. भांडारकरांनीं आपल्या एका भाषणांत म्हटलें आहे कीं, त्यावेळच्या नवीन शिकलेल्या मंडळीच्या दृष्टीस जी पहिली गोष्ट पडली ती आमच्या स्त्रीवर्गाची दुःस्थिति होय ! त्यावेळीं मुलींचीं अगदीं लहान वयांत लग्नें होत असत. दुर्दैवेंकरून एकाद्या मुलीस वैधव्य प्राप्त झाल्यास तिला पुनर्विवाहाची मुभा नसे—अर्थात् तिला कष्टमय स्थितींत सारा जन्म घालवावा लागे; सतीची चाल त्या वेळीं कांहीं प्रांतांत प्रचारांत होती; बहुपत्नीकत्वाची चाल होती; तात्पर्य स्त्रियांच्या पाठीमागें अशीं अनेक बंधनें लाविलीं गेल्या-मुळें त्यांच्या जीवाची लोकांस सामान्यतः कांहीं किंमत वाटत नसे. त्यामुळें स्त्रियांच्या या दुःस्थितीचें मूळकारण जें त्यांचें अज्ञान तें दूर करण्याचें उत्तम

साधन म्हणजे त्यांना शिक्षण देणें होय; व तेंच साधन उत्पन्न करण्याचें पहिल्या सुशिक्षित पिढींतील मंडळीच्या मनानें घेतलें व त्याप्रमाणें मुंबईत सन १८४८ मध्यें पहिली मुलींची शाळा उघडण्यांत आली. त्या सालीं मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांतील कांहीं प्रोफेसर लोकांच्या सहानुभूतीनें व मदतीनें—त्यांत प्रो. दादाभाई नवरोजी यांचें मुख्यतः अंग होतें—"स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी" ही संस्था स्थापन करण्यांत आली व तिच्या आश्रयाखालीं सदरील मुलींची शाळा व दुसऱ्या कांहीं मुलींच्या शाळा चालविण्याची व्यवस्था करण्यांत आली. असो. याप्रमाणें स्त्रीशिक्षणाचा पाया घालण्यांत आल्यावर बालविवाह बंद करण्याचे व विधवाविवाह सुरू करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या सुमारें शंभर वर्षांपूर्वीं सुरू झालेल्या चळवळीचा आज परिणाम काय झाला हें आम्ही प्रत्यक्ष पाहात आहोंत. आज चोहोंकडे विद्वान् स्त्रिया उत्पन्न झालेल्या दिसत आहेत; बालविवाह मागें पडत चालला आहे; विधवा स्त्रियांना त्यांची इच्छा असल्यास पुनः विवाह करण्याची मोकळीक आहे; सतीची चाल साफ बंद पडली आहे; बहुपत्नीकत्व लोकांस तिरस्करणीय—निदान अन्यायाचें आहे असें वाटूं लागलें आहे व सर्वांत महत्वाची गोष्ट सांगावयाची म्हणजे स्त्रीवर्गाचें पूर्वीचें परावलंबित्व—विशेषेंकरून विधवास्त्रियांचें—नामशेष होऊन त्यांना मानानें आपल्या पायांवर उभें राहतां येईल असे मार्ग खुले झालेले आहेत ! इतकी एका शतकांत समाजक्रांति ज्यांच्या श्रमांमुळें झाली ते पहिल्या पहिल्या सुशिक्षित पिढ्यांतले लोक हे—एकदां सर बार्टल फ्रेअर यांनीं डॉ. भाऊ दाजी व त्यांचे सहाय्यक यांच्याविषयीं बोलतांना म्हटल्याप्रमाणें—खरे खुरे शूर व आपल्या समाजाचे उपकारकर्ते होत ! त्यांचें कोणत्याही विचारशील माणसांस विस्मरण होणें शक्य नाहीं.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

सदरील समाजसुधारणेच्छु मंडळींमध्यें न्या. तेलंग हे एक प्रमुख होते, व त्यांनीं सन १८७२ पासून सन १८९३ पर्यंतच्या सर्व चळवळींत भाग घेऊन सामाजिक दृष्टीनें देशाची मोठी कामगिरी केली आहे. त्यांच्या वेळीं सामाजिक चळवळ करण्याचीं मुंबईतील मुख्य साधनें म्हणजे वर सांगितलेली स्टू. लि. अँड सा. सोसायटी व हिंदु यूनियन क्लब ह्या दोन संस्था होत. ह्या दोन्ही संस्थांशीं तेलंगांचा अत्यंत निकट संबंध होता; व त्यांतूनही स्टू. लि. अँड सा. सोसायटीच्या साधनानें तर तेलंगांनीं जशी सामाजिक व वाङ्मयात्मक दृष्टीनें अत्यंत महत्वाची कामगिरी केली आहे तशी बहुधा दुसऱ्या कोणीच केली नाहीं असें सर दिनशा वाच्छा यांनीं एके ठिकाणीं लिहून ठेविलें आहे! स्टू. लि. अँड सोसायटीचे तेलंग हे सन १८७२ पासून सन १८८९ पर्यंत सेक्रेटरी होते. त्या मुदतींत त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत पुढाकार घेऊन सोसायटीच्या ताब्यांत ज्या मुलींच्या शाळा होत्या त्यांना हरएक प्रकारें मदत करून ऊर्जितदशा आणली. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं त्या संस्थेंत वरचेवर निरनिराळ्या विषयांवर निबंध लिहून, व्याख्यानें देऊन व अन्य वेळीं होणाऱ्या वादविवादांत भाग घेऊन लोकांना इतकी नवीन माहिती करून दिली कीं, त्यांच्या ज्ञानांत निःसंशय बरीच भर पडली असली पाहिजे. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, वरीलपैकीं बरींच व्याख्यानें, भाषणें वगैरे हीं आज उपलब्ध नाहींत. जे निबंध किंवा जीं व्याख्यानें पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं तेवढींच उपलब्ध आहेत. तरी त्यांपैकीं जे निबंध किंवा जीं व्याख्यानें उत्तम म्हणून गणलीं गेलीं आहेत तीं सर्व स्टू. लि. अँड सा. सोसायटी पुढेंच झालीं होतीं. शंकराचार्यांचें चरित्र, रामायण—होमर यांवरील निबंध व गीता—बायबल यांवरील निबंध आणि सामाजिक—राजकीय बाबतींसंबंधानें सर ऑकलंड कॉल्विन यांस दिलेलें उत्तर—हीं सर्व

वाचनें व भाषणें वरील सोसायटी पुढेंच झालीं होतीं. असो. तेलंग हे त्या सोसायटीचे प्रथम सेक्रेटरी होते. पुढें रा. सा. मंडलीकांच्या निधनानंतर सन १८८९ मध्यें ते तिचे अध्यक्ष झाले. ते त्या जागेवर अखेरपर्यंत होते.

तसेंच तेलंग हे मुंबईतील हिंदु यूनियन क्लबचे अध्यक्ष होते. त्यांचा त्या संस्थेशीं संबंध होता, त्या काळांत ती एक अत्यंत नमुनेदार संस्था होती हें सर्वश्रुतच आहे. तेलंगांची स्वतःची वागणूक कै. चंदावरकरांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे " a life of culture and rectitude " सन्मार्ग व उदात्त विचारसरणी याला अनुरूप अशी असे. पण त्यांत महत्वाची गोष्ट म्हणजे लोकांनीं देखील तसेंच वागावें असा त्यांचा उपदेश व प्रयत्न असे. तेलंग हे नेहमीं म्हणत असत कीं, विद्या, पुस्तकें वगैरे साधनांच्या योगानें मनुष्याच्या मनावर सुसंस्कार घडून त्याच्यांत विचारशीलता जर जागृत झाली नाहीं, तर त्या विद्येचा किंवा त्या पुस्तकांचा कांहीं उपयोग नाहीं. त्यामुळें तेलंग हे क्लबमध्यें असले म्हणजे कोणी तरी सभासद एकादा विषय काढी व त्यावर मग चर्चा चाले. अशा वेळीं तेलंगांच्या सहवासाची खरी किंमत काय हें जमलेल्यांपैकीं प्रत्येक मनुष्यास कळून येत असे, व त्याचा आपणांस लाभ मिळत आहे याबद्दल त्याला समाधान वाटत असे. तेलंगांची बुद्धि तर विशाल व उदार अशी असेच, पण त्यांचा व्यासंग दांडगा व विविधविषयक असल्यामुळें व त्यांना अनेक विषयांसंबंधीं भरपूर माहिती असल्यामुळें त्यांचें संभाषण हें नेहमीं उदात्त विचारांनीं भरलेलें व बोधप्रद असे. कोणताही विषय असो, त्यासंबंधीं तेलंगांनीं कांहीं तरी नवीन माहिती सांगितली नाहीं अगर त्याविषयीं सुंदर रीतीनें तत्वबोध करून जमलेल्या मंडळींत थोडीशी तरी विचारजागृति केली नाहीं असें

सहसा घडत नसे. असे संभाषणाचे प्रसंग हिंदु यूनियन क्लबमध्यें वरचेवर येत असत व अशा प्रसंगीं चाललेल्या वादविवादांत जमलेल्या मंडळींपैकीं पुष्कळ लोक भाग घेत असत. तेलंगांच्या वेळच्या "हिंदु यूनियन क्लब"चें एका लेखकानें असें वर्णन केलें आहे:—

"या ठिकाणीं संध्याकाळीं, ऑफिस सुटल्यावर, पुष्कळ विद्वान् व विद्वानांच्या सहवासाचे शोकी लोक जमत असत. जमलेल्या मंडळींत सर्व जातींच्या लोकांचा भरणा असे. तेलंग हे सर्वांस केंद्रस्थानीं असत. ते नेमानें संध्याकाळीं क्लबांत येत, आणि त्यांच्या गोड व हितकर भाषणाचा लाभ घडावा म्हणूनच पुष्कळसे मेंबर हजर राहात असत. तेथें राजकीय, धार्मिक, सामाजिक वगैरे विषयांची चर्चा चाले. संध्याकाळीं थकून भागून आलेली कांहीं मंडळी चणेकुरमुऱ्यांवर व स्वच्छ पाण्यावर आपली तहान भूक भागवीत असत. तात्पर्य, "plain living and high thinking" (साधी राहणी व उदात्त विचारसरणी) या साधुवचनाचें तेलंगाच्या वेळीं हा क्लब एक उत्कृष्ट उदाहरण असे."

सन १८८४ मध्यें मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांनीं काशीनाथपंत तेलंग यांची प्रथमच मुंबईच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें नेमणूक केली. मुंबई यूनिव्हर्सिटीचे पदवीधर लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद झाल्याचें तेलंगांचेंच पहिलें उदाहरण होतें. त्यांच्यानंतर कांहीं दिवसांनीं, बद्रुद्दीन तय्यबजी, फेरोजशहा मेथा, रा. ब. रानडे यांच्या नेमणुका झाल्या. असो. तेलंगांची वरीलप्रमाणें नेमणूक होतांच त्यांच्या सन्मानार्थ हिंदु यूनियन क्लबनें अहोरात्र मोठा उत्सव केला. त्याबद्दलची हकीकत त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. असो. त्याच्याच पुढच्या वर्षीं तेलंगांच्याच पुरस्कर्तृत्वामुळें क्लबच्या

आश्रयाखालीं कांहीं तरी वाङ्मयसेवा व्हावी या उद्देशानें "हेमंतोत्सव व्याख्यानमाला" सुरू करण्याबाबतची योजना ठरली व त्यासाठीं कै. गणेश रामचंद्र किर्लोसकर, रा. वासुदेव गोपाळ भांडारकर वगैरे सात आठ सभासदांची एक कमिटी नेमण्यांत आली. याप्रमाणें सर्व व्यवस्था झाल्यावर सन १८८६ सालच्या नोव्हेंबर महिन्यापासून व्याख्यानमालेस सुरवात झाली. व्याख्यानमालेंत दर वर्षीं सुमारें दहा पंधरा व्याख्यानें होत असत, व तीं सर्व विद्वान् सुशिक्षित लोकांचीं असत. मधून मधून महामहोपाध्याय भीमाचार्य झळकीकर व महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस अशा जुन्या पद्धतीच्या विद्वान् लोकांचींही व्याख्यानें होत असत. पण फार करून आधुनिक विद्वान् लोकांचींच होत असत. कै. गणपतराव किर्लोसकर, डॉ. भालचंद्र व त्यांचे विद्वान् बंधु विष्णुपंत भाटवडेकर, रा. वासुदेवराव भांडारकर, रा. सा. नारायण विष्णु बापट, प्रि. वामनराव मोडक इत्यादि अनेक विद्वान् माणसांचीं त्या मालेंत व्याख्यानें झालीं आहेत. हीं व्याख्यानें दर वर्षीं आक्टोबर पासून मार्चपर्यंत चालू असत. हें ज्ञानसत्र तेलंग हयात होते तोंपर्यंत उत्तम चाललें. पुढें त्याला उतरती कळा लागली. न्या. रानडे मुंबईस आल्यावर सदरील व्याख्यानमालेचें पुनरुज्जीवन झालें, पण तें फार दिवस टिकलें नाहीं. असो.

हेमंतोत्सव व्याख्यानमालेंत काशीनाथपंत तेलंग हे स्वतः व्याख्यानें देऊन व नंतर होणाऱ्या वादविवादांत भाग घेऊन त्या ज्ञानसत्रांत महत्वाचें सहाय्य करीत असत. त्यांनीं "शास्त्र व रूढि" आणि "सामाजिक बाबतींतील तडजोड" या विषयांवर दिलेल्या व्याख्यानांचा मागें उल्लेख आलाच आहे. त्याची इकडे पुनरुक्ति करीत नाहीं. असो. एकंदरींत तेलंगांच्या नेतृत्वाखालीं त्यांच्या हयातींत हिंदु यूनियन

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

क्लबचा एकसारखा उत्तरोत्तर उत्कर्ष होत चाललेला पाहून कांहीं देशहितचिंतक लोकांना समाधान वाटावें व त्यांचे तसे उद्गार निघावे यांत आश्चर्य नाहीं. सन १८८९ सालीं केसरीनें एका लेखांत पुढील प्रमाणें लिहिलें आहे—"आज आमच्या समाजास असल्या संस्थांची फार जरूर आहे. आमच्यांत अजून ऐक्यभाव जोरावला नाहीं. किंबहुना असलेला ऐक्यभाव जातो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. सुशिक्षित म्हणविणाऱ्या व सुधारणेवर अत्यंत आसक्ति दाखविणाऱ्या आणि देशहिताची चिंता वाहणाऱ्या लोकांत देखील एकमेकांविषयीं उदारता व निरभिमानता दिसून येत नाहीं. जिकडेतिकडे फाजील स्वमताभिमान व एकलकोंडेपणा हे वाढत चाललेले दिसतात. ऐक्य राहिलें एकीकडे; नुसती मैत्री व शत्रुत्वाचा अभाव इतकें जरी असतें तरी पतकरतें. पण तसेंदेखील आमच्यानें होत नाहीं. ज्याला त्याला वाटतें कीं, आपल्याहून अन्यतर मत प्रतिपादणाऱ्या मनुष्यास चीत करावें ! अशा या अभिमानामुळें आज कित्येक चांगल्या हितकारक संस्था शून्यवत् होऊन बसल्या आहेत. अशा स्थितींत हिंदु यूनियन क्लबाची भरभराट चाललेली पाहून त्यांतील प्रमुख लोकांच्या अंगीं कांहीं चांगले गुण असावेत असें स्पष्ट दिसतें ! आमच्या पुण्यांत मात्र पोकळ बडबडीखेरीज कशाचेंच बीं रुजत नाहीं !"

तेलंग हे क्लबमध्यें दररोज संध्याकाळीं येऊन चार घटका मंडळीशीं बोलत बसत असत. रविवारीं एक तासभर लवकर येत असत, व क्लबमधलें काम संपल्यावर ते आठ साडेआठाला घरीं जात असत. काशीनाथपंत तेलंग यांच्यासारख्या माणसाचा सहवासच अत्यंत उन्नतिकारक असे. त्यामुळें त्याचा लाभ करून घेण्यास बरीच मंडळी उत्सुक असे. याप्रमाणें तेलंगांच्या सहवासापासून किती नवीन गोष्टी समजत

असत व त्यांच्यांशीं संभाषणप्रसंग आल्यास निरनिराळ्या विषयांसंबंधीं त्यांचे कसे उन्नतिकारक विचार असल्याचें आढळून येत असे, हें कै. सर नारायण चंदावरकर यांनीं आपल्या आठवणींत सुंदर रीतीनें दाखविलें आहे.

तेलंगांना आपल्या समान-विचाराच्या मंडळीबरोबर शक्य तितक्या वेळां एके ठिकाणीं जमण्याची व त्यांच्याशीं विचारविनिमय करण्याची भारी हौस असे. त्याचें प्रत्यंतर वरील हिंदु यूनियन क्लबाच्या हकीकती-वरून तर दिसतेंच आहे. पण तेलंगांनीं तशाच हेतूनें दुसरी एक योजना केली होती. त्यांनीं लोणावळ्यास कांहीं एकर जमीन विकत घेऊन तिकडे कायम आपला एक बंगला बांधला. मग रानडे, वागळे, भांडारकर, मोडक वगैरे मंडळींनीं शेजारीं शेजारीं आपले बंगले बांधले. याप्रमाणें सर्व मंडळीनीं मेच्या व आक्टोबरच्या सुटींत एके ठिकाणीं जमण्याचें आपापल्यापरी साधन केल्यामुळें सगळ्यांचेंच वर्षांतून दोन तीन महिने लोणावळ्यास राहणें होत असे. व एकमेकांमध्यें अनेक विषयांवर त्या अवधींत विचारविनिमय व संभाषणें होत असल्यामुळें त्या ठिकाणचें सबंध वातावरणच उन्नतिकारक व्हावें व तशा वातावरणाचा आपणांस पुष्कळ वेळां लाभ झाल्याबद्दल कित्येक मंडळीस आनंद व समाधान वाटावें यांत आश्चर्य नाहीं. या संबंधांत कै. चंदावरकरांच्या आठवणीचा वर उल्लेख आलाच आहे. तशाच प्रकारचे उद्गार न्या. तेलंगांविषयीं एका सार्वजनिक प्रसंगीं बोलतांना सर महादेव चौबळ यांनीं काढलेले आम्हांस माहीत आहेत. असो. मुद्याची गोष्ट ही कीं, काशीनाथपंत हे अंशतः आपल्या स्वभाव-गुणांमुळें व अंशतः नव्या-जुन्या पद्धतीच्या शिक्षणाचा त्यांच्या मनावर सुसंस्कार झाल्यामुळें सर्व लोकांना आपल्या सरळ वर्त-नानें कसे आकर्षित असत व त्यांच्यांत विचारजागृति करून त्यांना कसें

चांगलें वळण लावीत असत हेंच लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दु:खाची गोष्ट ही कीं, हिंदु यूनियन क्लबचें पूर्वीचें स्वरूप आतां पार बदलून गेलें आहे.

तेलंगांच्या वेळीं आपल्या देशांत सामाजिक दृष्टीनें बऱ्याच चळवळी झाल्या. त्यांपैकीं एक सन १८८४ सालीं मिस्तर मलबारी यांनीं केलेली चळवळ होय. त्या सालपर्यंत समाजसुधारकांचें लक्ष मुख्यत्वें करून स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराकडेच होतें. इतर सुधारणा त्यांना हव्या होत्या, पण त्यासंबंधानें जोराची खटपट करण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली नव्हती. स्त्रीशिक्षणालादेखील लोकमत सर्वांशीं अनुकूलच होतें असें नाहीं. पण मुंबईमध्यें त्या सुधारणेच्या पुरस्कर्त्यांमध्यें रा. सा. मंडलीकां-सारखे पुराणमताचे अभिमानी लोक असल्यामुळें स्त्रीशिक्षणास करण्यांत येत असलेला विरोध फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. त्यामुळें सन १८८४ सालपर्यंत स्त्रीशिक्षणविषयक सुधारणा लोकांच्या बरीच पचनीं पडली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

त्या सालीं मुंबईचे प्रसिद्ध मिस्टर मलबारी यांनीं आपलीं " बाल-विवाह " व " असंमत वैधव्य " ( Infant Marriage and Enforced Widowhood ) या संबंधाचीं दोन पत्रकें ( Notes ) प्रसिद्ध केलीं. मलबारी शेटजींना तीं पत्रकें त्या वेळीं प्रसिद्ध करण्याचें सुचण्याचें कारण कीं, थोड्याच दिवसांपूर्वीं इल्बर्ट बिलाच्या निमित्तानें जो वाद उपस्थित झाला होता त्यांत आम्हीं युरोपीयन लोकांच्या बरो-बरीचे हक्क मागत होतों; राजकीय बाबतींत राज्यकर्त्यांच्या बरोबरीचे हक्क मागण्याकरितां जर आम्ही इतक्या उत्सुकतेनें भांडत होतों, तर सामा-जिक बाबतींत देखील आम्ही स्त्रियांना समानत्वाचे हक्क देऊन त्यांचें जीवित सुखी करण्याचा प्रयत्न कां करूं नये ? हा विचार मनांत आणून मलबारी शेटनीं आपलीं पत्रकें प्रसिद्ध केलीं हें उघडच दिसत

होतें. वास्तविक खरा प्रकार असा होता कीं, " बालविवाह " व " असंमत वैधव्य " या अत्यंत घातुक चाली हिंदु लोकांत रूढ होत्या व त्या बंद केल्या पाहिजेत—निदान त्यांतील अन्यायाचा भाग तरी काढून टाकला पाहिजे, या गोष्टी सर्वसमंजस सुशिक्षित लोकांस मान्य होत्या. पण त्या कामीं सरकारकडे एकदम कायद्याची मागणी करावी असें मात्र सर्वांनाच वाटत नव्हतें. त्यामुळें तशी मागणी करण्यांत मलबारी शेटनीं जरा घाई केली असें म्हणणें भाग आहे. त्यापेक्षां आपण पारशी आहों, हिंदु नाहीं आहों, हें लक्षांत आणून मलबारी शेटजींनीं टिपणें प्रसिद्ध करण्यापूर्वीं कांहीं प्रमुख हिंदु पुढारी लोकांस भेटून प्रस्तुत विषयाची त्यांच्यांशीं चर्चा करून मग काय तें ठरविलें असतें अगर पत्रकें प्रसिद्ध केलीं असतीं तर तें अधिक रीतसर झालें असतें. आमच्या मतें प. वा. सर फेरोजशहा मेथा यांनीं एकदां अशाच विषयावर बोलतांना जें एक तत्त्व प्रतिपादन केलें होतें तें अत्यंत समंजसपणाचें होतें. तें असें:—" हिंदु लोकांच्या सामाजिक अगर धार्मिक बाबींच्या सारख्या गुंतागुंतीच्या बाबतींत आपण बाहेर राहून, कांहींतरी ढवळाढवळ करण्यापासून विशेष फायदा होईल असें मला वाटत नाहीं. अशा बाबतींत जी सुधारणा व्हावयाची असेल ती लोकांत शिक्षणप्रसार झाल्यानें व आपोआप होईल तीच खरी सुधारणा असें म्हणून मी स्वस्थ बसलों असतों."

मलबारी शेटजींनीं आपल्या पत्रकांत वर सांगितलेल्या दोन्ही चालींचें व त्यापासून होणाऱ्या परिणामांचें चांगलें वर्णन करून त्या चाली कोणत्या उपायांनीं बंद करतां येतील हें दर्शविलें होतें. जरूर तर कायदा करूनही त्या चालींतील अन्याय दूर करावा असें शेटजींनीं सुचविलें होतें. सदरील दोन्ही चालींत सामाजिक व धार्मिक तत्त्वांचा संबंध येत

असल्यामुळें पत्रकें प्रसिद्ध होतांच सर्व हिंदु समाजांत जबरदस्त चळवळ सुरू झाली. प्रस्तुत पिढींतल्या लोकांचे सामाजिक बाबतींतले विचार बरेच पुढें गेलेले असल्यामुळें या दोन चालींसंबंधानें मलबारी यांच्या पत्रकांवरून इकडे केलेलें विवेचन कित्येकांस चर्वितचर्वणासारखें वाटण्याचा संभव आहे. परंतु तो इतिहास आहे. सुमारें अर्धशतकापूर्वी या बाबतींत लोकमत काय होतें, सुशिक्षित पुढाऱ्यांचे विचार काय होते व तेलंगांनीं त्यांत कोणती बाजू घेतली होती हें वाचकांस समजलें पाहिजे. त्यामुळें तत्संबंधाच्या विवेचनास ऐतिहासिक दृष्टीनें महत्त्व आहे. म्हणून त्याचा इकडे अगदीं थोडक्यांत उल्लेख करतों.

सदर्हू दोन पत्रकें मलबारींनीं इतरांबरोबर तेलंगांनाही पाठविलीं होतीं. त्यांना तेलंगांनीं सन १८८४ च्या सप्टेंबरमध्यें उत्तर पाठविलें. मलबारींनीं आपल्या पत्रकांत सरकारनें ताबडतोब कायदा करावा असें स्पष्ट म्हटलें नव्हतें तरी त्यांच्या मनांतला अर्थ तोच होता व लोकही तो तसाच समजले. पण त्या वेळच्या लॉर्ड डफरीन अधिष्ठित हिंदुस्थान सरकारनें सन १८८६ सालीं आपला एक ठराव प्रसिद्ध करून प्रस्तुत प्रकरणीं कायदा करण्याचें नाकारलें. ठरावाचा तात्पर्यार्थ इतकाच होता कीं, कायदा करण्याबाबतचा सरकारचा जो अधिकार आहे त्याच्या कांहीं मर्यादा आहेत. त्या मर्यादेच्या आंत राहून योग्य तो कायदा केला पाहिजे. मर्यादे बाहेर जाऊन तो अधिकार बजावण्यानें जर लोकमत क्षुब्ध होत असेल तर तो अधिकार बजावूं नये. असो. याप्रमाणें सरकारनें कायदा करण्याचें नाकारलें तरी मलबारींच्या टिपणांच्या योगानें अशेष हिंदुस्थान देशांतील पुराणमतवादी व समाजसुधारक यांमध्यें खडाजंगी माजून सदर्हू विषयासंबंधानें दोन्ही बाजूंचें काय म्हणणें होतें तें स्पष्टपणें बाहेर पडलें हें तरी चांगलेंच झालें.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल मं. ९-१२-०९ ग्रंथानुक्रमांक ५-७८७०
किंमत ९१ पाने २००

मलबारींनीं ज्यांच्याकडे आपलीं पत्रकें पाठविलीं होतीं, त्यांपैकीं कांहींनीं अनुकूल उत्तरें पाठविलीं. दुसऱ्या कित्येकांनीं पाठविलेलीं उत्तरें प्रतिकूल होतीं. अनुकूल उत्तरें पाठविणारांमध्यें त्या वेळचे पुण्याचे रा. ब. रानडे हे एक होते. पण त्यांनीं लिहिलेलें उत्तर मात्र त्या वेळीं प्रसिद्ध झालें नाहीं. तेलंगांनीं प्रस्तुत प्रकरणीं सरकारानें कायदा करावा या म्हणण्यास कबुली दिली नाहीं. मलबारींच्या म्हणण्याप्रमाणें "बालविवाह" व "असंमत वैधव्य" या दोन अनिष्ट चाली हिंदु लोकांत प्रचलित आहेत व त्या लवकर बंद केल्या पाहिजेत या गोष्टी तेलंगांना कबूल होत्या. पण त्याकरितां सरकारकडे एकदम कायदा मागण्याची तूर्त घाई करूं नये इतकेंच त्यांचें म्हणणें होतें, आणि तसें त्यांनीं मलबारींना कळविलेंही.

तेलंगांच्या विचारसरणीसंबंधानें मुख्य सांगण्याची गोष्ट ही कीं, ते एका अगदीं जुन्या मताच्या कुटुंबांत वाढलेले होते. त्यांच्या कुटुंबांत नवीन पद्धतीनें शिकलेले असे फक्त त्यांच्या बंधूशिवाय कोणी नव्हते. खरेखुरे सुशिक्षित असे स्वतः तेच होते. शिवाय ते स्वभावाचे फार शांत व मनानें कोमल होते. त्यामुळें वडील माणसांच्या ज्या भावना असतील त्यांच्या विरुद्ध उघड रीतीनें प्रतिपादन करणें अगर वर्तन ठेवणें हें त्यांना अवघड वाटत असे. वस्तुतः नवीन विद्येचा त्यांच्या मनावर सुसंस्कार झालेला असल्यामुळें व ते फार विचारी मनुष्य असल्यामुळें आमच्या समाजव्यवस्थेंत काय दोष आहेत ते त्यांना स्पष्ट समजत असत; व ते घालविल्याशिवाय समाजाला सुस्थिति प्राप्त होणार नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलें होतें. परंतु उलटपक्षीं अशी स्थिति होती कीं, समाजव्यवस्थेंत जे दोष आहेत अगर अनिष्ट चाली आहेत असें नवीन सुशिक्षित लोकांना वाटत असे, ते दोष आहेत—अनिष्ट दोष आहेत—असें जुन्या मंडळीस मुळींच वाटत नसे. हें त्यांचें अज्ञान म्हणा, किंवा अज्ञानमूलक

समजूत म्हणा, पण त्या वेळीं वस्तुस्थिती तशी होती, यांत मात्र शंका नाहीं. तेव्हां ज्या चाली किंवा ज्या कल्पना शेंकडों वर्षांच्या संवयीनें लोकांच्या अगदीं अंगवळणीं पडल्या होत्या व ज्यांत कांहीं एक वाईट नाहीं अशी त्यांची भावना होती, त्या कल्पना किंवा त्या चाली, एकदम कायद्याच्या योगानें नष्ट करूं पाहण्याच्या भरीस पडण्यापेक्षां त्या अनिष्ट आहेत, वाईट आहेत, घातुक आहेत अशी लोकांची प्रथम समजूत होईल असें कांहींतरी केलें पाहिजे. आणि तसा परिणाम घडवून आणण्याला अगदीं रामबाण उपाय म्हणजे लोकांत शिक्षणाचा प्रसार करणें व त्यांतही स्त्रीशिक्षणाचा प्रसार करणें हाच होय असें तेलंगांचें म्हणणें होतें. आमच्या बहुतेक सामाजिक सुधारणांच्या बाबतींत स्त्रियांचाच संबंध येत असल्यामुळें रूढ चालींच्या अनिष्टत्वाविषयीं अगर सुधारणेच्या आवश्यकतेविषयीं त्यांचीच प्रथम खात्री होईल अशी कांहींतरी योजना करणें हेंच अत्यंत जरूर आहे. त्यामुळें न्या. तेलंग हे प्रथमपासूनच स्त्रीशिक्षणावर जोर देत असत, व त्या कार्याला ते तनमनधनेंकरून शक्य तितकी मदत करीत असत. त्यांत त्यांनीं कधींच कसूर केली नाहीं. जे कोणी अत्यंत उत्साही सुधारक होते, त्यांना कांहीं कांहीं सुधारणा ताबडतोब अमलांत याव्या असें वाटणें साहजिक होतें. परंतु अज्ञसमाजाशीं—आणि तोही प्रामाणिक अज्ञसमाजाशीं—संबंध असल्यामुळें सुधारणेचें काम केवळ आमच्याच इच्छेप्रमाणें—आणि तेंही कायद्याच्या सहाय्यानें करूं पाहाणें इष्ट नव्हतें. सबब वर सांगितलेल्या चालींच्या अनिष्टत्वाविषयीं प्रथम जनतेची मनोभूमिका तयार करणें हाच उत्तम उपाय होय. असो. याप्रमाणें तेलंगांची विचारसरणी असल्यामुळें त्यांनीं मलबारींना तसें कळवून आपण तूर्त सरकारी कायद्याच्या विरुद्ध आहों असें स्पष्ट सांगितलें.

मलबारी शेटजींनीं आपल्या दोन पत्रकांत जें विवेचन केलें होतें त्यांपैकीं कांहीं भाग—हिंदु समाजाची कांहीं कांहीं बाबतींतील अंतर्गत व्यवस्था त्यांना माहीत नसल्यामुळें—बरोबर उतरला नाहीं. पण तेलंगांनीं त्या त्या ठिकाणीं त्याविषयीं आपल्या उत्तरांत खुलासा केला आहे.

बालविवाहाची चाल अत्यंत वाईट आहे हें तेलंगांना कबूल होतें, व त्यांत सुधारणा झाली पाहिजे हेंही त्यांना दिसतच होतें. सुधारणा सुरू करावयाची कोठें व कशी इतकाच काय तो प्रश्न होता. तेलंगांच्या मतें, ही सुधारणा, लग्न अमुकच वयानंतर झालें पाहिजे अशी सक्ति करण्यांत नसून, मुलीला ऋतु प्राप्त झाल्यावर गर्भाधान करून तिची व तिच्या नवऱ्याची लवकर गांठ घालून देण्याबाबतच्या घाईसंबंधानें झाली पाहिजे. इतकी घाई करण्यांत काय अर्थ आहे ? खरी सुधारणा " शुभ मंगल ", किंवा " लाजाहोम, सप्तपदी " वगैरेंच्या बाबतींत न करतां गर्भाधान पुढें ढकलण्यासंबंधानें करावयास मुळींच हरकत नाहीं. अशीं कांहीं उदाहरणें तेलंगांच्या वेळीं घडलीं होतीं. त्याला शास्त्र आड येत नाहीं व जातही आड येत नाहीं. तशा सुधारणेला फक्त कुटुंबांतलीं माणसें व जवळची नातलग मंडळी आड येण्याचा संभव असतो. अशा मंडळीवर मलबारींच्या म्हणण्याप्रमाणें कायदा केला तरी काय परिणाम होणार ? पण हे बालविवाहाच्या चालीसंबंधाचे अंतर्गत भेद मलबारींना माहीत असणें शक्य नव्हतें.

असो. आतां त्या चालीपासून होणारे अनिष्ट परिणाम टाळण्याकरितां मलबारी शेटजींनीं कोणते उपाय सुचविले होते याचा विचार करूं. त्यांनीं पहिला उपाय सुचविला तो हा कीं, अमुक एक तारीख ठरविल्यावर पुढें विवाहित विद्यार्थी यूनिव्हर्सिटीच्या कोणत्याही परीक्षेस

येतील त्यांना त्या परीक्षेस बसूं देतां कामा नये ! याविषयीं तेलंगांनीं म्हटलें कीं, उपाय ठीक आहे. पण त्यापासून परिणाम काय होईल किंवा तो परिणाम कोठपर्यंत पोंचेल याचा अंदाज आतांच करतां येत नाहीं ! त्या वेळीं बरेच विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परीक्षांकरितां येत असत ते विवाहित असत. इतकेंच नव्हे तर कित्येकांस एकादें दुसरें मूल झालेलें असे. या गोष्टीचा विचार केला म्हणजे मलबारींच्या उपायापासून जो पहिला परिणाम झाला असता तो त्या परीक्षांसाठीं येणाऱ्या उमेदवारांची संख्या कमी झाली असती, हा होय ! म्हणजे सदरील उपायाची अंमलबजावणी केल्यानें "मूले कुठार:" असाच प्रकार झाला नसता काय ! आमच्या समाजांतील कांहीं कांहीं दुष्ट चाली बंद करण्याच्या कामीं उपयोगी पडणारें उत्तम साधन म्हणजे शिक्षणाचा शक्य तितका जास्त प्रसार करणें हें होय. याबद्दल कोणाचाच मतभेद नव्हता. अशा स्थितींत सदर्हू उपाययोजनेपासून लोकांत शिक्षणाची प्रगति झाली असती कीं पिच्छेहाट ? बरें, तें एक असो. दुसरी गोष्ट अशी कीं, आमच्या लोकांत मुलांचीं लग्नें बहुधा त्यांचे आईबापच ठरवीत असतात. त्यांत मुलांचा संबंध फारच थोडा येत असतो. किंबहुना मुळींच नसतो असें म्हणण्यासही हरकत नाहीं. निदान चाळीस–पन्नास वर्षांपूर्वी तरी अशी स्थिति खास होती. तेलंगांनीं विचारलें कीं, अशा स्थितींत मलबारींच्या उपाययोजनेनें आईबापांच्या पापाबद्दल मुलांना शिक्षा केल्यासारखें झालें नसतें काय ? बरें समजा कीं, आईबापांनीं रीतीप्रमाणें मुलांचें बालपणांत लग्न केलें आणि त्यांना त्या मुलाचें शिक्षण पुढें चालू ठेवण्याइतकें त्याचें महत्व वाटलें नाहीं, तर मग वरील उपाययोजनेनें त्या मुलाच्या शिक्षणाचें द्वार बंद केलें जाऊन त्याचें केवढें जन्माचें नुकसान केल्यासारखें झालें असतें बरें ? आणि अशीं बरींच

उदाहरणें घडूं लागल्यास शिक्षणाच्या बाबतींत देशाचें पाऊल पुढें पडलें असतें कीं मागें ? वरील उपायाबद्दलची सूचना बंगालकडचे त्यावेळचे एक प्रसिद्ध पुढारी मिस्टर मनमोहन घोस यांच्याकडून झाली होती व ती रा. ब. रानड्यांना मान्य होती. तरी ती आपणांला ग्राह्य वाटत नाहीं असें तेलंगांनीं स्पष्ट सांगितलें.

वरील सूचनेपेक्षां तेलंगांना दुसरी एक अशाच प्रकारची सूचना अधिक सयुक्तिक वाटली. ती अशी. यूनिव्हर्सिटी किंवा शिक्षणखातें या संस्था विद्यार्थ्यांना एकादी पदवी मिळेपर्यंत कांहीं स्कॉलरशिपा किंवा बक्षिसें देत असतात. त्या स्कॉलरशिपा अगर बक्षिसें फक्त अविवाहित विद्यार्थ्यांनाच मिळतील असा नियम करण्यास हरकत नाहीं. येथपर्यंत येण्याची आपली तयारी आहे असें तेलंगांनीं मलबारींना कळविलें.

मलबारींची दुसरी सूचना अशी होती कीं, सरकारानें आपल्या निरनिराळ्या खात्यांत विवाहित मनुष्याला जागा मिळणार नाहीं असा नियम करावा ! तेलंगांना ही सूचना न्याय्य वाटली नाहीं व तिच्यापासून देशाचा अगर समाजाचा एकंदरींत फायदा होईल असेंही वाटलें नाहीं. सरकारी खात्याच्या एकाद्या वरिष्ठाला आपल्या कचेरींत कारकून ठेवावयाचा तो त्याचें शिक्षण व चांगली चालचलणूक पाहून मग त्याला तो ठेवीत असतो. त्यांत सामाजिक सुधारणेचा संबंध काय ! व तो उमेदवार विवाहित आहे कीं अविवाहित हें पाहण्याचें त्या वरिष्ठ अंमलदाराला तादृश कारण काय ? शिष्यवृत्त्या किंवा बक्षिसें या बाबतींतली गोष्ट निराळी. कौटुंबिक जबाबदारी ही विद्यार्थ्यांना चांगल्या संवयी लागून त्यांच्या ठिकाणीं कार्यक्षमता उत्पन्न करण्याच्या कामीं आड येत असते. तशा संवयी लागणें अगर तशी कार्यक्षमता अंगीं येणें या शिक्षणाच्याच

अंगभूत गोष्टी आहेत. त्यामुळें बक्षिसें किंवा शिष्यवृत्त्या यांच्या बाबतींत "विद्यार्थी अविवाहित असावा" असा नियम सुसंबद्ध तरी होईल. परंतु कलेक्टरच्या किंवा अकौउंटंट जनरलच्या कचेरींत काम करूं इच्छिणाऱ्या उमेदवाराला हा नियम लावूं पहाणें समंजसपणाचें कसें होईल ?

या सर्व प्रकारांत एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. कोणत्याही गोष्टीची किंवा संस्थेची नैसर्गिक व सरळ रीतीनें वाढ होऊं देणें हेंच एकंदरींत हितकर असतें. त्या वाढीला कृत्रिम बांध घालून थोपवूं पाहणें अगर तिचा ओघ बदलण्याचा प्रयत्न करणें हें केव्हांही हितकर नव्हे. केव्हां केव्हां तर ते कृत्रिम नियम घालणाऱ्यांचे शुद्ध हेतु देखील निष्फळ होण्याचा संभव असतो. इतकेंच नव्हे तर पुढें कांहीं अनपेक्षित अडचणी उपस्थित होऊन अखेर नैतिक अधःपतन मात्र त्यांच्या पदरांत पडतें ! इतकें होऊनही या सगळ्या कृत्रिम नियमांचा अखेर शिक्षणप्रसारावर काय परिणाम होईल हेंही निश्चयात्मक रीतीनें सांगतां येणार नाहीं. सामाजिक सुधारणेच्या कामीं शिक्षणाचाच आपणांस पुष्कळ उपयोग होणार आहे. अर्थात् त्या शिक्षणाच्या प्रसाराला विघातक होतील अशा कोणत्याही सूचना करणें हें देशहिताच्या दृष्टीनें इष्ट नव्हे, असें एकंदरींत तेलंगांचें मत होतें.

मलबारी शेटजींची अशी एक तिसरी सूचना होती कीं, एक नवीन संस्था स्थापन करावी व तिच्या सभासदांनीं "मी अमकें वय झाल्या-शिवाय लग्न करणार नाहीं" असें लेखी वचन द्यावें किंवा शपथ घ्यावी ! तेलंगांच्या मतें ही सूचना अगदीं अव्यवहार्य होती. आधीं ज्यांच्या असल्या लेखी वचनाला कांहीं किंमत देतां येईल असे संस्थेंत सभासद येण्याचाच मुळीं संभव कमी. कारण जे सभासद होतील त्यांपैकीं बरेचसे

पूर्वीच विवाहित झालेले असतील ! शिवाय अशी प्रथमच लेखी शपथ घेतली पाहिजे ही अट ठेविल्यास सभासद होऊं इच्छिणाऱ्या लोकांचीं मतें संस्थेकडे आकर्षिलीं जाण्याच्या ऐवजीं तिजपासून परावृत्त होण्याचाच अधिक संभव ! असली अव्यवहार्य अट ठेवण्यापेक्षां लोकांची चालू रूढीपासून काय दुष्परिणाम होतात याविषयीं हरप्रयत्नानें समजूत करणें व जे त्या रूढीविरुद्ध वागण्यास तयार होतील त्यांना उत्तेजन देऊन सहाय करणें असे ह्या संस्थेचे उद्देश जाहीर केल्यास त्यापासून अधिक फायदा होईल असें तेलंगांचें म्हणणें होतें. शिवाय असल्या लेखी वचनावर व शपथेवर आपला फारसा विश्वास नाहीं असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें.

चवथी अशी सूचना होती कीं, कोणीही सुशिक्षित मनुष्यानें आपल्यापेक्षां वयानें फारच लहान मुलीशीं लग्न करूं नये. तेलंगांनीं यावर म्हटलें कीं, ही सूचना त्या वेळच्या परिस्थितींत शक्य कोटींतली नव्हती. त्या वेळीं विधवाविवाह प्रचारांत नव्हता. मुलींचीं लग्नें तेरा वर्षें होण्यापूर्वी उरकून टाकण्याची चाल अगदीं सार्वत्रिक होती. अशा स्थितींत वरील सूचनेनें एकाद्यावर पर्यायानें सक्तीचें ब्रह्मचर्यच लादण्यासारखें झालें नसतें काय ? आणि असल्या प्रकारच्या सक्तीपासून कोणते दुष्परिणाम ओढवते हें कोण सांगूं शकेल ?

प्रस्तुत सामाजिक विषयांवर लिहिलेले धडे ज्यांत आहेत अशीं पुस्तकें शाळांतून सुरू करावींत ही मलबारींची सूचना तेलंगांना मान्य होती. सामाजिक विषयांवर असा ऊहापोह करण्याच्या हेतूनें ठिकठिकाणीं संस्था स्थापन करणें किंवा तसल्या विषयांवर व्याख्यानें देण्याचीं अगर लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध करून लोकांत वांटण्याची तजवीज करणें या मलबारींच्या सूचना तेलंगांना अगदीं मान्य होत्या. मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं या विषयांत मुद्दाम लक्ष घालून असल्या समाजकार्यास जरूर

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

मदत करावी, ही मलबारींनीं केलेली सूचना देखील तेलंगांना पसंत होती. त्यांनीं पुन्हां अशी त्याला पुस्ती जोडली कीं, अशा अधिकारी लोकांनीं लहान लहान बालकांच्या लग्नांच्या निमित्तानें होणाऱ्या तमाशांमध्यें हजर राहण्याचें साफ नाकारावें ! बालविवाहाच्या चालीला विरोध दाखविण्याचा हा एक साधा, पण खात्रीचा मार्ग होता. त्या मार्गाचें अधिकारी लोकांनीं अवलंबन केल्यास त्याचा चांगला परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रस्तुत बालविवाहाच्या एकंदर प्रकरणावर तेलंगांनीं मलबारींना आपला स्पष्ट अभिप्राय कळविला कीं, तुम्ही या कामांत घाई करूं नका. आणखी कांहीं दिवसपर्यंत आहे हीच स्थिति राहूं द्यावी असें आपणांस वाटतें. मी "Letalonist" म्हणजे कांहीं एक करूं नये अशा मताचा आहें असें तुम्हांस वाटेल, पण तशी गोष्ट नाहीं. शिक्षणप्रसार व त्यायोगें लोकमत जागृत करणें या उपायावर माझा पूर्ण विश्वास आहे. या उपायापासून होणारे परिणाम तुम्हीं सुचविलेल्या उपायांपासून होणाऱ्या परिणामांपेक्षां अधिक हितकर व टिकाऊ होतील. शिक्षणाचें काम चालू आहे व तें चालूच राहणार आहे. त्याचा इष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. उच्चवर्णीय लोकांमध्यें शिक्षणाचा बराच प्रसार झाला आहे, व त्याचा त्यांच्या आचार–विचारांवर सुपरिणाम झाला आहे–होत आहे. त्यांच्याच सामाजिक बाबतींतल्या कल्पना खालच्या वर्गांत उतरत आहेत. पण मी स्त्रीशिक्षणाला सर्वांपेक्षां जास्त महत्व देतों. युनिव्हर्सिटीच्या शिष्यवृत्त्या व बक्षिसें जें काम करूं शकणार नाहींत, किंवा जें काम सरकारी नोकरीच्या लालुचीनेंही होणार नाहीं तें स्त्रीशिक्षणानें खात्रीनें होईल असें मला वाटतें. प्रस्तुत रूढ असलेली बालविवाहाची चाल शेंकडों वर्षांच्या संवयीनें हिंदुसमाजांत इतकी दृढमूल झाली आहे कीं, त्या चालींत कांहीं वाईट आहे ही कल्पनादेखील लोकांच्या गांवीं नाहीं ! ही

लोकांची मनोवृत्ति बदलणें हेंच आपलें मुख्य काम आहे, आणि तें काम करण्यास शिक्षणप्रसार हाच खरा मार्ग आहे. या उपायानें इष्ट सुधारणा जरा मंद गतीनें होईल हें खरें, पण दुसऱ्या सुचविलेल्या उपायांनीं तरी ती अगदीं जलद होणार आहे अशी हमी तरी कोणाला थोडीच घेतां येईल ! त्यामुळें तो शिक्षणप्रसार जारीनें करणें व त्याच्या जोरावर समाजांतील दुष्ट चालींसंबंधानें लोकांच्या मनोभावना बदलणें हें काम आपणांस सारखें करीत राहिलें पाहिजे. त्यांत कसूर होतां कामा नये.

असो. हें काशीनाथपंतांनीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं केलेलें भविष्य आज अक्षरशः खरें ठरलें आहे. गेल्या अर्ध शतकाच्या अवधींत जनतेंत शिक्षणाचा प्रसार बराच झाला आहे. स्त्रीशिक्षणाचेंही पाऊल एकसारखें पुढेंच पडत चाललें आहे, आणि त्यायोगानें महाराष्ट्रांत सामाजिक दृष्टीनें मोठी क्रांति झाली आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. बालविवाहाची चाल आतां मागें पडून शिकलेल्या मुलींचीं लग्नें निदान उच्चवर्णीय लोकांत हल्लीं पंधरा वर्षांच्या आंत बहुधा होतच नसतात. कांहीं मुली तर त्याहीपेक्षां मोठ्या वाढलेल्या व कांहीं तर तशा वयांतही शिकत असलेल्या दृष्टीस पडतात. कित्येक विधवा मुली मास्तरणी, डॉक्टरणी व नर्सेस होऊन आपला अन्नानें व मानानें चरितार्थ चालवीत असलेल्या दिसतात. विधवाविवाहाची संख्याही हळू हळू वाढतच आहे. तात्पर्य, समाजसुधारकांनीं अर्ध शतकापूर्वीं ज्या ज्या सुधारणांना म्हणून प्रथम हात घातला होता, त्यांपैकीं बहुतेक सगळ्या आज अंमलांत आल्या आहेत. बाकी राहिलेल्या थोड्या सुधारणा अंमलांत यावयाच्या मार्गांत आहेत. या सर्व क्रांतीला कारण म्हणजे बदललेली परिस्थिति, जनतेंत झालेला शिक्षणप्रसार—विशेषें करून स्त्रीशिक्षणाचा प्रसार—याशिवाय दुसरें काय असूं शकणार ?

येथपर्यंत तेलंगांनीं बालविवाहाविषयीं मलबारींनीं प्रसिद्ध केलेल्या टिपणासंबंधानें विचार करून त्यांत सुचविलेल्या उपाययोजनेविषयीं आपला मतभेद व्यक्त केला. पुढें त्यांनीं "असंमत वैधव्या"संबंधानें मलबारींनीं लिहिलेल्या टिपणावर आपले विचार अगदीं थोडक्यांत प्रदर्शित केले आहेत. त्यांचा तात्पर्यार्थ थोडक्यांत इतकाच कीं, मलबारींनीं केलेल्या कोणत्याच सूचना तेलंगांना पसंत नव्हत्या. मलबारींनीं प्रस्तुत विषयक आपल्या सबंध विवेचनांत मुख्य एक चूक केली होती. ती तेलंगांनीं दाखविली. त्यामुळें शेटजींनीं सुचविलेले बरेच उपाय गैरसमजूतीनें दूषित झालेले ठरतात. उच्च वर्णीय हिंदुजातींतल्या विधवा ज्या संन्यस्त वृत्तीनें राहतात त्या तशा स्वखुषीनें राहात नसून केवळ नातलगांच्या जुलुमामुळें राहतात असें मलबारींनीं गृहीत धरलें होतें. तो त्यांचा भ्रम होता, असें तेलंगांनीं स्पष्ट सांगितलें.

मलबारींची अशी एक सूचना होती कीं, एकादी संस्था काढून तिच्या मार्फत सन १८५६ चा ॲक्ट १५ (पुनर्विवाह केलेल्या विधवांच्या मार्गांतील कायद्याच्या दृष्टीनें येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबतचा) हा विधवा बायकांच्या फायद्याचा आहे हें त्यांना समजावून देण्याची व त्या कायद्याची त्या बायांच्या तर्फे अंमलबजावणी सक्तीनें करण्याची तजवीज करावी. तेलंगांनीं सांगितलें कीं, असली संस्था फारशी यशस्वी होणार नाहीं. हिंदुलोकांत विधवा बायका पुनर्विवाह करण्यास अगदीं उत्सुक असतात व त्यांना तसें त्यांच्या आप्त मंडळीच्या आग्रहामुळें वागण्याचें धैर्य होत नाहीं अशी मलबारी शेटजींची समजूत होती ती चुकीची होती. ज्या समाजांत त्या दुर्दैवी स्त्रिया राहतात त्या समाजाच्या व स्वतः त्या विधवा स्त्रियांच्या अशा ठाम समजुती झाल्या आहेत कीं, विधवांनीं पुनर्विवाह करणें हें एक धर्मविरुद्ध व अपवित्र

कृत्य आहे. त्यामुळें वरील प्रकारची एकादी संस्था काढून जे कोणी अगदीं शुद्ध हेतूनें प्रेरित होऊन पूर्वोक्त रीतीनें त्या दुर्दैवी प्राण्यांच्या तर्फे म्हणून झटण्याकरितां पुढें येतील त्यांना स्वतः त्या बाया आपले मित्र न समजतां खात्रीनें शत्रु समजतील.

शेटजींची दुसरी एक अशी सूचना होती कीं, पुनर्विवाहांत सामील झालेल्या माणसांना भट किंवा जात जें बहिष्कृत समजतात तें बंद झालें पाहिजे. तेलंगांनीं सांगितलें कीं, कोणाला बहिष्कार घालण्याचा अधिकार भटाला नाहीं. तो जातीला आहे. पण तो काढून घेतल्यानें न्याय होत नाहीं. तो जुलूम समजून कायद्यानें काढून घेतल्यास जातीचा जुलूम जाऊन त्याच्या जागीं कायद्याचा जुलूम मात्र येईल ! यासंबंधांत तेलंगांनीं प्रसिद्ध आगाखानच्या खटल्याच्या निकालांत जें एक महत्वाचें तत्व गोंवलें गेलें आहे त्याचा उल्लेख करून म्हटलें कीं, कोणतीही जात किंवा समाज म्हटला म्हणजे त्याचे कांहींतरी नियम म्हणून असतात, व समाजासंबंधानें त्यांतील प्रत्येक मनुष्याचीं कांहीं कर्तव्येंही असतात. तीं त्यानें बजावलीं पाहिजेत. त्यांत तो चुकला तर त्याला योग्य शासन करण्याचा अधिकार त्या जातीला किंवा समाजाला असला पाहिजे. आतां “ जात ” या संस्थेचा, प्रगतीला असलेला विरोध, प्रस्तुत बदलेल्या परिस्थितींत, दिवसें दिवस कमीकमीच होत जाणार हें दिसतेंच आहे. तथापि मलबारींनीं सुचविलेले उपाय त्या वेळच्या स्थितींत तरी व्यवहार्य दिसत नव्हते, असें तेलंगांनीं एकंदरींत आपलें मत दिलें.

वास्तविक मलबारींनीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं सुचविलेल्या सुधारणा आतां बहुतेक अंमलांत आल्या आहेत. अर्थात् आतांपर्यंतचें शेटजींच्या चळवळीचें केलेलें विवेचन थोडेंसें चर्वितचर्वणच आहे. तथापि

तो त्या वेळचा इतिहास आहे व तत्संबंधानें तेलंगांनीं प्रदर्शित केलेले विचार अत्यंत मननीय वाटतात म्हणूनच हा थोडासा विस्तार केला आहे.

पण मलबारी शेटजींच्या चळवळीचा सरकारावर जरी त्यावेळीं कांहीं परिणाम झाला नाहीं, तरी त्यायोगानें आमच्या जुन्या मताचे लोक जागे झाले व त्यांनीं सामाजिक सुधारणेविरुद्ध उघड रीतीन विरोध करण्यास सुरवात केली हें कबूल केलें पाहिजे. ही तरी एका दृष्टीनें इष्टापत्तिच होती. विरुद्ध मताच्या लोकांच्या पुणें येथें मग सभा होऊं लागल्या. तशाच त्या मुंबईसही झाल्या. मुंबईच्या विरुद्ध पक्षाचे कै. रा. सा. मंडलीक हे पुढारी होते. स्वतः रा. सा. मंडलिकांच्या संबंधानें कांहीं कांहीं गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या होत्या. ते सन १८५० च्या सुमारास स्टु. लि. अँड सा. सोसायटीचे एक प्रमुख सभासद असून मुंबईस गेल्या शतकांत ज्यांनीं स्त्रीशिक्षणाचा पाया घातला, त्यांपैकीं ते एक होते, ही तर गोष्ट झालीच, पण सन १८६९ मध्यें मुंबईस जो पहिला करमरकरांचा पुनर्विवाह झाला त्याविषयीं मंडलिकांची पूर्ण सहानुभूति असून ते त्या पुनर्विवाहास डॉ. भाऊ दाजींबरोबर हजर होते ! इतकेंच नव्हे तर त्याच सुमारास त्यावेळचे प्रसिद्ध समाजसुधारक करसनदास मुलजी यांनीं गुजराथी महाराजांसंबंधानें कांहीं अनीतीचे प्रकार उघडकीस आणल्याबद्दल जेव्हां त्या महाराजांनीं सदहू मुलजी यांजवर हायकोर्टांत अब्रुनुकसानीचा दावा मांडला, तेव्हां देखील मंडलिकांनीं डॉ. भाऊ दाजींबरोबर जाऊन त्या सुधारकांतर्फे साक्ष दिली ! तथापि सदरील मलबारींची चळवळ रावसाहेबांस पसंत न पडून त्यांनीं जुन्या पक्षाचें धुरीणत्व पतकरलें ही गोष्ट खरी व त्यांच्याच अध्यक्षतेखालीं त्या पक्षाची माधवबागेंत सन १८८६ मध्यें मोठी सभा भरविली जाऊन तिनें सामाजिक सुधारणेच्या बाबतींत सरकारकडे कायदा मागण्याबाबतच्या योजनेचा निषेध केला.

पण हा मंडलिकांचा मार्ग सरळ तरी होता. पण त्यांच्या अनुयायी मंडळींत असे कांहीं त्यावेळीं मुंबईत व पुण्यांत लोक होते कीं, त्यांना फक्त राजकीय चळवळ हवी होती. सामाजिक मुळींच नको होती. ते बहाणा करीत असत कीं, आपण सामाजिक सुधारणेविरुद्ध नाहीं, पण सुधारकांचे मार्ग आपणांस पसंत नाहींत. त्यामुळें त्यांनीं विरुद्ध पक्षाची चळवळ चालविली, व त्यांना एक दोन त्याच वेळीं घडलेल्या गोष्टींचा आयता फायदा मिळून त्यायोगें त्यांच्या चळवळीला थोडा जोरही पण आला. तेलंगांनीं आपलें मत मलबारींच्या पत्रकांविरुद्ध दिलें हें मागें सांगितलेंच आहे. त्याच वेळीं मुंबईचे एक तत्कालीन प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ मि. वर्डस्वर्थ यांनींही एक लहान पत्रक प्रसिद्ध करून मलबारींना "याबद्दल फार गाजावाजा अगर घाई करूं नका" असा इशारा दिला होता. त्याच प्रमाणें सन १८८६ मध्यें खुद्द तेलंगांनीं एक "सामाजिक सुधारणा वि. राजकीय सुधारणा" या विषयावर अत्यंत सुश्राव्य असें व्याख्यान दिलें होतें व त्यांत "Reform ought to go along the line of least resistance" (सुधारणा लघुत्तम प्रतिकाराच्या मार्गानें झाली पाहिजे) असे शब्द सहजगत्या येऊन गेले होते. या सर्व गोष्टींचा विरुद्ध पक्षाच्या कांहीं मंडळींनीं मनमुराद उपयोग करून मोठ्या जोराची चळवळ केली ! या मंडळीला वस्तुतः समाजसुधारणेची चळवळ मुळीं नकोच होती. ते आपण सुधारणेविरुद्ध नाहीं असें म्हणत मात्र. पण सुधारणेच्या दृष्टीनें ते कांहींच कृति करीत नसत. फक्त सुधारकांनीं चालविलेल्या चळवळीला विरोध करून ते त्यांच्या मार्गांत अडचणी मात्र उत्पन्न करीत असत.

तेलंगांच्या त्या वेळच्या कांहीं कृतींवरून व उद्गारांवरून त्यांच्याविषयीं कांहीं लोकांच्या चुकीच्या समजुती झाल्या होत्या यांत शंका नाहीं.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

ते तत्वतः मलबारींच्या चळवळीविरुद्ध होते, ही गोष्ट खरी, पण ते समाजसुधारणेविरुद्ध बिलकूल नव्हते. आणि हें त्याच सुमारास त्यांच्याकडून घडलेल्या दुसऱ्या एकदोन कृतींवरून स्पष्ट रीतीनें सिद्ध झालें. जुन्या मताच्या लोकांच्या माधव बागेंतील सभेस हजर राहून तेलंगांना तिच्या ठरावाला एक उपसूचना आणावयाची होती. पण ती आणण्याला त्यांना अध्यक्षांची परवानगी मिळाली नाहीं ! दुसरी गोष्ट, सन १८८७ सालीं मुंबईस मि. वर्डस्वर्थ साहेबांच्या पुरस्कर्तृत्वाखालीं जेव्हां "रखमाबाई डिफेन्स कमिटी" (याविषयीं मागील एका प्रकरणांत उल्लेख आलाच आहे) नेमण्यांत आली तेव्हां तेलंग त्या कमेटींत सामील झाले होते. तिसरी गोष्ट, सन १८९१ मध्यें डॉ. भांडारकरांच्या कुटुंबांत जेव्हां एक पुनर्विवाह झाला त्यावेळीं तेलंग हजर होते. पण ते जेवणाला राहिले नाहींत. तरी त्यांनीं पुढें कांहीं दिवसांनीं पुनर्विवाहित मंडळीस आपल्या घरीं मेजवानी दिली. त्याच सालीं उत्पन्न झालेल्या संमतिवयाच्या वादांत त्यांनीं प्रमुखत्वानें घेतलेल्या भागाविषयीं तर सर्वांस माहिती आहेच. या सर्व गोष्टींवरून तेलंगांचीं सुधारणाविषयक मतें स्पष्ट रीतीनें दिसून येतात.

आपल्या देशाची सर्व बाजूंनीं प्रगति झाली पाहिजे व त्यामुळें सर्व प्रकारच्या–राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे–चळवळी सारख्याच चालल्या पाहिजेत असें तेलंगांचें अथपासून अखेरपर्यंत मत होतें. आणि त्यालाच अनुसरून त्यांचे सर्व उद्योग चाललेले असत. या संबंधानें न्या. रानड्यांनीं आपल्या एका "तेलंग पंथ" या विषयावरील भाषणांत केलेलें विवेचन प्रसिद्धच आहे. तेव्हां तेलंग हे रानडे–भांडारकर या समाजसुधारक मंडळींतलेच एक होते याबद्दल कोणालाच शंका येण्याला कारण नव्हतें.

सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यांचा न्या. रानडे किंवा डॉ. भांडारकर यांच्या भाषणांतून अनेकदां उल्लेख आलेला आहे. जुन्या शास्त्री पंडित मंडळींना—त्यांचीं मनें वळवून—बरोबर घेऊन सुधारणा करण्याचा रा. सा. मंडलिकांनीं एकदां यत्न करून पाहिला, पण त्यांत त्यांची निराशाच झाली ! दुसरे मार्ग म्हणजे बिन-अडचणींच्या मार्गानें जाणें; कायद्याच्या सहाय्यानें सुधारणा करणें; सुधारकांची एक निराळी जात करणें; सह्या देऊन स्वतःस बांधून घेणें; वगैरे अनेक मार्ग आहेत. पण प्रत्येक मार्गांत कांहीं ना कांहीं अडचणी असतातच. त्या सर्वांचा विचार केल्यास असें आढळून येईल कीं, एकच मार्ग सर्व ठिकाणीं उपयोगीं पडेल अगर सोयीचा वाटेल असें नाहीं. म्हणून जो जेथें उपयोगीं पडेल तेथें तो अनुसरावा व सुधारणेचें काम करावें. फक्त एक मार्ग मात्र सर्व ठिकाणीं व तशी तयारी असल्यास सर्व लोकांस उपयोगीं पडण्यासारखा आहे. जी सुधारणा आपल्या सदसद्विवेक—बुद्धीस पटली व जी हितकर आहे अशी आपल्या मनाची खात्री झाली ती आपल्या कुटुंबांत धैर्यानें व निश्चयानें एकदम अंमलांत आणावी ! त्यांत दुसऱ्या कोणाची वाट पाहण्याची जरूर नाहीं. तुकोबांनीं म्हटलें आहे—

" आपुलें स्वहित करावें तें आधीं । विचारूनि शुद्धि समाधान ॥
नये मागें पाहों वाट फिरोनियां । दुसरा संगिया साहाकारी ॥
आपुलिया बळें घालावी हे कास । न येणेंची आस आणिकांची ॥ "

याप्रमाणें कोणी कसे, कोणी कसे, पण निश्चयानें सुधारणेच्या दिशेनें वागल्यामुळें गेल्या अर्धशतकांत समाजसुधारणेचें पाऊल महा-राष्ट्रांत पुष्कळच पुढें पडलें आहे. व भांडारकर, रानडे, मोडक या आद्य

सुधारकांच्या आकांक्षा मुंबई–पुण्यासारख्या शहरांपुरत्या पाहिल्यास–बऱ्याच अंशानें पूर्ण झाल्या आहेत. त्यांत तेलंगांची महत्वाची मदत होतीच. आतां तें काम प्रस्तुत पिढीला करावयाचें आहे. देश विस्तीर्ण, हिंदुसमाज प्रचंड त्या मानानें काम करणारे जितके जास्त पुढें येतील तितके हवेच आहेत.

---

प्रकरण नववें.

## इतर कांहीं चळवळी.

मलबारी शेटजींच्या चळवळीनें दुसरें कांहीं दृश्य स्वरूपाचें फळ देशाच्या पदरांत पडलें नाहीं, तरी जुन्या-नव्या मताचे लोक जागे होऊन सामाजिक प्रश्नांचा विचार करूं लागले ही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं. त्याहीपेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे त्या वेळच्या सुशिक्षित लोकांमध्यें देखील दोन पक्ष उत्पन्न झाले. एकाला वाटे कीं, आपण तूर्त मोठी चळवळ करून राजकीय हक्क प्रथम मिळवावे व मग सामाजिक प्रश्नांचा सावकाश सवडीप्रमाणें विचार करतां येईल. सामाजिक विषय आतां हातीं घेतले तर आमच्यामध्यें मतभेद माजतील व राजकीय चळवळीला व्यत्यय येईल ! तें कांहीं उपयोगी नाहीं. तेव्हां तूर्त सामाजिक प्रश्न बाजूला राहूं द्या, व राजकीय चळवळींतच आपण आपली सर्व शक्ति खर्च करूं ! बारीक नजरेनें पाहिल्यास ही विचारसरणी–ती कित्येकांस जरी फार सोपी व सोयीची वाटली तरी–अगदीं कोतेपणाची दर्शक असून त्याला कोणत्याच देशाच्या इतिहासाचा आधार मिळणार नाहीं. मूळ आधीं आमच्यांत जी थोडी लोक-जागृति झाली होती तिला मुख्य कारण

म्हणजे इंग्लिश शिक्षणाची इकडे झालेली सुरवात व आमच्या मंडळींनीं इंग्लंडच्या इतिहासाचा केलेला अभ्यास. बरें, लोक जागे झाले म्हणजे प्रथम त्यांच्या नजरेस घरांतले दोष पडतील कीं बाहेरचे ? डॉ. भांडारकरांनीं तर आपल्या एका भाषणांत स्पष्ट सांगितलें कीं, गेल्या शतकाच्या मध्यास पहिल्या पिढींतल्या सुशिक्षित लोकांस जी पहिली गोष्ट दिसली ती आमच्या स्त्रियांची दुःस्थिति होय ! त्यामुळें ती स्थिति सुधारण्याचे त्या मंडळींनीं प्रथम प्रयत्न केले व त्याप्रमाणें मुंबईस पहिली मुलींची शाळा स्थापन करण्यांत आली. भांडारकर सांगतात, कीं त्या वेळीं राजकीय चळवळ मुळीं जन्मलीही नव्हती ! राजकीय स्वरूपाचे कांहीं प्रश्न उपस्थित झाल्यास त्यासंबंधानें सभा, अर्ज, डेप्युटेशनें वगैरे मार्गानें दाद मागण्यांत येई. त्याला राष्ट्रीय चळवळीचें स्वरूप आलें नव्हतें. तशी आमच्यामध्यें राजकीय दृष्टीनें जागृति सन १८८३ मध्यें युरोपियन लोकांनीं इल्बर्ट बिलाविरुद्ध केलेल्या जंगी चळवळीनें उत्पन्न झाली व त्या जागृतीला मग लॉर्ड रिपन, लॉर्ड डफरिन यांच्याकडून उत्तेजन मिळालें व नंतर राजकीय चळवळ फोंफावत गेली, हें सर्व विश्रुत आहे. असो. याप्रमाणें आमच्या राजकीय चळवळीचा इतिहास आहे. अशा स्थितींत सामाजिक सुधारणेचें चालू असलेलें काम अर्धवट टाकून राजकीय चळवळीच्या मागें लागणें शहाणपणाचें झालें असतें काय ? तो जवळ जवळ हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्याचाच प्रकार झाला नसता काय ? सारांश, वरील प्रकारची विचारसरणी अत्यंत कोतेपणाची व एकदेशीय असल्यामुळें ती त्याज्यच होती. आतां तर अर्ध-पाऊण शतकाच्या अनुभवानंतर लोकमताचा ओघ कोणत्या दिशेनें वाहात आहे हें आम्ही प्रत्यक्ष पाहातच आहों. असो. ही एका वर्गाची स्थिति झाली.

दुसरा वर्ग अशा लोकांचा होता कीं, त्यांचें सर्व प्रकारच्या–राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे–सुधारणांकडे सारखेंच लक्ष असे. ही सुधारणा आधीं आणि ती मग, असा प्रकार त्यांचा नसे. व तसें करून चालणार नाहीं. तेलंगांनीं तर एके ठिकाणीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, देशाची सामान्य प्रगति म्हणजे–One integral Whole–सामुदायिक दृष्टीनें एकच काम अगर व्यवहार आहे; अगर तें एकाच राष्ट्रदेहाचें पोषण करण्यासारखें आहे. त्या व्यवहाराच्या एकाच भागावर–उदाहरणार्थ, हात, पाय अगर डोकें यांवर–जोर दिला अथवा त्याचेंच तेवढें पोषण केलें व इतर भागांकडे दुर्लक्ष केलें तर ते दुसरे भाग कमकुवत राहतील. म्हणजे तो सर्व व्यवहार यशस्वी होणार नाहीं व सबंध राष्ट्रदेहाचें पोषण होणार नाहीं. या संबंधांत तेलंगांनीं एक आपल्या नित्याच्या व्यवहारांतील अनुभवाचें उदाहरण देऊन यांपैकीं कोणता भाग आधीं हातीं घ्यावा व कोणता मग हें तुम्हीच सांगा असें आपल्या प्रतिपक्ष्यांना विचारलें आहे. वास्तविक तीं सगळींच कामें जरूरीचीं व निकडीचीं, त्यांत निवड ती कशी करणार ? त्यांनीं आपणांस एकदां चार सहा दिवसांच्या अवधींत सार्वजनिक कामासंबंधानें अजमासें पंचवीस बोलावणीं ( Calls ) अगर सूचना आल्याचें सांगितलें आहे. त्यांत राजकीय कामें होतीं, सामाजिक होतीं, औद्योगिक होतीं, वाङ्मयात्मक होतीं, शिक्षणात्मक होतीं, व इतर स्वरूपाचीं कामें होतीं. तेलंगांनीं स्पष्ट विचारलें कीं, यांपैकीं फक्त राजकीय कामें तेवढीं प्रथम घेऊं व बाकीचीं मग पाहूं असें म्हणून चालेल काय ? अशानें देशाची खरी प्रगति मुळींच होणार नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करून या दुसऱ्या वर्गातील–अर्थात् न्या. रानड्यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे "तेलंगपंथां"तील लोकांनीं मोठ्या दूरदर्शीपणानें सर्व प्रकारच्या सुधारणा हातीं घेऊन चळवळ केल्यामुळेंच

देशांतील जनता या पन्नास–साठ वर्षांत इतकी जागी झाली आहे, व त्याबद्दलचें सर्व श्रेय या दुसऱ्या वर्गाचें आहे. पण सन १८८४ पर्यंत सामाजिक चळवळ सुसंघटित रीतीनें करण्याची कांहीं सोय नव्हती. मलबारींच्या पत्रकांवरून झालेल्या वादविवादामुळेंच सुधारणेच्छु मंडळींना तशी कांहीं सोय करण्याचें सुचलें. सन १८८५ मध्यें मुंबईस राष्ट्रीय सभेचें पहिलें अधिवेशन झालें. त्या वेळीं देशाच्या सर्व भागांतून जमलेल्या मंडळींत सामाजिक विषयांची चर्चा झाली. त्या वेळीं रा. ब. रानडे, ना. तेलंग, दि. ब. रघुनाथराव यांचीं भाषणें झालीं. त्यांवरून वर्षांतून एक वेळ एका ठिकाणीं जमून सामाजिक प्रश्नांसंबंधानें विचार करण्याची सर्वांनाच आवश्यकता भासूं लागली. पण त्यासंबंधीं मुंबईस कांहींच नक्की ठरलें नाहीं. सन १८८६ सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभा झाली, त्या वेळींही जमलेल्या मंडळींत सामाजिक चर्चेपलीकडे कांहीं ठरलें नाहीं. सन १८८७ मध्यें राष्ट्रीय सभा जेव्हां मद्रासेस झाली तेव्हां मात्र सर्वानुमतें सामाजिक परिषदेची स्थापना झाली व त्याच सालीं सर टी. माधवराव यांच्या अध्यक्षतेखालीं तेथें तिचें पहिलें अधिवेशन झालें. सामाजिक परिषदेची स्थापना करण्यांत व पुढें सुमारें चवदा-पंधरा वर्षेंपर्यंत तिची काळजीपूर्वक जोपासना करण्यांत मुख्य अंग न्या. रानडे यांचें होतें हें येथें सांगितलें पाहिजे.

सन १८८६ व १८८७ या सालांतील राष्ट्रीय सभेस प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें तेलंग हजर राहूं शकले नाहींत. सन १८८८ मध्यें अलाहाबादेस झालेल्या राष्ट्रीय सभेस ते हजर होते. त्यावेळीं तिकडेच भरलेल्या सामाजिक परिषदेंत त्यांनीं भाग घेऊन एक महत्वाचा ठराव सभेपुढें आणला होता. त्या ठरावांत—१. लग्नाच्या वेळीं विनाकारण होणारा खर्च कमी करणें; २. लग्नाचें वय पुढें ढकलून बालविवाहाची

चाल बंद करणें; ३. पुनर्विवाह करूं इच्छिणाऱ्या विधवांना तशी मोकळीक असणें; ४. केशवपनाची चाल बंद करणें; ५. परदेशगमन; ६. पोटजातींत विवाहसंबंध जुळवून आणण्यास उत्तेजन देणें वगैरे—या विषयांचा अंतर्भाव झाला होता व त्यांपैकीं प्रत्येक विषयासंबंधीं तेलंगांनीं चांगलें विवेचन करून त्याचें महत्व प्रतिपादिलें.

सन १८८९ मध्यें मुंबईस झालेल्या सामाजिक परिषदेचे तेलंगांना अध्यक्षच निवडण्यांत आलें होतें. त्या वेळींही त्यांनीं सामाजिक बाबतींतील निरनिराळ्या सुधारणांविषयीं वक्तृत्वपूर्ण भाषण करून त्यांचें महत्व प्रतिपादन केलें व आपण तत्प्रीत्यर्थ शक्य ती एक सारखी खटपट करीत राहिलें पाहिजे असें सांगितलें. त्यानंतरच्या कोणत्याच परिषदेस तेलंग हजर राहूं शकले नाहींत.

सन १८९१ सालीं आपल्या देशांत संमतिवयाच्या कायद्याचा वाद निघाला. त्या वादांत तेलंगांनीं भाग घेऊन महत्वाचें काम केलें. त्या वादाचा थोडक्यांत असा इतिहास आहे. सन १८८६ मध्यें मलबारी शेटच्या सूचनेप्रमाणें वागण्याचें व कायदा करण्याचें हिंदुस्थानसरकारानें नाकारल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. तदनंतर सन १८८९ मध्यें प्रसिद्ध मि. दयाराम गिडुमल यांनीं एक पत्रक प्रसिद्ध करून पीनलकोडमध्यें संमतिवयाची मर्यादा जी दहा ठेवली होती ती बारा करावी अशी सरकारास शिफारस केली. दयाराम गिडुमल हे न्यायखात्यांतील एक सरकारी बडे अधिकारी असल्यामुळें कायद्यांत कांहीं सुधारणा हवी असल्यास ती सुचविण्याचें त्यांचें कामच होतें. दयारामजींचें पत्रक प्रसिद्ध झाल्यावर त्या संबंधानें वर्तमानपत्रांतून चर्चा सुरू झाली. परंतु सरकारच्या मनाचा निश्चय होईना. इतक्यांत बंगालच्या बाजूस एक "फुलमानी" नांवानें प्रसिद्ध असलेलें

प्रकरण उपस्थित झालें. त्यांत एका दहा वर्षांच्या मुलीवर तिच्या नवऱ्यानें बलात्कार केल्याबद्दल त्याजवर खटला करण्यांत आला होता. त्या मुलीचें नांव "फुलमानी" असल्यामुळें तें प्रकरणच मग त्या नांवानें प्रसिद्धीस आलें. असो. त्या खटल्यानें बंगाल प्रांतांत त्यावेळीं खूप चळवळ उडवून दिली व अखेर कायद्यांतील संमतिवय बारा वाढविण्याबद्दल हिंदुस्थान सरकारचा निश्चय झाला. ही बातमी मुंबईस समजतांच कांहीं पुढारी लोकांची तिकडे ( न्या. तेलंगांच्या अध्यक्षतेखालीं ) सभा होऊन सरकारास संमतिवय बारा करण्याबद्दल सभेतर्फे एक विनंति अर्ज करण्यांत आला. मुंबईच्या कांहीं डॉक्टर मंडळींनीं सरकारला तशाच प्रकारचा विनंति अर्ज केला. परंतु पुण्यास लोकांची मोठी सभा होऊन संमतिवय न वाढविण्याबद्दल विनंति करण्याचें ठरलें व तसा सरकारास अर्ज करण्यांतही आला. तथापि सन १८९१ च्या जानेवारींत कलकत्त्यास हिंदुस्थान सरकारच्या वरिष्ठ कायदेकौन्सिलमध्यें संमतिवय बारा वाढविण्याबाबतचें बिल सरकारतर्फे पुढें ठेवण्यांत आलें. त्या वेळीं त्या कौन्सिलमध्यें पुण्याचे रा. ब. नूलकर व कलकत्त्याचे सर रमेश्चंद्र मित्र हे सभासद होते. सदर्हू बिलास नूलकरांनीं दुजोरा दिला. पण सर रमेश्चंद्र यांनीं त्याला विरोध केला. त्याबरोबर देशभर मोठी चळवळ होऊन बिलावर अनुकूल प्रतिकूल टीका सुरू झाली. बिलास सर्व प्रांतांतील सुशिक्षित व सुजाण लोक अनुकूल होते. फक्त पुराणमतवादी व कांहीं सुशिक्षित लोक मात्र विरुद्ध होते. पण वादाला थोडेंसें कटु स्वरूप येण्यास असें कारण झालें कीं, बिलास विरोध करतांना सर रमेश्चंद्र मित्र यांनीं "सरकार बिलाच्या रूपानें लोकांच्या धर्मांत हात घालीत आहे व त्यामुळें राणीच्या जाहीरनाम्यांत दिलेल्या वचनाचा भंग होत आहे" असें प्रतिपादन केलें; व कलकत्त्याच्या दुसऱ्या कांहीं—तर्कचूडामणि वगैरे—लेख-

कांनीं तेंच प्रतिपादन पुढें चालविल्यामुळें लोकांचीं मनें बिथरलीं व त्यांनीं चळवळ जास्त जोरानें केली. खरें पाहिल्यास हा धर्मासंबंधाचा मुद्दा वादांत पुढें करण्यांत आला नसता तर बरें झालें असतें. कारण एक तर धर्माचा एवढा ओढून ताणून व्यापक अर्थ करीत बसल्यास व्यवहारच चालणार नाहीं. दुसरें असें कीं, सती, बालहत्या वगैरे धर्माच्या नांवाखालीं रूढ असलेल्या आमच्या देशांतल्या कांहीं अमानुषपणाच्या चाली सरकारानें पूर्वींच कायद्यानें बंद केल्या होत्या व ते कायदे आम्ही बिनतक्रार पाळीत होतों, तर आतांच धर्माचा मुद्दा पुढें आणणें सुसंगतपणाचें कसें होईल ? तिसरी गोष्ट, संमतिवयाची दहा ही मर्यादा पीनल कोडांत पूर्वींच दाखल होती. दहाची बारा करणें सरळ नव्हे काय ? पण धर्माचा व शास्त्राचा मुद्दा पुढें आणून बंगालमध्यें व महाराष्ट्रांत देखील कांहीं लोक जेव्हां सदहू बिलावर वाद करूं लागले तेव्हां सर्व परिस्थतीचा विचार करून डॉ. भांडारकरांनीं प्रस्तुत विषयक धर्मशास्त्रग्रंथांचें आलोडन करून व जरूर ते आधार देऊन एक लहान पुस्तक (Pamphlet) प्रसिद्ध केलें. न्या. तेलंगांनींही बिलांत अंतर्भूत झालेल्या तत्वाचा कायद्याच्या व धर्मशास्त्राच्या दृष्टीनें नीट विचार करून त्या वेळच्या "इंदुप्रकाश"मध्यें कांहीं लेख लिहिले. हे लेख व डॉ. भांडारकरांचें पुस्तक प्रसिद्ध होतांच पुण्याचे कै. लो. टिळक हे पुढें आले व त्यांनीं भांडारकरांनीं व तेलंगांनीं शास्त्रवचनांचे केलेले अर्थ बरोबर नाहींत असें प्रतिपादन केलें !

टिळक आणि भांडारकर किंवा टिळक आणि तेलंग यांजमध्यें प्रस्तुत विषयासंबंधानें जो वादविवाद झाला तो बराच विस्तृत आहे. त्याचें आतां प्रयोजन नाहीं, व त्यांच्या लेखांतील इकडे उतारे देऊन जागा अडविण्याचेंही कारण नाहीं. एक गोष्ट खरी आहे कीं, भांडारकर व तेलंग

हे त्या संमतिवयाच्या बिलाच्या बाजूचे होते व टिळक हे त्यांच्या विरुद्ध होते. परंतु यामुळें टिळकांचीच बाजू बरोबर होती व त्यांनीं भांडारकर व तेलंग या दोघांवरही सदरील वादांत जय मिळविला असा जो लोकांचा सामान्यत: समज—तसा लोकांचा समज कोणी केला अगर कोण करतात व तो कां याचीं कारणें आम्ही देत नाहीं—आहे तो चुकीचा आहे व त्याला मुळांत अगदीं आधार नाहीं. याविषयीं आम्ही इकडे विस्तार करीत नाहीं. जरूर तर वाचकांनीं आमचें डॉ. भांडारकरांचें चरित्र, प्रकरण पंधरा, हें पाहावें. असो. पण कांहीं मुद्याच्या गोष्टी लोकांस माहीत नाहींत तेवढ्यांचाच इकडे उल्लेख करतों. म्हणजे भांडारकर व तेलंग यांच्या संबंधानें लोकांचा झालेला गैरसमज दूर होईल. सदहू वादाच्या वेळीं टिळकांनीं जीं स्मृतिवचनें पुढें आणलीं होतीं त्यांचा अर्थ लावण्यांत त्यांनीं खुद्द डॉ. भांडारकरांचीच मदत घेतली होती. इतकेंच नव्हे, तर वादविषयक टिळकांचे लेख वाचून त्यांना कांहीं पारिभाषिक शब्द ऐकूनही माहीत नव्हते, व टिळकांनीं कांहीं वचनांचा आपणांस हवा तसा अर्थ करण्याकरितां त्यांतील शब्दांची फिरवाफिरव केली होती, या गोष्टी भांडारकरांनींच उघडकीस आणल्या. याशिवाय सबंध वादांत टिळक हे आपल्याशीं मुद्दाम असभ्यपणानें वागत होते असें भांडारकरांनीं स्पष्ट म्हटलें आहे. याहीपेक्षां महत्वाची गोष्ट ही कीं, ज्या कै. रा. ब. यशवंत वासुदेव ऊर्फ बापूसाहेब आठल्ये यांचें वादविषयक बाबतींतील मत टिळकांस मान्य झालें होतें व ज्यांची केसरीमध्यें त्याबद्दल टिळकांनीं सढळ हातानें स्तुति करून त्यांना डॉ. भांडारकरांच्या बरोबरीचे—किंबहुना कांकणभर जास्त विद्वान् ठरविलें होतें, त्याच बापूसाहेबांनीं मग पत्र लिहून केसरीच्याच द्वारें सदहू सर्व प्रकाराचा निषेध करून भांडारकरांनीं दिलेला अभिप्रायच बरोबर आहे असें आपलें स्पष्ट मत कळविलें ! हें

बापूसाहेबांचें पत्र ता. १७ मार्च १८९१ च्या केसरींतच प्रसिद्ध झालेलें असून टिळकपक्षीय लेखकांनीं अलीकडे प्रस्तुत वादासंबंधानें जो विस्तृत रीतीनें उल्लेख केलेला आढळतो त्यांत या पत्राचा पत्ताही नाहीं !

तेलंगांनींही सदर्हू वाद चालू असतां टिळकांस समर्पक उत्तरें दिलीं आहेत. इतकेंच नव्हे तर टिळकांनीं " विधि," " नियम " व "परिसंख्या " हे पारिभाषिक शब्द किंवा त्यांतील भेद हे कधीं ऐकलेलेही दिसत नाहींत असें भांडारकरांप्रमाणेंच तेलंगांनीं म्हटलें आहे. असो. मुद्याची गोष्ट इतकीच कीं, टिळकांनीं तेलंगांवर किंवा भांडारकरांवर सदरील वादांत जय मिळविला ही जी लोकांची समजूत झालेली आहे—किंवा केली गेली आहे—तिला बिलकूल आधार नाहीं.

तेलंगांचा मुख्य कटाक्ष सर रमेश्चंद्र मित्र यांनीं पुढें आणलेल्या " रघुनंदन "च्या आधारावर व त्यांनीं केलेल्या राणीच्या जाहीरनाम्याच्या ओढाताणीच्या अर्थावर होता. यासंबंधाचेंही तेलंगांनीं केलेलें स्पष्टीकरण अगदीं समर्पक पण फार विस्तृत आहे. ह्याचा इकडे विस्तार करणें शक्य नाहीं. " रघुनंदन, " कीं ज्याचा सर रमेश्चंद्र यांनीं आधार घेतला होता, त्याला सन १८८० च्या सुमारास बंगालमध्यें कोणी इतकें महत्त्वही देत नव्हते. ही गोष्ट एका बंगाली गृहस्थानेंच वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध केलेली आढळतांच तेलंगांनीं ती " टाईम्स "ला पत्रद्वारें कळवून सर रमेश्चंद्र व इतर टीकाकार यांचीं तोंडें बंद केलीं ! त्याचप्रमाणें राणीच्या जाहीरनाम्याचा असा व्यापक अर्थ करूं लागल्यास आमचीं शाळा—कॉलेजें बंद करावीं लागतील व पोलीसखातेंही बंद करावें लागेल. कारण शाळा—कॉलेजांतून शिकविल्या जाणाऱ्या पुस्तकांतील कांहीं धडे आमच्या धर्मसमजुतींविरुद्ध असतात व आमच्या धर्मसंबंधी मिरवणुकी सार्वजनिक

सुरक्षिततेसाठीं पोलिसांना केव्हां केव्हां बंद कराव्या लागतात ! अर्थात् असा जाहीरनाम्याचा व्यापक अर्थ केल्यास सर्व व्यवहार बंद ठेवावे लागतील.

वर सांगितलेला हा लेखी वाद झाला. सन १८९१ मध्यें या वादासंबंधानें अनुकूल–प्रतिकूल सभाही देशभर पुष्कळ झाल्या. पण त्यांचा आतां विस्तार नको. तरी अखेर संमतिवयाचें बिल त्या सालच्या मार्चमध्यें पास झालें ! ज्याच्या पायीं इतका कडाक्याचा दोन तीन महिनेपर्यंत वाद चालला होता, त्या कायद्याप्रमाणें गेल्या चाळीस वर्षांत कोर्टापुढें एकही महत्त्वाचा खटला आल्याचें आम्हांस स्मरत नाहीं !

सदरील संमतिवयाचा जो वाद चालू होता त्यांतून अनेक अवांतर मुद्दे आले होते. एक असा होता कीं, सामाजिक सुधारणेची कल्पना किंवा प्राचीन काळापासून चालत आलेल्या आचारांत शिथिलता राहूं देण्याची प्रवृत्ति ही इकडे इंग्रजी राज्य झाल्यापासून सुरू झाली. त्याच्यापूर्वीं ती नव्हती. पण ही समजूत चुकीची होती, हें सिद्ध करण्याच्या निमित्तानें तेलंगांनीं जुन्या बखरी, पत्रें वगैरे साधनांचें चांगलें परिशीलन करून पेशवाईतील सामाजिक व धर्मसंबंधीं धोरण काय होतें हें त्यांनीं सन १८९२ सालीं एक “ Gleanings from Maratha Chronicles ” या विषयावर सर्वोत्कृष्ट निबंध लिहून उत्तम रीतीनें दाखविलें आहे. हा निबंध न्या. रानडे यांच्या “ Rise of the Maratha Power ” या पुस्तकाच्या शेवटीं जोडलेला आहे. असो. तेलंगांचा निबंध फार मोठा आहे. आम्ही इकडे फक्त त्यांतील कांहीं महत्वाच्या गोष्टींचा निर्देश करतों. त्यावरून पेशवाईत खुद्द पेशवे सरकार किंवा त्या वेळचे जबाबदार असे वरिष्ठ अंमलदारदेखील धर्मसंबंधीं अगर सामाजिकसुधारणेचें काम प्रत्यक्ष उत्तेजन देऊन कसें सोपें करीत असत हें स्पष्ट दिसून येईल.

शाहू महाराजांच्या वेळीं व बाळाजी बाजीराव पेशवा असतांना एकदां ब्राह्मण–प्रभु प्रकरण उपस्थित झालें होतें. हा वाद फार जुना होता. तो शिवाजीच्याही वेळीं–अगदीं आरंभास–निघाला होता. पण त्यावेळीं जो निकाल देण्यांत आला तो शिवाजीच्या हयातींत, संभाजीच्या व राजारामाच्या कारकीर्दींत व खुद्द शाहूच्या कारकीर्दींत देखील प्रथम प्रथम पाळला जात होता. पण शाहूच्या कारकीर्दीच्या अखेरीस तो वाद पुनश्च उपस्थित झाला. याचें मुख्य कारण म्हणजे शाहूच्या दरबारांत प्रभु लोकांचें बरेंच वजन होतें. त्यांचें असें म्हणणें होतें कीं, त्यांच्या जातीला कमीपणा आणण्याकरितां ब्राह्मणांनीं कांहीं धर्मग्रंथांत–विशेषेंकरून सह्याद्रिखंडांत–नवीन प्रक्षिप्त श्लोक करून मुद्दाम घुसडून दिले आहेत ! प्रकरण नानासाहेबांपुढें येतांच त्यांनीं आपलें मत दिलें कीं, पूर्वींच्या वहिवाटीप्रमाणें वागण्याबद्दल स्पष्ट हुकूम द्यावा आणि ब्राह्मणांनीं चालविलेल्या भांडणाला मुळींच उत्तेजन देऊं नये. पेशव्यांच्या सल्ल्याप्रमाणें सर्वत्र हुकूम सुटले. त्यांत " नवीन पद्धत पाडूं नये व जुनी सोडूं नये " असें स्पष्ट बजावण्यांत आलें होतें. पण हा हुकूम शाहूतर्फें साताऱ्यास सर्व व्यवस्था पाहणारे प्रतिनिधि जगजीवनराव पंडित व त्यांचा गुमास्ता यमाजी यांना कबूल नव्हता. याचें कारण इतकेंच कीं, शाहूचा अंतकाळ जवळ आला होता ! मग शाहूच्या पाठीमागून त्या हुकुमाला कोण विचारतो ? परंतु शाहूचा अंत झाल्याबरोबर नानासाहेब पेशवे यांनीं प्रतिनिधि व त्यांचा गुमास्ता या दोघांनाही ताबडतोब तुरुंगांत टाकलें व प्रभु लोकांच्या घरीं सर्व धर्मकृत्यें पूर्वींप्रमाणेंच वेदमंत्रांनीं चालवावीं असे सक्तीचे हुकूम सोडले. ती वहिवाट थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीच्या शेवटपर्यंत चालू होती.

पण असले धर्मसंबंधी हिंदु लोकांचे वाद मिटविण्याचे प्रसंग मुसलमान राजांनाही येत असत. एकदां कोकणांतील ब्राह्मण व प्रभु यांच्या-

मध्यें वेदोक्तासंबंधानें वाद उपस्थित झाला व तो तिकडच्याच विजापूर सरकारच्या अधिकाऱ्यापुढें नेण्यांत आला. तो अधिकारी मुसलमान होता. त्याला हिंदुधर्मशास्त्रांतल्या भानगडी कशा समजणार ? त्यानें दोन्ही पक्षांतल्या लोकांस सांगितलें कीं, मला तुमचें शास्त्र समजत नाहीं. तुम्हीं काशीला जाऊन या वादाचा निकाल लावून ध्या व तो मला येऊन कळवा. मी त्याची बरोबर अमलबजावणी करतों. याप्रमाणें दोन्ही पक्षाचे लोक काशीस गेले. तिकडे पंडितांची सभा होऊन त्यांत प्रभु हे क्षत्रिय आहेत, त्यांना गायत्रीचा व सर्व धर्मकृत्यें वेदोक्त मंत्रांनीं करण्याचा अधिकार आहे, असें ठरलें. ब्राह्मण लोकांचें समाधान झालें व त्या निकालाप्रमाणें प्रभूंच्या घरीं धर्मकृत्यें वेदोक्त मंत्रांनीं करण्याचें त्यांनीं कबूल केलें. तीच वहिवाट पुढें चालली.

शहाजीच्या लग्नाची गोष्ट तर सर्वांनाच माहीत आहे. त्याचें लखजी जाधवरावाच्या मुलीशीं लग्न ठरलें होतें. पण ती गोष्ट लखजीच्या बायकोला पसंत न पडल्यामुळें लग्न मोडण्याच्या बेतांत आलें होतें. अखेर खुद्द निजाम मध्यें पडून त्यानें आपल्या वजनाच्या जोरावर—जाधवराव हा एक निजामशाहींतलाच मनसबदार होता—पूर्वीं ठरल्याप्रमाणें तें लग्न आपल्या देखरेखीखालीं घडवून आणलें !

तेलंगांना त्यांच्या तपासांत एक गोपिकाबाईचें पत्र मिळालें होतें. तें अनेक दृष्टीनें त्यांना महत्वाचें वाटलें. सवाई माधवराव हा गादीवर बसतांच त्यानें आपण राज्यकारभारांत कसें वागावें याबद्दल आपल्या आजीला—गोपिकाबाईला—सल्ला विचारला होता. या पत्राचें वरील गोपिकाबाईचें पत्र हें उत्तर होतें. ती बाई फार चतुर होती व राज्याच्या बऱ्याच उलाढाली त्या बाईच्या नजरेखालून गेल्या होत्या. तिनें आपल्या

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

नातवास रास्त तोच उपदेश केला. पण त्यांत त्या बाईनें असें स्पष्ट सांगितलें होतें कीं, "तूं आतां स्नानसंध्या कमी कर—घरचा ब्राह्मण देवाची पूजा करीतच असतो. तूं फक्त देवास एक तुलसीपत्र वाहा, म्हणजे झालें!" असा उपदेश गोपिकाबाईसारख्या स्त्रीनें करावा हें खरोखर आश्चर्य होय.

पेशव्यांच्या दरबारांत परशुराम भाऊ पटवर्धन हे एक प्रमुख पुरुष होते. त्यांची सात वर्षांची कन्या बयाबाई हिला बारामतीच्या जोश्यांचे घरीं दिलें होतें. परंतु दुर्दैवानें त्या मुलीचा नवरा लग्नानंतर पंधराच दिवसांनीं वारला. कांहीं दिवस लोटल्यावर भाऊंनीं आपल्या दुर्दैवी मुलीची हकीकत रामशास्त्री प्रभुणे यांच्यापुढें मांडली. शास्त्रीबोवांचें मन द्रवलें, आणि या मुलीचा पुनः विवाह करण्यास हरकत नाहीं असें त्यांनीं सांगितलें. पुढें भाऊंनीं तोच प्रश्न काशीच्या पंडितांपुढें ठेविला. पंडितांनींही ह्या मुलीच्या पुनर्विवाहास अनुकूल मत दिलें. इतकी सर्व तयारी करूनही भाऊंना अखेरीस जवळच्या आप्तमंडळीच्या आग्रहामुळें आपला—मुलीच्या पुनर्विवाहाचा—बेत रहित करावा लागला! परंपरागत रूढीनें बद्ध झालेल्या समाजांत वाढलेला उदार मनाचा मनुष्य देखील कसा कायमचा हतबल व गुलाम होऊन राहतो याचें हें वरील एक उत्कृष्ट उदाहरण आहे. त्याचप्रमाणें खुद्द पेशव्यांच्या दरबारांतील एका प्रमुख पण वर्णाश्रमधर्मावर पूर्ण श्रद्धा असलेल्या पुरुषाच्या डोक्यांत इतकी मोठी उदार कल्पना उद्भूत व्हावी हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

वरील गोष्टींवरून भरपेशवाईंत देखील धर्मसंबंधी किंवा सामाजिक बाबतींत सरकाराची किंवा लोकांची कशी उदार भावनाप्रेरित मनोवृत्ति असे हेंच पहाण्यासारखें आहे. पेशवाई आणखी कांहीं दिवस राहती तर

हल्लींचे कांहीं भानगडीचे सामाजिक प्रश्न कदाचित् कधींच सुटलेही असते असें तेलंगांचें म्हणणें होतें, पण इंग्लिशसत्ता आल्यामुळें तो मार्ग बंद झाला आहे.

असो. याप्रमाणें काशीनाथपंतांचे सामाजिक बाबतींतील अति उदार-मनस्कतेचे द्योतक असे विचार होते व त्यांनीं अनेक सामाजिक चळवळींत भाग घेऊन अत्यंत महत्वाची कामगिरी केली आहे.

तेलंगांच्या स्वतःच्या वागणुकीविषयीं इकडे चार शब्द लिहिले पाहिजेत. ते एका अगदीं जुन्या वळणाच्या कुटुंबांत वाढलेले असल्यामुळें सामाजिक प्रश्नांविषयीं विचार करतांना त्यांचें जुन्या मताच्या लोकांच्या मनोभावनांकडे प्रथम लक्ष जाई व ते त्या दृष्टीनें आपलें धोरण ठेवीत असत. दुसरी गोष्ट अशी कीं, सामाजिक बाबतींत व इतर बाबतींत देखील ते आपल्या आईबापांच्या इच्छेविरुद्ध कधींच वागत नसत. ही त्यांची पितृनिष्ठा व मातृनिष्ठा इतकी कडकडीत असे कीं, अखेरच्या दुखण्यांत " तुम्ही मोडांवर थोडीशी साधी शस्त्रक्रिया करून घेतल्यास बरे व्हाल " असें डॉक्टर लोक स्पष्ट सांगत असतांना व ती शस्त्र-क्रिया करून घेण्याची स्वतःच्या मनाची तयारी झाली असतांना देखील ती गोष्ट केवळ आपल्या आईबापांच्या इच्छेविरुद्ध होती म्हणून त्यांनीं शस्त्रक्रिया करून घेण्याचें नाकारलें आणि आपल्यावर मरण ओढवून घेतलें ! या त्यांच्या स्वभावगुणांमुळें तेलंगांच्या हातून केव्हां केव्हां सामाजिक बाबतींत त्यांच्या तत्वांप्रमाणें वर्तन घडत नसे व त्यायोगानें ते आपणांस लोकांच्या टीकेस पात्र करून घेत असत.

पण इतर पुष्कळ लोक असेच असत. तेलंगांसारख्या मोठ्या माण-साच्या बाजूस जर एवढ्या मोठ्या कमीपणाची गोष्ट, तर त्यांच्यांत व

इतरांत फरक तो काय ? ते आणि तेलंग सारखेच म्हणावयाचे ! असें बरेच टीकाकार म्हणत असत. आणि तें त्यांच्या दृष्टीनें बरोबर असे. खरी स्थिति काय होती हें वर सांगितलेंच आहे. लोकांनीं तीवरून आपलीं अनुमानें काढावींत.

परंतु तेलंगांच्या ठिकाणीं एक मोठा गुण होता. तो म्हणजे दंभाचा अभाव होय. तेलंग हे सुधारक मंडळींतलेच एक होते, व ते त्यांना त्यांच्या कामांत मनापासून सहाय्य करीत असत. वर्तनाच्या बाबतींत त्यांच्या परिस्थितीमुळें त्यांच्या बाजूस जरा कमकुवतपणा आला होता, ही गोष्ट खरी, व तो आपला दोष त्यांनीं अनेकदां कबूलही केला होता. एकदां तर तेलंग मोकळ्या मनानें आपली चूक कबूल करीत असल्याचें पाहून " How honest and magnanimous ! " ( किती प्रामाणिक व उदारमनस्क ! ) असे न्या. चंदावरकरांनीं उद्गार काढले होते ! तेलंगांनीं आपल्या दोषावर कधीं सफेती चढविण्याचा यत्न केला नाहीं कीं, आपल्या शब्दांनीं व वर्तनानें मी सुधारक नसून तुमच्याच बाजूचा आहें असें जुन्या मंडळीस कधीं दाखविलें नाहीं ! हाच तेलंगांमधला विशेष होता. तेलंगांच्या हातून सामाजिक दृष्टीनें वर्तनाच्या बाबतींत जशा एकदोन प्रसंगीं चुका घडल्या, तशा त्या वेळच्या बहुतेक सर्व सुधारक लोकांच्या हातून चुका घडत असत. त्याचें, न्या. रानड्यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, कारण एकच होतें. तेलंगप्रभृति मंडळीला " जुन्याला सर्वस्वी सोडावयाचें नाहीं व नवीनाप्रमाणें वागावयाचें " या अत्यंत हितकर तत्वाप्रमाणें चालावयाचें असल्यामुळें कांहीं लोक त्या वेळच्या परिस्थितींत केव्हां केव्हां घसरत असत. पण तेवढ्यामुळेंच त्यांच्याविषयीं केवळ अनुदार दृष्टि न ठेवतां ते तशाही बिकट स्थितींत कसे अडचणींशीं झुंजले, पण आपल्या तत्वनिष्ठेला मुकले नाहींत व

त्यांनीं हातांतलें सुधारणेचें काम बिलकूल सोडलें नाहीं, ही महत्वाची गोष्ट लक्षांत आणून आम्ही त्या कर्तव्यशील थोर माणसांची स्तुति केली पाहिजे, त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. त्या मंडळीपैकींच तेलंग हे एक प्रमुख होते. त्यामुळें न्या. रानड्यांनीं त्या मंडळींना "तेलंगसंप्रदाया"ची मंडळी असें जें म्हटलें तें अगदीं अन्वर्थक होतें.

---

प्रकरण दहावें.

# राजकीय चळवळी.

## राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपूर्वीं.

काशीनाथपंत तेलंगांच्या चरित्रांत १८७२ हें साल फार महत्वाचें होतें. त्या सालीं त्यांची विद्यार्थिदशा संपली व ते आपल्या ॲडव्होकेटच्या धंद्यास लागले. वाङ्मयक्षेत्रांत ते पूर्वींच शिरले होते. पण ज्या विद्वत्वपूर्ण "रामायण—होमर" या विषयावरील निबंधाच्या योगानें त्यांनीं आपल्या वयाच्या बाविसाव्या वर्षीं डॉक्टर वेबर सारख्या विद्वान् पंडिताला त्याच्या नवीन कल्पनेंतील दोष दाखवून चीत केलें, तो सुंदर निबंध तेलंगांनीं त्याच १८७२ सालीं लिहिला. त्याच सालीं ते स्टु. लि. अँड सा. सोसायटीचे सेक्रेटरी होऊन त्यांनीं स्त्री शिक्षणविषयक आपल्या सामाजिक कार्यास सुरवात केली, व ते त्याच सुमारास राजकीय क्षेत्रांत शिरल्यामुळें त्यांनीं सन १८७२ सालीं आपलें सार्वजनिक प्लॅटफॉर्मवरून पहिलें भाषण (maiden speech) केलें! तें भाषण मुंबईतील म्युनिसिपालिटीच्या सुधारणेविषयींच असल्यामुळें त्यावेळच्या "टाइम्स ऑफ इंडिया"नें म्हटलें होतें कीं, "तेलंगांनीं इतक्या लहान वयावर

आपलें मोठें जोरदार आणि विद्वत्वपूर्ण भाषण करून मुंबईतील स्थानिक स्वराज्याचा—त्याच्या सुधारणेची दिशा दाखवून—पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ”

तेलंग पुढें यावयाच्या पूर्वी मुंबईस एकदोन राजकीय संस्था स्थापिल्या जाऊन नवरोजी फर्दुनजी, दादाभाई नवरोजी, डॉ. भाऊ दाजी, मंगळदास नथूभाई वगैरे पूर्वीचे पुढारी कांहीं राजकीय चळवळ करीत असत. पण तो सार्वजनिक चळवळीचा पाया घालण्याचाच काळ असल्यामुळें, पुढाऱ्यांचें लक्ष राजकीय बाबींपेक्षां सामाजिक प्रश्नांकडे जास्त असे. त्यामुळें स्त्रीशिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह या विषयांसंबंधीं सार्वजनिक रीतीनें चर्चा करून लोकमत जागृत करण्याचेच त्या वेळीं जोराचे प्रयत्न चाललेले असत. मधून मधून एकादा राजकीय प्रश्न निघून त्यासंबंधानें सरकाराकडे अर्ज करण्यांत येई अगर सभा भरवून ठराव पास करण्यांत येत असत. या कामाकरितां डॉ. भाऊ दाजींनीं कलकत्त्याच्या “ ब्रिटिश इंडिया असोशिएशन ”च्या वळणावर मुंबईस सन १८५२ मध्यें एक “ बॉंबे असोशिएशन ” नांवाचीं संस्था स्थापन केली होती. पुढें लंडनच्या “ईस्ट इंडिया असोशिएशन”ची एक शाखा म्हणून दादाभाई नवरोजी यांनीं सन १८६८ सालीं मुंबईस एक संस्था स्थापन केली, व या संस्थांच्या साधनानें पूर्वोक्त पुढारी आपली राजकीय चळवळ चालवीत असत. सदहू दोन्ही संस्थांचे काशीनाथपंत तेलंग हे कांहीं दिवस सेक्रेटरी होते; व त्या संस्थांचे सेक्रेटरी या नात्यानेंच तेलंग उत्तम रीतीनें सार्वजनिक काम करीत असत असे सर दिनशा वाच्छा यांनीं अनेकदां उद्गार काढलेले आहेत.

अशा परिस्थितींत मुंबईच्या “ रेटपेयर्स असोशिएशन”च्या तर्फे म्युनिसिपालिटीची सुधारणा सुचविण्याकरितां म्हणून “ फ्रामजी कावसजी

इन्स्टिटयूट "मध्यें सन १८७२ सालीं एक जाहीर सभा भरविण्यांत आली होती. त्या वेळीं सभेंत युरोपीयन, हिंदु, पारशी असे सर्व जातीचे लोक हजर होते. शेट दादाभाई नवरोजी हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले होते. त्या वेळीं मुंबईच्या म्युनिसिपालिटीसंबंधानें कांहीं व्यवस्था करण्याविषयीं सरकारचा विचार चालला होता. त्यासंबंधींच्या बिलांत लोकांकरितां निवडणुकीचा हक्क मागावयाचा होता, व त्याकरितांच सदहू सभा बोलावण्यांत आली होती. सरकारकडे करावयाच्या अर्जाचा नमुना पूर्वींच तयार करण्यांत आला होता. तो अर्ज सभेपुढें ठेवून तिच्याकडून तो मंजूर करून घ्यावयाचा होता. अर्ज सभेपुढें ठेवण्याबाबतचा ठराव रा. शांताराम नारायण वकील यांनीं आणला, व त्याला तेलंग यांनीं अनुमोदन दिलें. अनुमोदन देतांना तेलंगांनीं वक्तृत्वपूर्ण भाषण केलें. तेंच त्यांचें पहिलें सार्वजनिक भाषण होतें. अर्ज सभेकडून पास होतांच तो सरकारकडे पाठविण्यांत आला.

सन १८७३ सालीं तेलंगांना दुसरें एक महत्वाचें भाषण करण्याची संधि आली. त्या वेळीं हल्लींच्या सारखीं कायदेकौन्सिलें नसल्यामुळें व लोक इतके तयार झालेले नसल्यामुळें सरकारी अधिकारी आपणांस वाटेल तसे व वाटेल तेव्हां कायदे पास करून घेत असत. कायदेकौन्सिलें अगदीं नांवाचीं होतीं ! नामदार गिब्ससारखे अधिकारी " लोक विचार करीपर्यंत आम्हांला बिलें थांबवितां येत नाहींत ! " असें कायदे कौन्सिलमध्यें जाहीर रीतीनें सांगत असत ! लोकांची जर वाट पाहावयाची नाहीं तर कायदेकौन्सिलें तरी कशास ? आणि सरकारी गॅझेटमधून लोकांच्या माहितीकरितां म्हणून बिलें पूर्वीं प्रसिद्ध करण्याचें सोंग तरी कशास ? एकदां तर कौन्सिलच्या एका बैठकींत एकदम पांच महत्वाचीं बिलें पुढें ठेवण्यांत आलीं होतीं ! वर सांगितल्याप्रमाणें घाईघाईनें कायदे पास

करून घेण्याच्या सरकारच्या प्रवृत्तीबद्दल निषेध करण्याकरितांच मुंबईच्या नागरिकांची सन १८७३ च्या नवंबरमध्यें " टाऊनहालां "त एक सभा भरविण्यांत आली होती. अध्यक्षस्थानीं मिस्टर जे. ए. फॉबर्स हे होते. मुख्य ठराव सभेपुढें मांडण्यांत आल्यावर तेलंगांनीं त्याच्या समर्थनार्थ वक्तृत्वपूर्ण भाषण केलें. त्यांनीं म्हटलें, " लोकांना कळूं न देतां जर सरकारला कायदे पास करावयाचे असतील तर कौन्सिलें कशास ? आणि वादविवाद प्रसिद्ध करण्याचें सोंग तरी कशास ? ह्या पांच बिलांपैकीं एकाही बिलास—पास होण्यास—तीन महिन्यांपेक्षां अधिक दिवस लागले नाहींत. एकाला तर दोन महिन्यांपेक्षांही कमी दिवस लागले ! हें घाईनें कायदे करणें नव्हे काय ? इंग्लंडांत प्रत्येक बिलास साडेचार ते सहा महिने लागतात. इकडे वास्तविक त्याहीपेक्षां अधिक दिवस लागले पाहिजेत. इंग्लंडांत पास करणारे लोक जनतेनें निवडलेले असतात. इकडे सगळे सरकारानें नेमलेले—केव्हां केव्हांतर सरकारचे अंमलदारच—असतात. इंग्लंडांतील पास करणारे लोक आमचेपेक्षां अधिक सुशिक्षित आहेत व त्यांचे पाठीशीं सर्व समर्थ लोकमत असतें. तेव्हां तिकडचे कायदे पास करणारे लोक, लोकमतास धाब्यावर बसविण्यास कधीं प्रवृत्त होतील हें शक्यच नाहीं. " असें निर्भीडपणाचें भाषण तेलंगांनीं वयाच्या तेविसाव्या वर्षी करणें म्हणजे खरोखर कौतुकास्पद होतें, व तसेंच तें होतें असें टाइम्सनें देखील म्हटलें !

त्याच सालीं सिव्हिल सर्विसमध्यें आमचे जास्त लोक घ्यावेत अशी सरकारास विनंति करण्याकरितां म्हणून मुंबईस एक सभा भरविण्यांत आली होती. त्या वेळींही तेलंगांनीं एक उत्तम भाषण करून सरकारास स्पष्ट सांगितलें कीं, " आम्हांस या कामीं न्याय मिळावा तसा मिळत नाहीं; तरी तो जरूर मिळाला पाहिजे !"

सन १८७६ सालीं लॉर्ड लिटन हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय होऊन आले. ते सन १८८० पर्यंत इकडे होते. त्या चार पांच वर्षांच्या मुदतींत हिंदुस्थानच्या खऱ्या हिताकडे अगदीं दुर्लक्ष करून जेवढीं अरेरावीचीं कृत्यें करतां येणें शक्य होतीं तेवढीं लॉर्ड लिटन अधिष्ठित सरकारानें केलीं असें म्हणण्यांत यत्किंचित् देखील अतिशयोक्ति होत नाहीं. त्याचप्रमाणें त्या मुदतींत सरकारच्या हरएक जुलमी कृतीवर अत्यंत निर्भीडपणें टीका करतांना तेलंगांमधले कांहीं उत्तमोत्तम गुण प्रकट झाले व त्यांची, एक अत्यंत वजनदार व निःस्पृह पुढारी म्हणून ख्याति झाली यांतही शंका नाहीं. राजकीय व अर्थशास्त्रीय विषयांवरील तेलंगांचीं कांहीं उत्तमोत्तम भाषणें व निबंध म्हणून जे प्रसिद्ध आहेत त्यांपैकीं बरेच त्या मुदतींतले आहेत. सन १८७६ सालीं लॉर्ड लिटनच्या कारकीर्दींत "रेव्हिन्यू जुरिसडिक्शन बिल" पास झालें. या बिलाच्या विरुद्ध सर्व युरोपियन व हिंदी लोक होते. बॉंबे गॅझेटचे त्या वेळचे संपादक मिस्टर मॅक्लीन यांनीं त्या बिलावर कडक टीका केली होती. तरी तें पास झालें! त्या विरुद्ध सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे अर्ज करण्याकरितां "फ्रामजी कावसजी" हॉलमध्यें एप्रिल १८७६ मध्यें मुंबईच्या सर्व नागरिक लोकांची सभा झाली. त्या सभेंत तेलंगांनीं अर्जाच्या समर्थनार्थ अत्यंत मुद्देसूद भाषण केलें. त्या वेळपर्यंत देशांतील जमावंदीचे प्रश्न न्यायकोर्टाकडे निकालाकरितां जात असत. ही वहिवाट वॉरन हेस्टिंग्सच्या वेळेपासून चालत आली होती. पण ती आतां बदलून तसले प्रश्न यापुढें मुलकी कामगारांकडे सोंपविण्यांत यावे असें प्रस्तुत बिलाच्या योगानें ठरविण्यांत आलें! हें धोरण अत्यंत पिछेहाटीचें होतें असें सर्वांचेंच मत पडलें. ब्रिटिश लोकांची राजनीति न्यायतत्वावर उभारलेली होती. ती सदरील बिलाच्या योगानें त्या उच्च स्थानावरून खालीं ओढली जाऊन एका

व्यक्तीच्या खुषीवर टाकली गेली, हें बरोबर झालें नाहीं, असें तेलंगांनीं स्पष्ट सांगितलें. तेलंगांच्या या भाषणावरून व्यक्त झालेल्या त्यांच्या भाषा-प्रभुत्वाबद्दल व गोड आवाजाबद्दल " बॉंबे गॅझेट"नें फार स्तुति केली !

सन १८७७ मध्यें महाराणी व्हिक्टोरिया सरकार यांनीं आपणांस " हिंदुस्थानची बादशाहीण " हा किताब घेतला. अशा शुभ प्रसंगीं त्यांचें आयुरारोग्य चिंतून कांहीं राजकीय हक्क मागण्याकरितां म्हणून पुण्याच्या सार्वजनिक सभेकडून रा. ब. रानडे यांच्या सल्ल्यानें एक अर्ज तयार करण्यांत आला. तो अर्ज पास करण्याकरितां पुण्यास जी मोठी सभा बोलाविण्यांत आली होती, त्यांत काशीनाथपंत तेलंग यांनीं अर्जाच्या समर्थनार्थ भाषण केल्यावर तो पास झाला व नंतर तो सरकाराकडे पाठविण्यांत आला.

त्याच सालीं मुंबईस एक " व्हॉलंटीयर कोर " म्हणजे व्हॉलंटीयरची पलटण स्थापन करण्याकरितां " टाउनहॉल"मध्यें सभा बोलावण्यांत आली होती. अध्यक्षस्थानीं गव्हर्नरसाहेब सर रिचर्ड टेंपल हे होते. चालकांचा उद्देश **सर्व रहिवाशांची** म्हणून सभा बोलावून पलटण फक्त " युरोपियन " लोकांची ( पण मुंबई नागरिकांच्या नांवाखालीं ! ) बनवावयाची असा होता ! त्यांत पारशी, हिंदु वगैरे यांना घ्यावयाचा उद्देश नव्हता. पण सभा " रहिवाशांची " बोलावल्यामुळें फेरोजशहा मेथा व तेलंग हे हक्कानें हजर राहिले होते. पुढें ठरावाच्या भाषेवरून चालकांचा खरा हेतु उघड होतांच मेथा व तेलंग या दोघांनीं उठून त्या फसवणुकीच्या प्रकाराचा तेथल्या तेथें निषेध केला ! लागलींच चालकांपैकीं एकानें उठून सभेचा उद्देश जाहीर करण्यांत नजरचूक झाल्याचें कबूल केलें व सभा फक्त युरोपीयन लोकांची आहे असें सांगितलें. त्याबरोबर मेथा व तेलंग हे दोघे सभेंतून उठून गेले !

सन १८७७–७८ हें साल फार आणीबाणीचें होतें. त्या सालीं हिंदुस्थानांत अतिभयंकर दुष्काळ पडला होता. तरी दुष्काळपीडित लोकांस मदत करण्याबाबतची सरकारनें केलेली व्यवस्था समाधानकारक नव्हती. दरसाल बजेटांत तूट हा क्रम कित्येक वर्षें चालला होता. तरी अफगाणिस्थानशीं लॉर्ड लिटन यांनीं लढाई सुरू केली. अशा खर्चाच्या बाबी वाढल्या असतां त्याची तरतूद कोठून करावयाची ? अशा अडचणीच्या स्थितींत देखील विलायती मालावरील आयात जकात उठविण्याच्या विचारांत लॉर्ड लिटन हे गढून गेले होते ! असल्या आणीबाणीच्या वेळीं हिंदुस्थान सरकारानें कर वाढविण्याचा बेत केला. त्यांनीं मिठावरील कर वाढविला, आणि "लायसेन्स टॅक्स" नांवाचा नवीन कर बसविण्याचें ठरविलें !

हा नवीन कर बसविण्याचें कारण असें दाखविण्यांत आलें कीं, हा कर एक "Famine Insurance Fund" ( दुष्काळाची आपत्ति टाळण्याकरितां पूर्वींच तरतूद करण्याकरितां फंड ) स्थापन करण्याकरितां बसविण्यांत यावयाचा असून कराचें उत्पन्न फक्त याच कामाकडे लावण्यांत येईल ! पण त्यांत थोडासा पंक्तिप्रपंच करण्यांत आला होता. तो कर बडे सरकारी अंमलदार व वकील आणि बॅरिस्टर अशा मोठ्या लोकांपासून घ्यावयाचा नव्हता ! तो फक्त व्यापारी आणि शेतकरी लोक यांजपासून वसूल करावयाचा होता.

या सर्व अन्यायाच्या प्रकारानें लोक अत्यंत असंतुष्ट झाले आणि सरकारच्या या कृत्याचा निषेध करण्याकरितां जिकडे तिकडे सभा झाल्या तर त्यांत आश्चर्य नाहीं. तशा प्रकारची एक निषेधप्रदर्शक सभा मुंबईस १८७८ च्या फेब्रुवारींत भरविण्यांत आली. ती प्रथम टाउनहॉलमध्यें

भरावयाची होती, पण त्याबद्दलची परवानगी सर रिर्चड टेंपल यांनीं दिली नाहीं ! म्हणून सभा कापाच्या मैदानावर "विल्सन सर्कस" करितां जो मोठा तंबू मारण्यांत आला होता त्या ठिकाणीं झाली. सभेंत जमलेल्या लोकांनीं सर्व तंबू चिकार भरून गेला होता. युरोपीयन लोक देखील सरकारी कृतीविरुद्ध होते. त्या सभेच्या अध्यक्षस्थानीं मिस्टर डी. ग्रॅहॅम हे होते. सभेंत पुढें पाठवावयाच्या अर्जाच्या समर्थनार्थ तेलंगांनीं जें भाषण केलें तें त्यांच्या उत्तम भाषणांपैकीं एक होतें. त्यांत त्यांनीं सरकारच्या विचारसरणींत अथपासून इतिपर्यंत कसा अन्याय भरला होता हें पायाशुद्ध तर्कपद्धतीनें व सुंदर रीतीनें दाखविलें. त्यांनीं म्हटलें "वास्तविक सर्व अप्रत्यक्ष कर व्यापारी लोक भरतात. शेतकरी लोक जमीनधारा तर भरतातच, पण पुन्हां त्यांच्यावर मीठाचा कर पडतोच. अशा स्थितींत त्याच लोकांवर हा आणखी एक नवीन कर लादणें हा केवळ अन्याय आहे. या करापासून उत्पन्न झालेली रक्कम जर दुष्काळनिवारणाकडे लावावयाची होती तर त्या कामीं बड्या अंमलदारांनीं किंवा वकील—बॅरिस्टरांनीं कराच्या रूपानें मदत कां करूं नये ?"

त्याच भाषणांत तेलंगांनीं कायदे कौन्सिलाची खरीखुरी स्थिति काय होती हें उत्तम रीतीनें दाखविलें. ते म्हणाले कीं, कोणतेंही बिल सरकारनें कौन्सिलपुढें आणलें कीं, सर्वांनीं त्याला अनुकूल मत द्यावें अशी त्यांची अपेक्षा असे. पण खरा प्रकार असा होता कीं, सरकारी आंतल्या कौन्सिलमध्यें—Cabinet मध्यें—कांहीं अंमलदारांची जूट असे. मग ते आपला मनोदय वाटेल तो लपंडाव करून पूर्ण करून घेत असत आणि कायदे कौन्सिलांना धाब्यावर बसवीत असत !

या भाषणाबद्दल बॉंबे गॅझेट व टाइम्स या दोन्ही पत्रांनीं तेलंगांची स्तुति केली. टाइम्सनें तर त्यांना जॉन ब्राइटची उपमा दिली !

लॉर्ड लिटन यांची कारकीर्द त्यांच्या अनेक अरेरावीच्या कृत्यांमुळें लोकांस इतकी असह्य झाली कीं, त्यांतून देशाची केव्हां एकदां सुटका होईल अशी लोक उत्कंठेनें वाट पाहात बसले होते ! त्यांच्या प्रत्येक महत्वाच्या जुलमी कृत्यांची तेलंगांनीं अगदीं निर्भीडपणें हजेरी घेतली व त्यांतील अत्यंत मुद्देसूदपणानें दोषाविष्करण करण्यांत त्यांनीं मुळींच कसूर केली नाहीं. तशाच प्रकारची ही त्यांची "लायसेन्स टॅक्स" सबंधाची टीका होती.

त्याच सुमारास लॉर्ड लिटन यांनीं मुस्कटदाबीचा कायदा पास केला होता. तो अगदीं अन्यायमूलक होता. या कायद्याचा ( Gagging Act चा ) सर्वच प्रकार इतका विचित्र होता कीं, हें सुधारलेल्या इंग्रज लोकांचें राज्य नसून नुसती मोंगलाईच आहे असेंही क्षणभर लोकांस वाटलें असेल ! त्या कायद्याची योजना अगदीं गुप्तपणें झाली होती. लोकांस त्याचा पत्ताही नव्हता. बिल, लोकांस त्याबद्दल पुरेशी नोटीस न देतां, एकदम कायदेकौन्सिल पुढें ठेवण्यांत आलें व तें एकाच बैठकींत पास करून घेण्यांत आलें ! कायद्याचा हेतु चालू असलेली सरकारावरील टीका बंद करण्याचा नसून पुढें होणारी टीका टाळण्याचा होता !

काशीनाथपंत तेलंग यांनीं त्या कायद्यावर अत्यंत मुद्देसूद व निभाड लेखमाला लिहून इंदुप्रकाशांत टीका केली होती. पहिल्या कांहीं लेखांत त्यांनीं त्या सबंध कायद्याचें कलमवारीनें परीक्षण करून त्यांत कसकसे दोष राहिले आहेत हें दाखविलें. त्या कायद्याखालचे खटले न्याय कोर्टापुढें पाठविण्याची सवड ठेविली नव्हती, याबद्दल तेलंगांनीं तक्रार करून पुढें त्यांनीं म्हटलें कीं, कांहीं कलमांची भाषा इतकी अस्पष्ट व संदिग्ध होती कीं, त्यांच्या कचाटींत अधिकारी लोकांस अप्रिय किंवा गैरसोयीचें

वाटत असलेलें कोणतेंही भाषण अगर पुस्तक अथवा पत्र सहज आणतां येईल ! शिवाय सुशिक्षित लोक हे राजनिष्ठ आहेत असें सरकार नेहमीं म्हणत असे. पण त्या म्हणण्यांत व या मुस्कटदाबीच्या कायद्यांत सुसंगतपणा तो काय राहिला? असें तेलंगांनीं स्पष्ट विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं, त्या वेळच्या सर्व परिस्थितीचा विचार केल्यास असें स्पष्ट दिसत होतें कीं, खरें कायद्याचें राज्य मागें पडून एकसत्तात्मक राज्याकडे—किंबहुना मोंगलाई-कडे—सरकारचा कल होत चालला होता ! तेलंगांच्या लिहिण्याचा स्पष्ट आशय असा होता कीं, त्या कायद्याप्रमाणें कोणीही—लहान असो, मोठा असो—अधिकारी आपणांस "सरकार" समजणार व आपल्या प्रत्येक कृतीला तो "सरकार"ची कृति समजणार. मग सरकाराच्याविषयीं लोकांच्या मनांत अप्रीति उत्पन्न केल्याचा आरोप करण्यास किती उशीर? तेलंगांनीं स्पष्ट सांगितलें कीं, अशी त्या कायद्याच्या द्वारें मतस्वातंत्र्यावर गदा आणणें हें केवळ अन्यायाचें व अप्रयोजक कृत्य असून त्यायोगें योजिलेला हेतु तर मुळींच सिद्धीस जाणार नाहीं. फार काय, पण जे परिणाम या कायद्याच्या योगानें टळतील असें सरकारास वाटत होतें तेच परिणाम अखेर हटकून घडून येतील !

तेलंगांनीं पुढें म्हटलें कीं, आम्ही ब्रिटिश अंमलाखालीं प्रस्तुत काळीं असल्यामुळें तदनुषंगिक मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य वगैरे ज्या हक्कांच्या योगानें आम्ही कांहीं बाबतींत उच्च स्थानावर आहों असें वाटत होतें, तो केवळ भ्रम ठरून या कायद्यानें आम्हांस त्या स्थानावरून खालीं ओढून आणून एकसत्तात्मक राज्यांत व अनुदार कल्पनासूचक गर्तेंत सोडलें आहे असें वाटूं लागलें आहे. म्हणजे पूर्वींच्या देशी राज्याच्या मानानें ब्रिटिश राज्याचें श्रेष्ठत्व दर्शविणाऱ्या ज्या कांहीं विशेष प्रकारच्या गोष्टी होत्या त्या या कायद्याच्या योगानें नष्टप्राय होऊन

आम्ही पुनः पूर्वीच्याच एकसत्तात्मक राज्यांत पडलों आहों असें आम्हांस वाटूं लागलें आहे !

सदहू मुस्कटदाबीचा कायदा हा सन १८७० मध्यें पार्लमेंटनें पास केलेल्या "आयरिश ॲक्ट" च्या वळणावर पास करण्यांत आला असा सरकारतर्फे खुलासा करण्यांत आला होता. पण तो खुलासा समाधानकारक नव्हता असें तेलंगांनीं सांगितलें. "आयरिश ॲक्ट" ज्या परिस्थितीमुळें पास करण्यांत आला होता त्या आयर्लंडच्या परिस्थितींत व सन १८७७–७८ मधील हिंदुस्थानच्या परिस्थितींत साम्य कितीसे ? आयरिश कायद्याच्या पूर्वी आयर्लंडांत दंगे, मारामाऱ्या वगैरे मनस्वी अत्याचार झाले होते. तसे हिंदुस्थानांत झाले होते काय ? बंड करणें हें आपलें कर्तव्य आहे असें आयरिश लोक उघड रीतीनें म्हणत असत. तसें हिंदुस्थानांत कोणी ऐकलें तरी होतें काय ? आयरिश कायदा करावयाच्या पूर्वी आयरिश लोकांच्या समजुती करण्याचे प्रयत्न करण्यांत आले होते. त्यांत सरकाराला यश आलें नाहीं ती गोष्ट निराळी. पण तसे प्रयत्न हिंदुस्थानांत करण्यांत आले होते काय ? देशांत दुष्काळ पडला असतां व लोकांचें दारिद्र्य वाढत चाललें असतां सरकार त्यांच्यावर कराचें ओझें वाढवीत होतें ! त्यामुळें लोकांत असंतोष पसरत चालला होता. त्याचा उपशम करण्याकरितां सरकारानें काय केलें ? तसेंच सिव्हिल सर्विसमध्यें युरोपीयनाच्याच बरोबरीनें हिंदी मनुष्याला सरकार शिरूं देत होतें काय ? "होम चार्जेस"च्या रूपानें हिंदुस्थानांतून इंग्लंडांत जाणारा द्रव्यप्रवाह बंद करण्याचा कधीं कोणी प्रयत्न केला होता काय ? आयात मालावरील–वचनभंग करूनही–जकात उठविण्यांत आली नाहीं काय ? युरोपीयन आणि हिंदी लोक यांजमधील अविश्वासाचीं कारणें दूर करून त्यांची दिलसफाई करण्याचा कोणी प्रयत्न केला होता

काय ? याप्रमाणें हिंदी लोकांच्या कांहीं मुख्य मागण्यांचा उल्लेख करून तेलंगांनीं, एक राजनिष्ठ प्रजाजन या नात्यानें म्हटलें कीं, "ब्रिटिश लोकांचें हिंदुस्थानवर राज्य चालावें अशी आमची मनापासून इच्छा आहे. पण आमचें सरकार आपण सर्वज्ञ आहों असें मानून 'सर्व ठीक चाललें आहे' अशा भरंवशावर जें झोंपीं जातें त्या झोंपेंतून त्याला कोणी जागें करण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावरच तें पुन्हां रुष्ट होतें याचेंच आम्हांस अत्यंत वाईट वाटतें."

ब्रिटिश लोकांचें इकडे राज्य चालावें असें आम्हांस खरोखरीच वाटतें. पण ब्रिटिश अधिकारी लोकांनीं इकडील लोकांस संतुष्ट राखण्याकरितां जेवढें करतां येण्यासारखें असेल तेवढें जरूर केलें पाहिजे. इकडील लोकांच्या संतोषावर व सदिच्छेवरच ब्रिटिश लोकांचें राज्य टिकणार आहे हें मोठमोठ्या मुत्सद्यांनीं कबूल केलें आहे. त्यामुळें लोकांच्या इच्छा काय आहेत, त्यांच्या गरजा काय आहेत ह्याबद्दलची माहिती अधिकाऱ्यांनीं करून घेतली पाहिजे. युरोपीय अधिकारी परकीय आहेत. त्यांना लोकांच्या भावना काय आहेत हें समजणें कठीण असतें. ती माहिती पुरवणारीं उत्तम साधनें म्हणजे देशी वर्तमानपत्रें. तीं चालविणारे लोक नेहमीं जनतेंत राहणारे, त्यांच्याशीं हरएक बाबतींत बोलणारे चालणारे असतात. त्यांना लोकांसंबंधीं सर्व माहिती असते. त्यांचींच तोंडें बंद करून कसें चालेल ? अशा प्रकारची सरकारास इशारत देऊन तेलंगांनीं म्हटलें कीं, अधिकारी लोकांनीं वृथा अभिमानाच्या अगर इभ्रतीच्या भरीस न पडतां लोकांच्या इच्छा काय आहेत हें पाहावें व त्या त्यांच्या इच्छा पुऱ्या करण्याच्या कामास लागावें. त्यांत हिंदुस्थान देशाचेंच केवळ नव्हे तर इंग्लंडचें देखील कल्याण आहे, व तसें केल्यानें इंग्लंडनें आपलीं वचनें पुरीं केलीं असें होऊन त्याच्या कीर्तींत भर पडेल ! असो. पुढें

सन १८८० मध्यें विलायतेंतील प्रधानमंडळ बदलतांच ग्लॅडस्टन साहेब मुख्य प्रधान झाले, व त्यांनीं हा मुस्कटदाबीचा कायदा एकदम रद्द केला!

सन १८७७–७८ च्या सुमारास हिंदुस्थान देशाची स्थिति हरएक दृष्टीनें फार बिकट झाली होती. अशा वेळीं लॉर्ड लिटन अधिष्ठित हिंदुस्थान सरकारानें इकडील करवसुलीच्या बाबतींत मोठी क्रांति घडवून आणली होती. त्या वेळीं या देशाची अर्थशास्त्रीय दृष्टीनें स्थिति अगदीं हलाखीची झाली होती. दरसाल बजेटांत तूट ही ठेवलेलीच असे! देशांत अति भयंकर दुष्काळ पडला होता. अशा स्थितींत अफगाणिस्थानाशीं क्षुल्लक कारणावरून युद्ध सुरू करण्यांत आलें होतें. इतकीं खर्चाचीं तोंडें “ आ ” पसरून बसलेलीं असतांना वास्तविक जमेचीं तोंडें उघडीं असलेलीं बंद तरी करूं नयेत. पण तेंही आमच्या सरकारच्यानें होईना. याचें मुख्य कारण त्या सरकाराचें लक्ष हिंदुस्थानाच्या स्थितीकडे नसून तें इंग्लंडच्या हिताकडे, त्या देशाच्या व्यापाराकडे लागलेलें होतें. खर्च भागविण्याकरितां—निदान जमाखर्चाचीं तोंडें मिळविण्याकरितां—त्या वेळीं विलायतेंतून या देशांत येणाऱ्या कापशी मालावर आमच्या सरकारकडून शेंकडा ७½ टक्के जकात बसविण्यांत आली होती. ती कित्येक वर्षें चालू होती. पण सन १८७४ पासून पुढें मुंबईच्या गिरण्यांची स्थिति जरा चांगली दिसूं लागली होती. तें इंग्लंडमधील गिरणीवाल्यांना सहन होईना. त्यांच्या मतें इकडील आयात जकातीनें मुंबईंतील गिरण्यांच्या मालाचें संरक्षण होत होतें. म्हणून सन १८७४ च्या सुमारास ती जकात उठविण्याबद्दलची विलायतेंत खटपट सुरू झाली. त्या वेळीं कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारावर होता. त्याचें अस्तित्व लँकॅशायर परगण्यांतील लोकमतावर अवलंबून होतें. अधिकारावर कोणताही पक्ष असला तरी लँकॅशायरमधील सभासदांची सदहू जकात उठविण्याबद्दल अधिकारारूढ

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

पक्षाच्या मागें एकसारखी टोंचणी सुरू असेच. लिबरल पक्ष अधिकारावर असला म्हणजे त्या सभासदांना—लिबरल हे खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते असल्यामुळें—फारशी अडचण वाटत नसे. पण अधिकारावर कॉन्सर्व्हेटिव्ह पक्ष असला म्हणजे त्याला प्रतिपक्षाला Opposition ला—जरा भिऊन वागावें लागत असे. अर्थात् त्या वेळच्या (१८७६–७७) विलायतेंतील सरकारानें लँकॅशायरच्या सभासदांच्या आग्रहास बळी पडून सदरील ७½ टक्के जकात उठविली ! पण त्याबद्दलचें कारण जें पुढें करण्यांत आलें होतें तें इतकें हास्यास्पद होतें कीं, तें इतर वेळीं कोणास खरेंही वाटलें नसतें. लँकॅशायर मधील सभासदांनीं अशी कोटी लढविली कीं, ती जकात संरक्षक स्वरूपाची होती ! ती कशी ? तर विलायतेंतील जो माल इकडे येत असे त्याच्या दृष्टीनें इकडच्या—देशांतील व्यापाराचें संरक्षण होत असे **असें नव्हे** तर विलायतेंतील जो माल चीन देशांत जात असे त्याबरोबर इकडचाही जो माल त्या देशांत जात असे त्याचें संरक्षण या देशांतील ७½ टक्के जकातीनें होत असे ! खरें पाहिल्यास चीनमधल्या व्यापाराचा इकडील जकातीशीं संबंध काय ? चीनमधले लोक पसंत पडेल त्या देशांतला माल घेतील. इंग्लंडचा घेतील किंवा हिंदुस्थानचा घेतील. त्यांत इकडच्या जकातीचा संबंध काय ? पण इंग्लंडच्या सरकारचें हिंदुस्थान सरकार हें बंदें गुलाम ! त्यामुळें त्याच्याकडून त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तें काम करून घ्यावें असा खराखुरा प्रकार होता. अर्थात् लॉर्ड लिटन ह्यांनीं विलायतेंतील सरकारच्या हुकुमामुळें सदहू ७½ टक्के जकात उठविली ! असें करणें हें हिंदुस्थानच्या दृष्टीनें केवळ अन्यायाचें होतें असें प्रत्येक अधिकारी व समंजस मनुष्यानें बजावून सांगितलें होतें. लॉर्ड नॉर्थब्रुक हे लॉर्ड लिटनच्या पूर्वीचे इकडचे व्हाइसरॉय होते. त्यांनीं हिंदुस्थानांतून विलायतेस जाण्यापूर्वीं इकडील कायदेकौन्सिलांतच जाहीर

रीतीनें सांगितलें होतें कीं, हिंदुस्थानच्या खऱ्या हिताचा विचार करणारा कोणीही जबाबदार अधिकारी ही आयात मालावरील जकात उठविणार नाहीं ! तरी देखील लॉर्ड लिटन यांनीं ती उठविली ! त्यामुळें इकडील लोकांत मोठी चळवळ सुरू झाली. अशा आणीबाणीच्या वेळीं काशीनाथ तेलंग यांनीं सन १८७७ मध्यें " खुला व्यापार व संरक्षण " ( Free Trade and Protection from an Indian Point of View ) या विषयावर एक अत्यंत उपयुक्त व मुद्देसूद असा निबंध लिहून तो " ससून मेकॅनिक्स इन्स्टिटयूट " या संस्थेपुढें वाचला.

तेलंगांनीं आपल्या निबंधांत मिल्ल, केर्न्स व क्लिफ लेस्ली यांच्या आधारावर प्रथम असें सांगितलें कीं, अर्थशास्त्राचे सिद्धांत हे रसायनशास्त्र किंवा पदार्थविज्ञानशास्त्र यांच्या सिद्धांतांप्रमाणें सार्वत्रिक स्वरूपाचे नसतात. त्यांत देश, काल किंवा इतर कारणें यांच्या योगानें फरक होत असतो. जे ( अर्थशास्त्रीय ) सिद्धांत एका देशास लागू पडतील तेच इतर देशाला त्याच वेळीं लागू पडतील असें नाहीं. पण हा सामान्य दृष्टीनें विचार झाला.

पुढें तेलंगांनीं संरक्षण जकातीला जे सामान्यतः आक्षेप घेण्यांत येतात त्यासंबंधानें विचार केला आहे. तेलंगांचें विवेचन बरेंच विस्तृत आहे. आम्हीं इकडे फक्त त्यांतील कांहीं महत्वाच्या मुद्यांचें विवरण करतों. असो. जकात ठेवल्यानें कापशी माल महाग होईल, हा त्यावेळीं पहिला आक्षेप होता.

आयात मालावर जकात बसविल्यास बाजारांत तो माल महाग विकेल व गिऱ्हाइकांचा तोटा होईल; आणि ती जकात उठविल्यास तो माल स्वस्त विकेल व गिऱ्हाइकांचा फायदा होईल, ह्या गोष्टी खऱ्या आहेत.

व विशेषेंकरून ज्या देशांत त्या प्रकारचा माल उत्पन्न होण्याचा संभव नाहीं त्या देशांत त्या आक्षेपास महत्वही आहे. पण तो आक्षेप हिंदुस्थानच्या बाबतींत लागू नाहीं. हिंदुस्थानांत कापसाचें कापड तयार होतें. कच्चा माल इकडे मुबलक आहे. मजुरी इकडे इंग्लंडपेक्षां कमी पडते. कोळसाही फार लांब नाहीं. भांडवल घातलें आणि धंद्यास एकदां चांगली सुरवात केली कीं, थोड्याच दिवसांनीं कापड तयार होईल व माल बाजारांत स्वस्त विकेल. पण तेलंग इतक्याच केवळ तात्विक कोटिक्रमावर थांबले नाहींत. त्यांनीं एका लेखकाच्या आधारानें फ्रान्स आणि अमेरिका या दोन देशांत आलेल्या अनुभवावरून सांगितलें कीं, त्या देशांत संरक्षक जकात बसविल्यानें जरी माल प्रथम थोडे दिवस महाग विकला, तरी मग कांहीं दिवसांनीं देशांत माल तयार होतांच मालाचा भरपूर पुरवठा झाला व त्याची किंमत उतरली ! इतकेंच नव्हे तर पुढें देशांतील मागणीला पुरून उरलेला माल बाहेरदेशीं जाऊं लागला ! असाच प्रकार हिंदुस्थानाच्या बाबतींत होईल !

दुसरा आक्षेप असा होता कीं, आयात मालावर जकात बसविल्यानें, संरक्षित मालाच्या व्यापाऱ्यांस आपला धंदा सुरक्षित आहे असें वाटून त्यांचें भांडवल त्याच धंद्यांत पडून राहातें. म्हणजे कमी किफायतशीर धंद्यांत, तें पडून राहून अधिक फायदेशीर धंद्याकडे वळत नाहीं. तेलंगांनीं सांगितलें कीं, हा आक्षेप दुसऱ्या कोणत्याही देशास कदाचित् लागू असला तरी तो हिंदुस्थान देशाच्या परिस्थितीस मुळींच लागू नाहीं. इकडे उलटा प्रकार मात्र घडून आला होता. म्हणजे जें भांडवल पूर्वी पेटींत पडून राहिलें होतें, त्याला हल्लीं अधिक किफायतशीर मार्ग मिळून तें ( भांडवल ) मुंबईतील गिरण्या उभारण्यांत उपयोगी पडलें आहे ! इतकेंच नाहीं तर, कांहीं संस्थानिकांच्या तिजोऱ्यांतही रिकामें पडलेलें

आंडवल आतां बाहेर येऊन तें मुंबईंतील कांहीं गिरण्यांचें पोषण करीत आहे ! तेलंगांनीं स्पष्ट विचारलें कीं, हा सर्व प्रकार बरा कीं वाईट ?

खुल्या व्यापाराच्या पुरस्कर्त्यांचा तिसरा आक्षेप असा होता कीं, संरक्षक जकात बसविल्यास देशांतील व्यापार मंदावतो; म्हणजे कापशी मालावर ती आयात जकात चालू ठेविल्यास इकडचा व्यापार बसेल ! पण हिंदुस्थानच्या बाबतींत हा आक्षेप निराधार होता हें तेलंगांनीं सिद्ध करून दाखविलें. त्यांनीं सन १८५७–६० व १८६८–७१ सालांतले सरकारी आंकडे घेऊन—त्या सालांत आयात जकात चालू होती—सिद्ध केलें कीं, त्या मुदतींत मुंबईचा आयात व निर्गत व्यापार बसला तर नाहींच, पण उलट तो वाढला !

खुल्या व्यापाराच्या पुरस्कर्त्यांचें असें म्हणणें होतें कीं, हिंदुस्थानांत शेतकीचा धंदा उत्तम चालतो. तेव्हां तुम्ही कापूस पिकवा आणि तो इंग्लंडला पाठवून द्या. आम्ही त्याचें कापड तयार करून तुम्हांस पुरवूं. पण हें म्हणणें एकदेशीय व आप्पलपोटेपणाचें होतें. हिंदुस्थानांत शेतकी चांगली चालते खरी, पण ती शेतकऱ्यास फारतर चार सहामहिने गुंतवून ठेवते. बाकीच्या दिवसांत त्यांना उद्योग नसतो. त्या दिवसांत पूर्वीं ते हातमागावर कापड विणण्याचें काम करीत असत. म्हणजे कामकरी लोक वर्षभर उद्योगांत असत व सुखी असत. वरील कोटिक्रमानें आमचा शेतकरी वर्ग फारतर वर्षाचे सहा महिने गुंतून राहील. पण इंग्लंडनेंच या देशांत कापड पुरविल्यास शेतकरी वर्गाचें बाकीच्या दिवसांत काय करावें ? पण ही बाजू खुल्या व्यापाराच्या पुरस्कर्त्यांनीं पाहिली होती कोठें ? त्यांनीं फक्त इंग्लंडच्या फायद्याकडे पाहिलें होतें. दुसरें असें कीं, कोणतेंही राष्ट्र केवळ शेतकी करून ऊर्जित दशेस येत नाहीं. त्यानें दुसऱ्या धंद्यांकडे लक्ष वळविलेंच पाहिजे.

त्या वेळीं—१८७७–७८ च्या सुमारास—मुंबईच्या गिरण्या सुरू झाल्या होत्या. म्हणजे त्या बाल्यावस्थेंतच होत्या. अशा वेळीं आयात जकातीच्या रूपानें त्या धंद्याला मदत करणें हिंदुस्थानसरकारचें काम होतें हें तेलंगांनीं मिल्लुच्याच आधारानें दाखविलें. फार काय, पण खुद्द इंग्लंडचीच व्यापाराच्या दृष्टीनें झालेली भरभराट ही मूळ संरक्षण-पद्धतीनेंच झाली होती हें तेलंगांनीं ग्लॅडस्टनच्या एका भाषणाचाच दाखला देऊन सिद्ध केलें ! शिवाय सतराव्या शतकांत इंग्लिश पार्लमेंटनें पास केलेल्या ( Navigation Laws ) नौकानयनासंबंधीं कायद्यांकडे दुर्लक्ष कसें करतां येईल ? ते कायदे मुद्दाम डच लोकांचा धंदा बसवून इंग्लंडांत गलबतें बांधण्याचा धंदा उभारण्याकरितां करण्यांत आले होते. त्यावेळपर्यंत समुद्रावर हॉलंडचेंच वर्चस्व होतें. इंग्लंडचा नंबर पुष्कळ खालीं होता ! पण इंग्लिश सरकारानें सतराव्या शतकांत सदहू कायदे पास करून आपल्या देशांतील गलबतें बांधण्याच्या धंद्यास—डच गलबतांस इंग्लिश बंदरांत मज्जाव करून—उत्तेजन दिलें, व पुढें दोनशें वर्षांत तो धंदा उत्तम भरभराटींत आल्यावर—किंबहुना इंग्लंडचें समुद्रावर वर्चस्व पक्कें झाल्यावर—इंग्लिश पार्लमेंटनें ते कायदे रद्द केले ! असें इंग्लंडनें हिंदुस्थानांतील गिरण्यांच्या बाबतींत कां करूं नये असें तेलंगांनीं ( आपल्या निबंधाच्या द्वारें ) पर्यायानें हिंदुस्थान सरकारास व विलायतेंतील सरकारास विचारलें !

हिंदुस्थानांतील गिरण्यांचें इंग्लंडच्या सरकारनें संरक्षण कां करूं दिलें पाहिजे याचें वरील पेक्षांही एक बलवत्तर कारण होतें. त्याचा तेलंगांनीं त्याच सुमारास इंग्लंडमध्यें या विषयावर झालेल्या वादविवादाच्या वेळीं मिस्टर इलियट व मिस्टर डिकिन्सन यांनीं पुढें आणलेल्या गोष्टींच्या आधारावर जोर देऊन असें सांगितलें कीं, इंग्लंडनें कांहीं बाबतींत

अत्यंत निर्घृणपणें वागून हिंदुस्थानचा व्यापार ठार बुडविला होता. त्याचें न्यायदृष्टीनें परिमार्जन करण्याकरितां तरी हिंदुस्थानच्या गिरण्यांचें इकडील सरकाराला आयात जकातीच्या रूपानें संरक्षण करूं द्यावें !

तेलंगांनीं अखेर समारोपाच्या रूपानें असें सांगितलें कीं, संरक्षण-पद्धतीनें इतर देशांत जे तोटे होतील ते हिंदुस्थानांत होणार नाहींत. त्या पद्धतीचा स्वीकार केल्यापासून इतरत्र जे फायदे होतील ते हिंदुस्थानच्या बाबतींतही होतील. सबब कोणत्याही दृष्टीनें—अर्थशास्त्राच्या किंवा त्याही-पेक्षां उच्चतर म्हणजे न्यायाच्या दृष्टीनें—पाहिलें तरी हिंदुस्थानांत संरक्षण-पद्धत सुरू करून त्याचा अनुभव घ्यावा हेंच उचित होय.

तेलंगांचा हा निबंध फार विस्तृत आहे. त्यांतून फक्त आम्हीं कांहीं मुद्यांचाच इकडे विचार केला आहे. पण तेवढ्यावरून देखील तेलंगांच्या बिनतोड कोटिक्रमाविषयीं कोणाचीही खात्री होईल. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत ॲडॅम स्मिथ, रिकार्डो वगैरे इंग्रजी पंडितांचें असें शास्त्र ठरूनच गेलें होतें कीं, हिंदुस्थान देशानें फक्त शेतकऱ्यांचें राष्ट्र बनून इंग्लंडला कच्चा माल पुरवावा आणि इंग्लंडनें त्याचा पक्का माल तयार करून पाठ-विलेला या देशानें विकत घ्यावा ! मधला सर्व फायदा इंग्लंडच्या खिशांत हें उघडच झालें ! हिंदुस्थानच्या बाबतींत तरी निदान हा सर्व उलटा न्याय होता. ज्या हिंदुस्थान देशांत तयार झालेला कापशी, रेशमी माल कैक वर्षें—किंबहुना कैक शतकें—इंग्लंडांत खपत असे, त्याच देशाला अर्थ-शास्त्राचें एकदेशीय प्रतिपादन करून शेतकऱ्यांचें राष्ट्र बनवून त्याचे-कडून कच्चा माल घ्यावयाचा व त्यालाच आपलें कायमचें गिऱ्हाइक करून आपल्या देशांतील—इंग्लंडांतील धंद्यांची वाढ करावयाची या प्रका-राला उलटा न्याय म्हणूं नये तर काय ? पण आनंदाची किंबहुना आम्हां

महाराष्ट्रीयांना अभिमानाची—गोष्ट ही कीं, सदर्हू ॲडॅम स्मिथ वगैरे पंडितांच्या आपमतलबी विचारसरणींतील एकदेशीयता उघडकीस आणून काशीनाथपंत तेलंगांनीं ( व मग रानड्यांनीं ) आमच्या देशांत अर्थशास्त्रीय दृष्टीनें मोठी क्रांति घडवून आणली ! म्हणूनच सर दिनशा वाच्छांसारख्या अर्थशास्त्रज्ञ पंडितानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, असल्या गुंतागुंतीच्या विषयावर प्रस्तुत तेलंगांच्या निबंधाइतका मुद्देसूद, जोरदार व निःसंदिग्ध निबंध हिंदुस्थान देशाच्या कोणत्याही भागांत गेल्या सुमारें पन्नास वर्षांत कोणीही विद्वान् मनुष्यानें लिहिलेला आपणांस माहीत नाहीं.

अखेर विलायतेंतील कापशी मालावरील आयात जकात हिंदुस्थानसरकारनें उठविलीच ! त्याबद्दल निषेध व्यक्त करण्याकरितां सन १८७९ च्या मे मध्यें मुंबईस सर्व नागरिकांची जाहीर सभा भरली होती. अध्यक्ष सर मंगलदास नथूभाई हे होते. निषेध व्यक्त करण्याकरितां तयार केलेला अर्ज फेरोजशहा मेथा यांनीं सभेंत वाचून दाखविला. तो मंजूर करण्याबद्दलची सूचना तेलंगांनीं सभेपुढें ठेविली व तिच्या समर्थनार्थ त्यांनीं एक भाषण केलें. त्यांत त्यांनीं फक्त दोन तीनच मुद्यांविषयीं विवेचन केलें. तेलंगांनीं त्यावेळीं स्पष्ट सांगितलें कीं, आपण आयात जकातीचा संरक्षणपद्धतीच्या दृष्टीनें मुळींच विचार करीत नाहीं. आपण फक्त ती एक जमाबंदीची बाब या दृष्टीनेंच पाहात आहों. त्या दृष्टीनें पाहिल्यास आयात जकात जरूर चालू ठेवावी असें त्यांनीं सांगितलें. दुसरें असें कीं, सेक्रेटरी ऑफ स्टेट व व्हाइसरॉय यांनीं अमक्या परिस्थितींत ती जकात उठविणार नाहीं असें इंग्लंडांत जाहीर केलें होतें. पण त्या वचनांचा भंग करूनही अखेर ती जकात उठविण्यांत आली ! सदर्हू बड्या अधिकाऱ्यांनीं म्हटलें होतें कीं, ही जकात उठविल्यानें जर दुसरा एकादा जादा कर बसवावा लागत असेल तर आपण ती उठविणार नाहीं. पण तें वचन त्यांनीं पाळलें

नाहीं. कारण लायसन्स टॅक्स हा नवीन कर बसविण्यांत आलाच होता. मिठावरील जकात वाढविण्यांत आलीच होती, व स्टांपाच्या जकातीचे दर वाढविण्यांत आले होते. इतके नवीन कर बसविण्यांत येऊनही अखेर आयात जकात उठविण्यांत आली, त्याअर्थी सरकाराकडून उघड उघड वचनभंग झाला होता असें तेलंगांनीं स्पष्ट सांगितलें.

तेलंगांनीं दुसरा एक महत्वाचा मुद्दा काढला होता. ही आयात जकात लॉर्ड लिटन साहेबांनीं आपल्या कौन्सिलमधील बहुमत धाब्या-वर बसवून उठविली होती ! ह्या गोष्टीचा व त्याच सुमारास खुद्द सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं देखील एका प्रकरणांत तसेंच वर्तन केल्याचा उल्लेख करून तेलंगांनीं म्हटलें कीं आतां कौन्सिलच्या सल्ल्यानें चाल-वावयाची राज्यपद्धत मागें पडून एकसत्तात्मक पद्धत सुरू झाल्याचें स्पष्ट दिसत होतें ! हें चिन्ह बरें नव्हतें.

काशीनाथपंतांनीं आणखी एका मुद्याचा उल्लेख केला. ही आयात जकात उठविण्याच्या बाबतींत कलकत्त्यास तेथील नागरिकांचें एक डेप्युटेशन लॉर्ड लिटन यांच्या भेटीकरितां गेलें होतें. त्या वेळीं लाट साहेबांनीं त्या डेप्युटेशनमधील मंडळींना उत्तर देतांना अत्यंत उपमर्द-कारक भाषा वापरली होती. याबद्दल आमच्या वंगदेशीय बंधूंशीं मुंबईच्या सर्व नागरिकांची तेलंगांनीं सहानुभूति व्यक्त करून असें स्पष्ट रीतीनें सांगितलें कीं, महाराणी साहेबांच्या प्रजाजनांना असें उपमर्द-कारक उत्तर ब्रिटिश राज्य सुरू झाल्यापासून कोणत्याच व्हाइसरॉय साहेबांनीं दिलें नव्हतें !

लॉर्ड लिटन यांची कारकीर्द हरएक दृष्टीनें हिंदुस्थानच्या लोकांस जाचक झाली होती. इतकेंच नव्हे, तर चालू असलेले कायदे किंवा

दिलेलीं वचनें यांजकडे केवळ दुर्लक्ष केलें जाऊन " हम करे सो कायदा " हेंच सरकारचें धोरण होऊं पहात होतें, असें उघडच दिसत होतें. याचीं कांहीं उदाहरणें मागें आलींच आहेत. यासंबंधानें तेलंगांनीं पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत ( आक्टोबर १८७९ ) "कायद्याचें राज्य" या मथळ्याखालीं एक अत्यंत उपयुक्त लेख लिहून विवरण केलें होतें. त्याचें तात्पर्य एवढेंच कीं, इंग्लिश राज्य म्हणजे कायद्याचें राज्य अशी लोकांची समजूत होती, ती खोटी ठरून तिच्या जागीं एकाच अधिकाऱ्याच्या लहरीप्रमाणें चालविलें जाणारें राज्य असें म्हणण्याची त्या वेळीं पाळी आली होती ! याच्या समर्थनार्थ तेलंगांनीं सुमारें सन १८६७ सालापासून झालेल्या एकतंत्री कायद्यांचा व नियमांचा उल्लेख करून सारांशरूपानें असें सांगितलें कीं, हिंदुस्थानच्या लोकांस एकतंत्रीच राज्य आवडतें अशी जी कित्येक बड्या लोकांची समजूत झालेली दिसत होती ती बरोबर नव्हती. दुसरें असें कीं, ब्रिटिश राज्य म्हणजे कायद्याचें राज्य असें जें कित्येक बडे अधिकारी अहंकारयुक्त वाणीनें सांगत असत तें निराधार असून तें कायद्याचें राज्य लॉर्ड लिटन यांच्या कारकीर्दीच्या वेळीं विस्तृत होण्याच्या ऐवजीं संपुष्टांत येण्याचींच चिन्हें स्पष्ट दिसत होतीं ! म्हणून एकंदरींत ही प्रवृत्ति पिछेहाटीची व खोडसाळपणाची दर्शक असून ती आजपर्यंत माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन व इतर थोर मुत्सद्दी या लोकांनीं जीं राज्यधोरणाचीं उच्च तत्वें घालून दिलीं होतीं त्यांच्या अगदीं विरुद्ध होती.

सन १८८० सालीं इंग्लंडचें प्रधानमंडळ बदललें, व लिबरल पक्ष अधिकारारूढ होऊन ग्लॅडस्टन साहेब हे मुख्य प्रधान झाले. त्याबरोबर इकडे लॉर्ड लिटन यांनीं राजीनामा देऊन ते विलायतेस निघून गेले व त्यांच्या जागीं लॉर्ड रिपन साहेब आले. लॉर्ड रिपन यांची सुमारें साडेचार

वर्षांची कारकीर्द एकंदरींत हिंदुस्थानच्या लोकांस अत्यंत सुखावह होऊन त्यांच्या ठिकाणीं राजकीय आकांक्षा उद्भूत होऊं लागल्या! रिपन साहेबांच्या कारकीर्दींत न्यायदृष्टीनें जे लोकांना हितकारक असे अनेक कायदे झाले त्यांपैकींच " इल्बर्ट बिल " हा एक होता. या बिलाचा उद्देश राणीच्या जाहीरनाम्यांत वचन दिल्याप्रमाणें युरोपीयन आणि नेटिव्ह यांना कायद्याच्या दृष्टीनें समान हक्क होते हेंच दाखविण्याचा होता. तें बिल जसेंचें तसें पास झालें नाहीं ही गोष्ट खरी, पण त्यांतील मुख्य तत्व—युरोपीयन आरोपीची नेटिव्ह मॅजिस्ट्रेटपुढें चौकशी होण्यास हरकत नाहीं हें—कबूल करण्यांत आल, हेंच विशेष होतें. असो. पण त्या " इल्बर्ट बिला"मुळें इकडील युरोपीयन लोकांनीं फार मोठी चळवळ केली. ती इतकी कीं, तशी जंगी चळवळ या देशांत पूर्वीं कधींच झाली नव्हती! त्या वेळीं कांहीं कांहीं प्रांतांतील युरोपीयन लोकांचीं डोकीं देखील ठिकाणावर नव्हतीं व त्यांनीं सुशिक्षित लोकांविरुद्ध वाटेल तसें बरळणें चालविलें होतें. अशा वेळीं, युरोपीयन लोकांच्या वर्तणुकीचा निषेध करण्याकरितां व हिंदुस्थान सरकारच्या कृतीचें समर्थन करण्याकरितां देशभर ठिकठिकाणीं लोकांच्या सभा झाल्या. तशी मुंबईस एक नागरिकांची सभा सन १८८३ च्या एप्रिलमध्यें टाऊनहॉलमध्यें झाली. अध्यक्षस्थानीं सर जमशेटजी जीजीभाई हे होते. त्या वेळीं जीं तिकडे भाषणें झालीं त्यांत एक तेलंगांचें झालें. तेलंगांचें हें भाषण त्यांच्या उत्तम भाषणांपैकीं एक असें सामान्यतः मानलेलें असल्यामुळें त्याचा इकडे विस्तार न करतां त्याचा पुढील एकाद्या प्रकरणांत सारांश देऊं.

लॉर्ड रिपन यांची कारकीर्द ही एकंदरींत सुखकारक झाली, पण त्याचें महत्व एवढ्याचकरितां कीं, त्या कारकीर्दींत घडलेल्या गोष्टींच्या योगानें आमचे लोक जागे झाले व सुसंघटित रीतीनें आपली राजकीय

चळवळ चालविण्याच्या उद्योगास लागले. देशहिताच्या दृष्टीनें हा अत्यंत महत्वाचा परिणाम होता, व त्यामुळें लॉर्ड रिपन साहेबांविषयीं देशभर सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांमध्यें अत्यंत आदर व उत्साह उत्पन्न झालेला स्पष्ट दिसत होता. तो उत्साह व्यक्त करण्याची लोकांना मग लवकरच संधि मिळाली. सन १८८४ च्या अखेरीस लॉर्ड रिपन यांची मुदत संपून ते इंग्लंडला जावयास निघाले तेव्हां देशांत ठिकठिकाणीं लोकांनीं सभा भरवून त्यांजविषयीं आदर व्यक्त केला. तशी एक मुंबईच्या नागरिकांची सभा सन १८८४ च्या नोवेंबरमध्यें टाऊनहॉलमध्यें भरविण्यांत आली होती. त्या वेळीं भाषण करणाऱ्यांमध्यें दादाभाई, मंडलिक, मेथा, बद्रुद्दीन, तेलंग वगैरे मंडळी होती. तेलंगांनीं आपल्या भाषणांत लॉर्ड रिपन साहेबांच्या कारकीर्दींत ज्या ज्या महत्वाच्या गोष्टी घडल्या त्यांचा थोडक्यांत उल्लेख करून रिपन साहेबांविषयीं लोकांच्या मनांत इतका आदर व कृतज्ञता कां वाटते हें विशद करून सांगितलें. रिपन साहेबांच्या कारकीर्दीचें महत्व त्यांनीं पास केलेल्या कांहीं हितकर कायद्यांत अगर त्यांनीं सुरू केलेल्या नुसत्या स्थानिक स्वराज्यांत नसून तें त्यांच्या उदार धोरणांत व त्या योगानें लोकांच्या ठिकाणीं उत्पन्न केलेल्या राष्ट्रीय आकांक्षांत होतें. त्यामुळें लॉर्ड रिपन यांनीं हिंदुस्थानांत ब्रिटिशसाम्राज्याचा पाया मजबूत केला, इतकेंच नसून त्यांनीं त्यायोगानें खुद्द इंग्लंडच्या लोकांचें देखील चिरंतनचें कल्याण केलें आहे. हे विचार तेलंगांनीं ( Poet Laureate ) राष्ट्रकवीच्या कवितेंतलाच एक उतारा देऊन सुंदर रीतीनें व्यक्त केल्यामुळें त्यांच्या त्या भाषणाचा अखेरचा भाग फारच बहारीचा झाला होता.

प्रकरण अकरावें.

## राष्ट्रीय सभेची स्थापना व नंतर.

लॉर्ड रिपन साहेबांची कारकीर्द ही आधुनिक कालांतल्या हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक क्रांतिकारक गोष्ट होती. किंबहुना तो आधुनिक कालांतील शकारंभ—Epoch-making event—होता असें म्हणण्यासही हरकत नाहीं. त्या कारकीर्दींत इल्बर्ट बिलाच्या निमित्तानें युरोपीयन लोकांनीं जी जंगी व अश्रुतपूर्व चळवळ केली तिच्या योगानें—प्रत्यक्ष असें लोकांच्या पदरांत मोठेंसें फळ पडलें नसलें तरी—लोक खडबडून जागे झाले, त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीय आकांक्षा उत्पन्न झाल्या व लॉर्ड रिपन साहेबांच्या सहानुभूतिकारक राज्यकारभाराच्या योगानें त्या आकांक्षा उद्दीपित झाल्या यांत मात्र शंका नाहीं. सुदैवेंकरून त्या वेळीं मुंबई शहरांत काशीनाथपंत तेलंग, फेरोजशहा मेथा व बद्रुद्दिन तय्यबजी यांच्यासारखे विद्वान्, कुशल व धैर्यवान् लोकनायक लाभल्यामुळें राजकीय चळवळीला भारदस्तपणा आला होता व त्या चळवळीचा सरकारावर परिणाम होत असे.

अशा उत्साहपूर्ण काळांत राजकीय चळवळ अधिक जोमानें व सतत चालू ठेवण्याकरितां एक व्यवस्थित रीतीनें चालविलेली व पायाशुद्ध अशी मुंबईत एक नवीन संस्था पाहिजे होती. ती सन १८८५ च्या सुरवातीसच स्थापन करण्यांत येऊन तिचें "बॉंबे प्रेसिडेन्सी असोशियेशन" असें नांव ठेवण्यांत आलें. तिचे मूळ उत्पादक तेलंग व मेथा हे दोघे असून त्यांच्याच विनंतीवरून बद्रुद्दीन हे नंतर त्यांना येऊन मिळाले. या नवीन संस्थेचे सर दिनशा पेटिट हे अध्यक्ष असून मेथा, तेलंग व वाच्छा हे सेक्रेटरी होते, व बद्रुद्दीन तय्यबजी हे कौन्सिलचे अध्यक्ष होते.

या संस्थेनें जें बहुतेक पहिलें काम हातीं घेतलें तें इंग्लंडास त्याच सालीं एक इकडचें डेप्युटेशन पाठविणें होय. सन १८८५ सालीं इंग्लंडांत पार्लमेंटची निवडणूक व्हावयाची होती. त्या वेळीं इकडून एकादें डेप्युटेशन पाठवून इंग्लंडांतील लोकांस इकडची माहिती करून देण्याचा प्रयत्न केल्यास लोकमतावर त्याचा परिणाम होऊन या देशाचें हित होण्याचा बराच संभव होता. त्या कामांत तेलंगांनींच पुढाकार घेतला होता, व त्या योजनेप्रमाणें मुंबईहून मिस्टर ना. ग. चंदावरकर, कलकत्त्याहून मिस्टर मनमोहन घोस व मद्रासेहून मिस्टर रामस्वामी मुदलीयार यांचें एक डेप्युटेशन इंग्लंडांत गेलें. या मंडळींनीं त्या देशांत जाऊन तिकडील कांहीं मित्रांच्या सहाय्यानें निरनिराळ्या ठिकाणीं जाहीर सभा भरविल्या व भाषणद्वारा तिकडील लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. म्हणजे या आमच्या लोकांनीं इंग्लंडांत जाऊन त्या वेळीं या देशाच्या दृष्टीनें उत्तम काम केलें. मिस्टर चंदावरकरांनीं एका भाषणांत इंग्लिश लोकांस स्पष्ट सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील इंग्लिश जज्ज हे " नेटिव्ह–नेटिव्ह " यांजमध्यें जरी उत्तम रीतीनें न्याय करीत असले तरी युरोपीयन आणि हिंदी यांजमध्यें न्याय करण्याचा प्रसंग आला म्हणजे मात्र त्या जज्जाच्या मनाचा कल बहुधा युरोपीयनाच्या बाजूस होतो व आमच्या लोकांच्या बाबतींत अन्याय होतो ! सबब ही वस्तुस्थिति बदलली पाहिजे. दुसऱ्या एका भाषणांत चंदावरकरांनीं लष्करी खर्च कसा भराभर वाढत आहे हें सांगून तो कसा कमी करतां येईल हेंही दाखविलें. खर्चांत बचत करण्याचा मुख्य उपाय म्हणजे मोठमोठ्या पगारांच्या सरकारी खात्यांतील जागांवर युरोपीयन लोकांना न नेमतां पगाराचें प्रमाण जरा कमी करून हिंदी लोकांना नेमणें हाच होय. पण या सगळ्याला रामबाण औषध म्हणजे हें कीं, पार्लमेंटच्या सभासदांनीं जॉन

ब्राइट व हेनरी फॉसेट या उदारधी गृहस्थांचें अंशतः तरी अनुकरण करून हिंदुस्थानच्या राज्यकारभाराकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे.

तिसऱ्या एका भाषणांत चंदावरकरांनीं इंग्लिश लोकांस बजावून सांगितलें कीं, त्यांनीं हिंदुस्थान देशास सन १८५३, सन १८५८, सन १८६१, व सन १८७७ या सालांमध्यें दिलेलीं अभिवचनें अद्यापि पुरीं करण्यांत आलीं नाहींत ! एकतंत्री सत्ता चालविण्याचे प्रयोग पुष्कळ ठिकाणीं करण्यांत आलेले आहेत. पण ते त्या त्या ठिकाणीं फसलेले आहेत. अर्थात् राजा व प्रजा, शास्ते व शासित यांजमध्यें आपण सर्व एकच आहोंत, अशी भावना उत्पन्न होईल.याप्रकारची हिंदुस्थानांत राज्यपद्धत सुरू केल्याशिवाय तो देश व इंग्लंड यांमध्यें परमेश्वरकृपेनें जडलेला संबंध दृढ होण्याचा संभव नाहीं !

याप्रमाणें सदहू डेप्युटेशनमधील लोकांनीं इंग्लंडमध्यें यशस्वी रीतीनें आपलें काम करून इकडे ते परत आल्यावर मुंबईंत त्यांचें थाटाचें स्वागत करण्यांत आलें, तें ठीकच होतें. त्या वेळीं काशीनाथपंत तेलंग यांनीं निष्कर्षरूपानें जें भाषण केलें तें अनेक दृष्टींनीं महत्वाचें होतें. ते म्हणाले कीं, या डेप्युटेशनच्या योजनेपासून पहिली गोष्ट स्पष्ट रीतीनें दिसून आली ती ही कीं, तिन्ही इलाख्यांतील लोकांमध्यें बंधुभावना उत्पन्न झालेली असून ते सर्व त्या धोरणानें वागत आहेत. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, कांहीं विघ्नसंतोषी लोकांनीं कितीही खटपट केली तरी त्यांचें जनतेवर मुळींच वजन पडलें नसून, त्यांना सुशिक्षित लोकांत फूट पाडण्याच्या कामीं यश आलेलें नाहीं. तिसरी महत्वाची गोष्ट ही कीं, इंग्लिश लोकांना इकडील प्रजाजनांविषयींची खरीखुरी आणि निश्चित प्रकारची माहिती प्रथमच त्यांच्या प्रतिनिधींकडून ऐकावयास मिळाली.

चवथी गोष्ट, विलायतेंतील मजूर पक्षास हिंदुस्थानाविषयीं पूर्ण सहानुभूति वाटत असून या देशाचें कांहीं तरी हित आपल्या हातून व्हावें अशी त्या पक्षाची इच्छा आहे. पांचवी गोष्ट, "हिंदुस्थान देश हा आम्ही तरवारीच्या जोरावर जिंकला आहे व आम्ही तो त्याच रीतीनें राखणार आहों" हें जें कित्येक बड्या लोकांचें पालुपद होतें त्यांचें तें आसुरी तत्व इंग्लिश जनतेस मुळींच मान्य नाहीं. आणि सहावी गोष्ट ही कीं, डेप्युटेशनची कल्पना ज्यांना प्रथम मान्य नव्हती त्यांना देखील आतां कळून चुकलें कीं, यापुढें हिंदुस्थानच्या लोकांना केवळ लहान मुलां-प्रमाणें वागवून चालावयाचें नाहीं ! ह्या गोष्टी आतां स्पष्ट झाल्या आहेत, आणि त्या उघड्या डोळ्यांनीं पाहणाऱ्या कोणत्याही मनुष्यास सहज दिसण्यासारख्या आहेत !

त्याच सालीं (१८८५) इंग्लंडांतील निवडणुकीच्या वेळीं इंग्लिश जनतेंत सरसहा वांटण्याकरितां म्हणून इकडून कांहीं जबाबदार पुढाऱ्यां-कडून तयार झालेलीं अशीं बारा हस्तपत्रकें (leaflets) पाठविण्यांत आलीं होतीं. त्यांपैकीं तीन पत्रकें तेलंगांनीं लिहिलीं होतीं. सर जेम्स फर्ग्यूसन हे मुंबईचे (१८८१ ते १८८५) गव्हर्नर होते. त्यांनीं विलायतेंत परत गेल्यावर केलेल्या एका भाषणांत (India is not heavily taxed) "हिंदुस्थानांतील लोकांना सरकार देणें फार नसतें" असें विधान केलें होतें. तेलंगांनीं वरीलपैकीं पत्रक नं. २ मध्यें इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन देशांतील लोकांच्या उत्पन्नाचे आणि कर देण्यासंबंधाचे सरकारी आंकडे देऊन वरील फर्ग्युसन साहे-बांचें विधान कसें निराधार व चुकीचें होतें हें स्पष्ट रीतीनें दाखविलें होतें. इंग्लंडची त्या वेळची लोकसंख्या तीन कोटी साठ लक्ष होती व तिचें वार्षिक उत्पन्न १ अब्ज वीस कोटि पौंड होतें म्हणजे दर माणशीं

शेंकडा ३३ पौंड उत्पन्न झालें. या उत्पन्नावर तिकडील सरकारी वसूल ८ कोटि ७२ लक्ष होता. म्हणजे वरील उत्पन्नावर सरकारी देण्याचें प्रमाण शेंकडा ७½ इतकें बसतें. तीच हिंदुस्थानची स्थिति पाहा. ब्रिटिश इंडियाची लोकसंख्या त्या वेळीं वीस कोटि होती. व तिचें वार्षिक उत्पन्न चाळीस कोटि पौंड होतें, म्हणजे दर माणशीं सालीना २ पौंड उत्पन्न झालें. यावरील सरकारी वसूल सात कोटि पौंड होता. म्हणजे सरासरी शेंकडा १७ इतकें प्रमाण बसलें ! यावर तेलंगांनीं म्हटलें कीं, वार्षिक दोन पौंडांवर हिंदुस्थानचा रहिवाशी जीवंत तरी कसा राहूं शकतो याचा इंग्लिश लोकांनीं आधीं विचार करावा व मग असल्या दरिद्री उत्पन्नावर तो निष्कांचन हिंदी मनुष्य, सधन इंग्लिश मनुष्याच्या मानानें दुप्पटी-पेक्षांही अधिक सरकार देणें भरत असतांना हिंदुस्थानांत सरकार देणें भारी आहे कीं नाहीं हेंही पाहावें ! वर दिलेले सर्व आंकडे तेलंगांनीं आपल्यावेळीं म्हणजे सुमारें पंचेचाळीस वर्षांपूर्वीं प्रसिद्ध केलेल्या पत्रकावरून दिलेले आहेत. हल्लींचे दिलेले नाहींत. ते दिले असते तरी हिंदुस्थानाच्या एकंदर सांपत्तिक स्थितींत फारसा फरक पडलेला दिसेल असें वाटत नाहीं. असो.

हिंदुस्थानांतील लोक हे खाऊन पिऊन कसे राहतात व त्यांची सांपत्तिक स्थिति कशी आहे तें पाहा, त्यांचें दर माणशीं वार्षिक उत्पन्न सरकार तर्फे सर एवलिन बेअरिंग यांनींच अंदाज केलेलें असें रु. २७ आहे. खरें पाहिल्यास हें २० रुपये ( ३० शिलिंग ) पर्यंतही खालीं उतरेल असें मानण्यास जागा आहे. पण तें असो. त्याचप्रमाणें जमीन-धारा व मिठावरील कर हे गरीब लोकच भरतात. मिठाशिवाय शाकाहारी मनुष्य तर जीवंत राहूंच शकत नाहीं. अर्थात् त्या पदार्थाचें त्याला महत्व विशेष आहे. इकडील लोकांपैकीं बरेच लोक नुसतें जगण्याला

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

पुरेल इतकें अन्न खाऊन राहात असतात. सरकारचे आंकडेपंडित डॉ. हंटर ह्यांनीं लिहून ठेवलें आहे कीं, सुमारें चार कोटि लोक पुरेसें अन्न न मिळत असल्यामुळें अर्धपोटीं जेऊन राहात असतात. ह्या सर्व गोष्टींचा इंग्लिश लोकांनीं जरूर विचार करावा.

खरा प्रकार असा होता. हिंदुस्थानचा राज्यकारभार सरकारदेणें खाऊन बसणारेच लोक चालवीत असत. तें देणें देणारांचें म्हणणें कोणीच ऐकत नसे ! सर जेम्स फर्ग्युसन यांना इकडे गव्हर्नर असतांना दर साल १०,००० पौंड पगार व दुसरे ४,००० पौंड इतर खर्चा-करितां म्हणून बिनतक्रार मिळत असत. मग लोकांस सरकार देणें भारी पडतें असें त्यांना कां वाटावें ?

तेव्हां इंग्लिश लोकांनीं या सर्व गोष्टींचा जरूर व लक्षपूर्वक विचार करावा, असें एकंदरींत तेलंगांनीं पहिल्या पत्रकांत म्हटलें.

दुसरें पत्रक नं. ६ चें तेलंगांनीं लिहिलें होतें. त्याचा "Imperial stock-taking" ( हिंदी साम्राज्याचा आढावा ) असा मथळा होता. त्यांत महत्वाची गोष्ट ही होती कीं, हिंदुस्थानच्या जमाखर्चाची चौकशी करून आढावा काढून पाहण्याच्या प्रश्नासंबंधानें बर्क, फॉसेट, ब्राइट व बीकन्स्फील्ड इतक्या सर्व जबाबदार लोकांमध्यें एकवाक्यता होती. पण एकादी पार्लमेंटची कमिटी नेमून घेऊन हिंदुस्थानसरकारच्या जमा-खर्चाची चौकशी करण्याचें मात्र त्यांपैकीं कोणीच मनावर घेत नसे. फॉसेट साहेबांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यांत असे तें बरें होतें. निदान वीस वर्षांनीं तरी दुसरी सनद द्यावयाच्या वेळीं त्या कारभाराची चौकशी करण्यांत येत असे. पण कंपनीच्या हातून तो राज्यकारभार महाराणी सरकारच्या

ताब्यांत आल्या वेळेपासून तें नियंत्रण—चौकशीचें—निघून गेलें व त्याच्या ऐवजीं जीं दुसरीं बंधनें घालण्यांत आलीं त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्यामुळें हिंदुस्थान सरकारच्या खर्चाच्या बाबी वाढूं लागून एकंदर खर्च किती अवाढव्य वाढत चालला होता, हें तेलंगांनीं सरकारी आंकडे देऊनच सिद्ध केलें. लष्कर व इमारती वगैरेंचा खर्च वगळून हिंदुस्थान सरकारचा बाकीचा खर्च सन १८५६ सालीं १,४९,६४,८६७ पौंड होता, तो सन १८७१ मध्यें २,३२,७१,०८२ पौंड झाला; व सन १८७९ सालीं तो ३,३३,५२,८५२ पौंडांवर गेला ! म्हणजे पंचवीस वर्षांच्या आंत हिंदुस्थान सरकारचा खर्च दुप्पटीपेक्षां अधिक वाढला. तेलंगांनीं पुढें लष्करी खर्च व कर्ज वाढल्याचेंही आंकडे देऊन त्याही बाबींचा खर्च किती अवाढव्य वाढला होता हें स्पष्ट दाखवून म्हटलें कीं, ह्याबद्दलची चौकशी जरूर झाली पाहिजे. पण ही चौकशी विलायतेंतून झाली पाहिजे. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत ती समाधानकारक रीतीनें मुळींच होणार नाहीं, हें तेलंगांनीं जॉन ब्राइटचा आधार देऊनच सांगितलें. कारण इकडचे सर्व बडे अधिकारी गोरे होते, व त्यांना त्यांचे वशिले, पगार, बढत्या, पेनशनें ह्या सर्व गोष्टी हव्याच होत्या. त्यांत काटकसर ते कसे करतील ? याचें एक उदाहरणही तेलंगांनीं दिलें. सन १८७९ सालीं व्हाइसरॉय व सेक्रेटरी ऑफ स्टेट अशा दोघांनींही म्हटलें होतें कीं, सरकारी सर्व खात्यांत काटकसर करण्याची ताबडतोब व्यवस्था झाली पाहिजे. पण तशी व्यवस्था मग मुळींच झाली नाहीं ! कां ? ह्याचें जॉन ब्राइटनें बरोबर कारण दिलें होतें. इकडचे सगळेच बडे अधिकारी लोक असे होते कीं, त्यांनीं नुसते जमा झालेले पैसे खर्च करावे आणि चंगळ करावी ( Enjoyed ) ! त्यांपैकीं सरकार देणें कोणालाच भरावें लागत नसे ! तें देणें हिंदुस्थानचे लोक भरतच होते ! ! ! लॉर्ड बीक-

न्फील्ड यांनीं एकदां हिंदुस्थानांतील सर्व अँग्लो–इंडियन म्हणजे गोऱ्या अधिकाऱ्यांची योग्य स्तुति केली होती. पण त्यांनीं शेवटीं सांगितलें कीं, त्या अधिकाऱ्यांच्या ठिकाणीं एक मात्र दोष होता व तो जबाबदारीचा अभाव हा होय ! मग खर्च कसा वाढल्याशिवाय राहील ? या सर्व कारणांमुळें, तेलंगांनीं म्हटलें कीं, नवीन पार्लमेंट निवडून येईल तिनें या चौकशीचें काम जरूर हातांत घ्यावें.

तेलंगांनीं तिसऱ्या (नं. ८ च्या) पत्रकांत ( Manchester's interest in India ) मँचेस्टरच्या व्यापाराला हिंदुस्थानचें महत्व किती होतें हें त्याच्या व्यापारवाढीचे आंकडे देऊन दाखविलें व त्या परगण्यांतील पार्लमेंटच्या सभासदांनीं तरी हिंदुस्थानच्या राज्यकारभाराकडे विशेष लक्ष पुरवून इकडील लोकांच्या सुखसोयी वाढविण्याचे प्रयत्न करावेत, असें सांगितलें.

सन १८८५ मध्यें मुंबईत प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थ यांच्या सहानुभूतीनें एक कमिटी नेमण्यांत आली होती. तिचा उद्देश असा होता: त्या वेळीं कलकत्याचा एक युरोपीयन बातमीदार इंग्लंडमधील लंडन टाइम्स व इतर पत्रें यांना इकडील चळवळीसंबंधानें चुकीची बातमी देऊन इंग्लिश लोकांत गैरसमजुती उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत होता, असा अनुभव आला होता. तो प्रकार बंद करून हिंदुस्थानविषयक खरी माहिती इंग्लंडमधील जनतेला पुरविण्याच्या हेतूनें मुंबई इलाख्यापुरती सदरील कमिटी नेमण्यांत आली होती. तिचे दादाभाई नवरोजी, काशीनाथपंत तेलंग व बद्रुद्दीन तय्यबजी असे तिघे सभासद होते.

लॉर्ड रिपन साहेबांच्या स्फूर्तिदायक कारकीर्दीच्या योगानें थोड्या दिवसांनीं दुसरी एक महत्वाची जी संस्था जन्मास आली ती " राष्ट्रीय

सभा " होय. सन १८८३ सालांतील इल्बर्ट बिलासंबंधानें युरोपीयन लोकांनीं केलेल्या चळवळीनें हिंदुस्थानची राजकीय स्थिति काय होती हें सर्व लोकांच्या लक्षांत आलेंच होतें. तोंपर्यंत इंग्लिश शिक्षणाचा देशांत जरी बराच प्रसार झाला होता तरी बंगाली, गुजराती, मराठे, मद्रासी अशा सर्व प्रांतांतील लोकांत बंधुभावना उत्पन्न झालेली नव्हती. ती इल्बर्ट बिलाच्या चळवळीनें उत्पन्न केली. त्या चळवळीच्या निमित्तानें युरोपीयन लोकांनीं सरसहा सर्व हिंदी लोकांवर केलेला हल्ला परतविण्याकरितां सर्व प्रांतांतील लोक एक झाले व त्यांनीं एक जुटीनें तो हल्ला परतविला ! पण अशी सर्व प्रांतांतील लोकांची एक संस्था असणें जरूर आहे असें कित्येकांस वाटलें आणि मग साहाजिकच सर्व प्रांतांतील पुढाऱ्यांमध्यें त्यासंबंधानें विचारविनिमय सुरू झाला. या सर्व प्रकारांत मुख्य भाग प. वा. ह्यूम साहेबांचा होता हें येथें सांगितलें पाहिजे. या कामांत ह्यूम साहेबांनीं अगदीं प्रथम सुरवातीसच ज्यांचा सल्ला घेतला त्यांत काशीनाथपंत तेलंग होते, व त्यांच्याच सहाय्यानें मग ह्यूम साहेबांनीं आपली पुढील इमारत उभारण्याचा उद्योग आरंभिला. याप्रमाणें सन १८८५ च्या मार्चमध्येंच असें ठरलें कीं, त्या सालच्या नाताळांत हिंदुस्थानाच्या सर्व प्रांतांतील प्रतिनिधींची एके ठिकाणीं एक सभा भरवावी, व त्या कामाकरितां पुणें हें मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळें तिकडेच ती सभा भरविण्याचें ठरलें. इतकी तयारी होतांच ह्यूमसाहेबांनीं त्यावेळचे व्हाइसरॉय साहेब लॉर्ड डफरीन ह्यांची गांठ घेऊन त्यांच्यापुढें सर्व योजना ठेविली. डफरीन साहेबांस ती योजना पसंत पडली. त्यांनीं सांगितलें कीं, राज्यकारभारांत कांहीं चुका होत असल्या तर त्या दाखविण्याकरितां विलायतेंत जशी " Opposition " ( प्रतिपक्षी ) म्हणून एक कायमची संस्था असते तशी हिंदुस्थानांत कांहीं तरी व्यवस्था झाली पाहिजे.

इंग्लिश लोक इकडे परकीय आहेत. त्यांना लोकांच्या मनांत इंग्लिश लोकांविषयीं व इकडील सर्व राज्यकारभाराविषयीं काय वाटत असतें हें समजण्याचा संभव नसतो. लोकांचीं मतें सामान्यतः वर्तमानपत्रांत प्रतिबिंबित होत असतात हें खरें, पण तीं नेहमींच विश्वास ठेवण्यासारखीं असतात असें नाहीं. अशा स्थितींत हिंदुस्थान देशांतील राजकारणी लोकांनीं वर्षांतून एक वेळ एके ठिकाणीं जमून राज्यकारभारांत कोठें काय चुकतें हें जरूर दाखवावें व त्या कारभाराला लोकांच्या इच्छेप्रमाणें वळण देण्याचा प्रयत्न करावा.

ह्यूमसाहेबांची प्रथम सूचना अशी होती कीं, अशी सभा प्रथम मुंबई इलाख्यांत भरवावी व तिचे त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नरसाहेब लॉर्ड रे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें. पण ही सूचना डफरीन साहेबांनीं मान्य केली नाहीं. ते म्हणाले कीं, सभेंत जर सरकारी धोरणावर टीका होणार—आणि अशी टीका जरूर झाली पाहिजे—तर अध्यक्ष खुद्द इलाखाधिपतिच असल्यास ती टीका निर्भीडपणाची होणार नाहीं. याप्रमाणें डफरीन साहेबांचा सल्ला मिळतांच ह्यूमसाहेबांनीं तो सर्व प्रांतांतील पुढाऱ्यांस कळविला व नाताळांत पुण्यास सभा भरविण्यांत यावी असें नक्की ठरलें.

पण पुढें दुसरीच कांहीं अडचण उपस्थित होऊन राष्ट्रीय सभेचें पहिलें अधिवेशन जें पुण्यास व्हावयाचें ठरलें होतें तें बदलून सभा मुंबईस भरविण्यांत आली. पुण्याचा बेत एकदम बदलून सभा मुंबईस भरविण्याचें आयत्यावेळीं ठरल्यामुळें मुंबईच्या लोकांची जरा धांदल उडाली. तरी त्या मंडळींनीं शक्य तितकी खटपट केल्यामुळें मुंबईस गवालिया टँकवरील गोकुळदास तेजपाल यांच्या संस्कृत पाठशाळेच्या दिवाणखान्यांत ता. २८–१२–८५ रोजीं राष्ट्रीय सभेची पहिली बैठक सुरू झाली. ही

बैठक यशस्वी रीतीनें पार पाडण्याचे कामीं तेलंगांनीं जेवढी मेहनत घेतली तेवढी दुसऱ्या कोणीच घेतली नसेल असें सर दिनशा वाच्छा यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे.

लॉर्ड रिपन साहेबांच्या उदार धोरणामुळें हिंदी लोकांच्या मनांत नवीन राजकीय आकांक्षा उत्पन्न झाल्या हें पाहून कित्येक सरळ मनाच्या इंग्लिश लोकांना देखील समाधान वाटलें. ह्यूम साहेब तर राष्ट्रीय सभेचे जनकच असल्यामुळें ते प्रथमपासून हजर होतेच, पण बाकी तशा युरोपीयन लोकांपैकीं प्रि. वर्डस्वर्थ, सर विल्यम वेडर्बर्न, जस्टिस जार्डीन वगैरे मंडळींनीं पहिल्याच दिवशीं बैठकीस हजर राहून आपली सहानुभूति व्यक्त केली. असो. सभेच्या अध्यक्षस्थानीं बाबू उमेश्चंद्र बानर्जी ह्यांची योजना झाली होती.

सभेंत अनेक ठराव पास झाले. त्यांपैकीं तिसरा कायदेकौन्सिलें सुधारण्याबद्दलचा ठराव सभेपुढें ठेवण्याचें काम तेलंगांकडे आलें होतें. त्यांनीं तो ठराव सभेपुढें मांडतांना जें भाषण केलें त्यांत त्यांनीं बऱ्याच महत्वाच्या गोष्टींचा ऊहापोह केला. त्यांत मुख्यतः—

१. कायदेकौन्सिलांत लोकांनीं निवडलेले लोक असावे; २. सरकारचें वार्षिक जमाखर्चाचें अंदाजपत्रक कौन्सिलपुढें ठेवून त्यावर सभासदांना वादविवाद करूं द्यावा; ३. सभासदांना राज्यकारभारासंबंधीं प्रश्न विचारावयास मुभा असावी; इतक्या गोष्टींचें विवेचन केलें होतें. कदाचित् कायदेकौन्सिल व सरकार यांमध्यें विरोध उत्पन्न झाल्यास प्रकरण विलायतेंत पार्लमेंटपुढें जावें असें तेलंगांचें मत होतें. याकरितां हाउस ऑफ् कॉमन्सची एक स्टँडिंग कमिटी असावी व इकडील कौन्सिलास सरकाराविरुद्ध कांहीं बाबतींत अपील करावेंसें बहुमतानें वाटल्यास तें त्या स्टँडिंग कमिटीपुढें जावें. त्या कमिटीचा निकाल कायमचा समजण्यांत यावा.

याच कारणाकरितां लंडन येथील " India Council " बंद करावें असें तेलंगांचें स्पष्ट मत होतें. तें कौन्सिल मूळ स्थापन करण्यांतला सरकारचा हेतु कोणताही असला तरी त्याचा इकडील राज्य-कारभारांत कोणतीही सुधारणा करण्याच्या कामीं कांहीं एक उपयोग होत नसतो असा अनुभव आहे. हल्लीं वास्तविक त्या कौन्सिलांत लॉर्ड मॉर्ले यांच्या वेळेपासून कांहीं हिंदी सभासदांच्या नेमणुका होत असतात ही गोष्ट खरी, परंतु सर्व सत्ता एका स्टेट सेक्रेटरीच्याच हातीं कायद्यानें ठेवलेली असल्यामुळें अशा हिंदी सभासदांचा उपयोग फारच थोडा होत असतो; किंबहुना मुळींच होत नसतो. लॉर्ड बर्कनहेड यांनीं तर आपल्या कौन्सिलमध्यें काम करीत असणाऱ्या डॉ. परांजपे यांना एका प्रसंगीं ओळखलेंही नाहीं ! फक्त लॉर्ड मॉर्ले सारखा किंवा मँटेगूसारखा एकादा उदारमनस्क व दृढ निश्चयाचा सेक्रेटरी ऑफ स्टेट असला तरच कांहीं तरी आशा बाळगण्यास जागा असते. एऱ्हवीं त्या लंडनच्या कौन्सिलचा– हिंदी सभासद असोत वा नसोत–कांहीं एक उपयोग होत नाहीं. ही गोष्ट लक्षांत आणूनच तेलंगांनीं तें कौन्सिल काढून टाकावें असें जोरानें प्रतिपादन केलें. हें तेलंगांचें भाषण पंचेचाळीस वर्षांपूर्वीं झालें होतें. लंडन येथील कौन्सिल अद्यापि जशाचें तसें आहे !

सन १८८६ सालची राष्ट्रीय सभा कलकत्त्यास शेट दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं झाली, व सन १८८७ ची राष्ट्रीय सभा मद्रासेस मिस्टर बद्रुद्दीन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. पण त्या दोन्ही सभांना तेलंगांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हजर राहतां आलें नाहीं. सन १८८८ सालीं चवथी राष्ट्रीय सभा अलाहाबाद येथें झाली. तिच्या अध्यक्षस्थानीं मिस्टर जॉर्ज यूल या नांवाचे युरोपीयन गृहस्थ यांची योजना झाली होती. या राष्ट्रीय सभेस काशीनाथपंत तेलंग हे हजर होते

व त्यांनीं कायदे कौन्सिलें सुधारण्याबाबतचाच ठराव सभेपुढें मांडतांना एक अत्युत्तम भाषण केलें.

या पूर्वींच्या चार वर्षांत राष्ट्रीय सभेसंबंधानें लोकमतांत बराच फरक झाला होता. त्यामुळें सभेविरुद्ध प्रतिकूल अशी बरीच टीका झाली होती. कांहीं युरोपीय लोकांना असली राजकीय चळवळ नको होती. अर्थात् त्यांतील कांहीं बड्या लोकांनीं राष्ट्रीय सभेविरुद्ध भाषणें करावीं यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नव्हतें. दुसरें, कांहीं विघ्नसंतोषी लोकांनीं राष्ट्रीय सभेच्या कामांत अडथळे उत्पन्न करण्याचे व लोकांत फूट पाडण्याचेही प्रयत्न केले. कित्येक लोकांनीं पारशी लोकांना फोडण्याचे प्रयत्न करून पाहिले. पण शेट दादाभाई, फेरोजशहा मेथा, दिनशा वाच्छा वगैरे मंडळी प्रथमपासूनच राष्ट्रीय सभेस मिळालेली असल्यामुळें सदरील विघ्नसंतोषी लोकांना पारशी लोकांच्या बाबतींत यश आलें नाहीं. मग त्यांनीं मुंबईच्या मुसलमान लोकांना फोडून राष्ट्रीय सभेस कमकुवतपणा आणण्याचा यत्न केला. पण त्यांपैकीं बद्रुद्दीन तय्यबजी, रहिमतुल्ला सयानी, अबदुल्ला धरमसी वगैरे मुसलमान पुढारी मूळपासूनच राष्ट्रीय सभेचे पुरस्कर्ते असल्यामुळें त्याही बाजूनें विघ्नसंतोषी लोकांस यश आलें नाहीं. याप्रमाणें अशा लोकांचे खोडसाळपणाचे प्रयत्न मुंबईच्या बाजूस झालेले सगळे फसून राष्ट्रीय सभेचें काम अधिक जोरानें चाललें.

पण उत्तर हिंदुस्थानांत मात्र मुसलमान लोकांचा भरणा फार असल्यामुळें त्यांपैकीं कांहीं लोक—सर सय्यद अहमद सारखे—वरील सारख्या विघ्नसंतोषी लोकांच्या जाळ्यांत सांपडले व ते राष्ट्रीय सभेविरुद्ध बोलूं लागले. कांहीं युरोपीयन बडे अंमलदार तर विरुद्ध पक्षांत होतेच होते. त्यांपैकीं सर ऑकलंड कॉल्विन हे प्रथम व्हाइसरॉयाच्या कौन्सिलचे एक

सभासद होते व मग ते संयुक्त प्रांताचे लेफ्टेनंट गव्हर्नर झाले होते. त्यांनीं मागें ( १८८४ ) मिस्टर मलबारींच्या चळवळीच्या वेळीं आपल्या एका पत्रांत हिंदी पुढाऱ्यांना उद्देशून "तुम्ही राज्यकर्त्यांना त्यांनीं कामें कशीं करावीं हें शिकविण्याच्या भरीस पडण्याच्या ऐवजीं आधीं सामाजिक सुधारणा करून तुमचें घर सुधारा" असा उपदेश केला होता. त्यांस तेलंगांनीं सन १८८६ मध्यें मुंबईस एक जाहीर व्याख्यान देऊन सणसणीत उत्तर दिलें होतें. त्याच साहेब बहादुरांनीं पुढें ( सन १८८८ मध्यें ) राष्ट्रीय सभेविरुद्ध टीका केली. त्यावेळींही त्यांना तेलंगांनींच उत्तर दिलें. पण त्याहीपेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे खुद्द व्हाइसरॉय साहेब लॉर्ड डफरीन यांनीं त्या सालीं—१८८८—एका प्रसंगीं राष्ट्रीय सभेवर टीका केली. या लाट साहेबांच्या टीकेस तेलंगांनींच अलाहाबादेच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं आपल्या भाषणांत उत्तर दिलें. हीं दोन भाषणें १८८६ मधलें मुंबईंत दिलेलें व्याख्यान व १८८८ मधलें राष्ट्रीय सभेंतलें भाषण—फार महत्वाचीं असल्यामुळें त्यांचा थोडक्यांत सारांश पुढील प्रकरणांत देऊं. पण सदहू लॉर्ड डफरीनची टीका कांहीं समंजस व उदारधी युरोपीयन लोकांस देखील आवडली नाहीं. सन १८८८ मधल्या राष्ट्रीय सभेचे ( अलाहाबादेच्या ) मिस्टर जॉर्ज यूल हे अध्यक्ष होते हें मागें सांगितलेंच आहे. त्यांनीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या आपल्या भाषणांत लॉर्ड डफरीन यांच्या टीकेचा निषेध केला होता. फार काय, पण लॉर्ड डफरीन यांच्या टीकेची बातमी विलायतेंत पोंचतांच खुद्द ग्लॅडस्टन साहेबांनीं देखील त्या टीकेविषयीं आपली नापसंती व्यक्त केली होती. असो. इकडे मुद्याची गोष्ट सांगावयाची म्हणजे ही कीं, त्या भर चळवळीच्या काळांत बड्या बड्या युरोपीयन अधिकारी लोकांनीं हिंदी लोकांनीं चालविलेल्या राजकीय चळवळीवर केलेले हल्ले काशीनाथपंत

तेलंगांनीं मोठ्या बाणेदारपणानें त्यांना मुद्देसूद उत्तरें देऊन परतविल्यामुळें त्यांनीं त्या चळवळीच्या बाल्यावस्थेंत देशाची अत्यंत महत्वाची कामगिरी केली यांत शंका नाहीं. असो. पुढें सन १८८९ सालीं तेलंगांची हायकोर्ट जज्जाच्या जागीं नेमणूक झाल्यामुळें त्या सालच्या राष्ट्रीय सभेस "लोकांचे एक प्रतिनिधि" म्हणून ते हजर राहूं शकले नाहींत. प्रेक्षक म्हणून ते हजर राहिले होते.

काशीनाथपंत तेलंग यांनीं मुंबईच्या कायदेकौन्सिलमध्यें व मुंबईच्या मुनिसिपालिटीमध्यें कांहीं वर्षें महत्वाचें काम केलें. मागें एकवार सांगितल्याप्रमाणें सन १८८४ मध्यें सर जेम्स फर्ग्युसन ( मुंबईचे गव्हर्नर ) यांनीं तेलंगांची कायदेकौन्सिलमध्यें नेमणूक केली. मुंबई यूनिव्हर्सिटीचे पदवीधर कायदेकौन्सिलचे सभासद झाले असें तेलंगांचेंच पहिलें उदाहरण होतें. मेथा, रानडे, बद्रुद्दीन हे मागाहून सभासद झाले. तेलंगांची दोन वर्षांची मुदत संपल्यावर लॉर्ड रे यांनीं त्यांना पुन्हां दोन वेळां नेमलें. असा मान फारच थोड्यांना मिळतो. याप्रमाणें तेलंग कौन्सिलचे सन १८८४ पासून १८८९ पर्यंत सभासद होते. १८८९ मध्यें त्यांना जज्जाची जागा मिळतांच त्यांनीं कौन्सिलमधील आपल्या जागेचा राजीनामा दिला. असो. तेलंग हे कौन्सिलचे सभासद होते त्या मुदतींत बरेच कायदे पास झाले. पण त्यांत "लँडरेव्हिन्यु" दुरुस्तीचा कायदा, मुंबईच्या शहर म्युनिसिपालिटीचा कायदा, खेडेगांवांतील आरोग्य राखण्याची व्यवस्था करण्याबाबतचा ( Village Sanitation ) कायदा व मिठाचा कायदा हे मुख्य होते. यांपैकीं प्रत्येक कायद्याच्या मसुद्यावरील वादविवादांत तेलंगांनीं भाग घेतलेला असून त्यांत त्यांचें नोकरशाहीची सत्ता कमी करून ती लोकांच्या हातांत देण्याकडे नेहमीं धोरण असे. इतकेंच नव्हे, तर ते आपलें म्हणणें कौन्सिलपुढें मांडतांना सरकारी

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय

बड्या अधिकाऱ्यांच्या निर्भीडपणानें चुका दाखविण्यास यत्किंचित्‌ही कमी करीत नसत.

मुंबई म्युनिसिपालिटीच्या कायद्याच्या वेळीं तर त्यांनीं केलेल्या कामगिरीचें मोठें महत्व होतें. मूळ त्या कायद्याचा मसुदा हा त्या वेळचे म्युनिसिपल कमिशनर सर चार्लस ऑलिव्हँट यांच्या सल्ल्यानेंच तयार झालेला असल्यामुळें त्याची सर्व रचना अत्यंत अनुदारपणाची व पिछेहाटीची दर्शक अशी होती. ही गोष्ट बिलाच्या प्रथम वाचनाच्या वेळींच तेलंगांच्या मुद्देसूद व निर्भीड टीकेवरून स्पष्ट झाल्यामुळें लॉर्ड रे यांनीं तें बिल सिलेक्ट कमिटींत पाठविण्यांत येतांच त्याची योग्य सुधारणा करण्याचें काम तेलंग व मेथा यांजवरच सोंपविलें. रे साहेबांनीं फेरोजशहा मेथा यांची कौन्सिलमध्यें थोड्या दिवसांपूर्वीं नेमणूक केलीच होती. तेव्हां त्यांची व तेलंगांची त्या लाट साहेबांनीं सिलेक्ट कमिटींत नेमणूक केल्यामुळें त्यांना सदरील कायद्यांत वाटतील तशा सूचना करून आपल्या इच्छेप्रमाणें कायद्याचें स्वरूप बदलून घेतां आलें. या वेळीं तेलंग व मेथा या दोघांनीं केलेली कामगिरी चिरसंस्मरणीय होती. व मुंबईच्या म्युनिसिपालिटीचें सबंध हिंदुस्थानांत जें एवढें अद्वितीयत्व प्रस्थापित झालें आहे, त्याचें बहुतेक सर्व श्रेय तेलंग आणि मेथा यांचें होतें.

तेलंग हे मुंबई म्युनिसिपालिटीचे प्रथम "जस्टिस ऑफ धी पीस" च्या तर्फे व मग गिरगांव वॉर्डतर्फे असे (१८८३ ते १८८९) पांच वर्षें सभासद होते. त्याच मुदतींत ते स्कूल्स कमिटीचेही सभासद असल्यामुळें मुंबईंतील प्राथमिक शिक्षणाच्या सुस्थितीचें श्रेय तेलंगांना दिलें पाहिजे असें सर रेमंड वेस्ट यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे.

सन १८८९ सालीं तेलंगांची हायकोर्ट जज्जाच्या जागीं नेमणूक झाली हें मागें सांगितलेंच आहे. तरी त्यांचे इतर सार्वजनिक व्यवसाय

चालूच होते. फक्त ते जज्ज झाल्यामुळें शिस्तीच्या दृष्टीनें एकाद्या राजकीय सभेंत उभें राहून त्यांना जाहीर रीतीनें भाषण करतां येत नसे. बाकीचे त्यांचे उद्योग चाललेच होते. जज्ज झाले त्या वेळीं त्यांची प्रकृति नीटशी नव्हती. ते सन १८९३ मध्यें वारले त्याच्या पूर्वीं एक वर्षभर ते आजारीच होते. तरी मधल्या दोन ( १८९० व १८९१ ) वर्षांत त्यांनीं बरींच सार्वजनिक कामें केलीं. सन १८९० मध्यें एल्फिन्स्टन हायस्कूल मधील ग्यादरिंगच्या वेळीं त्यांचें एक महत्वाचें भाषण झालें. त्याच सालीं त्यांचा कै. यशवंतराव रानडे वगैरे मंडळींबरोबर महत्वाच्या राजकीय व सामाजिक विषयांवर झालेला पत्रव्यवहार त्या वेळच्या टाइम्स वगैरे पत्रांत प्रसिद्ध झाला आहे. त्या वेळचा खरा प्रकार असा होता. कांहीं लोकांना फक्त राजकीय चळवळ पाहिजे होती. सामाजिक तितकी नको होती. या वर्गांतले लोक राजकीय बाबतींत पुढें पुढें धांवत जाण्यास पाहात असत व सामाजिक बाबतींत मात्र केवळ उलट दिशेनेंच त्यांना जावयाचें नसलें तरी होते तेथेंच ते राहाण्यास उत्सुक असत. याच विचारसरणीची छाया सदहू रानडे यांच्या पत्रव्यवहारांत दृष्टीस पडत होती. तेलंगांचें त्यांना मिळालेलें उत्तर नेहमीं सारखेंच समतोलपणाचें व दूरदृष्टीचें दर्शक असें होतें. देशाची प्रगति ही फक्त राजकीय दिशेनेंच होऊन सामाजिक स्थिति होती तशीच राहावी असें त्यांचें केव्हांच मत नव्हतें. त्यामुळें राजकीय चळवळ चालू राहावी व तशीच सामाजिक सुधारणेचीही पण चळवळ चालू राहावी असें त्यांना वाटत असे, व त्या धोरणाला अनुसरूनच तेलंगांचें रानड्यांना उत्तर होतें.

सन १८९१ मध्यें संमतिवयाचा वाद निघाला व त्यांत तेलंगांनीं महत्वाचें काम केल्याचें विवेचन मागील एका प्रकरणांत आलेंच आहे. त्याच सालीं एल्फिन्स्टन कॉलेजांत दुसरें ग्यादरिंग झालें त्या वेळीं डॉ,

कीर्तिकर यांचें निबंधवाचन झालें. त्या प्रसंगीं तेलंगच अध्यक्ष होते. कीर्तिकरांचा सर्वच प्रकार सुधारकांप्रमाणें असे. पण ते वेळीं अवेळीं कोणत्याही कारणानें असो—जुन्याचीच तरफदारी करीत असत व सुधारकांना दोष देत असत. तेलंगांचा सगळाच कारभार उघडा आणि सरळ होता. त्यांना देशाची प्रगति हवी होती व म्हणून त्यांची नजर जुन्याला न सोडतां पुढें जाण्याकडे असे. कीर्तिकरांची—त्यांच्या निबंधाच्या दृष्टीनें—नजर अगदीं मागें वळलेली नसली तरी आहे तीच सामाजिक स्थिति कायम राखण्याकडे होती. हें धोरण तेलंगांना पसंत कसें पडेल? अर्थात् त्यांनीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत आपला मतभेद सुंदर रीतीनें व्यक्त केला.

तेलंगांनीं सन १८९२ सालीं एक " Gleanings from Maratha Chronicles " या विषयावर निबंध लिहिला होता. पण या संबंधाचें विवेचन मागील एका प्रकरणांत आलेंच आहे. सन १८९३ मध्यें तेलंग स्वर्गस्थ झाले !

---

प्रकरण बारावें.

## भाषणें.

—०—

काशीनाथपंत तेलंग यांच्या वेळीं सार्वजनिक कामांत ते एक उत्तम वक्ते होते अशी त्यांची प्रसिद्धि होती. त्यामुळें त्यांचीं कांहीं भाषणें इकडे देणें इष्ट वाटतें. वस्तुतः वक्तृत्व हें ऐकावयाचें असतें. त्याची कल्पना वक्त्याचीं भाषणें वाचून येणें शक्य नाहीं. परंतु एकाद्या भाषणावरून वक्त्याचे ठिकाणीं असलेले अनेक गुण व्यक्त होत असतात. त्याचें भाषाप्रभुत्व, विषयाची मांडणी, बोलण्याची पद्धत, त्याचें विस्तृत वाचन वगैरे

अनेक गुण भाषणें वाचल्यापासून देखील समजण्यासारखे असतात. तेलंगांच्या वक्तृत्वाचा आणखी एक विशेष असे. ते आपलीं भाषणें पूर्वी मुळींच तयार करीत नसत किंवा लिहूनही काढीत नसत. ते आपणांस काय बोलावयाचें हें मनाशीं योजून ठेवीत असत व ते एकदां बोलण्यास उभे राहिले म्हणजे त्यांना विषयाला व प्रसंगाला योग्य अशी भाषा व शब्दयोजना सहज सुचत असे. त्यामुळें त्यांचीं सगळींच भाषणें ऐकण्यासारखीं असत. तीं एकत्रित केल्यास एक मोठा ग्रंथ सहज होईल. पण इकडे तसें करतां येणें शक्य नाहीं. म्हणून आम्ही इकडे फक्त त्यांच्या तीन अत्यंत महत्वाच्या भाषणांचा अगदीं थोडक्यांत सारांश देण्याचें योजिलें आहे. एक, तेलंगांचें "इल्बर्ट" बिल वरील भाषण; दुसरें, "सामाजिक सुधारणा आधीं कीं मग!" या विषयासंबंधानें सर ऑकलंड कॉल्विन यांना दिलेलें व्याख्यानरूपानें उत्तर; व तिसरें, अलाहाबादेच्या राष्ट्रीय सभेच्या प्लॅटफॉर्मवरून लॉर्ड डफरीन साहेबांस दिलेलें उत्तर. हीं तिन्ही भाषणें तेलंगांच्या उत्तमोत्तम भाषणांत गणलेलीं आहेत.

सन १८८३ मध्यें "इल्बर्ट" बिलामुळें हिंदुस्थान मधील युरोपीयन लोकांनीं जेव्हां मोठी चळवळ चालविली होती व त्यांनीं लॉर्ड रिपन साहेबांविरुद्ध व नेटिव्ह सुशिक्षित लोकांविरुद्ध कडक टीका केली, त्यावेळीं देशांत ठिकठिकाणीं सभा भरविल्या जाऊन युरोपीयन लोकांच्या कृतीचा निषेध करण्यांत आला होता. तशी एक सभा मुंबईस टाउन हॉलमध्यें भरविण्यांत आली होती. त्यावेळीं, तेलंग, मेथा व बद्रुद्दीन या तिघांचीं भाषणें झालीं होतीं. त्या चळवळींत युरोपीयन लोकांच्या बाजूनें मोठमोठ्या लोकांनीं भाग घेतला होता. त्यांत एक सर फिट्स जेम्स स्टीफन या नांवाचे गृहस्थ होते. हे पूर्वी हिंदुस्थानांत एक बडे अंमलदार होऊन गेलेले असून त्यांनीं कायदे शास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिलेले होते. म्हणजे ते एक उत्तम विद्वान् व

कायदेपंडित म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं त्या चळवळीच्या वेळीं वर्तमानपत्रांतून एक पत्र प्रसिद्ध करून त्यांत लॉर्ड रिपन साहेबांवर थोडेसे शिंतोडे उडवून सुशिक्षित नेटिव्हांची भरपूर निंदा केली होती. काशीनाथपंत तेलंगांनीं आपल्या भाषणांत वरील सर फिट्स जेम्स स्टीफन साहेबांच्या कोटिक्रमांचें दोषाविष्करण करून त्यांना सणसणीत उत्तर दिलें.

कित्येक युरोपीयन लोकांनीं त्या वेळीं बोलण्याच्या व लिहिण्याच्या भरांत " बंगाली लोक हे युरोपीयन लोकांविषयीं मनांत वैरभाव बाळगीत असून ते त्यांचा फार द्वेष करीत असतात !" असें म्हटलें होतें. तेलंगांनीं प्रथमच आपल्या भाषणांत, या युरोपीयन लोकांच्या समजुतीला मुळींच आधार नसून ती केवळ त्यांची कल्पना होती, असें आपल्या अनुभवावरून सांगितलें. एज्युकेशन कमिशनच्या निमित्तानें आपण कलकत्त्यास पांच चार महिने राहिलों होतों व त्या मुदतींत अनेक बंगाली पुढाऱ्यांशीं आपणांस संभाषणप्रसंग आलेले होते; पण त्यांच्याठिकाणीं इंग्लिश लोकांविषयीं द्वेषभाव मुळींच दिसून आला नाहीं असें तेलंगांनीं सांगितलें.

तेलंगांनीं मग सर फिट्स जेम्स स्टीफन या गृहस्थांच्या विद्वत्तेविषयीं व त्यांच्या प्रस्तुत विषयावर बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या अधिकाराविषयीं प्रथम सादर उल्लेख करून मग म्हटलें कीं, आपण ( युरोपीयन लोकांप्रमाणें ) कदाचित् बिलांच्या विरुद्ध असतों तरी स्टीफन साहेबांची तरफदारी आपणांस मुळींच कबूल झाली नसती ! त्या साहेबांनीं कांहीं वर्षांपूर्वी " स्वातंत्र्य, समता व बंधुभाव " ( Liberty, Equality and Fraternity ) या नांवाचें एक पुस्तक लिहिलें होतें. त्यांत त्यांनीं आपल्या जातभाईंना हिंदुस्थानांत जवळ जवळ दंडुकेशाही

चालविण्याविषयींच उपदेश केला होता. म्हणजे हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याकरितां ज्या उदार तत्वांचा महाराणी सरकारच्या ( १८५८ सालांतल्या ) जाहीरनाम्यांत उल्लेख केलेला आहे व जीं त्यांत इकडील लोकांस अभिवचनें दिलेलीं आहेत, त्यांच्याविरुद्ध जाण्याबद्दलचा त्या पुस्तकांत स्टीफन साहेबांनीं उपदेश केला होता ! अशा प्रकारची ज्या गृहस्थांची विचारसरणी होती त्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या कोणत्याही कृतीची—ज्या कृतीनें वरील जाहीरनाम्यांतील तत्वांचें समर्थन होत असेल त्याची—तरफदारी केली तरी ती अडचणीची—embarrassment—व अनर्थकारकच होईल ! पण हें स्टीफन साहेबांचें सामान्य धोरण झालें. खुद्द इल्बर्ट बिलाविरुद्ध त्यांचें म्हणणें तरी काय होतें तें आतां पाहिलें पाहिजे. स्टीफन साहेबांचे मुख्य मुद्दे व तेलंगांनीं त्यांना दिलेलीं उत्तरें याचा सारांश असा होता.

स्टीफन साहेबांचा पहिला मुद्दा असा होता कीं, लॉर्ड रिपन यांचें प्रस्तुत बिलावरून व्यक्त होणारें धोरण हें हिंदुस्थानचा राज्यकारभार ज्या पायावर चालवावयाचा आहे त्याला अगदीं विसंगत होतें ! तेलंगांनीं सांगितलें कीं, हें म्हणणें आपणांस कबूल नाहीं. रिपन साहेबांचें राजकीय धोरण हें इकडील राज्यकारभाराकरितां जीं कांहीं पार्लमेंट व स्वतः राणीसाहेब यांनीं उदार तत्वें घालून दिलीं आहेत त्यांला अनुसरूनच होतें. इतकेंच नव्हे, तर तें धोरण प्राचीन काळच्या इतिहासाच्या शिकवणीलाही अनुसरून होतें. प्राचीन रोमन राष्ट्राचा एक इतिहासकार तर असें म्हणतो कीं, रोमन लोकांच्या इतिहासापासून जर कोणता धडा शिकावयाचा असेल तर तो हाच कीं, जेत्या राष्ट्रानें—जिंकलेल्या देशांत आपली सत्ता पक्की व कायम करावयाची असेल—आपले कांहीं विशेष प्रकारचे हक्क असतील ते जित लोकांस दिले पाहिजेत ! हल्लींचे

इंग्लिश लोक अभिमानानें–व तो अभिमान थोडासा स्वाभाविकही आहे– सांगत असतात कीं, आधुनिक कालांतले रोमन लोक आपणच आहोंत व आपलें ब्रिटिश साम्राज्य हेंच हल्लींचें रोमन साम्राज्य होय. ही जर गोष्ट खरी, तर ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं प्राचीन रोमन राज्यकर्त्यांचें अनुकरण करावें असें आम्हीं म्हटलें तर त्यांत कोठें चुकलें ? क्लार्कसन आणि विल्बरफोर्स, ग्लॅडस्टन आणि ब्राइट यांच्या देशबांधवांनीं मेरियस आणि सिल्ला, ट्रायमव्हीर्स आणि सीझर यांच्या देशबांधवांचें अनुकरण करावें– किंबहुना त्यांच्याही पेक्षां चार पावलें पुढें जावें–असें आम्हीं म्हटलें तर त्यांत बिघडलें तें काय ? एक गोष्ट मात्र सत्य आहे. ती ही कीं, त्या रोमन लोकांच्या इतकीही जर ब्रिटिश लोकांनीं आज उदार बुद्धि दाखविली नाहीं, तर मात्र तें ब्रिटिश राष्ट्रास कमीपणाचें आहे असें भावी इतिहासकार चक्क म्हटल्याशिवाय राहणार नाहीं ! ! आणि असा परिणाम झाल्यास त्याबद्दल एक राजनिष्ठ प्रजाजन या नात्यानें आपणांस तरी निदान फार वाईट वाटेल, असें तेलंगांनीं सांगितलें !

स्टीफन साहेबांनीं दुसरा मुद्दा असा पुढें आणला होता कीं, तुम्ही युरोपीयन लोकांचे कांहीं विशेष हक्क काढून घ्या असें म्हणतां तें ठीक आहे. पण तसले कांहीं हक्क हिंदूंना दिलेले नाहींत काय ? मुसलमान लोकांना दिलेले नाहींत काय ? वारसा हक्काचे ( Inheritance ) चे हिंदूंचे कायदे निराळे आहेत; मुसलमानांचे निराळे आहेत; पारशांचे निराळे आहेत. मग युरोपीयन लोकांचे हे निराळे हक्क असले म्हणून काय झालें ? यावर तेलंगांनीं म्हटलें कीं, अशी भलत्याच गोष्टीची भलत्याच प्रकाराशीं तुलना करणें बरोबर नाहीं. स्टीफन साहेबांनीं सांगितलेले सर्व कायदे दिवाणी स्वरूपाचे आहेत, व त्यांत फक्त एका धर्माच्या लोकांशिवाय दुसऱ्या कोणाचा संबंधच नसतो. इल्बर्ट बिलासारखा फौजदारी कायदा

हा सर्वांनाच म्हणजे हिंदु, मुसलमान, पारशी, युरोपीयन वगैरेंना सारखा लागू व्हावयाचा असतो. पण मग त्या कायद्यांतच युरोपीयन लोकांकरितां कांहीं विशेष हक्क कां बरें राखून ठेवण्यांत यावेत ?

स्टीफन साहेबांनीं पुढें म्हटलें होतें कीं, तुर्कस्थान व इतर कांहीं परकीय देश येथें युरोपीयन लोकांकरितां निराळीं कोर्टें स्थापन करण्यांत आलीं आहेत. तेलंगांनीं त्यावर म्हटलें कीं, त्या देशांत युरोपीयन लोकांचें परदेशीय कोर्टापासून संरक्षण करावयाचें असतें. पण हिंदुस्थानांत युरोपीयनांचें संरक्षण त्यांचे खटले एका ब्रिटिश कोर्टापासून काढून दुसऱ्या ब्रिटिश कोर्टाकडे पाठवून केलें जातें ! दोन्ही प्रकारांमध्यें केवढा मोठा फरक बरें ?

स्टीफन साहेब म्हणाले कीं, एकाद्यानें गुन्हा केला तर आपली चौकशी आपल्याच जातवाल्यांकडून व्हावी असें त्याला वाटणें अगदीं साहजिक आहे. तेलंग म्हणाले, होय. पण तशी एकाद्या नेटिव्ह आरोपीलाही इच्छा होईल ! पण त्याबद्दल स्टीफन साहेबांनीं कोणता उपाय सुचविला होता ? त्यांनीं उपाय सुचविला होता. पण तो केवळ हास्यास्पद होता ! ते म्हणाले होते कीं, युरोपीयनांविरुद्ध खटला इंग्रजीमध्यें चालविण्याइतकें नेटिव्ह लोकांचें **इंग्लिश** शिक्षण झालेलें **नसतें** ! व नेटिव्ह आरोपींचे खटले चालविण्याकरितां युरोपीयन कामगारांना **देशी** भाषा शिकविण्याबद्दल सरकारचे प्रयत्न **चाललेले असतात** ! यावर तेलंगांनीं म्हटलें कीं, वरील पैकीं स्टीफन साहेबांचें पहिलें विधान सत्याला अगदीं सोडून होतें, कारण देशी भाषेंत फौजदारी खटला चालविणारा युरोपीयन जर एक मिळाला तर इंग्लिशमध्यें तसे खटले चालविणारे व लायक असे नेटिव्ह निदान शंभर तरी खास मिळतील ! दुसऱ्या विधानाचा हास्यास्पदपणा दाखविण्याकरितां तेलंगांनीं परस्पर एका बंगाल

मधल्या सिव्हिलियनाचाच दाखला दिला. त्या सिव्हिलियन मनुष्यानें कांहीं वर्षांपूर्वी " बाहेरगांवांतलें राहणें " ( Life in the Mofussil ) या नांवाचें एक पुस्तक लिहिलें होतें. त्यांत त्यानें प्रांजलपणें कबूल केलें होतें कीं, आपण जरी बंगाली भाषेंत पास झालों होतों, तरी ती भाषा आपणांस मुळींच येत नव्हती ! स्टीफन साहेबांनीं सांगितलेल्या सरकारच्या प्रयत्नाला कितीसें यश येत असे त्याचा हा एक नमुना आहे ! असो. यापेक्षां स्टीफन साहेबांच्या कोटिक्रमाविषयीं अधिक बोलण्याचें कारण नाहीं असें तेलंग म्हणाले.

त्याच सुमारास दुसऱ्या एका युरोपीयनानें " मराठा " या टोपण नांवानें " टाइम्स ऑफ इंडिया " मध्यें एक पत्र प्रसिद्ध केलें होतें. त्यालाही तेलंगांनीं आपल्या भाषणांत उत्तर दिलें. " मराठा " म्हणाला होता कीं, सुशिक्षित नेटिव्ह हा मुळीं युरोपीयनांचा योग्य न्यायाधीश होऊंच शकत नाहीं. कारण युरोपीयनाच्या हातून एकादा नेटिव्ह कोठें मारला गेला आणि त्या युरोपीयनानें मृत मनुष्याची प्लीहा ( Spleen ) वाढलेली होती अशी सबब पुढें आणली कीं, सर्व नेटिव्ह पत्रें ती सबब नेहमीं खोटीच असते असें म्हणतात आणि तो खरोखरीच खून झाला असें प्रतिपादन करतात. बरें, हें नेटिव्ह पत्रांचें लिहिणें बरोबर नाहीं असें सुशिक्षित लोक कधींच म्हणत नाहींत. त्यावरून त्यांचीं मनें युरोपीयनांविषयीं दूषित झालेलीं उघडच दिसतात, व म्हणूनच ते युरोपीयनांचे योग्य व लायक जज्ज होऊं शकत नाहींत ! यावर तेलंगांनीं म्हटलें कीं, प्लीहा वाढल्याची सबब नेहमींच खोटी असते असें म्हणणाऱ्यांपैकीं आपण नाहीं. केव्हां केव्हां ती सबब खरीही असेल व कित्येक नेटिव्ह पत्रांचें या बाबतींतलें लिहिणें अतिशयोक्तीचेंही असेल. पण एवढ्यावरून " मराठा " नें काढलेला सिद्धांत मात्र बरोबर होता असें सिद्ध होत नाहीं. त्याच्या उलट बाजूस तेलंगांनीं दुसरी एक कोटि

ठेवून दिली ! ते म्हणाले कीं, पुष्कळ युरोपीयन लोक " नेटिव्ह लोक हे नेहमीं खोट्या शपथा घेतात " असें उघड रीतीनें म्हणत असतात. त्यांचा निषेध दुसरे युरोपीयन कधींच करीत नाहींत. म्हणजे " मराठा " च्याच तर्कशास्त्राप्रमाणें युरोपीयन हा नेटिव्हांचा योग्य जज्ज होऊं शकत नाहीं, हें उघडच झालें. पण मग स्थिति कशी झाली ती पहा. इकडे युरोपीयन मनुष्य जज्ज होऊं शकत नाहीं आणि तिकडे नेटिव्ह मनुष्य जज्ज होऊं शकत नाहीं ! मग न्यायदान कसें होणार ? व न्यायखात्यानें करावयाचें काय ?

असो. शेवटीं तेलंगांनीं सांगितलें कीं, आपली बाजू न्यायाची व मजबूत आहे. ती पार्लमेंट पुढें जाऊं द्या. तिकडे योग्य तोच निकाल होईल.

हें तेलंगांचें भाषण उत्तम झालें असें " टाइम्स ऑफ इंडिया " व इतर पत्रें यांनीं नमूद केलें आहे.

सन १८८४ मध्यें मिस्टर मलबारींनीं प्रसिद्ध केलेल्या दोन पत्रकांना कलकत्त्याचे सर ऑकलंड कॉल्विन यांनीं उत्तर दिलें होतें. त्यांत त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, " इंग्लिश राज्यकर्त्यांना त्यांनीं आपलीं कामें कशीं करावीं हें दाखवीत बसण्याच्या ऐवजीं हिंदी लोकांनीं प्रथम आपलें लक्ष सामाजिक सुधारणेकडे वळवावें हेंच अधिक इष्ट आहे. " याबद्दल त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून बराच वाद झाला होता. त्यामुळें विषयाचें महत्त्व लक्षांत आणून त्यावर सन १८८६ मध्यें तेलंगांनीं मुंबईतल्या फ्रामजी कावसजी हॉलमध्यें स्टु. लि. अँड सा. सोसायटीच्या आश्रयाखालीं एक अत्यंत श्रवणीय असें व्याख्यान देऊन सर ऑकलंड कॉल्विन यांना उत्तर दिलें. त्या वेळीं शेट दादाभाई नवरोजी हे अध्यक्षस्थानीं होते.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)

तेलंगांनीं प्रथमच सांगितलें कीं, सुधारणेच्या कामांत तात्त्विक दृष्टीनें राजकीय व सामाजिक असे भेद करतां येत नाहींत. कांहीं प्रश्न असे आहेत कीं, ते सामाजिकही असूं शकतात व राजकीयही असूं शकतात. उदाहरणार्थ, शिक्षण. याचा प्रसार हा राजकीय प्रगतीला अत्यंत पोषक आहे. तसाच तो—विशेषें करून स्त्रीशिक्षणाचा प्रसार—सामाजिक सुधारणेलाही साहाय्यकच आहे. दुसरा, परदेशगमनाचा प्रश्न. तो सामाजिक प्रश्न तर आहेच. पण त्या वेळीं ( १८८५ ) आमच्या देशांतून विलायतेस गेलेल्या राजकीय डेप्युटेशनचा उल्लेख करून तेलंगांनीं म्हटलें कीं, त्या प्रश्नाला राजकीय दृष्टीनेंही महत्त्व आहेच. तिसरी, बालविवाहाची बाब घ्या. त्याला सामाजिक दृष्टीनें तर महत्त्व आहेच. पण त्या बाबतींत कायदा असावा अशी सूचना झालेली असल्यामुळें त्याला राजकीय दृष्टीनेंही महत्त्व येतें. तात्पर्य, खरी स्थिति अशी असल्यामुळें, सुधारणेच्या बाबतींत राजकीय व सामाजिक असे भेद पाडतां येत नाहींत. दोन्ही प्रकारच्या सुधारणा इष्टच आहेत.

त्या वादांतला कॉल्विन साहेबांनीं पुढें आणलेला दुसरा मुद्दा असा होता कीं, घरीं गुलामगिरी आणि बाहेर राजकीय स्वातंत्र्य ह्या गोष्टी परस्परविरुद्ध आहेत. घरीं गुलामगिरी म्हणजे आम्ही बायकांना गुलामाप्रमाणें वागवितों ही. तेलंग म्हणाले कीं, ठीक आहे. पण तुम्ही ज्यांना गुलाम म्हणतां त्या बायकाच आमच्या घरांत खऱ्या मालक आहेत ! " गुलामगिरी " शब्दच वापरावयाचा तर आम्ही सगळेच प्राचीन काळापासून चालत आलेल्या रूढीचे गुलाम झालेलों आहोंत असें फार तर म्हणतां येईल ! ही स्थिति राजकीय स्वातंत्र्याशीं विसंगत आहे असें म्हणतां येत नाहीं.

सर ऑकलंड कॉल्विन यांचा तिसरा मुद्दा असा होता कीं, सामाजिक दृष्टीनें खालच्या पायरीवर असणारें राष्ट्र राजकीय दृष्टीनें उच्च पदावर

असूं शकत नाहीं. निदान तसा इतिहासाचा दाखला नाहीं. तेलंगांनीं विचारलें कीं, या म्हणण्याला आधार काय ? त्याला अन्य देशाचा दाखला मिळत नाहीं. इतिहासाचा नाहीं. इतिहासाचा दाखला मिळतो तो उलट दिशेनें मात्र मिळतो. आमच्या देशांतील सतराव्या शतकांतलें मराठेशाहीचेंच उदाहरण घ्या. त्या वेळची सामाजिक स्थिति हल्लींच्या पेक्षां फारशी भिन्न नव्हती. त्या वेळीं बालविवाह प्रचारांत होते. विधवाविवाह नव्हते. सतीची चाल सार्वत्रिक नसली तरी पुष्कळ ठिकाणीं प्रचारांत होती. स्त्रीशिक्षण अगदीं तुटपुंजें होतें. म्हणजे मलबारींच्या वादाच्या दृष्टीनें त्या वेळची सामाजिक स्थिति अगदीं समाधानकारक नव्हती. तीच राजकीय स्थिति किती चांगली होती हें इतिहासावरून सर्वांनाच माहीत आहे. बरें, त्याच्याही पेक्षां हजार वर्षें मागें जा. तरी तोच प्रकार दिसेल. सातव्या शतकांतील या देशाच्या स्थितीचें हुएनसँग यानें वर्णन करून ठेवलें आहे. त्यावरून त्यावेळची राजकीय स्थिति—उत्तर हिंदुस्थानांत हर्षवर्धन याची कारकीर्द आणि महाराष्ट्रांत पुलकेशीची कारकीर्द—अत्यंत भरभराटीची असून सामाजिक स्थिति हल्लींच्या पेक्षां अधिक समाधानकारक होती असें दिसून येत नाहीं. विधवाविवाहाची चाल त्या काळीं प्रचारांत नव्हती असें हुएनसँग यानें स्पष्ट सांगितलें आहे. म्हणजे कॉल्विन साहेबांच्या दृष्टीनें त्या वेळीं घरीं गुलामगिरी होतीच ! हे हिंदुस्थानच्या इतिहासांतले दाखले झाले. आतां इंग्लंडचा इतिहास पाहा. इंग्लंडच्या इतिहासांत सतरावें शतक अत्यंत भरभराटीचें होतें. हॅलॅम व मेकॉले यांनीं लिहिलेले इतिहास सर्वांच्याच परिचयाचे आहेत. त्या शतकांत राजाची अनियंत्रित सत्ता हळू हळू कमी होत जाऊन लोकसत्ता वाढत गेली हें विश्रुतच आहे. पण त्याच काळांतली इंग्लंडची सामाजिक स्थिति पाहा. याबद्दलचीं मेकॉलेच्या ग्रंथाच्या आधारें फक्त दोनच उदाहरणें देतों. एक स्त्रीशिक्षणाबाबतचें व दुसरें

कुटुंबस्थितीचें–दर्शक. त्यावेळच्या तिसऱ्या विल्यम राजाच्या मेरी राणीचें इंग्लिश भाषेचें ज्ञान पाहा. लॅटिन, ग्रीक वगैरे अभिजात भाषा तर राहोतच. कोणी एकानें राणीला एक बायबलची प्रत नजर केली होती. त्याच्या मुखपृष्ठावर राणीच्या हातचा मारलेला शेरा असा होता: " This book was given the King and I at our crownation " हें राणीचें इंग्लिश ! ह्यापेक्षां आमच्या इकडच्या चवथ्या इयत्तेंतला मुलगा अगर मुलगी खचित अधिक शुद्ध इंग्लिश लिहूं शकेल ! असो. दुसरें उदाहरण पाहा. सामाजिक सुस्थितींतली पहिली गोष्ट म्हणजे पतिपत्नीसंबंध. ही गोष्ट जिकडे चांगली तिकडची सामाजिक स्थिति चांगली हें ओघानेंच सिद्ध होतें. मेकॉलेनें सांगितलें आहे कीं, त्या काळांत इंग्लंडांत चांगल्या सुस्थितींतील कुटुंबांत देखील कांहीं नवरे आपल्या बायकांना निर्दयपणें मारीत असत ! पण ही स्थिति सतराव्या शतकांतली. तेलंगांनीं म्हटलें–हल्लींची स्थिति पाहा. इंग्लंडदेश प्रस्तुत काळीं राजकीय दृष्टीनें अगदीं वैभवशिखरास चढला आहे याबद्दल कोणीच शंका घेणार नाहीं. पण तिकडची सामाजिक स्थिति पाहा. परवां ( १८८५ ) इंग्लंडहून परत आलेल्या डेप्युटेशनपैकीं मिस्टर रामस्वामी मुदलियार यांनीं सांगितलें कीं, इंग्लंडांतील श्रीमंत व गरीब यांमधील संबंध समाधानकारक नाहींत. त्याच वेळीं ( व्याख्यानाच्या दोन दिवसांपूर्वीं ) लंडन येथील हाइड पार्कमध्यें वीस हजार लोकांची प्रचंड सभा भरली होती. त्यांत एकानें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, सामाजिक सुधारणा–म्हणजे इंग्लिश समाजाच्या निरनिराळ्या भागांत समाधानकारक स्थिति उत्पन्न करण्याचे प्रयत्न–लवकर न झाल्यास रक्तपात होईल ! ही स्थिति चांगली असें म्हणतां येईल काय ? त्याच प्रमाणें, मेलेल्या बायकोच्या बहिणीशीं लग्न करण्याबाबतचा ( Marriage with a deceased wife's sister ) प्रश्न घ्या. हा वाद कितीतरी जुना होता ! तो

आतां मिटला आहे. पण तो तेलंगांच्या वेळीं जोरांत होता. आणि त्यांत विरुद्ध पक्षाचे लोक मोठमोठे Bishops, Archbishops (धर्माध्यक्ष) हेच होते. असो. याप्रमाणें जर खुद्द इंग्लंडचीच स्थिति आहे, तर देशाची सामाजिक स्थिति चांगली असली तरच त्याची राजकीय उन्नति होते या कॉल्विन साहेबांच्या म्हणण्याला आधार काय? आणि त्याला इतिहासाचा दाखला तरी कोठें आहे?

तेलंगांनीं स्पष्ट सांगितलें कीं, सामाजिक दृष्टीनें आम्हांमध्यें कांहीं दोष नाहींत असें ध्वनित करण्याचा आपला उद्देश नाहीं. आमच्या सामाजिक स्थितींत बरेच दोष आहेत हें सर्वांनाच कबूल होतें, व ते घालविण्याचे प्रयत्न चालू होतेच. पण ते सगळे दूर होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसावें, राजकीय चळवळ करूं नये असें ठरत नाहीं. सामाजिक बाबींच्या मानानें राजकीय बाबतींत आम्हांला कांहीं गोष्टी अनुकूल आहेत. राजकीय बाबतींत आम्हांस इंग्लिशांसारख्या सुशिक्षित व सुधारलेल्या लोकांशीं कर्तव्य असतें. अर्थात् त्यांचा स्वार्थ नसेल त्या ठिकाणीं त्यांची खात्री करणें सोपें काम असतें. सामाजिक बाबतींत आमचा सगळा संबंध जुन्या मताच्या अशिक्षित व कांहीं अंशीं दुराग्रही समाजाशीं येतो. त्याची समजूत घालणें फार कठीण असतें. राजकीय बाबतींत आम्ही सगळे—हिंदु, पारशी, मुसलमान, ख्रिस्ती—एक होऊं शकतों. सामाजिक बाबतींत तसा प्रकार असणें संभवनीय नाहीं. राजकीय बाबतींत सर्वांचा—विघ्नसंतोषी लोकांना ओळखून चालल्यास—एकोपा होण्याचा अधिक संभव असतो. कारण सुखदुःखें सारखीं, सोयगैरसोयी सारख्या, व गाऱ्हाणीं सारखीं, या कारणसमुच्चयामुळें राजकीय चळवळ ही अधिक यशस्वी होण्याचा संभव असतो. सबब ती जोरानें चालविण्यास हरकतच नाहीं. पण सामाजिक सुधारणेकडेही लक्ष पुरविलें पाहिजे व ती चळवळ चालू ठेविली पाहिजे.

तेलंगांनीं म्हटलें कीं, हिंदी पुढारी सामाजिक बाबतींत कांहींच हालचाल करीत नव्हते असें सर ऑकलंड कॉल्विन यांनीं गृहीत धरलें होतें तें बरोबर नव्हतें. पुढाऱ्यांचे प्रयत्न चालूच होते. पारशी समाजानें दादाभाईच्या पुढारीपणाखालीं सामाजिक सुधारणेच्या बाबतींत बरीच आघाडी मारली होती. हिंदु समाजानें स्टु. लि. अँड सा. सोसायटीच्या साधनानें स्त्रीशिक्षणाप्रीत्यर्थ खटपट चालविलीच होती. मुसलमान समाज मागसलेला असें म्हणतात. पण त्याचेंही लक्ष बद्रुद्दीन तय्यबजीसारख्या पुढाऱ्यांच्या उद्योगामुळें सामाजिक सुधारणेकडे लागलेलें होतें. सारांश, सर ऑकलंड कॉल्विन समजत होते तसे हिंदी पुढारी सामाजिक बाबतींत स्वस्थ बसले नव्हते. ते आपल्या सामर्थ्याप्रमाणें राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न करीत होते. आणि हेंच धोरण इष्ट व हितकर असें होतें. असो. हें तेलंगांचें व्याख्यान सर्वांनाच आवडलें व इंदुप्रकाश, केसरी, नेटिव्ह ओपिनियन वगैरे सर्व पत्रांनीं त्यांची त्याबद्दल स्तुति केली.

राष्ट्रीय सभेविरुद्ध त्याच सुमारास सर ऑकलंड कॉल्विन व व्हाइसरॉय लॉर्ड डफरीन साहेब या दोघांनीं भाषणें केल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्या दोघांनाही तेलंगांनीं ( १८८८ ) राष्ट्रीय सभेंत भाषण करून उत्तर दिलें. तेंही तेलंगांच्या उत्तम भाषणांपैकीं एक होतें. त्याचा सारांश असा होताः

कॉल्विन साहेबांच्या टीकेंतला एकच मुद्दा होता. त्यांनीं म्हटलें होतें कीं, कॉंग्रेसनें कायदे कौन्सिलची सुधारणा सुचविली होती त्यांत नवीन असें कांहींच नव्हतें. ती सुधारणा दुसऱ्यांनीं ( सरकारतर्फे ) कॉंग्रेसचा जन्म व्हावयाच्या पूर्वींच सुचविली होती ! तेलंगांनीं यावर म्हटलें कीं, कॉल्विन

साहेबांनीं जरी राष्ट्रीय सभेचा दोष दाखविण्याच्या हेतूनें वरील उद्गार काढले तरी त्यांत कॉंग्रेसला वाईट वाटण्यासारखें कांहीं नसून उलट तें एक राष्ट्रीय सभेला सर्टिफिकिटच होतें ! कारण एकाद्या सुधारणेची कल्पना एकाच्याच डोक्यांतून न निघतां जर ती पुष्कळांच्या डोक्यांतून निघाली असेल तर तो त्या सुधारणेंतला दोष म्हणण्यापेक्षां तें तिचें गुणदर्शक चिन्हच म्हणणें रास्त होईल !

कांहीं युरोपीयन लोकांकडून, ठिकठिकाणीं दरसाल "सेंट अँड्र्यूज"चा उत्सव पाळला जात असून, त्यांचा मोठा खाना होत असतो, व त्या वेळीं कांहीं भाषणें होतात. तसा तो उत्सव सन १८८८ सालीं कलकत्त्यास साजरा करण्यांत येऊन त्यावेळीं लॉर्ड डफरीन साहेबांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं राष्ट्रीय सभेवर थोडेंसें तोंडसुख घेतलें. वास्तविक राष्ट्रीय सभेची स्थापना साहेबबहादुरांच्या सल्ल्यानेंच झाली होती. तर तिचें काम कसें चाललें होतें हें पाहण्याकरितां त्यांनीं तिचे वार्षिक रिपोर्ट तरी वाचावयाचे होतें. तसें न करतां कोणीतरी राष्ट्रीय सभेविषयीं कांहीं तरी सांगितलेलें खरें मानून डफरीन साहेबांनीं मूळ तें भाषण केलें होतें हें उघडच दिसत होतें. वास्तविक असली घोडचूक करून आपणां स्वतःस उपहासास्पद करून घेणारे डफरीन साहेब खास नव्हते ! पण तशी गोष्ट झाली खरी. डफरीन साहेबांनीं म्हटलें कीं, " कांहीं शहाण्या, देशाभिमानी व राजनिष्ठ लोकांना हल्लीं वाटतें कीं, आपण—एकादेंच पाऊल पुढें टाकण्याच्या ऐवजीं—एकदम एक मोठी उडी घ्यावी ! त्यांचें म्हणणें कीं, हिंदुस्थानांत एकदम लोकसत्ता—जी स्वतः इंग्लंडलाच कित्येक शतकांच्या परिश्रमानें मिळाली आहे ती—सुरू करावी. म्हणजे प्रथम एक प्रातिनिधिक संस्था निर्माण करावी; त्यांत सरकारी कामगार अगदीं थोडे असावेत, मुख्य तिजोरीच्या किल्ल्या—पिशवीच्या दोऱ्या—त्या संस्थेच्या ताब्यांत असाव्या व त्यायोगें तिला ब्रिटिश

श्री. छ. प्रतापसिंह महाराज

सत्ताधारी लोक यांना आपल्या मर्जीप्रमाणें वागविण्यास मिळावें. " यावर तेलंगांनीं सांगितलें कीं, हें सगळें बोलणें अगदीं निराधार होतें. त्यांपैकीं एकाही विधानाला कॉंग्रेसच्या रिपोर्टांत आधार नव्हता. प्रतिनिधि निवडलेले असावे व त्यांचा बजेटवर वादविवाद होऊं द्यावा अशी कॉंग्रेसची मागणी होती, हें खरें, पण कायदेकौन्सिलाचा एकादा ठराव ब्रिटिश सत्ताधारी लोकांना—सरकाराला—पसंत न पडला तर तो त्यांनीं खुशाल फेंटाळून लावावा असें ठरावांत एक स्पष्ट कलम घातलेलें होतें ! व हा असा ठराव एक वेळ नव्हे, दोन वेळां नव्हे तर तीन वेळां पास झालेला होता. असें असतांना डफरीन साहेबांनीं वरील सारखें विधान केलें ! तेव्हां त्यांनीं रिपोर्ट वाचले नव्हते हेंच खरें. त्यामुळें तेलंगांनीं डफरीन साहेबांच्या विधानाला कोणी एकानें केलेल्या खेकड्याच्या व्याख्येची उपमा देऊन त्याचा निराधारपणा उत्तम रीतीनें स्पष्ट केला. ती खेंकड्याची व्याख्या अशी होती:—खेंकडा हा एक तांबड्या रंगाचा मासा असून त्याची गति मागल्या बाजूनें असते. त्याच्यावरचें भाष्य इतकेंच कीं, व्याख्या ठीक आहे, पण खेंकडा हा मासा नव्हे; त्याचा रंग तांबडा नसतो व त्याची गति मागल्या बाजूनें नसते ! हें सांगून तेलंगांनीं म्हटलें कीं, लॉर्ड डफरीन यांची टीका बरोबर असेल, पण इतकेंच कीं कांग्रेसनें लोकसत्ता—जी इंग्लंडलाच कित्येक शतकांच्या परिश्रमानें मिळाली होती ती—कधीं मागितली नाहीं; कौन्सिलमध्यें सरकारी कामगार थोडे असावे असें म्हटलें नाहीं; तिजोरीच्या किल्ल्या संस्थेच्या ताब्यांत असाव्या असें मागणें केलें नाहीं आणि ब्रिटिश सत्ताधारी लोकांनीं संस्थेच्या मर्जीप्रमाणें वागावें असें कोणीं म्हटलें नाहीं ! अशा स्थितींत डफरीन साहेबांच्या विधानाला तेलंगांनीं दिलेली खेकड्याच्या व्याख्येची उपमा किती समर्पक होती बरें ?

डफरीन साहेबांचे आणखी एक दोन किरकोळ मुद्दे होते. पण त्यांचीही गत तीच. त्यांनीं मुळीं राष्ट्रीयसभेचे रिपोर्टच वाचले नव्हते. त्यामुळें त्यांनीं आपल्या भाषणांत असल्या गोष्टी सांगितल्या कीं, ज्यांच्याशीं राष्ट्रीयसभेचा दूरचाही संबंध नव्हता! किंबहुना त्यांनीं कल्पनेनेंच एक संस्था निर्माण करून तिजविषयीं आपल्या भाषणांत इतक्या जोरानें वर्णन केलें असें म्हणण्यासही हरकत नाहीं. फक्त इतकेंच कीं, ती साहेबबहादुरांनीं काढलेली संस्था कांग्रेसच्या लोकांना ऐकूनही माहीत नव्हती! त्यांना तिचें एवढें माहात्म्य होतें ही गोष्ट डफरीन साहेबांचें भाषण वाचल्यानंतरच समजली!! असो.

तेलंगांचें हें भाषण उत्तमच झालें. अलाहाबादेच्या राष्ट्रीय सभेस मिस्टर (नंतरचे सर नारायण) चंदावरकर हजर होते. त्यांनीं एकदां मित्रमंडळींत सांगितलें कीं, तें भाषण करण्यापूर्वीं तेलंगांना विचार करण्याला पुरेशी वेळसुद्धां मिळाली नव्हती. तरी त्यांचें भाषण इतकें उत्तम झालेलें ऐकून आपण आश्चर्यचकित झालों!

---

प्रकरण तेरावें.

## लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी.

काशीनाथपंत तेलंग यांनीं कॉलेजांत असतांनाच आपल्यापुढें कशीं उच्च ध्येयें ठेवण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें तयारी चालविली होती हें मागील एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. आतां त्यांच्या एकंदर चरित्रांत मुख्य लक्षांत ठेवण्यासारख्या कोणत्या गोष्टी होत्या अगर त्यांच्या ठिकाणीं मुख्य गुण कोणते होते हें इकडे थोडक्यांत सांगतों.

पहिली गोष्ट ही कीं, तेलंगांना सार्वजनिक काम करण्याची पहिल्यापासूनच मोठी हौस होती. त्यामुळें ते सन १८७२ मध्यें आपल्या धंद्यास लागल्या दिवसापासूनच जे सार्वजनिक कामांत पडूं लागले ते तीं कामें अगदीं अखेरपर्यंत म्हणजे १८९३ पर्यंत करीत होते. ह्या वीस बावीस वर्षांमध्यें मुंबईच्या सर्व सार्वजनिक चळवळीमध्यें तेलंगांचें अति उच्च स्थान होतें. त्या मुदतींत त्यांनीं जेवढीं भाषणें केलीं तेवढीं जर एकत्रित केलीं, तर सर रेमंड वेस्ट यांनीं एकदां म्हटल्याप्रमाणें, तो एक मुंबईतील सार्वजनिक चळवळींचा तितक्या वर्षांचा इतिहासच होईल ! त्या भाषणांपैकीं कित्येक अशीं आहेत कीं, त्यावरून त्यांना आपल्या देशाबद्दलचा केवढा अभिमान होता, लोकहिताची केवढी कळकळ वाटत होती व त्यामुळें ते जरूर तेव्हां सरकारी लहान मोठ्या अंमलदारांवर कसे निर्भीडपणें टीका करीत असत हें चांगलेंच दिसून येतें. या भाषणांचा खुलासा मागील कांहीं प्रकरणांत आलेलाच आहे. त्यांच्या कामाचें क्षेत्र कोणतेंही असो, राजकीय असो, सामाजिक असो, अर्थशास्त्रीय असो, वाङ्मयात्मक असो, शिक्षणविषयक असो, त्यांच्या कामाचा नमुना एक ! विषयासंबंधानें पूर्ण माहिती मिळवावयाची, प्रतिपक्षाचेंही काय म्हणणें असेल तें ऐकून घ्यावयाचें व एकंदर प्रश्नाचा सर्व दृष्टींनीं व केवळ सत्यशोधनाच्या हेतूनें विचार करावयाचा व शेवटीं अगदीं समतोल मनानें निष्कर्ष काढावयाचा अशी त्यांची रीत असे. विशेषेंकरून प्रतिपक्षाचें दोषाविष्करण करावयाचें असलें म्हणजे तेलंगांचें वक्तृत्व, त्यांचें भाषाप्रभुत्व, त्यांचे ठिकाणीं प्रतिपक्ष्याविषयीं वसत असणारें चित्तौदार्य व त्यांची बिनचूक तर्कपद्धत हे गुण जास्तच खुलत असत. तेलंगांचा " रामायण-होमर " या विषयावरील निबंध घ्या, " खुला व्यापार–संरक्षण " यावरील निबंध घ्या, सामा-

जिक–राजकीय बाबतींसंबंधानें त्यांनीं सर ऑकलंड कोल्विनला दिलेलें उत्तर घ्या किंवा लॉर्ड डफरीन साहेबांचा राष्ट्रीय सभेवरील हल्ला परतविते वेळीं केलेलें भाषण घ्या, तेलंगांच्या ठिकाणचे वरील गुण स्पष्ट रीतीनें झळकल्याशिवाय राहातच नाहींत! अशा त्यांच्या विविधक्षेत्रांतील चळवळीं-मुळें त्यांच्या इतका सार्वजनिक कामें करणारा पुरुष त्या वेळीं मुंबईत दुसरा कोणीच नव्हता असें म्हणत असत!

दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे, कोणत्याही प्रश्नाविषयीं विचार करतांना तेलंग ठेवीत असलेली उदार दृष्टि होय. ते आपला ॲडव्होकेटचा धंदा करीत असतांना किंवा जज्ज या नात्यानें मोठें जबाबदारीचें काम करतांना स्मृत्यादि ग्रंथांचा ते कसा उदार दृष्टीनें अर्थ करून जनतेचें, विशेषेंकरून स्त्रीवर्गाचें–जीवित थोडें तरी सुखमय करण्याचा प्रयत्न करीत असत हें मागील एका प्रकरणांत दाखविलेंच आहे. तीच त्यांची उदार दृष्टि सर्व ठिकाणीं दृष्टीस पडत असे. शाळेंत किंवा कॉलेजांत अभ्यास करीत असतांना ते पारशी, गुजराथी, हिंदु व दक्षिणी हिंदु विद्यार्थ्यांशीं देखील कसे प्रेमळपणानें वागत असत याबद्दलचा त्यांचे सहाध्यायी दलाल व देसाई यांनीं आपला अनुभव नमूद करून ठेविलाच आहे. तोच नमुना त्यांच्या पुढील सार्वजनिक कारकीर्दींत सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांशीं वर्तन ठेवतांना दिसून येत असे. ते जसे आपल्या दक्षिणी हिंदूमध्यें, तसेच गुजराथी हिंदूंमध्यें किंवा पारशी, मुसलमान, युरोपीयन वगैरे अन्य धर्मीय लोकांमध्यें देखील लोकप्रिय असत. तथापि अन्यधर्मीयांशीं तेलंगांचा खाण्यापिण्याच्या बाबतींत मात्र कधींच संबंध येत नसे! काशीनाथपंतांचा मूळचाच अगदीं सात्विक आहार असे. त्यामुळें पारशी–मुसलमान अगर युरोपीयन लोकांशीं त्यांचा खाण्यापिण्याच्या बाबतींत संबंध येणें शक्यच नव्हतें. आणि तें त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें

साहजिक होतें. हिंदु लोकांशीं वागतांना मात्र ते जातींचा किंवा दुसरा कोणताच विचार मनांत आणीत नसत, व सर्वांशींच ते बंधुभावानें वागत असत. युरोपीयन लोकांशीं तेलंग जो वर्तनक्रम ठेवीत असत तो हल्लींच्या दृष्टीनें कित्येकांस विलक्षण वाटेल. कारण लॉर्ड रे, सर रेमंड वेस्ट, सर विल्यम वेडर्बर्न, सर फ्रँक फॉर्ब्स ॲडॅम वगैरे मोठमोठ्या युरोपीयन लोकांशीं तेलंगांचा वरचेवर व निकट प्रकारचा संबंध येत असे, व त्यांचे ठिकाणीं तेलंगांविषयीं फार आदरभाव वसत असे. तो इतका कीं, तेलंगांच्या इतका युरोपीयन लोकांमध्यें त्या वेळीं मुंबईत लोकप्रिय दुसरा कोणीच पुढारी नसे असें म्हणण्यासही हरकत नाहीं ! तरी त्यांचे घरीं चहा घेण्याकरितां किंवा मेजवानीकरितां तेलंगांना जाण्याचा अगर यांच्या घरीं त्यांना येण्याचा कधींच प्रसंग आला नाहीं ! पण याबद्दल युरोपीयन लोकांना कधींच कांहीं वाटत नसे. उलट तेलंगांच्या साध्या राहाणीबद्दल व अगदीं सरळ वर्तनाबद्दल कित्येक युरोपीयन लोकांना त्यांच्याविषयीं अधिकच आदर वाटत असे. त्या वेळचे मुंबई हायकोर्टाचे चीफ जस्टिस सर चार्लस सार्जेंट यांनीं एका सार्वजनिक प्रसंगीं या तेलंगांच्या ठिकाणच्या गुण-विशेषाबद्दल गौरवयुक्त उल्लेख करून उघड रीतीनें सांगितलें होतें कीं, ग्रंथावलोकनानें मिळविलेला पाश्चात्य समाजाशीं दृढ परिचय व पौरस्त्य हिंदु लोकांचा साधेपणा यांचें—किंबहुना पाश्चात्य संस्कृति व पौरस्त्य संस्कृति यांचें योग्य प्रमाणांत—तेलंगांच्या ठिकाणीं झालेलें संमिश्रण पाहून युरोपीयन समाजास त्यांच्याविषयीं विशेष प्रकारचा आदर व समाधान वाटत असे ! प. वा. जमशेटजी दलाल यांनीं एकदां सांगितलें कीं, आपण अहमदाबादेस असतांना तेलंग हे एका प्रसंगीं आपल्या धंद्याकरितां त्या शहरांत आल्या वेळीं आपल्या घरीं पाहुणे म्हणून राहिले होते ! तात्पर्य, तेलंग हे सर्वच लोकांशीं उदार भावनेनें वागत असत. त्यामुळें सर्व जातींच्या समाजांमध्यें त्यांची चहा असे.

हीच उदारदृष्टि तेलंगांची धर्माच्या बाबतींत असे. ते प्रथम प्रथम धर्मभोळेपणानें वागत असत हें खरें, पण पुढें तें सर्व बदललें. तेलंग यांनीं, डॉ. भांडारकरांप्रमाणें किंवा न्या. रानड्यांप्रमाणें प्रार्थनासमाजासारख्या नवीन पंथाचा स्वीकार करून, स्वतंत्रपणें धर्मसंबंधीं प्रतिपादन केलें नाहीं, ही गोष्ट खरी, पण त्यांच्याच प्रमाणें तेलंगांचीं धर्मसंबंधीं उदार मतें असत याविषयीं मात्र शंका नाहीं. त्यांनीं हिंदुधर्मविषयक शांकरभाष्य, भगवद्गीता वगैरे ग्रंथ तर लक्षपूर्वक वाचलेच होते, पण त्यांनीं बायबलचा देखील चांगला अभ्यास केला होता. फार काय, पण त्यांना वर्डस्वर्थची कविता व टॉमस केंपिस याचें "Imitation of Christ" हें पुस्तक, हीं फारच आवडत असत ! ते महंमदी धर्मासंबंधानें आदर व्यक्त करीत असत. ते प्रार्थनासमाजाचे सभासद कधीं झाले नाहींत हें खरें, पण ते समाजांत उपासनेला जात असत ! ते एकदां "थिआसॉफिस्टांच्या परिषदेस" (Convention) हजर राहिले होते. तसेंच ते एकाद्या जुन्या चालीच्या हरदासबोवांच्या वेदान्तपर कीर्तनास देखील जात असत. तात्पर्य, एकदां इंदुप्रकाशानें म्हटल्याप्रमाणें तेलंग हे धर्मभोळेही नव्हते व नास्तिकही नव्हते. त्यांची धर्मासंबंधी उदारदृष्टि असे, व सर्वच धर्मांमध्यें कांहीं ना कांहीं सत्य असतें अशी त्यांची भावना होती. त्यांच्या धर्मसंबंधानें प्रतिपादनांत,

> यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
> तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥
> येऽप्यन्यदेवताभक्ता भजंते श्रद्धयान्विताः ।
> तेऽपि मामेव कौन्तेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥

( जो जो मनुष्य ईश्वराच्या ज्या मूर्तीची पूजा करण्याची इच्छा करतो याची त्याच मूर्तीच्या ठिकाणीं भक्ति मी अचल करतों. जे लोक अन्य

देवतांची श्रद्धेनें भक्ति करतात ते खरें पाहिल्यास माझीच--त्यांचा विधि चुकला तरी--भक्ति करतात. )

हे गीतेंतले श्लोक नेहमीं येत असत. ते स्वतः नित्य स्नानानंतर व भोजनापूर्वी गीतेचा पाठ करीत असत.

याप्रमाणें कोणत्याही विषयासंबंधानें तेलंगांचीं उदार मतें असल्यामुळें ते सर्व प्रकारच्या चळवळी--एक आधीं, व मग दुसरी असें न म्हणतां--बरोबरच चालविल्या पाहिजेत असें प्रतिपादन करीत असत. याच कारणास्तव न्या. रानडे यांनीं एका प्रसंगीं सर्व उदारमतवादी मंडळीस "तेलंगसंप्रदाय" असें नांव दिलें होतें. तेलंग हे दादाभाई, मेथा, बद्रुद्दीन यांच्याबरोबर राजकीय चळवळ करीत असत. भांडारकर व रानडे यांना ते सामाजिक चळवळींत सहाय्य करीत असत. भाऊ दाजी व भांडारकर यांच्याप्रमाणें ते वाङ्मय व संशोधन या क्षेत्रांत काम करीत असत. व युनिव्हर्सिटींत व इतर ठिकाणीं ते युरोपीयन व इतर लोक यांजबरोबर शिक्षणविषयक कामगिरी करीत असत. असा सर्वांगपूर्ण त्यांचा आयुष्यक्रम असल्यामुळें तेलंग हे त्यांच्या हयातींत सर्वच ठिकाणीं हवेत असें वाटावें आणि ते निधन पावतांच त्यांची जागा घेणारा कोणीही हिंदु मुंबईत राहिला नाहीं असे इंदुप्रकाशानें उद्गार काढावे यांत आश्चर्य नाहीं !

तेलंगांच्या ठिकाणीं दुसरे कांहीं गुण लक्षांत ठेवण्यासारखे असत. गुरुजनाविषयीं आदर व विनयशील वर्तन हे तेलंगांमधले विशेष होते. "विद्या ददाति विनयम्" हें वचन तेलंगांच्या बाबतींत अक्षरशः सत्य होतें. रानड्यांसंबंधानें बोलतांना अगर लिहितांना ते नेहमीं "My revered friend and teacher" असें म्हणत असत. भांडारकर व मामा

परमानंद यांच्याविषयीं ते फार आदर बाळगीत असत. भांडारकरांना तर ते नेहमीं "आचार्य" असें संबोधीत असत. असा तेलंगांचा वर्तनक्रम असे तरी तो केवळ अंधश्रद्धामूलक नसे. कोणत्याही बाबतींत त्या पूज्य व्यक्तीशीं तेलंगांचा मतभेद झाल्यास तो ते स्पष्टरीतीनें व्यक्त करीत असत. मिस्टर मलबारींच्या पत्रकांसंबंधीं चाल- लेल्या वादविवादांत रानडे व तेलंग यांजमध्यें कायदा मागण्याच्या बाबतींत मतभेद झाला होता. असो. कै. भीमाचार्य झळकीकर हे अगदीं जुन्या मताचे शास्त्री तेलंगांचे गुरु होते. त्यांच्याविषयीं तेलंगांच्या ठिकाणीं अखेर- पर्यंत आदरभाव वसत असे. तेलंगांच्याच शिफारशीमुळें झळकीकर शास्त्रीबोवांचे गुण त्या वेळच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेस आले व त्यांना "महामहोपाध्याय" ही पदवी देण्यांत आली असें आम्ही ऐकलें होतें.

"सौजन्य" हा एक दुसरा तेलंगांच्या ठिकाणीं विशेष होता. आपल्या विद्यार्थिदशेंत संस्कृत शिकण्याच्या कामीं आपणांस प्रथम कै. श्रीपादराव ठाकूर यांची मदत झाली होती हें तेलंग अखेरपर्यंत विसरले नव्हते. कॉलेजांत असतांना व नंतर तेलंग हे मोठ्या पदवीस चढल्यावर सुद्धां आपल्या बालवयांतील मित्रांना, त्यांना न कळत देखील, कसे हर- एक तऱ्हेनें सहाय्य करीत असत याबद्दल जमशेटजी दलाल व अंबालाल देसाई यांनीं आपले अनुभव नमूद करून ठेवले आहेत. एकदां रा. सा. मंडलिक यांची वरिष्ठ कायदे कौन्सिलांत नेमणूक झाल्यावेळीं कांहीं गैर- समज उत्पन्न झाला होता व त्यांत तेलंगांच्या नांवाचा उपयोग करण्यांत आला होता. ही गोष्ट तेलंगांच्या नजरेस येतांच त्यांनीं मुंबईच्या इंग्रजी वर्तमानपत्रांत स्वदस्तूरचें पत्र लिहून खरा प्रकार काय होता हें सांगितलें व तो गैरसमज दूर केला.

एकदां केसरीनें म्हटल्याप्रमाणें " लोकोपयोगित्व " हा एक तिसरा तेलंगांमध्यें विशेष होता. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतींत तेलंग हे प्रत्यक्ष मदत तर करीतच असत, पण त्यांच्यासंबंधानें त्यांनीं आपल्या एज्युकेशन कमिशनच्या रिपोर्टांत " The poor boys are the very salt of our Schools and Colleges " असा सदय अंतःकरणानें शेरा मारून त्यांना फी–माफीच्या बाबतींत सरकारानें उदार मनानें जरूर मदत केली पाहिजे असें आपलें स्पष्ट मत दिलें होतें. त्याचप्रमाणें एकदां एल्फिन्स्टन कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या बाबतींत कांहीं अडचण उपस्थित झाली असतां तें प्रकरण पुष्कळ दिवस भिजत पडलें होतें. ही गोष्ट तेलंगांच्या नजरेस येतांच त्यांनीं खुद्द लॉर्ड रे यांची गांठ घेऊन ती अडचण तावडतोब दूर केली ! तसेंच, दुसऱ्या एका प्रसंगीं रा. विनायकराव देशमुख हे बी. ए. च्या परीक्षेंत परीक्षकाच्या अनवधानतेमुळें नापास झाले होते. तेलंग त्या वेळीं सिंडिक होते. त्यांच्या नजरेस वरील गोष्ट येतांच त्यांनीं त्या परीक्षकाला त्याची चूक दाखवून देशमुखांना व त्यांच्या बरोबरच तशाच स्थितींत असलेल्या दुसऱ्या विद्यार्थ्यांना पास करविलें ! अशा आणखी किती तरी गोष्टी सांगतां येतील, पण विस्तारभयास्तव तसें आतां करीत नाहीं.

तेलंगांमधले एक दोन दोष त्यावेळीं कांहीं लोक दाखवीत असत. पण त्यांत खऱ्या वस्तुस्थितीपेक्षां अतिशयोक्तीचा–कांहीं तर केवळ कल्पनेचा–अधिक भाग होता ! तेलंग एका प्रसंगीं पुनर्विवाहाच्या वेळीं हजर राहून जेवावयाला राहिले नाहींत, ही गोष्ट खरी, पण त्यांनीं मग कांहीं दिवसांनीं पुनर्विवाहित मंडळीस आपल्या घरीं बोलावून मेजवानी दिली ! त्याचप्रमाणें तेलंगांनीं–त्यांच्या मरणाच्या थोड्या दिवसांपूर्वीं–आपल्या एका आठ वर्षांच्या मुलीचें लग्न केलें होतें. त्याबद्दल पुष्कळांनीं

त्यांच्यांवर कडक टीका केली, पण त्याला कारण फक्त त्यांच्या घरची परिस्थिति ! या घरच्या वडील माणसांच्या अडचणीमुळें आपण आपल्या तत्वाविरुद्ध वागलों असें तेलंगांनीं मग कबूल केलें ! तेव्हां याबद्दल तेलंगांना दोष किती द्यावयाचा याविषयीं निरनिराळ्या प्रकृतीच्या माणसांमध्यें मतभेद होण्याचा संभव आहे. कोणी तेलंगांना दूषण देतील, कोणी दूषण देणार नाहींत !

तेलंग हे साहेब लोकांशीं फार सलगीनें व गोड बोलून वागत असत व म्हणून त्यांची त्या लोकांत इतकी चहा होती असेंही कित्येक म्हणत असत. व ह्यासंबंधांत तेलंगांना–इतरांना सोडून सी. आय. ई. पदवी मिळाली व त्यांना–रानड्यांना टाकून–हायकोर्ट जज्जाची जागा मिळाली या गोष्टींचा उल्लेख करण्यांत येत असे. पण हें म्हणणें अज्ञानमूलक होतें व त्याला कल्पनेशिवाय दुसरा आधार नव्हता ! सी. आय. ई. सारख्या पदव्या सरकार कांहीं विशेष कारणाकरितां देत असतें. वाटेल त्याला किंवा कोणी मागतो म्हणून सरकार त्या देत नसतें. तेलंगांना सी. आय. ई. पदवी त्यांनीं एज्युकेशन कमिशनमध्यें चांगलें काम केल्याबद्दल देण्यांत आली होती. कमिशनच्या बाबतींत त्यांचें दुसऱ्या बड्या युरोपीयन लोकांशीं जमलें नाहीं म्हणून त्यांनीं बाणेदारपणानें एक स्वतंत्र भिन्नमतपत्रक रिपोर्टास जोडून कित्येक साहेब लोकांचें म्हणणें खोडून काढलें होतें ! अशा स्थितींत तेलंगांनीं साहेब लोकांशीं गोड बोलून सदरहू पदवी मिळविली असें कसें म्हणतां येईल ?

तेलंगांना–रानड्यांना टाकून–जज्जाची जागा देण्यांत आली याचीं कारणें निराळीं होतीं. सन १८७० च्या सुमारास पुण्यांत ज्या धामधुमी झाल्या त्यांच्या बुडाशीं रानडे असावेत असा वरिष्ठ सरकारी अधिकारी

लोकांना संशय येऊन जीं त्यांचीं मनें एकदां दूषित झालीं तीं पुढें कित्येक वर्षें तशींच राहिलीं होतीं, आणि हेंच रानड्यांच्या बढतीच्या आड येणारें मुख्य कारण होतें. तेलंगांचें राहणें मुंबईंत व धंदा हायकोर्टांतील युरोपीयन बॅरिस्टर लोकांमध्यें; असा प्रकार मूळपासूनच असल्यामुळें त्यांच्या मार्गांत रानड्यांच्यासारख्या अडचणी मुळींच नव्हत्या. याशिवाय तेलंगांचें एशियाटिक सोसायटीपुढें अगर इंडियन अँटिकरीमध्यें विद्वत्त्वपूर्ण वाङ्मयात्मक निबंध व लेख येत असत. ते व यूनिव्हर्सिटींतील सिंडिकेट मधलें काम यांच्या योगानें त्यांचा मोठमोठ्या युरोपीयन लोकांशीं नेहमींच संबंध येत असे. त्यामुळें त्यांचें युरोपीयन लोकांत चांगलें वजन असे. त्यांचा धंदा तर उत्तम चाललाच होता. या कारणसमुच्चयामुळें जज्जाचे जागेसाठीं तेलंगांची हायकोर्टकडून व लॉर्ड रे यांजकडून शिफारस झाली व त्यांची त्याप्रमाणें नेमणूक झाली.

तेलंगांनीं आपलीं सर्व सार्वजनिक कामें अगदीं निःस्वार्थबुद्धीनें व बाणेदारपणानें केल्याबद्दलचे रानडे, मेथा, वाच्छा वगैरे लोकांचे दाखले तर आहेतच, पण मद्रासचे जॉन ॲडम यांनीं तेलंगांना ( Incorruptible patriot ) " अगदीं निर्दोष असा देशाभिमानी पुरुष " म्हटलें आहे व खुद्द लॉर्ड रे यांनीं त्यांच्या सार्वजनिक उद्योगास ( Disinterested efforts to promote the people's welfare ) निःस्वार्थ बुद्धीनें केलेले प्रयत्न असें म्हटलें आहे. तात्पर्य, घरच्या परिस्थितीमुळें तेलंगांना सामाजिक बाबतींत एक दोन प्रसंगीं आपल्या तत्वाप्रमाणें वागतां आलें नाहीं या एका गोष्टीशिवाय त्यांच्या संबंध सार्वजनिक कारकीर्दींत नांव ठेवण्यासारखें कोणास कांहीं मिळेल असें वाटत नाहीं.

इतर लोक धंद्यास लागून त्यांची सांपत्तिक स्थिति जरा समाधानकारक होऊन त्यांचें ( इच्छा असल्यास ) सार्वजनिक कामाकडे लक्ष लागतें तों

त्यांच्या वयास चाळीस वर्षें सहज होऊन जातात. त्या वयावर तेलंग आपल्या वैभवशिखरास पोंचले होते ! त्यामुळें अल्प काळांत महत्वाचीं सार्वजनिक कामें करून ज्यांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली असें न्या. तेलंगांसारखें महाराष्ट्रांत आधुनिक काळांतलें दुसरें उदाहरण मिळेल असें वाटत नाहीं. पांचवे वर्षी शिक्षणास आरंभ; नववे वर्षी इंग्रजीची सुरवात; चवदावे वर्षी मॅट्रिक; सतरावे वर्षीं बी. ए.; एकोणिसाव्या वर्षी एम्. ए; २० वे वर्षी एल्एल्. बी; २२ वे वर्षी ॲडव्होकेट व सार्व-जनिक कामास आरंभ; ३२ वे वर्षी एज्युकेशन कमिशनचे सभासद व मग सी. आय्. ई.; ३४ वे वर्षी नामदार; एकुणचाळिसावे वर्षी हाय-कोर्टचे जज्ज; ४२ वे वर्षी व्हाइस चान्सेलर; ४३ वे वर्षी मृत्यु ! असलें दुसरें उदाहरण कोठें आहे ?

---

प्रकरण चवदावें.

## कुटुंबाची हकीकत व अखेर.

काशीनाथपंत तेलंग यांचे जनक बापूभाई. त्यांना दोन मुलगे. कृष्णराव व काशीनाथपंत. काशीनाथपंतांचे चुलते त्रिंबकराव. त्यांना पुत्रसंतान नव्हतें. म्हणून त्यांनीं काशीनाथपंतांना दत्तक घेतलें. याप्रमाणें काशीनाथ त्रिंबक तेलंग म्हणून ते पुढें प्रसिद्धीस आले.

बापूभाई व त्रिंबकराव हे दोघेही फॉर्बस् कंपनीमध्यें नोकरीवर होते. पुढें कृष्णरावही तेथेंच नोकरीस लागले.

त्यांचा सर्वांचाच पोषाख अगदीं साधा असे. अंगांत वास्कुट, त्यावर जुन्या तऱ्हेचा अंगरखा व डोक्यास परभी तऱ्हेचें पागोटें हा त्यांचा

पोषाख असे. काशीनाथपंत शाळेंत व कॉलेजांत जात असत तेव्हांपासू-नच पाटलोण व बूट वापरीत असत. अंगांत साधा सदरा, त्यावर फारशी तऱ्हेचा पांढरा कोट (थंडीच्या दिवसांत काळा बनातीचा कोट), गळ्यांत बॅरिस्टरी चष्मा व डोक्यास परभी पागोटें हा त्यांचा पोषाख असे.

घरची सर्व व्यवस्था त्रिंबकराव पाहात असत. काशीनाथपंतांना घरीं कांहींच पाहावें लागत नसे. यांत वस्तुतः त्यांची सोयच होत असे. कारण त्यांना आपला सगळा वेळ धंदा, वाचन व सार्वजनिक कामें यांकडे देण्यास सहज मिळत असे. तथापि कुटुंबांत त्यांचें सर्वांशींच प्रेमळपणाचेंच वर्तन असे. त्यांच्या सर्व खासगी व्यवहारांत एक मुख्य तत्व असे. ते वडील माणसांच्या इच्छेविरुद्ध कधींहि वागत नसत. याबद्दलचीं एक दोन उदाहरणें दिल्यास तीं हल्लींच्या दिवसांत देखील अत्यंत विचारणीय ठरतील असें वाटतें. तेलंग हे सर्व मंडळीसह प्रथम कांदेवाडींतील आपल्या घरांत राहात असत. पुढें बॅरिस्टरी चांगली चालूं लागल्यावर त्यांनीं चौपाटीवरील बंगला विकत घेण्याचें ठरविलें. त्यांनीं ती गोष्ट प्रथम वडिलांना कळविली नव्हती. सर्व व्यवस्था ठरून खरेदी-पत्र व्हावयाचें त्या वेळीं त्यांनीं ती गोष्ट वडिलांस कळविली. त्यांनीं लाग-लींच काशीनाथपंतांना "तूं आणि तुझीं बायकोमुलें जाऊन बंगल्यांत राहा आम्ही इकडेच राहतों" असें उत्तर दिलें! तें ऐकून त्यांना वाईट वाटलें व त्यांनीं म्हटलें, "सर्व माणसें यावयाचीं नसतील तर बंगला मला नको. मीही इकडेच राहीन!" तेव्हां "बरें तर, आम्ही सगळींच नव्या घरांत राह-ण्यास येऊं. खरेदीपत्र कर जा" असें वडिलांनीं म्हटलें. मग काशीनाथ-पंतांनीं नवीन घर घेतलें व तिकडे कुटुंबांतली सर्व मंडळी राहूं लागली.

काशीनाथपंत हे स्वतः इतके शिकलेले, बॅरिस्टरीचा धंदा करणारे व विद्वान् म्हणून प्रसिद्धि पावलेले असे होते, पण ते घर बदलतांना

आपल्या वडिलांच्या संतोषाकरितां पीतांबर नेसून, शेला पांघरून व हातांत घरांतले देव घेऊन जुन्या घरापासून नव्या घरापर्यंत सुमारें मैल दीड मैल उघड्या पायांनीं चालत गेले !

काशीनाथपंतांच्या अखेरच्या दुखण्यांत मोडावर थोडीशी साधी शस्त्र-क्रिया करून घेतल्यास तुम्ही बरे व्हाल अशी डॉक्टरांनीं खात्री दिली असतांना त्यांच्या अंगांतून रक्ताचा एक थेंब बाहेर पडलेला देखील आपल्या आईबापांच्यानें पाहवणार नाहीं म्हणून त्यांनीं शस्त्रक्रिया करून घेतली नाहीं व आपल्यावर मृत्यु ओढवून घेतला !

यावरून तेलंग हे आपल्या आईबापांना न दुखविण्याबद्दल किती जपत असत हें स्पष्ट रीतीनें सिद्ध होतें. असा कर्तव्यतत्पर मुलगा वैभवशिखरास चढलेला वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी—अल्पवयींच—आपल्या देखत गेलेला पाहून त्या वृद्ध आईबापांना काय वाटलें असेल ? त्यांच्या दुःखाचें कोण वर्णन करूं शकेल ? तेलंग हे ता. १ सप्टंबर सन १८९३ रोजीं गेले. त्रिंबकराव पुढें एक वर्षानेंच गेले ! बापूभाई मग गेले.

काशीनाथपंतांना तीन मुलगे व चार मुली इतकीं अपत्यें होतीं. एक मुलगा लहानपणींच मृत झाला होता. मरणसमयीं दोन मुलगे व चार मुली इतकीं हयात होतीं. मुलींचीं लग्नें पूर्वींच झालीं होतीं. मुलगे शिकत होते. काशीनाथपंतांचे वडील चिरंजीव पंढरीनाथपंत हे सर्वदृष्टींनीं त्यांचे सत्पुत्र असे होते. ते दोन वर्षांपूर्वीं मृत झाले. द्वितीय चिरंजीव द्वारकानाथपंत व पंढरीनाथपंतांची मंडळी हीं सर्व माणसें हल्लीं काशीस राहतात. काशीनाथपंतांच्या मुलींपैकीं फक्त हल्लीं दोन हयात आहेत. एक आठवणकरांच्या घरीं दिलेली व दुसरी खोटे यांच्या घरीं दिलेली अशा असून त्या आपापल्या घरीं सुखी आहेत.

श्री निवास ना. कर्नाटकी



तेलंग वारले तेव्हां सर्व इंग्लिश व देशी पत्रांतून दुखवट्याचे लेख आलेच होते. तरी मग मुंबईच्या शेरिफनें बोलावलेली अशी तेलंगांच्या स्मारकाबद्दलची सन १८९३ च्या आक्टोबरमध्यें टाउनहॉलमध्यें सभा भरली. अध्यक्षस्थानीं गव्हर्नर साहेब लॉर्ड हॅरिस हे विराजमान झाले होते. सभेंत रानडे, मेथा, चंदावरकर, मॅकिकन वगैरे गृहस्थांचीं भाषणें झालीं. रीतीप्रमाणें स्मारककमिटी नेमण्यांत आली. वर्गणीची रक्कम सुमारें ४०,००० रुपये जमली. त्यामधून एल्फिन्स्टन कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची इमारत बांधून त्यास " Telang Wing " असें तेलंगांचें नांव देण्यांत आलें. त्याचप्रमाणें पंचमहाल जिल्ह्यांतील गोध्रा शहरांत हायस्कूलची इमारत बांधण्यांत येऊन त्यास त्या वेळच्या कलेक्टरकडून " तेलंग हायस्कूल " असें नांव देण्यांत आलें. पुढें कांहीं वर्षांनीं कै. रा. सा. नारायण विष्णु बापट यांनीं सहा हजार रुपये खर्चून मुंबईच्या यूनिव्हर्सिटींत एम्. ए. परीक्षेंत " इतिहास व तत्वज्ञान " विषय घेऊन पहिल्या नंबरास पास होणाऱ्या विद्यार्थ्याकरितां तेलंगांच्या नांवानें एक सुवर्णपदक ठेविलें आहे. हल्लीं माटुंगा येथें बांधण्यांत आलेल्या सारस्वत ब्राह्मणांच्या वसाहतीच्या इमारतींपैकीं एका इमारतीस " तेलंगां "चें नांव देण्यांत आलें असून त्याच भागांत मुंबई म्युनिसिपालिटीनें तयार केलेल्या एका नवीन रस्त्याला तेलंगांचें नांव देण्यांत आलें आहे. इतकीं तेलंगांच्या नांवानें आतांपर्यंत स्मारकें झालीं आहेत.

— श्री केशव बोमारे —

समाप्त.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं. ९-१२-२०९ ग्रंथानुक्रमांक ५४६७०
किंमत १।- पाने २००

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | ४ | नानाभाइ | नानाभाई |
| ५ | ११ | ह्यांची | त्यांची |
| ६ | ११ | विशाद | विषाद |
| २९ | १ | म्हटलें | म्हटलें कीं, |
| ३१ | १८ | मध्य | मध्यें |
| ४१ | २ | असतात. | असतात, |
| ४४ | ८ | शतकपर्यंत | शतकापर्यंत |
| ६० | ११ व १२ | गॉटहोल्ड | ग्रँटहोल्ड |
| | | Gotthold Ephraim Lessing | ( Granthold Iphrain Lesing ) |
| ६८ | ५ | वेतरेजनाः | वेतरोजनः |
| ७२ | १२ | धर्मज्ञांस | मर्मज्ञांस |
| ७४ | १० | आवडल | आवडलें |
| ९७ | १० | कायम | प्रथम |
| १०७ | ३ | मतें | मनें |
| १४१ | ८ | कितींस ? | कितीसें ? |
| १४७ | २० | वर्गाचें | वर्गानें |
| १५३ | ९ | आल | आलें |
| १७५ | २३ | असेल | असेल तर |
| १८९ | १४ | गुजराथी, हिंदु | मध्यें स्वल्पविराम नको. |

## याच पुस्तककर्त्यांचीं दुसरीं पुस्तकें.

| | किंमत. |
|---|---|
| १ गुरुवर्य डॉ. सर रा. गो. भांडारकर यांचें चरित्र ( कर्त्याजवळ ) | २–८–० |
| २ ना. न्या. का. त्रिं. तेलंग यांचें चरित्र ( मोठें ) | ३–०–० |
| ३ डॉ. भाऊ दाजी लाड यांचें चरित्र ( कापडी ) | १–०–० |
| ,, ,, ( साधी ) | ०-१२-० |

मिळण्याचा पत्ता—

**भारत-गौरव-ग्रंथमाला,**
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.